



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार २६ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४








# आम्ही कुणालाही सोडणार नाही, कठोर कारवाई करणार



## महिला डॉक्टर मृत्यू प्रकरण

आत्महत्येप्रकरणी आम्ही कुणालाही सोडणार नाही. या घटनेत जो कुणी आरोपी असेल त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच, संबधित पोलीस अधिका-यांना कालच निलंबित करण्यात आलं आहे. विरोधकांनी या प्रकरणाचं राजकारण करु नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

**मुंबई/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यातील फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी प्रशांत बनकर याला कोर्टामध्ये हजर करण्यात आलं होतं. अतिरिक्त जिल्हा न्यायालय फलटण यांच्याकडून संशयित आरोपी प्रशांत बनकर याला चार दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानं प्रशांत बनकर याला २८ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्याचदरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी या घटनेबाबत प्रतिक्रिया दिली आहे. ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

सातारा फलटणमधील घटना ही अतिशय दुर्दैवी आणि धक्कादायक आहे. या घटनेत महिला डॉक्टरच्या

**संशयित आरोपी प्रशांत बनकरला पोलीस कोठडी-**फलटण येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालयात सरकारी वकील महाले यांनी सात दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. तर, आरोपी प्रशांत बनकर याचे वकील सुनील भोंगळे ➪(पान २ वर)

# जन्मदात्या बापानेच संपवले आपल्या जुळया मुलींना

**बुलढाणा/प्रतिनिधी :**जिल्ह्यातील अंढेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत धक्कादायक घटना घडली आहे. बापानेच आपल्या दोन जुळ्या मुलींचा गळा कापून हत्या केली आहे. पती पत्नीतील वादातून दुहेरी हत्याकांडाने बुलढाणा जिल्हा हादरला आहे. या घटनेमुळं समाजमन सुन्न झालं आहे. रुई (जि. वाशिम) येथील राहणारा राहुल चव्हाण, जो पुण्यातील एका खासगी कंपनीत काम करतो, याने आपल्या दोन जुळ्या मुलींचा गळा कापून हत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



**प्रवासादरम्यान नवरा-बायको यांच्यात वाद-**पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल चव्हाण आपल्या पत्नी आणि दोन मुलींना घेउन घरच्या दिशेने जात होता. प्रवासादरम्यान नवरा-बायको यांच्यात वाद सुरु झाला. या वादात रागाच्या भरात पत्नीने माहेरी जाण्याचा निर्णय घेतला, तर राहुल आपल्या मुलींसह पुढे निघाला. रागाच्या भरात खामगाव - जालना मार्गावरील अंढेरा फाटा जवळील जंगलात त्याने आपल्या दोन जुळ्या मुलींची गळा कापून निर्दयपणे हत्या केली. या घटनानंतर राहुलने स्वतः वाशिम शहर पोलिस स्टेशनमध्ये जाउन हत्येची कबूली दिली. पोलिसांनी तत्काळ अंढेरा पोलिसांना संपर्क करून प्रकरणाची माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ घटना स्थळ गाठून मृत चिमुकल्यांचे मृतदेह हस्तगत केले आहेत. संपूर्ण परिसरात या घटनेने खळबळ उढाली आहे. सध्या आरोपी राहुल अंढेरा पोलीसांच्या ताब्यात असून पोलीस पुढील चौकशी करत आहेत.

# अभिनेते सतीश शाह यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :**अभिनेता सतीश शाह यांचे शनिवारी दुपारी अडीच वाजता मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. शाह यांचे पार्थिव रुग्णालयात ठेवण्यात आल्याचे त्यांच्या व्यवस्थापकाने सांगितले. रविवारी अंत्यसंस्कार केले जातील. ते ब-याच काळापासून मूत्रपिंडाच्या समस्यांनी ग्रस्त होते आणि नुकतेच त्यांचे मूत्रपिंड प्रत्यारोपण झाले होते. सतीश शाह साराभाई व्हर्सेस साराभाई आणि जाने भी दो यारो सारख्या शोमुळे प्रसिद्ध झाले. ते मैं हूं ना (२००४), कल हो ना हो (२००३), फना (२००६), आणि ओम शांती ओम (२००७) यासारख्या अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये दिसले.२००८ मध्ये, त्यांनी अर्चना पूरण सिंग यांच्यासोबत कॉमेडी सर्कस शोमध्ये न्यायाधीश म्हणून काम केले. २०१५ मध्ये, त्यांना फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) चे फेलो देखील बनवण्यात आले.

सतीश यांना किडनीचा आजार होता. कोलकाता येथे त्यांचे प्रत्यारोपण झाले होते. ते दीड महिना तिथे राहिले आणि पूर्णपणे बरे होउन परतले. जेवण केल्यानंतर अचानक ते कोसळले आणि आज त्यांचे निधन झाले. शनिवारी



सकाळी सतीश शाह यांनी हा सेल्फी काढला, जो त्यांचा शेवटचा ठरला. त्यांनी तो चित्रपट निर्माते विवेक शर्मा यांना पाठवला होता.चित्रपट निर्माते विवेक शर्मा म्हणाले, 'शनिवारी सकाळी मी सतीश शाह यांच्याशी चॅट करत होतो. आम्ही दररोज चॅट करत असायचो, एकमेकांना रील आणि मनोरंजक व्हिडिओ पाठवत होतो.'सतीश शाह यांचे एक जुने सहकारी रमेश होते, जे त्यांच्यासोबत अनेक वर्षांपासून काम करत होते. त्यांनीच त्यांना रुग्णालयात नेले होते.सतीश शाह हे सुमारे दीड वर्षापासून डायलिसिसवर होते. त्यांनी सकाळी मला सांगितले की, आपण नोव्हेंबरमध्ये काम सुरू करू. त्यांनी मला एक सेल्फी पाठवला आणि म्हणाले, 'बघ, मी २०-२२ किलो वजन कमी केले आहे! मी आता खूप देखणा दिसतोय.'सतीश शाह यांचा जन्म मुंबईतील मांडवी येथे झाला. झेवियर्स कालेजमध्ये शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुण्यातील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) मध्ये शिक्षण घेतले. १९७२ मध्ये सतीश यांनी डिझायनर मधु शाह यांच्याशी लग्न केले.सतीश यांनी १९७० च्या बालिवूड चित्रपट भगवान परशुरामपासून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. तेव्हापासून २०१४ पर्यंत त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केले.१९८४ मध्ये 'ये जो है जिंदगी' या टीव्ही शोद्वारे त्यांनी टेलिव्हिजनवर पदार्पण केले. या शोच्या ५५ भागांमध्ये त्यांनी ५५ वेगवेगळ्या भूमिका साकारल्या.

# गोपाळ बदने महिलांची छेड काढायचा, डोळा मारायचा, तक्रार केल्यास पैसे मागायचा

**सातारा/प्रतिनिधी :** सरकारी रुग्णालयातील डॉक्टर तरूणीने एका हॉटेलमध्ये गळफास घेउन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी (ता, २३) रात्री साडेदहाच्या सुमारास घडली. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. आत्महत्येपूर्वी डॉक्टर तरूणीने स्वतःच्या हातावर 'माझ्या मरण्याचे कारण पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने असून, ज्याने चारवेळा माझ्यावर अत्याचार केला, तसेच प्रशांत बनकर याने चार महिने शारीरिक व मानसिक छळ केला,' असे लिहून ठेवले आहे. याप्रकरणी फलटण शहर पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर यांच्यावर मानसिक व शारीरिक त्रास, तसेच लैंगिक अत्याचार गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पोलिस अधिका-याला



निलंबित केले असून, दोघांचा शोध घेतला जात होता. पहाटेच्या सुमारास प्रशांत बनकरला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. दरम्यान या प्रकरणात आरोप झालेल्या पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदनेबाबत काही धक्कादायक माहिती समोर आली आहे. डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणात आरोपी असलेल्या पोलिस अधिका-यावरती गंभीर आरोप करण्यात आले आहेत. फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयात आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांकडून पोलीस उपनिरिक्षक गोपाळ बदनेवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. गोपाळ बदने हा महिलांची छेड काढायचा, डोळा मारायचा आणि तक्रार केल्यास पैसे मागायचा असं रुग्णांची नातेवाईक असलेल्या एका महिलेने म्हटलं आहे. तो अद्याप फरार असून ➪(पान २ वर)

# एकनाथ शिंदेंची अचानक 'दिल्ली'वारी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी महायुतीतील वाद चव्हाट्यावर येत आहेत. ठाणे, नवी मुंबई याठिकाणी भाजपा नेते उघडपणे स्वबळाची भाषा करत आहेत. दुसरीकडे मुंबईत भाजपाने १५० प्लसचा नारा दिला आहे. त्यामुळे महायुतीत जागावाटपावरून रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. त्यातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौ-यावर गेल्याने विविध चर्चांना उधाण आले. या दौ-यात शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

या भेटीनंतर एकनाथ शिंदे यांनी महायुतीतील मतभेदावर भाष्य केले. शिंदे म्हणाले की, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी भेट देउन दिवाळी आणि नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी केंद्र आणि राज्यातील विविध विषयांवर आमच्यात सकारात्मक चर्चा झाली. एनडीए आणि महायुतीचे गठबंधन म्हणजे एकच विचारधारा आणि विकासाचा अजेंडा घेउन पुढे जाणारे एकत्र कुटुंब आहे. नरेंद्र मोदी यांनी सातत्याने विकासाचा



आणि विचारधारेचा मार्ग दाखवला आहे. त्यामुळे निवडणुका असोत वा विकासाची कामे आपण एकसंघ राहूनच पुढे गेलं पाहिजे असं त्यांनी सांगितले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ग्रासरूट लेव्हलच्या असतात. कार्यकर्त्यांना लढायची इच्छा असते, परंतु अंतिम निर्णय हा वरिष्ठ नेतृत्व घेत असते. निर्णय झाल्यावर सर्व कार्यकर्त्यांनी शिस्त पाळावी. महायुतीमध्ये कोणतेही मतभेद होउ नयेत. मिठाचा खडा पडू नये याची काळजी सर्वांनी घ्यावी असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. त्यासोबतच पुण्यातील शिंदेसेना नेते रवींद्र धंगेकर आणि भाजपा नेते मुरलीधर मोहोळ ➪(पान २ वर)

# भीक मागणा-या महिलेकडे सापडला 'खजिना'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**उत्तराखंडच्या हरिद्वार येथील रुडकीमध्ये एका महिला भिका-याकडून नोटांचा प्रचंड साठा सापडला आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकही हैराण झाले. या नोटा इतक्या मोठ्या संख्येने आहेत ज्या मोजायला एक दिवसही पुरला नाही.याबाबत स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस तिथे पोहचले. सध्या या भिकारी महिलेकडे पैशाचा साठा सापडल्याची बातमी परिसरात चर्चेचा विषय बनली आहे. रुडकीतील मंगलोर येथील मोहल्ला पठाणपुरा येथील या महिला भिका-याकडे नोटांचा ढीग सापडल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पठाणपुरा येथील एका व्यक्तीच्या घराबाहेर गेल्या १२ वर्षापासून ही महिला भीक मागत होती. ज्यावेळी या महिलेला तिथून हटवण्याचा प्रयत्न झाला. तिथे तिच्याकडे काही पोती आढळली. ही पोती उघडून पाहिली तेव्हा सर्वांचे डोळे वटारले. या भिकारी महिलेकडे २ पोती भरून नोटा आणि सिक्के आढळले.




# नवी मुंबईत भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात रंगणार सेमीफायनल

**मुंबई/प्रतिनिधी :** महिला वनडे वर्ल्ड कप स्पर्धेतील ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील २६ व्या सामन्यातील निकालानंतर सेमीफायनलमध्ये कोणता संघ कोणाविरुद्ध भिडणार ते चित्र स्पष्ट झाले आहे. इंदूरच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ७ विकेट्सनी मात दिली. या विजयासह ऑस्ट्रेलिया संघाने गुणतालिकेत



अव्वलस्थानी झेप घेतली आहे. त्यामुळे आता दुस-या सेमीफायनलमध्ये भारतीय संघासमोर ऑस्ट्रेलियन संघाचे तगडे आव्हान असणार आहे. अलाना किंग हिच्या फिरकीच्या जोरावर पहिल्यांदा गोलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ९७ धावांवर रोखले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने ३ विकेट्स गमावल्या. पण शेवटी १६ व्या ➪(पान २ वर)

# 'यूजीसी'ने जाहीर केली देशातील 22 बनावट विद्यापीठांची यादी

**मुंबई/प्रतिनिधी :** मान्यता नसलेल्या विद्यापीठांमुळे दरवर्षी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे. या विद्यापीठांकडून विद्यार्थी व पालकांची दिशाभूल करण्यात येते. विद्यार्थी व पालकांची होणारी लूट थांबण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशातील मान्यता नसलेल्या विद्यापीठांची यादी जाहीर केली आहे.



यामध्ये २२ विद्यापीठांचा समावेश असून, यूजीसीने या विद्यापीठांवर कारवाई करण्याचे आदेश देउनही राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे भविष्यातही अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.देशातील प्रत्येक विद्यापीठाला यूजीसीची मान्यता घेणे बंधनकारक आहे. यूजीसी कायदा १९५६ अंतर्गत कलम २२(१) नुसार केंद्र, राज्य आणि प्रांतातील शैक्षणिक संस्थांना विद्यापीठाची मान्यता देण्यात आली आहे. तर कलम ३ नुसार अभिमत विद्यापीठांना मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मान्यता नसल्यास यूजीसी कायद्याच्या कलम २३ अंतर्गत विद्यापीठ संबोधणे गुन्हा आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना मान्यता नसलेल्या विद्यापीठांची माहिती व्हावी यासाठी यूजीसीकडून दरवर्षी ऑक्टोबरमध्ये देशातील अशा विद्यापीठांची यादी जाहीर करण्यात येते. तसेच या विद्यापीठांवर कारवाई करण्याचे निर्देशही राज्य सरकारला देण्यात येतात. ➪(पान २ वर)

# दोन ग्रामस्थांची निर्घृण हत्या

**रायपूर/वृत्तसंस्था :** छत्तीसगडच्या बीजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी दोन निष्पाप गावक-यांची क्रुरपणे हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. ही धक्कादायक घटना उसूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेलाकांकेर गावात घडली असून, या हत्येमुळं संपूर्ण परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. नक्षलवाद्यांच्या एका पथकानं शुक्रवारी(दि.२४) रात्री गावातील रवी कट्टम (२५) आणि तिरु पती सोढी (३८) या दोघांची धारदार शस्त्रांनी हत्या केली. घटनेनंतर नक्षलवादी तात्काळ जंगलाच्या दिशेनं फरार झाले. माहिती मिळताच पोलिस दल घटनास्थळी रवाना झाले आणि तपास सुरू केला. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच शेकडो नक्षलवाद्यांनी आत्मसर्मपण केलं, त्यानंतर अशाप्रकारची घटना घडली आहे.

# भरधाव कारने पादचा-यांना चिरडल्याने 5 जणांचा मृत्यू

**आग्रा/वृत्तसंस्था :** शुक्रवारी रात्री आग्रा येथील नागला बुधी भागात झालेल्या एका भयानक अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला तर दोन जण जखमी झाले. या अपघातात एका भरधाव वेगाने येणा-या टाटा नेक्सॉन कारने पादचा-यांना चिरडले. पोलिसांनी शनिवारी ही माहिती दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बबली (३३), भानु प्रताप (२५), कमल (२३), कृष्णा (२०) आणि बंतेश (२१) अशी अपघातातील मृतांची नावे आहेत. गंभीर जखमी झाल्यानंतर सरोजिनी नायडू मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करताच सर्वांना मृत घोषित करण्यात आले.जखमींची ओळख पटली असून, राहुल आणि गोलू हे शहरातील रुग्णालयात उपचार घेत आहेत, तर शनिवारी सकाळपर्यंत त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे अधिका-यांनी सांगितले.दृ तपासातून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृतांमध्ये झोमॅटोमध्ये काम करणारा भानू प्रताप हा फूड डिलिव्हरी बॉय होता. या दुर्घटनेमुळे आग्रा येथे बेदरकारपणे वाहन चालवणे आणि पादचा-यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता पुन्हा निर्माण झाली आहे. संबंधित कलमांखाली एफआयआर दाखल करण्यात आला आहे आणि कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हणून मृतदेह शवविच्छेदन तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत

# रोहितचे शतक, कोहलीच्या रेकॉर्डमुळे भारत विजयी

## तिस-या वनडेत ऑस्ट्रेलियाला 9 विकेटनी हरवले

**मुंबई/प्रतिनिधी :** रोहित शर्माचे शतक आणि विराट कोहलीच्या विक्रमी खेळीमुळे भारताने तिस-या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ९ विकेट्सने पराभव केला. या पराभवानंतरही ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली. मिचेल मार्शने सलग तिस-यांदा नाणेफेक जिंकली आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियन संघ ४६.४ षटकांत २३६ धावांवर सर्वबाद झाला. हर्षित राणाने ४ विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरादाखल, भारताने ३८.३ षटकांत एका विकेटच्या मोबदल्यात लक्ष्य गाठले. रोहित शर्मा 

➪(पान २ वर)

# विद्यार्थी हितासाठी ४ थी व ७ वीची शिष्यवृत्ती परीक्षेची अंबलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात करा

## प्राथमिक शिक्षक संघटनेची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासन निर्णयान्वये इयत्ता ४ थी व ७ वी वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षेचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे.मात्र सदर परीक्षेच्या निर्णयाची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षात न करता पुढील शैक्षणिक वर्षापासून होणे न्यायसंगात होईल.अशी विनंती राज्यातील प्राथमिक शिक्षक संघटना यांनी राज्यात शालेय शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण राज्यमंत्री,प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,शिक्षण आयुक्त, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य यांना निवेदना व्दारे केली आहे. आपल्या राज्यातील शिष्यवृत्ती परीक्षा ही महत्वाची परीक्षा आहे. या परीक्षेची तयारी विद्यार्थी, शिक्षक व पालक फार गांभीर्याने करीत असतात. बहुतांश शिक्षक व विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी मागील शैक्षणिक वर्षाच्या मध्यापासून म्हणजे सुमारे दीड वर्षे तयारी करीत असतात. या कालावधीत काही शिक्षक छोटी-मोठी सुट्टीही घेत नाहीत. त्यामुळे परीक्षा तयारी चांगली होते.असे असताना वरील संदर्भीय

शासनाचा निर्णय स्वागतार्ह पण यावर्षी खूप उशीर झाला- शिष्यवृत्ती सारख्या महत्वाच्या परीक्षेबाबातचा निर्णय किमान एप्रिल मध्ये जाहीर होणे आवश्यक होता. शिक्षक पहिल्या सत्रात अभ्यासक्रम पूर्ण करुन दुसऱ्या सत्रात सराव प्रश्न पत्रिका सोडवून घेत असतात. या वर्षी इथून पुढे फक्त ६ महिन्यात इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेची चांगली तयारी होणे अशक्य असल्याने सदर परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात होणे संयुक्तिक होईल. **-राजेश सावरकर,** राज्य प्रसिध्दी प्रमुख,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

शासन निर्णयानुसार इयत्ता ४ व ७ वी या वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षा फक्त ६ महिने अगोदर अधिकृतपणे जाहीर करणे ही बाब सदर इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी संयुक्तिक वाटत नाही. शिष्यवृत्तीसारखी महत्वाची परीक्षा किमान शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी दोन महिने अगोदर जाहीर होणे आवश्यक असताना शैक्षणिक सत्राच्या मध्यावर शिष्यवृत्ती परीक्षा अधिकृतपणे जाहीर झाल्याने व परीक्षेच्या तयारीसाठी ६ महिन्याचा कालावधी अत्यल्प असल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्यामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संदर्भीय शासन निर्णयाची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षात (सन २०२६-२७) करणे न्यायसंगत होईल म्हणून विद्यार्थी हितासाठी इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा घेणेबाबत शासन निर्णयाची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षात न करता पुढील शैक्षणिक वर्षात (सन २०२६-२७) करावी अशी मागणी संघटना यांनी केली आहे.

# सावत्र मुलावर वडिलांनी केला लैंगिक अत्याचार

## फ्रेजरपुरा येथील घटना, आई वडीलांन अटक

अमरावती/प्रतिनिधीः- सावत्र मुलावर पित्याने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणात सावत्र वडिलांसह जन्मदात्या आईला सुद्धा अटक केली आहे.

माहितीनुसार पीडित मुलाच्या आई-वडिलांचे काही वर्षापासून पटत नसल्यामुळे ते दोघेही वेगळे राहत होते. काही दिवसांपूर्वी पीडित मुलाच्या आईने दुसऱ्या व्यक्तीसोबत लग्न केले. अल्पवयीन मुलाला आई दुसऱ्या पतीच्या घरी घेऊन गेली. पीडित मुलाच्या सावत्र बापाने त्याला वरच्या माळ्यावरील स्वयंपाक घरात नेले.

त्यानंतर जबरदस्तीने मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केला. मुलगा ओरडला नाही पाहिजे म्हणून त्याचे तोंड दाबले. त्याचवेळी मुलाची आई तिथे पोहचली. तिने मुलावर झालेल्या लैंगिक अत्याचाराचा प्रकार बाघितला. पतीला जाब विचारण्यापेक्षा तिने मुलाला सांगितले की ते तुझ्या वडिला प्रमाणे आहेत. कुणाला सांगितले तर घराबाहेर आणि शाळेतून सुद्धा काढून देईल अशी धमकी दिली. तरीपण मुलाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता आईने त्याला दुसऱ्या पतीच्या घरातून हाकलून लावले. त्यानंतर पीडित मुलगा हा शहरात राहणाऱ्या आपल्या जन्म देणाऱ्या बापाकडे गेला. त्याने त्याच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराची माहिती त्यांना दिली. त्यामुळे वडिलांनी पोलिसात तक्रार दाखल केली. फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून पीडित मुलाची आई व सावत्र बाप या दोघांना अटक केली. सावत्र पित्याविरुद्ध बळजबरीसह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

# विहिरीत पडून तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

## विरुळ आकाजी परिसरात घडली दुर्दैवी घटना



विरुळ आकाजी: शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास शेतकरी इश्वर वसंत गाठे (वय २९) यांचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली गाठे हे शेतात फेरफटका मारत असताना चुकून तोल गेल्याने विहिरीत पडले. तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले, मात्र बुडाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला,

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुलगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी अमोल बरडे यांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. अपघाती मृत्यूची नोंद पोलिसांकडून करण्यात आली आहे. इश्वर वसंत गाठे यांच्या निधनामुळे गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी व भावंडे असा मोठा परिवार असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शनिवारी विरुळ येथील मोक्षधामावर त्यांच्या अंत्यसंस्कार करण्यात आला, यावेळी गावकऱ्यांची गर्दी उसळली होती ,

# दिवाळी संपली; वर्धा बसस्थानकावर प्रवाशांची लाट, गर्दीनं झळाळलं स्थानक

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीचा सण उत्साहात साजरा झाल्यानंतर आता नागरिक परतीच्या प्रवासासाठी मोठ्या संख्येने वर्धा बसस्थानकाकडे धाव घेत आहेत. परिणामी, स्थानक परिसर प्रवाशांच्या गर्दीनं अक्षरशः फुलून गेला आहे. नौकरीच्या गावी परतणारे प्रवासी, तर काहीजण धार्मिक आणि पर्यटन स्थळांकडे रवाना होत असल्याचे दृश्य दिसत आहे.राज्य परिवहन महामंडळाकडून अमरावती, राजुरा, चंद्रपूर, अहेरी, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, जळगाव,या मार्गांवर अतिरिक्त बसगाड्या सोडण्यात आल्या असून, प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक बसगाड्यांमध्ये प्रवाशांनी तिकीट मिळवण्यासाठी रांगा लावल्या असून,



बसस्थानक कर्मचाऱ्यांना गाड्या ने-आण सुरळीत पार पाडण्यासाठी नाहक श्रम घ्यावे लागत आहेत. सणानंतरचे हे दिवस परगावी जाणारे, तसेच उरलेल्या सुट्ट्यांचा आनंद घेणारे प्रवासी यांच्या गडबडीत जात आहेत. काहीजण घरी साजरी केलेल्या दिवाळीनंतर आता मामाच्या गावी निघाले आहेत, तर काही प्रवासी धार्मिक स्थळांकडे दर्शनासाठी रवाना झाले आहेत. बसस्थानकात दिवसभर प्रवाशांची लगबग सुरू असून नागरिकांच्या चेहऱ्यावर सणानंतरही आनंदाचे तेज दिसून येत आहे. महामंडळानं अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक करून गर्दीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र तरीही बस मिळवण्यासाठी प्रवाशांची धावपळ सुरूच आहे. दिवाळीनंतर परतीच्या प्रवासानं वर्धा बसस्थानक पुन्हा एकदा उत्साहात न्हाऊन निघाले आहे.

# जिल्ह्याचा झेंडा फडकवणारी अलिझा शहा

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** जिल्हा क्रीडा परिषद व क्रीडा युवक संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत सनशाईन स्कूलची अलिझा शहा हिने जिल्हात बाजी मारली. १७ वर्षाखालील मुलींच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तीने पहिला क्रमांक पटकावत सनशाईन चा झेंडा फडकावला.सलग दुसऱ्या वर्षी मिळवलेली कामगिरी अलिझाच्या सातत्याचे प्रतीक ठरली आहे. तिच्या या यशामुळे चंद्रपूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. तिच्या या घवघवीत यशाबद्दल गट शिक्षणाधिकारी वीणा धावडे, संस्थाध्यक्ष प्रेम महिले, सचिव विजय ठाकरे, तालुका क्रीडा संयोजक मंगेश जाचक, प्रशिक्षक पवन ठाकरे व हेमंत बन्नगरे तसेच शिक्षक-व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अलिझाचे कौतुक केले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### आम्ही कुणालाही सोडणार

यांनी संशयित आरोपी प्रशांत बनकर याला कमीत कमी पोलीस कोठडी द्यावी, असा देखील युक्तिवाद केलेला होता. यावर न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

**प्रशांत बनकरला पुण्यातून अटक-** फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात संशयित आरोपी प्रशांत बनकर याला पोलिसांनी पुण्यातून अटक केली. घटनेनंतर पोलिसांची पथके दोन आरोपींच्या शोधासाठी रवाना केली होती. युवतीने हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये प्रशांत बनकर याने मानसिक व शारीरिक छळ केल्याचं लिहिलं होतं.

**गोपाल बदने याचा शोध सुरु**-महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील संशयित आरोपी पीएसआय बदने याचं काल शेवटचं लोकेशन पंढरपूर होतं. तोही बीड परिसरातला असल्यानं साता-यावरून बीडकडे जाताना त्याने बहुदा पंढरपूर परिसरात फोन बंद केलेला असावा, अशी माहिती आहे. कालपासून पोलिसांच्या सर्व टीम त्याच्या गाडीसह शोध घेत होते. मात्र तो आज अखेर मिळून आलेला नाही. गोपाल बदने याला कधी अटक होणार हे पाहावं लागेल

### गोपाळ बदने महिलांची छेड

त्याचाही पोलिस शोध घेत आहेत. या महिलेने गोपाळ बदने वरती आरोप करताना सांगितलं की माझी भाची होती तिला डोळे मारले. ही घटना आठ दिवसापूर्वी घडली आहे. माझी भाची त्याच्याकडे तक्रार देण्यासाठी गेली होती. तिच्या नवरा देखत तिला डोळा मारला. तो सांगतो पैसे द्या, तक्रारीसाठी पैसे द्यावे लागतील. पाच हजार रुपये द्या म्हणाला दिले नाहीत म्हणून त्याने दार लावून घेतलं.महिला डॉक्टरने केलेल्या खुलाशात या डॉक्टर अंशुमन धुमाळ यांचा उल्लेख आहे. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात येउन गोपाळ बदनेने धमकावल्याचे आणि इतर पोलीस अधिका-यांनी त्रास दिल्याचे अनेक आरोप आहेत. या सगळ्याबद्दल या डॉक्टर धुमाळ यांना विचारले असता त्यांनी मला माहिती नाही, माझ्याकडे हा खुलासा करण्यातच आला नव्हता अशी उत्तरं दिली आहेत.

***गळफास घेण्यापूर्वी तळहातावर लिहिले आत्महत्येचे कारण***

गळफास घेण्यापूर्वी तळ्हातावर डॉक्टर तरूणीने आत्महत्येचे कारण लिहिले. पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे आणि सखोल तपास केला जाईल, असे सांगितले आहे. हातावरील मजकूर हा महत्त्वाचा पुरावा मानला जात असून, त्या दिशेने पोलिस तपास करीत आहेत.

**गोपाळ बदने निलंबित**-या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ दखल घेतली असून, संबंधित जबाबदार असलेल्या पोलिसांना तत्काळ निलंबित करावे, असे आदेश पोलिसांना दिले. त्या प्रकरणी पोलिसांनी कारवाई करत पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदनेला तत्काळ निलंबित केले आहे. तो फरार असून पोलिसांकडून त्याचा तपास सुरू आहे.

***एका आरोपीला अटक-*** फलटण येथील डॉक्टर तरूणी आत्महत्या प्रकरणात एका आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. प्रशांत बनकर या आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. घटनेनंतर पोलिसांची पथके दोन आरोपींच्या शोधासाठी रवाना केली होती. युवतीने हातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये प्रशांत बनकर याने मानसिक व शारीरिक छळ केल्याची माहिती लिहिली होती. सातारा ग्रामीण पोलिसांनी प्रशांत बनकरला अटक केली आहे. प्रशांत बनकरला आज पहाटे चार वाजता अटक करण्यात आली आहे. तो मित्राच्या फार्महाउसमध्ये लपून बसला होता, सातापा पोलिसांनी ही कारवाई करण्यात आली आहे.

### एकनाथ शिंदेंची अचानक

यांच्यातील वादावर भाष्य करताना धंगेकरांना मी स्पष्ट संदेश दिला आहे, आवश्यक असल्यास मी स्वत? त्यांच्याशी बोलेन असं शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, बिहारमधील निवडणुकीत एनडीएचा बहुमताने विजय होईल असा विश्वास शिंदे यांनी व्यक्तकेला. सोबतच मुंबई, ठाणे आणि एमएमआरडीए क्षेत्रातील बिहारी बांधवांसोबत बैठका सुरू असून सर्वजण कामाला लागलेत. मोदी यांनी बिहारच्या विकासासाठी मोठा निधी दिला आहे. त्यामुळे तिथे एनडीएला बहुमत मिळेल असं एकनाथ शिंदे यांनी दावा केला. साता-यातील महिला डॉक्टरवरील अत्याचारप्रकरणी एकनाथ शिंदे यांनी तीव्र संताप व्यक्तकेला. ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि क्लेशदायक आहे. आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल. एका आरोपीला अटक झाली असून इतरांना लवकरच अटक होईल. दोषींना कोणत्याही प्रकारे पाठीशी घातले जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला.

### यूजीसी'ने जाहीर केली

यंदा यूजीसीने जाहीर केलेल्या यादीत अशा २२ विद्यापीठांचा समावेश आहे. या यादीतील मान्यता नसलेली सर्वाधिक १० विद्यापीठे दिल्लीमध्ये असून, त्याखालोखाल उत्तर प्रदेशमध्ये चार विद्यापीठ, आंध्र प्रदेश, केरळ, पश्चिम बंगालमध्ये प्रत्येकी दोन आणि महाराष्ट्र व पुद्दुचेरीमध्ये प्रत्येकी एक विद्यापीठ असल्याची माहिती यूजीसीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.मागील पाच वर्षांमध्ये दिल्लीतील मान्यता नसलेल्या विद्यापीठांच्या संख्येत वाढ झाली असून, उत्तर प्रदेशमधील अशा विद्यापीठांच्या संख्येत घट झाली आहे. मान्यता नसलेल्या विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थी व पालकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन यूजीसीकडून करण्यात आले आहे.यूजीसी कायदा, १९५६ नुसार विद्यापीठाचा दर्जा नसतानाही काही संस्थांकडून विद्यापीठ शब्दाचा वापर करून विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात येत आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेउन मान्यता नसलेल्या विद्यापीठाविरुद्ध योग्य ती कारवाई करावी, अशी विनती यूजीसीकडून राज्य सरकारांना करण्यात येत आहे. मात्र यातील काही विद्यापीठे ही मागील अनेक वर्षांपासून सुरू असून, त्यांच्यावर राज्य सरकारकडून अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

### नवी मुंबईत भारत-ऑस्ट्रेलिया

षटकात विजयी डाव साधत अपराजित राहून गत चॅम्पियन ऑस्ट्रेलियन संघ अव्वलस्थानी पोहचला. धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघाकडून जङ्ग्र्जिया वोल हिने ३८ चेंडूत नाबाद ३८ धावांची खेळी केली. याशिवाय बेथ मूनी हिने ४१ चेंडूत ४२ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलिया संघाने सर्वाधिक वेळा वर्ल्ड कप स्पर्धा जिंकली असून यंदाच्या हंगामात वर्ल्ड कप उंचावण्याचं स्वप्न साकार करण्यासाठी टीम इंडियाला आता ऑस्ट्रेलियाला मात द्यावी लागेल. जर भारतीय संघाने ही लढाई जिंकली, तर निश्चितच टीम इंडिया फायनल बाजीही अगदी सहज मारेल. ३० ऑक्टोबरला नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अकादमीच्या स्टेडियवर भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात यंदाच्या वर्ल्ड कप स्पर्धेतील दुस-या सेमीफायनलचा थरार रंगल्याचे पाहायला मिळेल. भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील लढतीआधी गुवाहटीच्या बारासपारा क्रिकेट स्टेडियमवर इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पहिली सेमीफायनल खेळवण्यात येईल. २९ ऑक्टोहरला भारतीय प्रमाणवेळेनुसार, दुपारी ३ वाजता हा सामना नियोजित आहे. दोन्ही सेमीफायनलमधील विजते संघ यंदाच्या हंगामातील जेतेपदासाठी २ नोव्हेंबरला एकमेकांविरुद्ध भिडतील.

### रोहितचे शतक, कोहलीच्या

१२१ आणि विराट कोहली ७४ धावांवर नाबाद राहिला. रोहितने एकदिवसीय इतिहासातील ३३ वे शतक झळकावले. विराट कोहली डावात ५४ धावा काढून एकदिवसीय इतिहासातील दुस-या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने कुमार संगकारा (१४२३४ धावा) चा विक्रम मोडला. आता फक्त सचिन तेंडुलकर (१८४२६ धावा) कोहलीच्या पुढे आहे. टॉस जिंकून फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने प?वरप्लेमध्ये एक गडी गमावला तर ६७ धावा केल्या. तथापि, सामन्याच्या सुरुवातीच्या षटकांत चेंडू स्विंग होत होता. अशा परिस्थितीत, मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड यांनी सावधपणे फलंदाजी केली आणि पहिल्या विकेटसाठी ६७ धावा जोडल्या. प्रसिद्ध कृष्णाने मोहम्मद सिराजच्या चेंडूवर हेडचा झेल घेतला. पॉवरप्लेनंतर, कॅप्टन मिचेल मार्श अक्षर पटेलने बाद केला.२३व्या षटकात विराट कोहलीने मॅथ्यू शार्टचा शानदार झेल घेतला. वाशिंग्टन सुंदरच्या चेंडूवर शार्टने स्वीप केला. चेंडू फारवर्ड स्क्वेअरवर उभ्या असलेल्या विराट कोहलीकडे गेला. कोहलीला जास्त रिॲक्शन टाइम मिळाला नाही, पण तरीही त्याने झेल घेतला. ३४व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर, विकेटकीपर ॲलेक्स कॅरीला झेलण्याचा प्रयत्न करताना श्रेयस अय्यर जखमी झाला. त्यालाही मैदान सोडावे लागले. कॅरी २४ धावा करून बाद झाला.

### भीषण अपघातात दोन ठार,

पोपट जगताप (वय ४८, ओमवाडी) आदींचा समावेश असून, सर्वांना अमरावती इर्विन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

घटनास्थळी परतवाडा बस आगाराचे प्रमुख जीवन वानखडे तसेच पोलिस अधिकारी दाखल झाले. नागरिकांची मोठी गर्दी घटनास्थळी जमली होती. अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. अकोट आगाराची एसटी बस (क्र. एमएच ४० वाय ५१३४) चालक नितेश एस.ओईबे (बॅच नं.७०८५१), वाहक मनिष एल अलाटे (बेंच नं.१११०५४) होते.

दरम्यान, हा अपघात नेमका कसा घडला आणि कोणाचा दोष आहे, याबाबत विरोधाभासी चर्चा सुरू आहेत. काही प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रकला वाचविताना बसने नियंत्रण गमावल्याने हा अपघात घडला, तर काहींच्या मते बस परतवाडा कडे जात होती आणि क्रुझर शेगावच्या दिशेने येत होती. पोलिसांकडून याबाबतचा तपास सुरू असून, सत्यस्थिती चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

सुदैवाने एसटी बसमधील चालक, वाहक आणि प्रवाशी सुरक्षित असल्याचे समजते. मात्र, घटनेनंतर बसचा चालक व वाहक घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती मिळाली आहे. या मार्गावर गेल्या काही महिन्यांपासून अपघातांचे प्रमाण वाढले असून, नागरिकांनी रस्त्याच्या सुरक्षिततेसाठी योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

### श्वानाच्या हल्ल्यात बालिका

उपचारानंतर तिची प्रकृती गंभीर असल्यामुळे तिला जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे रेफर करण्यात आले. येथे मध्यरात्री दोन वाजेपर्यंत तिच्यावर उपचार सुरू होते पण प्रकृती गंभीर असल्यामुळे डॉक्टरांनी तिला नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये रेफर केले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार श्वानाच्या हल्ल्यात तनिषाचा उजवा डोळा निकामी झाला आहे. या डोळ्याने आता ती पाहू शकणार नाही.

तिच्यावर नागपूर मध्ये उपचार सुरू आहे. डॉक्टरांची विशेष टीम तिच्यावर लक्ष देत आहे. या घटनेची माहिती धारणी पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी पंचनामा केला.या घटनेमुळे गावांत दहशत निर्माण झाली आहे. मोकाट श्वानाचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पूर्व वैमनस्यातून अक्षय नागलकरची

ठाण्यामध्ये शिला विनायक नागलकर यांनी त्यांचा मुलगा अक्षय नागलकर (वय २६ वर्ष, रा. मारोती नगर, जुने शहर) हा २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता बाहेर जाऊन येतो, असे सांगून घरून गेल्यानंतर बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. या प्रकरणी पोलीस अधीक्षकांनी शहर उपविभागीय पोलीस अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखेला चौकशीसाठी पथके गठीत करण्याचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेचे चार, डाबकी रोड पोलिसांचे दोन व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे दोन असे एकूण आठ पथकांनी शोध सुरू केला. सतत ४८ तास शोध कार्य राबवून तांत्रिक माहिती वरून संशयित चंद्रकांत बोरकर याला ताब्यात घेतले. चौकशीमध्ये त्याने ब्रम्हा भाकरे, रोहित पराते, क्रिष्णा भाकरे, आशु वानखडे, शिवा माळी, आकाश शिंदे व अमोल उन्हाळे या आठ जणांनी अक्षयला भौरद येथील हॉटेल एमएच ३० येथे जेवणासाठी बोलावले. पूर्व वैमनस्यातून त्याची हत्या करण्यात आली. मृतदेह ब्रम्हा भाकरे याचे मोरगाव भाकरे येथील शेतातील टिनाच्या शेडमध्ये जाळून टाकल्याची कबुली आरोपींनी दिली. या प्रकरणात चंद्रकात बोरकर, ब्रम्हा भाकरे, क्रिष्णा भाकरे, आशू वानखडे यांना अटक करण्यात आली आहे.गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध पथकांद्वारे घेतला जात आहे. पुढील तपास शहर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, प्रभारी अधिकारी डाबकी रोड पोलीस ठाणे अभिषेक अंधारे, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि गोपाल ढोले, पोउपनि गोपाल जाधव, पोउपनि अनिल चव्हाण आदींनी केली. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. इतर आरोपींना पकडण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

### महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची

सहाय्यक धर्मादाय आयुक्त शीतल साळवी यांनी या दाव्याचा निकाल नुकताच जाहीर केलाय. बाळासाहेब लांडगे यांच्या विश्वस्त पदाला मान्यता नाकारण्यात आली होती. असं असतानाही लांडगे हे बेकायदेशीररित्या सचिव पदाला चिकटून राहीले. त्यांच्याच कार्यकाळात २०२१ ते २५ या कालावधीसाठी निवडणूक प्रक्रिया राबवली गेली. अपात्र व्यक्तीनं निवडणूक घेतली. निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती नियमबाहय आणि मनमानीपणे करण्यात आली. या निवडणुकीसाठी धर्मादाय कार्यालयाकडून परवानगी घेतलेली नाही.

नामदेव शिरगावकर यांनी सादर केलेला चेंज रिपोर्ट आणि कागदपत्रं अविश्वसनीय असल्याचं निरीक्षण नोंदवत मुंबईच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी २४ सप्टेंबर २०२१ ची महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची निवडणूक प्रक्रिया अवैध ठरवलीय. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष असणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी हा मोठा धक्का आहे. महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू आहे. अध्यक्ष पदासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार विरूध्द केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे एकमेकासमोर उभे ठाकले आहेत. असोसिएशनचे सचिव नामदेव शिरगावकर यांच्या मनमानी कारभाराविरोधात विविध क्रीडा संघटनांनी आंदोलनाची राळ उडवलीय. त्यातच सन २०२१ ते २०२५ या कालावधीसाठीची निवडणूक प्रक्रिया अवैध ठरल्यानं सध्या सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया सुध्दा वादाच्या भोवऱ्यात सापडणार आहे.

### महिलेची २० हजारांनी फसवणूक!

नेहमी चहा पिण्यासाठी येत असे. तो स्वतःला 'बँकेत नोकरी करतो' असे सांगत होता. काही दिवसांनी त्याने महिलेला कर्ज मिळवून देतो, असे सांगून तिच्याकडून दोन कोरे धनादेश आणि काही कागदपत्रे घेतली. यानंतर आरोपीने तिच्या खात्यातील २० हजार रुपये बेकायदेशीररीत्या काढून घेतले. फसवणुकीची जाणीव झाल्यानंतर महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### उभ्या ट्रॅक्टरला दुचाकीची

होता. लक्ष्मण यांच्या दुचाकीची ट्रॅक्टरला जोरदार धडक बसली. या अपघातात लक्ष्मण हिरे यांच्या छातीत व पायावर गंभीर दुखापत झाली, तर त्यांचा भाऊ जखमी झाला. दोघांनाही तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान लक्ष्मण हिरे यांचा मृत्यू झाला. त्यांच्या भावाचा उपचार सुरू आहे. या प्रकरणी लक्ष्मण हिरे यांचा मुलगा अशोक हिरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी ट्रॅक्टरचालक अमोल वानखेडे याच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन उभे ठेवल्याबद्दल गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### अवैध दारु विक्रीविरोधात

भालेराव, हर्षल चंद्रकांत पोखार, धर्मपाल महादेव स्थुल यांच्याकडून देशी दारु जप्त करण्यात आली. तर नागपुरी गेटमध्ये फिराज खान दाऊद खान व शिला गंगाराम साहु यांच्याकडून आणि राजापेठ हद्दीत सुशील संतोष बोरकरच्या ताब्यातून अवैध दारु जप्त करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे, रमेश धुमाळ, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या पथकांनी ही कारवाई केली. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई शहरात सुरु असलेल्या अवैध दारु विक्रीवर अंकुश घालण्यासाठी राबवण्यात आली.

### परतवाड्यात गांजा तस्कर

या छाप्यात सरकारी पंच, नापजोख अधिकारी आणि व्हिडिओग्राफरही उपस्थित होते. ठाणेदार सुरेश मस्के, सचिन पवार, युवराज मानमोठे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने आणि मनोज धावले यांनी कारवाईत भाग घेतला. पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्पष्ट केले की, ग्रामीण आणि शहरी भागातील अवैध धंदे—विशेषतः अमली पदार्थांची विक्री आणि वाहतूक यावर कडक कारवाई केली जाणार आहे.

### सुपर हायवेवर गोवंश तस्करीचा

ट्रक तपासणीदरम्यान आत ६ गायी, १६ बैल आणि १३ वासरे, म्हणजे एकूण ३५ गोवंश आढळले. सर्व जनावरांना सुरक्षितपणे बाहेर काढून हिंदू सूर्य प्रतिष्ठान बडनेरा यांच्या गोरक्षकांच्या ताब्यात सोपवण्यात आले. स्थानिक गौशाळेत ही सर्व जनावरे सुरक्षित ठेवण्यात आली. या प्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध आयपीसीच्या विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास बडनेरा पोलिस करत आहेत.

### रेल्वे प्रवासात कोट्यवधीचे सोन्याचे

केले. त्यानंतर आरोपींनी कारमध्ये बसून पळ काढला. या घटनेचा तपास करताना पोलिसांनी स्टेशनच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. फुटेजमध्ये आरोपी बॅग घेऊन रेल्वेच्या कोचमध्ये उभे असताना दिसले आणि नंतर कारमध्ये बसून पळ काढताना दिसले. तरीही, बडनेरा जीआरपी पोलिस आणि नागपूर रेल्वे पोलिस आरोपीपर्यंत पोहोचलेले नाही. या प्रकरणामुळे अमरावतीतील सराफा व्यापाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त झाला आहे. सूत्रांच्या माहितीप्रमाणे, ही चोरी किशोर गोल्डन गँग या टोळीने केली असल्याची शक्यता आहे, जे मराठवाडा आणि आंध्रप्रदेशातही विविध चोरीचे कारनामे करत असल्याचे समजते.

बडनेरा जीआरपी पोलिसांनी घटनेची गंभीरता लक्षात घेत सर्व संबंधित ठिकाणांवरील चौकशी सुरू केली आहे, मात्र अजूनही आरोपींचा मागोवा लागलेला नाही.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २६ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# बहुचर्चित बेपत्ता अक्षय नागलकरची अखेर हत्याच

## मुख्य आरोपीसह चार जणांच्या मुसक्या आवळल्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

***अकोला शहरातील बहुचर्चित अक्षय नागलकर मिसींग प्रकरणाचा थरारक उलगडा झाला आहे. शहरालगत असलेल्या एका हॉटेल मध्ये जेवणासाठी अक्षयला बोलावून त्याठिकाणी त्याची निर्घृण हत्या करण्यात आली असून एका शेतशिवारात जाळण्यात आले असल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी मुख्य आरोपीसह चार जणांना अटक केली आहे तर इतर आरोपींचा शोध सुरू आहे.***



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौ. शिला विनायक नागलकर यांनी दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी डाबकी रोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, त्यांचा मुलगा अक्षय विनायक नागलकर (वय २६ वर्षे, रा. मारोती नगर, बाळापुर रोड, जुने शहर, अकोला) हा दिनांक २२ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी पाच वाजून पंधरा मिनिटांनी 'बाहेर जाऊन येतो' असे सांगून घराबाहेर गेला आणि परतला नाही. या तक्रारीवरून मिसींग क्र. ४४/२०२५ दाखल करण्यात आला.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तात्काळ चौकशीसाठी पथके गठीत करण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेची चार, डाबकी रोड पोलीस ठाण्याच्या दोन आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या दोन पथकांसह एकूण आठ पथके शोधमोहीमेसाठी तयार करण्यात आली.

सदर पथकांनी पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक श्री. बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली सलग ४८ तास अतोनात मेहनत घेतली. गुप्त बातमी आणि तांत्रिक माहितीच्या आधारे संशयित चंद्रकांत बोरकर यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने कबुली दिली की, त्याने आणि त्याच्या साथीदारांनी जुन्या वादातून अक्षय नागलकरचा खून केला.

त्यांनी अक्षयला ब्रम्हा भाकरे यांच्या भौरद येथील 'हॉटेल ३० ३०' मध्ये जेवणाच्या बहाण्याने बोलावून घेतले आणि त्याठिकाणी त्याचा खून करून त्याचे शव मोरगाव भाकरे येथील शेतातील टिन शेडमध्ये जाळले, अशी माहिती आरोपीने दिली.

यानंतर पोलिसांनी चंद्रकांत महादेव बोरकर, अशोक उर्फ ब्रम्हा पांडुरंग भाकरे, कृष्णा वासुदेव भाकरे आणि आशु उर्फ आशिष शिवकुमार वानखडे या चार आरोपींना अटक केली असून, इतर सहआरोपींचा शोध सुरु आहे. या कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक अभिषेक अंधारे (प्रभारी, डाबकी रोड), सपोनि गोपाल ढोले, पो.उपनि गोपाल जाधव (स्थानीय गुन्हे शाखा), पो.उपनि अनिल चव्हाण (डाबकी रोड) तसेच स्थागुशा आणि डाबकी रोड पोलीस ठाण्याचे अंमलदार यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

गुन्ह्याचा तपास सध्या उपविभागीय पोलीस अधिकारी शहर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. अकोला पोलीस दलाच्या तत्पर व प्रभावी कारवाईमुळे बहुचर्चित प्रकरणाचा अखेर उलगडा झाला आहे.

**पुरावे नष्ट करण्याच्या प्रयत्न :** आरोपींनी केवळ अक्षयची हत्याच केली नव्हे तर याप्रकरणी गुन्हा लपविण्यासाठी पुरावे सुद्धा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अक्षयचा मृतदेह ज्या शेतशिवारात टिन शेडमध्ये जाळण्यात आला त्याठिकाणी ते टिन पुन्हा रंगरंगोटी करण्यात आले, सोबतच राखेची सुद्धा विल्हेवाट लावण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.


**असे घडले हत्याकांड :** अक्षयला जेवणासाठी भौरद येथील एमएच ३० या हॉटेलवर बोलाविण्यात आले. याठिकाणी जेवणाच्या वेळी अक्षयच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून त्याच्यावर वार करण्यात आले. नंतर मोरगाव भाकरे येथील एका शेत शिवारात घेऊन जात तेथे बनलेल्या एका टिन शेडमध्ये नेऊन त्याला जाळण्यात आले. एवढेच नव्हे तर जाळल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याच्या राखेची सुद्धा विल्हेवाट लावण्यात आली.

**आठ पथकांचे अतोनात परिश्रम :** घटनेचे गांभीर्य बघता ऐन दिवाळीच्या पर्वात अतिशय क्लिष्ट स्वरूपाच्या असलेल्या या मिसिंग प्रकरणात पोलिसांनी कमालीची तत्परता आणि तपासातील गुप्तता बाळगली. एकीकडे बेपत्ता अक्षय नागलकर याच्या कुटुंबीयांचा रोष दुसरीकडे तपासातील गुप्तता या दोन्ही बाबींना बॅलन्स करीत ४८ तासांच्या कालावधीत संपूर्ण प्रकरणाचा उलगडा तपास पथकांनी केला आहे. या तपासानंतर अकोला पोलिसांवरील नागरिकांचा विश्वास आणखीन दृढ झाला आहे.

# गुटखा बंदी धाब्यावर : मालेगाव तालुक्यात खुलेआम गुटखा विक्री सुरू

## तरुणांच्या जीवाशी खेळ – प्रशासनाचा नाही मेळ

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



राज्य सरकारने गुटखाबंदी लागू करून आरोग्यरक्षणाचा डंका पिटला असला, तरी मालेगाव शहरासह तालुक्यात ही बंदी धाब्यावर बसल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये तसेच शहरातील बाजारपेठा, गल्लीबोळ आणि चौकांमध्ये खुलेआम गुटखा विक्री सुरू असून, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

गुटख्याची विक्री आता लपवाछपवी न करता उघडपणे होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे, अनेक शाळा व कॉलेज परिसरातसुद्धा गुटखा सहज मिळत असल्याने तरुण वर्ग या व्यसनाच्या आहारी जात आहे. यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आरोग्य विभाग, पोलिस व अन्न व औषध प्रशासन या तिन्ही विभागांमध्ये कोणताही समन्वय दिसत नाही. या निष्क्रियतेचा फायदा घेत गुटखा माफियांचे मनोबल वाढले असून, त्यांनी बेकायदेशीर व्यापाराची मांडवळी उघडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

आता या प्रकरणी प्रशासन काय भूमिका घेते, गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होते का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

# ३० ऑक्टोबर रोजी गोर बंजारा समाज समृद्धी सह हैदराबाद अकोला महामार्ग रोखणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■



गोर बंजारा समाजाला एस टी.दर्जाचे आरक्षण मिळावे, हैदराबाद गॅझेट लागू करुन सेवासवलती उपलब्ध करून देण्यात याव्यात यामागणीसाठी गोर बंजारा महाराष्ट्रभर आतापर्यंत लाखोंच्या संख्येने पंचावन्न महामोर्चे काढले तसेच महाराष्ट्रात अनेक गोर बंजारा युवकांनी ९ ठिकाणी आमरण उपोषण केले तसेच चार युवकांनी आरक्षणाची मागणी करीत आपले जीवन संपविले मात्र सरकारने गोर बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला गांभीर्याने घेतले नाही.तसेच सर्वच उपोषणकर्त्यांची फक्त शाब्दिक

बोळवण केली. गोर बंजारा समाज हा आदीवासी समुदायाच्या वैशिष्ट्याची पुर्तता करत असताना विविध ठिकाणी नोंदीचे पुरावे सापडत असतांनाच, तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये अनुकूल नोंदी असतांनाही सुस्त निद्रिस्त सरकार गेल्या ७८ वर्षापासूनच्या मागणीकडे कानाडोळा करत आहेत. तेव्हा सुस्त निद्रिस्त मगरगट्ठ सरकारला जागवण्यासाठी वाशीमच्या गोर बंजारा आरक्षण कृती समितीने राजधानी मुंबई व उपराजधानी नागपूरला जोडणारा महत्वपूर्ण समृद्धी महामार्गासह हैदराबाद अकोला महामार्ग रोखण्याचा निर्णय पोहरादेवी येथे आरक्षण कृती समितीच्या २३ आक्टोंबर रोजी झालेल्या बैठकीत घेतला आहे. समृद्धी महामार्ग व हैदराबाद अकोला महामार्ग हे दोन्ही महामार्ग येत्या गुरुवारी दि.३० आक्टोंबर रोजी

किमान २० हजार गोर बंजारा स्त्रीपुरूष समृद्धी महामार्गावर उतरणार असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पोहरादेवी येथील सभेत गोर बंजारा आरक्षण कृती समितीने घेतला आहे. पोहरादेवी येथे आज दि.२३ आक्टोबर रोजी पार पडलेल्या सभेमध्ये महंत, सर्व संघटनांचे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.यवतमाळ वाशीम अकोला बुलढाणा अमरावती या जिल्ह्यांसह हिंगोली, जालना, नांदेड, परभणी, जळगाव, या जिल्ह्यातील गोर बंजारा बांधव भगिनी या रास्ता रोको आंदोलनात सहभागी होणार आहेत. आरक्षणाची लढाई थेट समृद्धी महामार्ग रोखण्यापर्यत गेली असून भविष्यात हा लढा अधिक तीव्र करीत पोहरादेवी येथे सामुहिक साखळी उपोषण व आमरण उपोषणाला गोर बंजारा समाजातीलमहंत, विविध संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते बसणार असल्याची चर्चा आहे.

# विद्यार्थी हितासाठी इयत्ता ४ थी, ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा पुढील शैक्षणिक वर्षात घ्यावी

## पुरोगामी शिक्षक संघटनेची शासनाकडे मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

राज्यातील इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षा या शैक्षणिक वर्षात घेणे बाबतचा शासन निर्णय पहिले सत्र संपल्यानंतर जाहीर होणे ही बाब संयुक्तिक नसल्याने विद्यार्थी हितासाठी दि. १७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षात न करता पुढील शैक्षणिक वर्षात (सन २०२६ - २७) पासून करावी अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने महाराष्ट्र शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनाच्या प्रती राज्याचे शालेय शिक्षण मंत्री, शिक्षण राज्यमंत्री, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त, प्राथमिक शिक्षण संचालक व माध्यमिक शिक्षण संचालक यांनी मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

शासनास दिलेल्या निवेदनात राज्यातील शिष्यवृत्ती परीक्षा ही महत्वाची परीक्षा असल्याने या परीक्षेची तयारी विद्यार्थी, शिक्षक व पालक वार्षिक परीक्षा संपताच म्हणजे एप्रिल पासूनच करीत असतात. आतापर्यंत इयत्ता ४ थी व ७ वी वर्गाच्या शिष्यवृत्ती परीक्षेबाबत शासनाची अधिकृत घोषणा नसल्याने नेहमी प्रमाणे या वर्षी फक्त इयत्ता ५ वी व ८ वीच्या वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा तयारी विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी केली आहे. परीक्षेच्या फक्त ६ महिने अगोदर इयत्ता ४ थी- ७ वी वर्गाची शिष्यवृत्ती परीक्षा एप्रिल २०२६ मध्ये व इयत्ता ५ वी- ८ वी या वर्गांची शिष्यवृत्ती परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये घेणे आणि २०२६ - २७ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ४ थी- ७ वी वर्गाची परीक्षा घेणे बाबतचा निर्णय जाहीर करणे हा चालू शैक्षणिक वर्षातील इयत्ता ४ थी व ७ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यावर अन्यायकारक कारक आहे. निवेदनावर राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्यसरचिटणीस हरीश ससनकर यांची स्वाक्षरी आहे. अशी माहिती राज्यकोषाध्यक्ष जी. एस. मंगनाळे, जिल्हाध्यक्ष इरफान मिर्झा, जिल्हा सरचिटणीस.प्रदिप गावंडे, विभागीय सचिव प्रदीप वनारसे जिल्हा कोषाध्यक्ष भाष्कर टोम्पे, देविदास बाकल, राजेंद्र सोमनाथे दिपकराव चौधरी भाऊराव शिंदे यांनी दिली.

**शासनाचा निर्णय स्वागतार्ह पण यावर्षी खूप उशीर झाला :** शिष्यवृत्ती सारख्या महत्वाच्या परीक्षेबाबाताचा निर्णय किमान एप्रिल मध्ये जाहीर होणे आवश्यक होता. शिक्षक पहिल्या सत्रात अभ्यासक्रम पूर्ण करुन दुसऱ्या सत्रात सराव प्रश्न पत्रिका सोडवून घेत असतात.

# गोगरी येथे दिवाळीच्या सुट्टीत ५० युवक-युवतींचे रक्तदान



**मंगरुळपीर :** मंगरुळपीर तालुक्यातील संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोगरी गावात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळीच्या सुट्टीत समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. भाऊबीजेच्या शुभदिनी गावातील तरुणांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजासाठी आदर्श निर्माण केला. जिल्ह्यातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेता या उपक्रमाला विशेष महत्त्व लाभले असून, एकूण ५० युवक-युवतींनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला आहे. शिबिराची सुरुवात आराध्य पवनपुत्र हनुमान यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी गावचे सरपंच केशवराव जटाळे, उपसरपंच सौ. कविता पंकज इंगोले, ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्ती समिती अध्यक्ष विजयराव कंकणे, तसेच शास्त्रज्ञ डॉ. संतोष बोथे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी सेवानिवृत्त माजी सैनिक विनोद पवार, विनोद जाधव, नंदु पावशे, तसेच खासदार वैद्यकीय कक्ष वाशीम जिल्हा अध्यक्ष शिवा सावके आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन डोफेकर यांनीही उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढविला.

# दिवाळीच्या सुट्टीत घ्या निसर्गसंपन्न अनुभव

**मंगरुळपीर :** दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि सुट्टीचा उत्सव! या सुट्टीत थोडं वेगळं काही अनुभवायचं ठरवला असेल तर निसर्गाच्या कुशीत वसलेलं काटेपूर्णा अभयारण्य तुमच्यासाठी आदर्श ठिकाण ठरेल. वाशिम-अकोला जिल्ह्याच्या सीमेवर वसलेले हे अभयारण्य निसर्गप्रेमी आणि पर्यटकांसाठी स्वर्ग ठरले आहे. येथे जंगल सफारीसोबतच काटेपूर्णा प्रकल्पातील नौका विहाराचा आनंद पर्यटकांना मिळतो. ७३.६९ चौ.किमी क्षेत्रफळावर पसरलेले हे अभयारण्य जैवविविधतेचे अद्वितीय उदाहरण आहे. पक्षी, वन्यप्राणी आणि वनस्पतींच्या प्रजातींनी नटलेले हे अभयारण्य निसर्ग निरीक्षण, ट्रेकिंग, बर्ड वॉचिंग आणि फोटोग्राफीसाठी उत्कृष्ट केंद्र ठरते.

# आदिशक्ती संस्थेतर्फे यावर्डीच्या मंगेश, यश व साक्षीला प्रत्येकी १२ हजार रुपयाची आर्थिक मदत



■ प्रतिनिधी | कारंजा ■

गरीब होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथील माजी विद्यार्थी मंगेश इंगोले, यश मांगे व कु.साक्षी वानखडे या तीन विद्यार्थ्यांना आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था वाल्हई तर्फे प्रत्येकी बारा हजार रुपयाचा धनादेश देऊन शैक्षणिक मदत करण्यात आली.

दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथे गरीब व होतकरू माजी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी धनादेश वाटप कार्यक्रमात आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था वाल्हईच्या अध्यक्षा कविता ठाकूर, संचालक प्रा.निर्मल ठाकूर, ग्रामपंचायत यावर्डीच्या सरपंचा विद्याताई परमेश्वर आमले, पंचायत समिती सदस्य शुभमभाऊ बोनके, गावचे पोलीस पाटील सुनीलभाऊ ठाकरे व बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डीचे मुख्याध्यापक विजय भड यांच्या शुभहस्ते मंगेश लक्ष्मण इंगोले, यश शंकरराव मांगे व कु. साक्षी वानखडे यांना प्रत्येकी बारा हजार रुपयाचा धनादेश वितरित करण्यात आला.

मंगेश, यश व कु.साक्षी हे तिन्ही विद्यार्थी बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथे इयत्ता आठवी ते दहावी पर्यंत शिकत होते. मंगेश इंगोले याने बारावी पर्यंतचे शिक्षण कारंजा येथे पूर्ण करून त्याचा नंबर ?ग्रीकल्चर कॉलेज तोंडापूर, कळमनुरी जिल्हा हिंगोली येथे बीएससी एग्री करिता लागला. परंतु घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्याच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था वाल्हई तर्फे मंगेश लक्ष्मण इंगोले ला बीएससी फर्स्ट इयरला दहा हजार रुपये, बीएससी सेकंड इयरला दहा हजार रुपये, थर्ड इयर दहा हजार रुपये व आता बारा हजार रुपये अशी आता पर्यंत ४२ हजार रुपयाची शैक्षणिक मदत करण्यात आली.

# समाजाला प्रगतीपथावर नेण्यासाठी युवकांनी व्यसनांपासून दूर राहणे गरजेचे

■ प्रतिनिधी | रिसोड ■



समाजात तरुणाईची शक्ती ही राष्ट्र उभारणीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे, त्यामुळे युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता प्रगतीकडे लक्ष केंद्रित करणे किती आवश्यक आहे, याचा महत्त्वाचा संदेश महाबोधी बौद्ध विहारातील वर्षावास कार्यक्रमाच्या समाप्ती निमित्त भिक्खू रत्नदिप थेरो यांनी दिला.गुरू पौर्णिमेपासून सुरू झालेल्या या धार्मिक कार्यक्रमाची सांगता नुकतीच करण्यात आली, ज्यात अनेक बौद्ध उपासक आणि संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या महत्त्वपूर्ण सोहळ्याने समाजाला नवी दिशा दिली.

**वर्षावास पर्वाचा समारोप आणि मोलाचा संदेश**

महाबोधी बौद्ध विहाराच्या परिसरात वर्षावास कार्यक्रमाची सुरुवात गतवर्षी (दि. १०) जुलै २०२५ रोजी झाली होती. या पर्वात ग्रंथवाचनाचा नित्यक्रम अव्याहतपणे सुरू होता.हे ग्रंथवाचन कार्य कल्पना कैलास जुमडे यांनी पूर्ण केले. या कार्यक्रमाची समाप्ती (दि. ७) ऑक्टोबर रोजी झाली. याच पार्श्वभूमीवर (दि. २५) ऑक्टोबर रोजी विहारात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात भिक्खू रत्नदिप थेरो यांच्यासह पूज्य भंदत राहुल यांची सन्माननीय उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना भिक्खू रत्नदिप थेरो यांनी समाजातील युवकांना व्यसनाधीनते पासून दूर राहण्याचे आणि स्वतःच्या तसेच समाजाच्या विकासासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

# स्व. सिंदुबाई वाघमारे यांचे मरणोत्तर नेत्रदान



■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड जि.वाशिम येथील संतोष वाघमारे यांची आई स्व. सिंदुबाई पुरुषोत्तम वाघमारे यांच्या वयाच्या ८१ व्या वर्षी दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.५० वाजता निधन झाले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे तसेच संपुर्ण वाघमारे कुंटुबातील आधारस्तंभ तथा सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या तसेच समाजकार्याची आवड असलेल्या स्व. सिंदुबाई पुरुषोत्तम वाघमारे यांचे निधन झाल्याने संपुर्ण वाघमारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा असताना वाघमारे कुंटुबीयांनी एवढया दुखामध्येही मुत्यनंतर दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, डॉ. आशिष बेदरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली सुधिर साळवे व रमेश ठाकरे, संदिप पोफळे यांनी स्व. सिंदुबाई पुरुषोत्तम वाघमारे यांची नेत्र बुबुळे काढली.

# शेतामध्ये जाणारा रस्ता उपलब्ध करून द्यावा; अन्यथा शेतकऱ्यांनी दिला आत्मदहनाचा इशारा

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



तालुक्यातील पोटी येथील शेतकरी प्रशांत विनोद गावंडे व श्रीकांत विनोद गावंडे यांनी यांच्या शेताच्या समोर असलेल्या शेतकऱ्यांचा रस्ता अडवलेला आहे अशा आशयाचे निवेदन राज्याचे महसूल मंत्री ना . मा. चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन यांना रस्ता नसलेल्या पोटी येथील सुधाकर सुडके, रमेश दोड, महादेव गावंडे, राजू गावंडे , गजानन गावंडे, ज्ञानेश्वर दोड यां शेतकऱ्यांनी दिले आहे . यांच्या शेतामध्ये जाणारा रस्ता हा प्रशांत विनोद गावंडे व श्रीकांत विनोद गावंडे गैर अर्जदार यांनी अडवला असून तो खोदून ठेवलेला आहे. सदर निवेदनात सांगितले आहे की सध्या सर्व शेतामध्ये सोयाबीन व कापूस हे पीक असून सोयाबीन सोगनी व काढणे तसेच कापूस वेचण्यासाठी आलेला आहे. परंतु गावंडे यांच्या शेतामध्ये जाणारा रस्ता हा गैर अर्जदार यांनी अडवलेला असून तोंडाशी आलेले सोयाबीन व कपाशी चे पिक तक्रारदार कुटुंबीयांना रस्ता उपलब्ध नसल्यामुळे घेता येत नाही. त्यामुळे यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ शकते, या शेतीलगतच माजी सैनिक सुधीर सुडके यांची देखील शेती असून देशाची २८ वर्षे सेवा केल्यानंतर आपल्या गावी शेती करीत असणारे माजी सैनिक सुडके यांच्यावर देखील आत्मदहनाची वेळ आलेली आहे. शेतीच्या आजूबाजू मध्ये असणाऱ्या शेतीमध्ये पैदल, ट्रॅक्टर व बैल गाडी जात नसून सदर शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा करून द्यावा अन्यथा दिनांक २८ ऑक्टोबर रोजी आम्ही आमच्या शेतात असलेल्या सोयाबीनच्या सुडीवरच आत्मदहन करू असा इशारा शेतकरी सुधाकर सुडके, रमेश दोड, महादेव गावंडे राजू गावंडे , गजानन गावंडे, ज्ञानेश्वर दोड यांनी दिला आहे.

आमच्या शेतामध्ये दैनंदिन काम करण्याकरिता तसेच आलेले पीक घरापर्यंत नेण्याकरिता रस्ता उपलब्ध करून द्यावा यासाठी आम्ही राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली यावेळी मंत्री महोदयांनी पुढील तीन दिवसांमध्येच आपल्या शेतमाल घरी नेण्याकरिता रस्ता उपलब्ध करून देण्यात येईल अशा सूचना जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. जर २८ ऑक्टोबर पर्यंत मंत्री महोदय व संबंधित अधिकाऱ्यांनी आमच्या शेतातील शेतमाल घरी आणण्याकरिता व शेतात येण्या-जाण्याकरिता रस्ता मोकळा करून दिला नाही. तर आम्ही आमच्या शेतात असलेल्या सोयाबीनच्या रांगेवरच आत्मदहन करू असा इशारा यावेळी निवेदनाद्वारे माजी सैनिक सुधीर सुडके यांनी दिला आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२६ ■ रविवार, २६ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## दिवाळी संपली; वर्धा बसस्थानकावर प्रवाशांची लाट, गर्दीनं झळाळलं स्थानक



**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीचा सण उत्साहात साजरा झाल्यानंतर आता नागरिक परतीच्या प्रवासासाठी मोठ्या संख्येने वर्धा बसस्थानकाकडे धाव घेत आहेत. परिणामी, स्थानक परिसर प्रवाशांच्या गर्दीनं अक्षरशः फुलून गेला आहे. नौकरीच्या गावी परतणारे प्रवासी, तर काहीजण धार्मिक आणि पर्यटन स्थळांकडे रवाना होत असल्याचे दृश्य दिसत आहे.राज्य परिवहन महामंडळाकडून अमरावती, राजुरा, चंद्रपूर, अहेरी, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, जळगाव,या मार्गांवर अतिरिक्त बसगाड्या सोडण्यात आल्या असून, प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक बसगाड्यांमध्ये प्रवाशांनी तिकीट मिळवण्यासाठी रांगा लावल्या असून, बसस्थानक कर्मचाऱ्यांना गाड्या ने-आण सुरळीत पार पाडण्यासाठी नाहक श्रम घ्यावे लागत आहेत. सणानंतरचे हे दिवस परगावी जाणारे, तसेच उरलेल्या सुट्ट्यांचा आनंद घेणारे प्रवासी यांच्या गडबडीत जात आहेत. काहीजण घरी साजरी केलेल्या दिवाळीनंतर आता मामाच्या गावी निघाले आहेत, तर काही प्रवासी धार्मिक स्थळांकडे दर्शनासाठी रवाना झाले आहेत. बसस्थानकात दिवसभर प्रवाशांची लगबग सुरू असून नागरिकांच्या चेहऱ्यावर सणानंतरही आनंदाचे तेज दिसून येत आहे. महामंडळानं अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नेमणूक करून गर्दीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र तरीही बस मिळवण्यासाठी प्रवाशांची धावपळ सुरूच आहे. दिवाळीनंतर परतीच्या प्रवासानं वर्धा बसस्थानक पुन्हा एकदा उत्साहात न्हाऊन निघाले आहे.

## जिल्ह्याचा झेंडा फडकवणारी अलिझा शहा



**कारंजा (घा.) जनमाध्यम :** जिल्हा क्रीडा परिषद व क्रीडा युवक संचालनालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत सनशाईन स्कूलची अलिझा शहा हिने जिल्ह्यात बाजी मारली. १७ वर्षांखालील मुलींच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तीने पहिला क्रमांक पटकावत सनशाईन चा झेंडा फडकावला.सलग दुसऱ्या वर्षी मिळवलेली कामगिरी अलिझाच्या सातत्याचे प्रतीक ठरली आहे. तिच्या या यशामुळे चंद्रपूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. तिच्या या घवघवीत यशाबद्दल गट शिक्षणाधिकारी वीणा धावडे, संस्थाध्यक्ष प्रेम महिले, सचिव विजय ठाकरे, तालुका क्रीडा संयोजक मंगेश जाचक, प्रशिक्षक पवन ठाकरे व हेमंत बन्नगरे तसेच शिक्षक-व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अलिझाचे कौतुक केले आहे.

## सिलेंडर स्फोटानंतर झामरे परिवार उद्ध्वस्त

### -शिवसेनेची धाव : राजेश सराफांच्या पुढाकाराने दिला दिलासा



**वर्धा जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील वडगाव (खुर्द) गावात सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन प्रविण झामरे व त्यांचे वडील गोपाल झामरे यांचा संसारच आगीत भस्मसात झाला. काही क्षणांत झामरे यांच्या मेहनतीने उभ्या राहिलेल्या घराचे रूपांतर राखेत झाले.घटनेची माहिती मिळताच शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आपल्या पदाधिकाऱ्यांसह त्यांनी झामरे परिवाराची भेट घेतली, नुकसानाचे वास्तव पाहिले आणि तातडीने ?११,००० ची आर्थिक मदत सुपूर्द केली. संकटाच्या काळात सेनेने धाव घेतली म्हणजे कार्यकर्त्यांना आधार मिळतो, हे पुन्हा अधोरेखित झाले.२३ ऑक्टोबरच्या रात्री सिलेंडर मधून गॅस लिकेज झाल्याने आग लागली आणि काही क्षणांतच स्फोट झाला. झामरे कुटुंब रोजंदारी करून उदरनिर्वाह करते, त्यामुळे या आगीत घरातील सर्व वस्तू भस्मसात होऊन ते अक्षरशः रस्त्यावर आले.शिवसेनेचे वर्धा विधानसभा प्रमुख सुनील पारिसे यांनी घटना कळताच सराफ यांना माहिती दिली. त्यानंतर जिल्हाप्रमुखांनी शासन व गॅस कंपनीकडून मदतीसाठी पाठपुरावा करण्याचा शब्द दिला. ग्रामीण भागातील नागरिकांच्या संकटात सेनेची तत्पर साथ हीच खरी जनसेवा असल्याचे चित्र या प्रसंगी दिसले.या वेळी जिल्हा समन्वयक अनिल देवतारे, उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी, शहरप्रमुख शार्दूल वांदिले, तालुका प्रमुख रोशन कोंबे, विधानसभा संघटक रोशन राऊत, विजय धोंगडे यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## खेळातून सुदृढ समाजनिर्मिती शक्य : खा.अमर काळे

### पालकमंत्री चषक कबड्डी स्पर्धेचे पुलगावात उत्साहात उद्घाटन



**पुलगाव जनमाध्यम :** मैदानाशी नाळ जोडल्याने शरीर आणि मन दोन्ही सुदृढ राहतात. व्यसनाधिनतेपासून दूर राहून खेळाच्या माध्यमातून जीवनात शिस्त आणि सकारात्मकता टिकवली पाहिजे. प्रत्येक युवकाने दिवसातील एक तास खेळासाठी राखीव ठेवल्यास सशक्त समाज आणि राष्ट्रनिर्मिती अधिक दृढ होईल, असे प्रतिपादन खासदार अमर काळे यांनी केले.वर्धा जिल्हा क्रीडा भारती आणि गांधीनगर स्पोर्टिंग लब यांच्यावतीने डॉ. हेडगेवार स्टेडियम येथे आयोजित पालकमंत्री चषक जिल्हास्तरीय पुरुष व महिला कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन काळे यांच्या हस्ते झाले.अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष संजय गाते होते. या प्रसंगी माजी खासदार रामदास तडस, जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष महेश ठाकूर, क्रीडा भारतीचे जिल्हा संयोजक हरीश गांधी आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात क्रीडाज्योत प्रज्वलनाने झाली. आर. के. स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ज्योत परिसरात फिरवून अभिवादन केले. प्रास्ताविक अविनाश भोपे यांनी केले, संचालन अजय बोबडे यांनी केले.यावेळी राष्ट्रीय कबड्डीपटू रवी साखरे, विनोद बिरे आणि दिलीप बन्नगरे यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेतील सामने पाहण्यासाठी पुलगावातील नागरिक, युवक आणि महिला प्रेक्षकांची मोठी गर्दी जमली होती.

## मदतीची दिवाळी अपुरीच

## ६३ लाख शेतकऱ्यांनाच दिलासा, उर्वरितांची प्रतीक्षा कायम



**वर्धा जनमाध्यम :** अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतीचा दिलासा मिळेल, अशा ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या होत्या. मात्र मंगळवार (ता. २१) पर्यंत राज्यातील फक्त ६३ लाख शेतकऱ्यांपर्यंतच निधी पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारने जाहीर केलेल्या तब्बल ३१ हजार कोटींच्या पॅकेजपैकी फक्त ५,८६६ कोटी ९६ लाख रुपयेच वितरीत करण्यात आले आहेत. राज्यातील सुमारे ६८ लाख हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले होते. त्यापैकी केवळ ४८.४१ लाख हेक्टर क्षेत्रासाठीच मदतीचा निधी मंजूर झाला आहे. तीन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देऊ अशी सरकारची घोषणा असली, तरी राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (एनडीआरएफ) च्या नियमांमुळे मदत दोन हेक्टरपर्यंतच सीमित राहिली. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना अपुरी मदत मिळाल्याची नाराजी व्यक्त होते आहे.दरम्यान, केंद्र सरकारकडून निधीची प्रतिपूर्ती झाल्यानंतर राज्य सरकारने उर्वरित एका हेक्टरपर्यंतच्या शेतकऱ्यांसाठीसुद्धा मदतीला मंजुरी दिली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाने ६४८ कोटी १५ लाख रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करत नवा शासन निर्णय जारी केला आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या मते, राज्यभर एकूण ८,१३९ कोटींचे वितरण पूर्ण झाले आहे. मात्र लक्ष्मीपूजनानंतरही अनेक शेतकऱ्यांच्या घरात दिव्यांचा उजेड न पसरल्याने ग्रामीण भागात नाराजीचे सूर उमटत आहेत.

## पाणीसमस्येवर मनसेचा तोडगा; नव्या हॅण्डपंपाचा शुभारंभ



**बोरगाव मेघे (ता. वर्धा) :** गेल्या अनेक दिवसांपासून पिण्याच्या पाण्याच्या समस्येनं ग्रासलेल्या बोरगाव मेघे येथील ग्रामस्थांना अखेर दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकाराने नव्या बोअरवेल हॅण्डपंपाचा शुभारंभ करत नागरिकांच्या मागणीतून स्वच्छ पाण्याचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे.

या उपक्रमासाठी मनसे जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे आणि जिल्हा उपाध्यक्ष नितीन अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करण्यात आले. पालकमंत्र्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनाच्या पाठपुराव्याला आज यश लाभले असून, या प्रकल्पाच्या उद्घाटनावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तालुका अध्यक्ष धर्मदीप हिवरकर, तालुका संघटक नितीन परतेकी, तालुका उपाध्यक्ष जीवन पोहनकर, सर्कल अध्यक्ष शंकर वासनिक, प्रेम नागेश्वर, राहुल नागोसे यांचा या योजनेसाठी विशेष सहभाग राहिला. ग्रामस्थांनी मनसेच्या स्थानिक नेतृत्वाचे आभार मानले असून, या उपक्रमामुळे बोरगाव मेघे वॉर्डातील पाण्याच्या तुटवड्यावर मोठा दिलासा मिळाला आहे.

## विहिरीत पडून तरुण शेतकऱ्याचा मृत्यू

### -विरुळ आकाजी परिसरात घडली दुर्दैवी घटना



**विरुळ आकाजी:** शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास शेतकरी इश्वर वसंत गाठे (वय २९) यांचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली गाठे हे शेतात फेरफटका मारत असताना चुकून तोल गेल्याने विहिरीत पडले. तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले, मात्र बुडाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुलगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी अमोल बरडे यांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. अपघाती मृत्यूची नोंद पोलिसांकडून करण्यात आली आहे. इश्वर वसंत गाठे यांच्या निधनामुळे गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या मागे आई-वडील, पत्नी व भावंडे असा मोठा परिवार असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शनिवारी विरुळ येथील मोक्षधामावर त्यांच्या अंत्यसंस्कार करण्यात आला, यावेळी गावकऱ्यांची गर्दी उसळली होती.

## मुक्या जीवांना सन्मानाचा स्मृतिगंध

## वर्ध्यात करुणेचं साक्षात रूप: आशिष गोस्वामींचा हृदयस्पर्शी उपक्रम




**वर्धा जनमाध्यम :** प्राणीही आपल्याच सारखेच असतात फक्त बोलू शकत नाहीत, त्यांच्या डोळ्यांतलं प्रेम, नजरेतील ममता आणि घरभर पसरलेला चैतन्याचा सुगंध कोण सांगेल? पण हे सगळं अचानक थांबलं, की घर रिकामं होतं, मन सुन्न होतं, आणि पाळीव प्राण्याच्या आठवणी डोळ्यांत पाणी आणतात. अशा संवेदनांना सन्मान देत वर्ध्यात पीपल फॉर अ?निमल्स संस्थेचा 'स्मृतिगंध' हा भावनिक उपक्रम फुलला आहे.या उपक्रमांतर्गत करुणाश्रम, पिपरी येथे पाळीव प्राण्यांसाठी सन्मानपूर्वक अंतिम संस्कार करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. एवढंच नव्हे, तर आपल्या प्रिय प्राण्याच्या स्मृतीत वृक्ष लावून त्याची आठवण कायम जपण्याची अद्भुत संकल्पनाही यामध्ये आहे.संस्थेचे सचिव आशिष गोस्वामी म्हणाले, स्मृतिगंध ही केवळ जागा नाही, तर प्रेम आणि करुणेची भावना जिवंत ठेवण्याचं प्रतीक आहे. गोस्वामी हे जिल्ह्यातील प्राणीसेवेचे पर्यायवाची नाव ठरले आहेत. त्यांनी हिंस्त्र बिबट्यांपासून ते व्यसनाधीन माकडांपर्यंत सर्व जीवांवर उपचार करत असंख्य प्राण्यांना नवजीवन दिलं आहे.मानवतेच्या नावाने करणावं तसं काम गोस्वामी करत आहेत, जिथं मूक जीवांना मृत्यूनंतरही आदराने निरोप मिळतो, अशा स्मृतिगंध'चा सुगंध आज वर्ध्याच्या सीमा ओलांडून हृदयापर्यंत पोहोचला आहे,

## दिवाळीत अभिनव विचार मंच'चा सेवाभावी उपक्रम

### -गरजू विद्यार्थिनींना कपडे, औषधे व आनंदाचा प्रसाद



**हिंगणघाट जनमाध्यम :** दिवाळीच्या प्रकाशमय आणि आनंददायी वातावरणात हिंगणघाट येथील अभिनव विचार मंच या सामाजिक संस्थेने पुन्हा एकदा सेवाभावाचा दीप प्रज्वलित केला आहे. मंचाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या अभिनव सहाय्यता निधी अंतर्गत गरजू व गुणवंत विद्यार्थिनींना मदतीचा हात देण्यात आला.या उपक्रमाअंतर्गत शेकापुर (बाई) येथील लावण्या यादव शिवणकर ही सिकलसेल आजाराशी झुंज देत शिक्षणासाठी प्रयत्नशील असलेली विद्यार्थिनी तसेच उत्कर्षा काटकर ही सोरायसिस या त्वचारोगाने ग्रस्त विद्यार्थिनी दत्तक घेण्यात आल्या आहेत. या दोघींना सहाय्यता निधीमार्फत दरवर्षी औषधोपचार आणि रक्तपुरवठा केला जातो.दिवाळी निमित्त या दोन विद्यार्थिनींना कपडे, फराळ साहित्य, मिष्ठान्न, भेटवस्तू, औषधे आणि निधी देऊन दिवाळी साजरी करण्यात आली. या सेवाभावी कार्यात नितीन सुकळकर, चंद्रशेखर रेवतकर, ओमप्रकाश मुडे, प्रसाद पाचखडे, श्रीकांत डोळसकर, चंद्रशेखर दाते, सारंग चरडे, प्रमोद बोरकर, विकास नागरकर, राजेंद्र मोघे, शरद वाघमारे, जयंत देवडे, मनीष तडस, जीवन तडस आणि रेणुदास नागतोडे उपस्थित होते.अभिनव विचार मंचाच्या या उपक्रमामुळे समाजात सकारात्मकता आणि माणुसकीची ज्योत अधिक उजळली आहे. लावण्या आणि उत्कर्षा यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे स्मित हेच या दिवाळीचे खरे सौंदर्य ठरले.

## जि.प.च्या ५ प्रभागांच्या आरक्षणावर ७ हरकती; २७ नोव्हेंबरला सुनावणी

### -३ नोव्हेंबरला अंतिम आरक्षण जाहीर




**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी जोरात सुरू असून राज्य निवडणूक आयोगाने नुकतेच ५२ प्रभागांचे प्राथमिक आरक्षण जाहीर केले आहे. या आरक्षणावर नागरिक व राजकीय कार्यकर्त्यांकडून एकूण सात हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. २७ नोव्हेंबर रोजी नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात या हरकतींची सुनावणी घेण्यात येणार असून, ३१ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर करण्यात येईल. त्यानंतर ३ नोव्हेंबर रोजी अंतिम आरक्षणाचा तपशील प्रसिद्ध केला जाणार आहे.जिल्ह्यातील विरूळ व रोहणा या प्रभागांवर प्रत्येकी दोन तर नाचणगाव, कानगाव आणि मोरांगणा या प्रभागांवर प्रत्येकी एक अशी सात हरकती नोंदविल्या गेल्या आहेत. सध्या जिल्हा परिषदेत ५२ सदस्य कार्यरत असून, सदस्यसंख्या वाढविण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला संबंधित कायद्यात सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्हा परिषदेतील निवडणुकांशिवाय समाजकार्यातून पात्र मानले जाणाऱ्या सदस्यांची संख्या ५७ पर्यंत जाण्याची अपेक्षा आहे.

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर आज जिल्ह्याच्या दौ-यावर



**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर दि. २६ ऑक्टोंबर रोजी जिल्ह्याच्या दौ-यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

दि.२६ ऑक्टोंबर रोजी सकाळी ९ वाजता नालवाडी ते म्हसाळा रस्त्याचे लोकार्पण कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १० वाजता सर्कस मैदान येथे आयोजित वर्धा क्रिकेट चॅम्पियन्स लिग टुर्नामेन्ट कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२ वाजता दत्ता मेघे इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस ऑडिटोरियम सावंगी मेघे येथे आयोजित ई-भूमीपूजन सोहळा कार्यक्रमास उपस्थिती.

सायंकाळी ७ वाजता पिपरी मेघे येथील ग्रामपंचायत सुविधा केंद्राच्या नुतणीकरण केलेल्या इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमास उपस्थिती व राखीव. दि.२७ ऑक्टोंबर रोजी सकाळी ६.१५ वाजता वर्धा येथून नागपूर कडे प्रयाण करतील.

## रात्रीचा आसमंत उजळवणारी वर्ध्याची दिवाळी;

## छायाचित्रकार राहुल तेलरांधे यांची कलाकारी ठरली उठावदार



**वर्धा :** शहराच्या आकाशात दिवाळीच्या रात्री फटाक्यांच्या झगमगाटाने अविस्मरणीय रंग भरले. लक्ष्मीपूजन आणि भाऊबीज या दोन खास दिवशी घराघरांवर आकर्षक रोषणाई झळकली होती. रात्री उशिरापर्यंत फटाक्यांची आतषबाजी सुरू होती, त्यामुळे संपूर्ण वर्धा उजळून निघाली होती.विशेष म्हणजे, या प्रकाशोत्सवाची मजा घेण्यासाठी नागरिकांनी हनुमान टेकडीवर तुफान गर्दी केली होती. रंगीबेरंगी फटाक्यांनी आसमान न्हाल्याने हा देखावा हजारो नागरिकांना आकर्षून गेला. तरुणाईपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील लोक दिवाळीचा आनंद लुटताना दिसले.फटाक्यांची झगमग आणि रोषणाईचे नयनरम्य क्षण कॅमेरात कैद करणे तांत्रिकदृष्ट्या मोठे आव्हान असते. मात्र, वर्ध्याचे छायाचित्रकार राहुल तेलरांधे यांनी आपल्या फोटोग्राफीच्या कौशल्यातून हे अविस्मरणीय क्षण अत्यंत सुरेखपणे टिपले. त्यांच्या प्रकाशचित्रांमुळे वर्ध्याच्या दिवाळीची उत्सवमुद्रा आठवणीत राहिली आहे

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

## एकाच 'खुर्ची'साठी दोघी भिडल्या

### गडकरींसमोरच महिला अधिका–यांचे लाजिरवाणी कृत्य

**नागपूर :**नागपूरमध्ये झालेल्या १७ व्या रोजगार मेळाव्यात एक अनपेक्षित आणि लज्जास्पद घटना घडली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या समोरच टपाल विभागातील दोन महिला अधिकारी एकाच खुर्चीसाठी एकमेकींशी भिडल्या आहेत. या प्रसंगाचा व्हिडीओ सोशल मीडीयावर चांगलाच व्हायरल झाला असून समाजमाध्यमांवर झालेल्या प्रकारावर टीका होत आहे.नागपूरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील सुमारे ५१ हजार तरुणांना नियुक्तिपत्रे वाटली. नागपूर येथील कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, स्थानिक खासदार, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. गडकरी व्यासपीठावर बसलेले असताना त्यांच्या शेजारी असलेल्या सोफ्यावर टपाल विभागाच्या दोन महिला अधिकारी



बसल्या होत्या.या सोफ्यावर प्रत्यक्षात केवळ एकाच अधिका-यासाठी जागा राखीव ठेवण्यात आली होती, तसेच त्या जागेवर बसणा-या अधिका-याचे नाव असलेली पाटीही ठेवण्यात आली होती. मात्र, दोघी महिला अधिकारी ज्यांपैकी एकीची बदली दक्षिण भारतात झाली असूनही त्या अद्याप मुख्यालय सोडलेले नव्हते. त्या दोघीही व्यासपीठावर उपस्थित झाल्या. एकाच खुर्चीवर बसण्याचा प्रयत्न करू लागल्या. प्रथम हसत-खेळत सुरू झालेला हा प्रसंग काही क्षणांतच गंभीर झाला. दोन्ही अधिका-यांमध्ये खुर्चीसाठी धक्काबुक्की झाली, एकमेकींना ढकलण्याचा प्रकार घडला. हा सर्व प्रकार व्यासपीठावर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या समोरच झाला.

## पुढील दोन दिवस पाउस कायम; हवामान खात्याचा अंदाज

**मुंबई :** सध्याच्या ऑक्टोबर हीटमुळे हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. राज्यात अवकाळी पाउस सुरू झाला असून, पुणे, मुंबई आणि सोलापूरसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पावसामुळे तापमानात घट झाली असली तरी,



गडचिरोलीसह अनेक भागांतील भात व कापूस पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील दोन दिवस पाउस कायम राहणार आहे.सध्या दिवसभ ऑक्टोबर हीट जाणवत असून उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. मात्र आता याच उकाड्यादरम्यान पुण्यासह राज्यातील अनेक अनेक भागातील नागरिकांना दिलासा मिळू शकतो. तामिळनाडू, केरळ आणि दक्षिण भारतात २६ ते २८ ऑक्टोबर दरम्यान अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या भागात रेड आणि यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे, त्याचा परिणाम परिणाम महाराष्ट्रातील हवामानावर होणार आहे. पुण्यात पुढील दोन दिवस यलो अलर्ट देण्यात आला आहे. ऑक्टोबर हिटमुळे वाढलेल्या उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना गेल्या दोन दिवसांपासून पडणा-या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. शहर आणि परिसरात गुरु वार आणि शुक्रवार पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे तापमानात मोठी घट झाली. तर आता पुढचे दोन दिवस मेघगर्जना आणि विजांचा कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तसेच मुंबईतही पुढचे दोन दिवस पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात काल रात्री परतीच्या पावसामुळे भात पिकाचं मोठं नुकसान झाले. २४ ऑक्टोबर रात्री एकपासून पहाटे चार वाजेपर्यंत जवळपास तीन ते असे परतीच्या पावसाने झोडपून काढले. पावसामुळे सध्या कापणी वर असलेल्या भात पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे. जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने कापूस आणि भाताची शेतीचे नुकसान केले.

## 80 फुटांवर पाळण्यात अडकलेल्या 18 जणांची सुखरूप सुटका

**कागल :**येथे सुरू असलेल्या श्री गहिनीनाथ हजरत गैबीपीर उरूसात दूधगंगा डेअरीजवळ उभारण्यात आलेला जॉइंट व्हील नावाचा पाळणा तांत्रिक कारणाने वर जाउन अडकल्याने या पाळण्यात बसलेले अठरा जण ऐंशी फुटांवर जाउन तब्बल चार तास अडकले. रात्री



०८:३० वाजता हे पाळण्यात बसले होते. रात्री ११:३० वाजेपासून कोल्हापूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या बचाव पथकाने एका- एका व्यक्तीस खाली घेण्यास सुरु वात केली. रात्री १२:३० वाजता सर्व जण सुखरूप खाली आले. यामध्ये पाच महिला चार लहान मुले व नउ पुरु षांचा समावेश होता. हे सर्व जण कागल, कणेरी मठ, गोकुळ शिरगाव येथील होते.तब्बल चार तास हा थरार चालला. सर्व जण खाली येण्यासाठी प्रतीक्षा करीत होते. आपण इतक्या उंचीवर येउन अडकलो आहोत. या भीतीने चिंताग्रस्त होउन हे लोक एकमेकांना धीर देत होते, तर खाली नातेवाईक त्यांना हातवारे करून धीर देण्यासाठी धडपडत होते. मोबाइल फोनवरील संपर्क यासाठी मोठा आधार ठरला. यामुळे कोणता गोंधळ उडाला नाही. सर्वांनी संयम बाळगला. कोल्हापूर महानगरपालिकेच्या टर्न टेबल लॅडर गाडीने रात्री ११:०० वाजेच्या सुमारास एका- एका व्यक्तीस खाली उतरविण्यात सुरुवात करताच उपस्थित नागरिकांनी टाळ्या वाजवल्या आणि प्रशासनासह सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

कागल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत गर्दीवर नियंत्रण मिळविले. उरूसानिमित्त दरवर्षी येथे लहान- मोठ्या आकारांतील पाळणे येतात. गेल्या दोन वर्षांपासून हा जाइंट व्हील नावाचा पाळणा येत आहे. यामध्ये वर्तुळाकारात समोर तोंड करून मांडलेल्या खुर्चीवर लोकांना बसतात. हे वर्तुळाकार चक्र लोखंडी अँगल वरून सरकत वर ऐंशी फुटांवर जाते व तेथे स्थिर होउन फिरते, अशी याची रचना आहे. सायंकाळी ०७:०० वाजता हा पाळणा सुरू झाला. रात्री ०८:३० वाजेच्या सुमारास तांत्रिक कारणाने हे गोलाकार चक्र वर जाउन अडकले. पाळणा चालकांनी तासभर प्रयत्न केला; पण यश आले नाही. शेवटी कोल्हापूरहून महापालिकेचे बचाव पथक बोलवून यात अडकलेल्या सर्वांना बाहेर काढले. याप्रसंगी उरूस समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रवीण काळबर, सौरभ पाटील, दीपक मगर, अमित पिष्टे, विवेक लोटे आदींनीही या कामात मदत केली.

## इंदौरमध्ये ऑस्ट्रेलियन महिला खेळाडूंचा विनय भंग; आरोपींना अटक

**इंदौरः** आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक सध्या सुरु आहे. भारताना आता या स्पर्धेत सेमी फायनलची मजल गाठळी आहे. महिला विश्वाचषकाचे आयोजन यंदा भारताने केले आहे. सामने खेळण्यासाठी इंदौरमध्ये गेलेल्या ऑस्ट्रेलियन संघातील दोन महिला खेळाडूंशी छेडछाडीचा प्रकार उघडकीस आला आहे.या घटनेनंतर पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे आणि त्यांची चौकशी सुरू आहे. ही घटना २३ऑक्टोबर खजराना रोडवर घडल्याचे वृत्त आहे.प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, पोलिसांनी पाच पोलिस ठाण्यांचे पथक तयार केले आणि आरोपीचा शोध सुरू केला, ज्याला अटक



करण्यात आली. आरोपीची चौकशी सुरू आहे. आरोपींनी महिला खेळाडूंचा पाठलाग केला आणि त्यांना अयोग्यरित्या स्पर्श केला. दोन्ही महिला खेळाडू हाटेल रॅडिसन ब्लू येथून एका कॅफे मध्ये चालत जात असताना, पांढरा शर्ट आणि काळी टोपी घातलेला एक तरु ण दुचाकीवरून त्यांच्याकडे आला आणि त्यांचा पाठलाग करू लागला. काही वेळातच, आरोपीने एका महिला खेळाडूला अयोग्यरित्या स्पर्श केला आणि तो गायब झाला. दोन्ही खेळाडूंनी हा प्रकार घडल्यानंतर ताबडतोब संघाचे सुरक्षा अधिकारी डॅनी सिमन्स यांना मेसेज केला आणि त्यांचे लाईव्ह लोकेशन पाठवले. डॅनी सिमन्स यांना माहिती मिळताच त्यांनी संघ सदस्य सुमित चंद्राशी संपर्क साधला आणि खेळाडूंना हाटेलमध्ये सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी एक गाडी पाठवली. दोन्ही खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहेत. ऑस्ट्रेलियाने विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

# महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात प्रशांत बनकरला अटक

**पुणे/प्रतिनिधी :** फलटण उपजिल्हा रु ग्णालयात डॉक्टर म्हणून कार्यरत असलेल्या महिलेने शुक्रवारी (ता. २४ ऑक्टोबर) पहाटे शहरातील एका हॉटेलमध्ये आत्महत्या केली. या प्रकरणातील एक आरोपी प्रशांत बनकर याला अटक करण्यात आली आहे. शनिवारी पहाटे ४ वाजता बनकरला पुणे येथून अटक करण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रु ग्णालयात डॉक्टर म्हणून कार्यरत असलेल्या महिलेने शुक्रवारी (ता. २४ ऑक्टोबर) पहाटे शहरातील एका हॉटेलमध्ये आत्महत्या केली. शुक्रवारी सकाळी या महिला डॉक्टरच्या आत्महत्येची माहिती समोर आली आणि संपूर्ण साता-यात खळबळ उडाली.

धक्कादायक बाब म्हणजे महिला ड?क्टरने आत्महत्येपूर्वी स्वतःच्या हातावर आत्महत्येचे कारण लिहिले होते. यामध्ये



पीएसआय गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर अशी दोन नावे समोर आली. या घटनेची राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेत तत्काळ कारवाईचे आदेश दिले. याच प्रकरणातील एक आरोपी प्रशांत बनकर याला अटक करण्यात आली आहे. शनिवारी (ता. २५ ऑक्टोबर) पहाटे ४ वाजता बनकरला पुणे येथून अटक करण्यात आली आहे.

फलटण उपजिल्हा रु ग्णालयातील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात दोन आरोपींची नावे समोर आली. यातील एक आरोपी पीएसआय गोपाळ बदने आहे, तर दुसरा आरोपी प्रशांत बनकर आहे. त्यामुळे या दोघांचाही पोलिसांकडून शोध घेण्यात येत होता.अशातच पोलिसांनी एका आरोपीला म्हणजेच प्रशांत बनकरला अटक केली आहे. प्रशांत बनकरने शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप महिला डॉक्टरने केला आहे. तिने तिच्या हातावर लिहिलेल्या नोटमध्ये याबाबत लिहिण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांकडून बनकरचा शोध घेण्यात येत होता. अशातच प्रशांत बनकरला आज पहाटे चार वाजता पुण्यातून अटक करण्यात आली आहे. तो मित्राच्या फार्महाउसमध्ये लपून बसला होता, सातारा पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली आहे.महिला डॉक्टरने आत्महत्या केल्याची बातमी समोर आल्यानंतर ती वा-याच्या वेगाने महाराष्ट्रात पसरली. त्यानंतर या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. आत्महत्येपूर्वी महिला डॉक्टरने स्वतःच्या हातावर माझ्या मरण्याचे कारण पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने असून, ज्याने चारवेळा माझ्यावर अत्याचार केला, तसेच प्रशांत बनकर याने चार महिने शारीरिक व मानसिक छळ केला, असे लिहून ठेवले आहे.

## आरोपींना फासावर लटकवले पाहिजे

### फलटण प्रकरणात सुरेश धस आक्रमक

**बीड/प्रतिनिधी-** डॉक्टर आत्महत्या प्रकरण खटला फास्टट्रॅक कोर्टात लढवला पाहिजे, अशीही मागणी आमदार धस यांनी केली. त्याचप्रमाणे एसआयटीकडून या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, आरोपींना फासावर लटकवले पाहिजे असेही आमदार धस यांनी म्हटले आहे.

सातारा जिल्ह्यातील तरु ण महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरले आहे. फलटण उपजिल्हा रु ग्णालयातील महिला डॉक्टरने पोलीस अधिका-यावर गंभीर आरोप करत आपले आयुष्य संपवले. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी तळहातावर सुसाईड नोट लिहून पोलीस अधिका-यावर शारीरिक छळाचा आरोप केला.आता याप्रकरणी आमदार सुरेश धस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. आई-वडिलांनी तीन एकर जमिनीवर लेकीला डॉक्टर बनवलं होतं. तिच्या तक्रारीची दखल न घेणारे जो कोणी



अधिकारी असतील, त्या सर्वांना आरोप केलं पाहिजे. या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. महिला डॉक्टरच्या आत्महत्येला जबाबदार असलेल्या सर्व आरोपींना फासावर लटकवले पाहिजे. मग यात खासदार असो किंवा दबाव टाकणारे त्यांचे पीए असो. त्यांनाही या प्रकरणात आरोपी ठरवले पाहिजे. डॉक्टर तरु णीला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही तिच्या कुटुंबीयांच्या बाजूने उभे राहू, असे ते म्हणाले.पुढे बोलताना धस म्हणाले,पोटाला चिमटा घेउन, उस तोडून आमची लोकं लेकीबाळीला शिकवतात. पण कोणी गैरफायदा घेत असेल तर जरब बसलीच पाहिजे. भविष्यात अशी दुसरी घटना घडता कामा नये. जर तिला कोणी बीडची म्हणून हिणवत असेल तर ते सगळ्यात मोठे दुर्दैव आहे. आमची बीडची लोकं बुद्धिमान आणि सर्व क्षेत्रात पुढे जाणारे आहेत, असेही त्यांनी ठणकावून सांगितलं.

## गृहविभागाच्या अब्रुची लक्तरे वेशीला टांगणारी

### हर्षवर्धन सपकाळांची सरकारवर टीका

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रु ग्णालयातील एका महिला डॉक्टरला पोलिसांच्या अनन्वीत छळाला कंटाळून आत्महत्या करावी लागली ही घटना पोलिस विभागाला लाज आणणारी आहे. गृहविभागावर फडणवीस यांचे नियंत्रण नाही, फलटणची घटना गृहविभागाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जनाची नाही तर मनाची तरी



वाटावी आणि तात्काळ गृहमंत्रीपदाचा राजीनामा देउन राज्याला पुर्णवेळ गृहमंत्री द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.सातारा जिल्ह्यातील घटनेप्रकरणी भाजपा महायुती सरकार व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी खरपूस समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य आहे. याचा अर्थ सज्जनांचे रक्षण करणे आणि दुर्जनांचा नाश करणे आहे पण आपल्या पोलीसांमध्ये गुंड, मवाली, बलात्कारी अशा दुर्जन प्रवृत्तींना मोकाट सोडून सज्जनांना त्रास देण्याची प्रवृत्ती बळावत आहे आणि त्याला सर्वस्वी देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार आहेत. पोलिस विभागाचा कारभार पाहून फडणवीस यांना लाज वाटली पाहिजे. पण घटना कितीही गंभीर घडली तरी फडणवीसांना त्याचे काहीही वाटत नाही. फलटणची घटना ही काही पहिली घटना नाही. स्वारगेट बस स्थानकात एसटी बसमध्ये एका महिलेवर बलात्कार झाला त्यावेळी गृहराज्यमंर्त्यांनी केलेले विधान तर निर्लज्जपणाचा कळस होते. रावेरमध्ये केंद्रीय मंर्त्याच्या मुलीची छेड काढली पण कारवाई होत नाही हे पाहून मंर्त्यालाच पोलिस स्टेशनमध्ये धरणे धरावे लागले. आका, खोक्या, ही देण फडणवीस यांनी महाराष्ट्राला दिली आहे. आता ते सारवासारव करतील, तो मी नव्हेच अशा अविर्भावात आम्ही हे केले. ते केले अशा वल्गणा करतील पण ते जर खरेच धर्माला मानत असतील तर फलटणच्या घटनेतील नराधमांच्या मुसक्या आवळा, असेही सपकाळ म्हणाले.

## संजय शिरसाट 5000 कोटींच्या मलिदा गँगचे मुख्य सूत्रधार

**मुंबई :** नवी मुंबईतील सिडकोच्या ५ हजार कोटी रु पयांच्या जमीन घोटाळ्याप्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा सरकारवर सडकून टीका केली आहे. नवी मुंबईतील सिडको प्रकरणाचे आपल्याला पुरावेच लागतायत ना, तर वन विभागानेच दिलेल्या कबुली पत्राचे हे घ्या आणखी पुरावे. आधी



साडेबारा हजार पानांचे पुरावे आपल्याकडे पाठवले आहेतच आणि आताही वनविभागाने गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांना दिलेले दोन पत्र सरकारच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहेत, हेही आपल्याकडे पाठवतो. असे म्हणत आमदार रोहित पवारांनी सरकारवर हल्लाबोल केलाय. तसंच या प्रकरणात याबाबत गुन्हा दाखल झाल्याचंही कळतंय. आता तरी ५ हजार कोटी रु पयांच्या या मलिदा गँगचे मुख्य सूत्रधार आणि मास्टरमाईंड सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा राजीनामा घेउन सरकारची उरलीसुरली विश्वासार्हता रसातळाला जाण्यापासून वाचवा. आता एवढे पुरावे देउनही आपण भ्रष्ट मंर्त्यांना पाठीशी घातलं तरी स्थानिक भूमीपुत्रांना न्याय देण्यासाठी आम्ही हा लढा सोडणार नाही आणि हे प्रकरण तडीस लावल्याशिवाय थांबणार नाही! असा इशाराही आमदार रोहित पवारांनी सरकारला दिला आहे. या प्रकरणात लक्ष घातल्याने तब्बल सहा-साडेसहा हजार कोटी रुपये सरकारचे आणि स्थानिक भूमीपुत्रांचे वाचवता आले, याचा आनंद आहे. आता याबाबत सरकार काय पावलं उचलतं, याकडं लोकांचं लक्ष लागून आहे. असेही ते म्हणाले. नवी मुंबईतील सिडको प्रकरणात गुन्हा दाखल करण्याबाबत वन विभागाने पोलिसांना पत्र देउनही गुन्हा दाखल होत नसेल तर याचे क्लिअर कट दोनच अर्थ होतात. एकतर हा गुन्हा दाखल होउ नये यासाठी गृह विभागावर मित्र पक्षाचा प्रचंड दबाव आहे. नाहीतर या प्रकरणी गुन्हा दाखल होउ न देता मित्र पक्षावर उपकार करु न त्याला आपल्या ताटाखालचं मांजर बनवून ठेवायचं आणि चाणक्य नितीचा वापर करु न मित्र पक्षाचाच आमदार गळाला लावायचा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकतर हे मान्य करा, नाहीतर मंत्री शिरसाठ यांचा राजीनामा घेउन याप्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करा.

## आमची मुलगी 'नीट' परीक्षेत टॉपर

### महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण; नातेवाइकांना अश्रु अनावर

**सातारा /प्रतिनिधी :** शवविच्छेदनाचे चुकीचे अहवाल देण्यासाठी खासदार, त्यांचे दोन पीए आणि पोलिसांकडून महिला सरकारी डॉक्टरवर दबाव आणला होता, असा धक्कादायक आरोप नातेवाइकांनी केला आहे. यामुळे महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाने वेगळे वळण घेतले आहे. या प्रकरणात पोलिसांनी दबाव न घेता या प्रकरणाचा छडा लावावा, अशी मागणी करण्यात येत आहे.



फलटणमधील महिला डॉक्टरने आत्महत्या केल्यानंतर नातेवाईक तातडीने बीड जिल्ह्यातील गावाहून साताराकडे रवाना झाले. काही नातेवाईक फलटण शहरात रात्री तीन वाजता पोहोचले. तेव्हापासून सकाळी नउपर्यंत ते फलटण शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया होण्याची वाट पाहत होते. त्यानंतर त्यांना महिलेचा मृतदेह घेउन सातारा जिल्हा शासकीय रु ग्णालयाकडे रवाना करण्यात आले. दहा वाजता शवविच्छेदनगृहात मृतदेह आणून ठेवला. याठिकाणी त्यांना चार तास ताटकळत राहावे लागले. याबद्दल तीव्र आक्षेप घेत संशयितांना अटक झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे नातेवाइकांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.माध्यमांशी बोलताना नातेवाइकांनी सांगितले की, आमची मुलगी हुशार होती. नीट परीक्षेत सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण झाली होती, तसेच वैद्यकीय अधिकारी परीक्षेतही चांगल्या गुणांनी निवड झाली. तिच्याबाबत असे घडेल, असे कधीही वाटले नव्हते, असे सांगत नातेवाइकांनी अश्रूंना मोकळी वाट करून दिली.

**पत्रामध्ये खासदार अन् पीएंचा उल्लेख**

जून २०२५ मध्ये महिला डॉक्टरने उपविभागीय पोलिस अधिका-यांकडे तक्रार दिली आहे. यामध्ये एक खासदार आणि त्याचे दोन पीए, यांच्यासह अन्य दोन-तीन नावे आहेत. पीए फोन करायचे अन् त्यावरून खासदार बोलायचे, असा आरोप करून या प्रकरणाचा सखोल तपास होउन न्याय मिळावा, अशी अपेक्षा नातेवाइकांनी व्यक्त केली.

# अदानी ग्रुपपमध्ये ३३,००० कोटी गुंतवल्याचा LIC वर आरोप

### 30 कोटी लोकांच्या कमाईचा गैरवापर, 2025 च्या सुरुवातीचे प्रकरण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** २०२५ च्या सुरु वातीला भारतीय जीवन विमा महामंडळाने (LIC) अदानी समूहात ३.९ अब्ज डालर्स किंवा अंदाजे ३३,००० कोटींची गुंतवणूक केली. काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारवर ग्राहकांच्या कष्टाने कमावलेल्या पैशाचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. काँग्रेस पक्षाने संसदेच्या सार्वजनिक लेखा समिती (PAC) कडून चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, टीएमसी खासदार महुआ मोइत्रा यांनी सोशल मीडियावर द वाशिंग्टन पोस्टचा एक अहवाल पोस्ट केला आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे की या वर्षाच्या सुरु वातीला गौतम अदानी कर्जात बुडालेले असताना आणि अमेरिकेत लाचखोरीच्या आरोपांना तोंड देत असताना केंद्र सरकार आणि एलआयसीने अदानी समूहात गुंतवणूक केली होती. सरकार किंवा अदानी समूहाकडून अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

जयराम रमेश म्हणाले, 'हा घोटाळा खूप मोठा आहे, त्यात अनेक गोष्टींचा समावेश आहे...' सरकारी संस्थांचा गैरवापरः अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) आणि आयकर विभागाचा वापर इतर खाजगी कंपन्यांना त्यांच्या मालमत्ता कमी किमतीत अदानी समूहाला विकण्यासाठी दबाव आणण्यासाठी करण्यात आला.

मालमत्तेचे अयोग्य खाजगीकरणः विमानतळ आणि बंदरे यासारख्या महत्त्वाच्या मालमत्ता केवळ अदानी समूहाच्या फायद्यासाठी विकल्या गेल्या. हे सर्व गैरव्यवहाराने झाले.

**परदेशी व्यवहारांमध्ये मदतः** बांगलादेश आणि श्रीलंका सारख्या शेजारील देशांमध्ये अदानींसाठी करार मिळवण्यासाठी भारताच्या राजनैतिक प्रभावाचा वापर करण्यात आला.

**कोळसा महागाईचा खेळः** अदानी समूहाने शेल कंपन्यांद्वारे उच्च किमतीचा कोळसा आयात केला. हा मनी लाँडरिंग नेटवर्कचा एक भाग होता. यामुळे गुजरातमधील अदानी पॉवर प्लांटमधून वीजेच्या किमती वाढल्या.

**निवडणुकीपूर्वी वीज करारः** मध्य प्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्रातील निवडणुकांपूर्वी अदानींना अत्यधिक किमतीत वीज पुरवठ्याचे कंत्राट देण्यात आले होते. आणि अलिकडेच, निवडणुका जवळ येत असलेल्या बिहारमध्ये, वीज प्रकल्पासाठी जमीन फक्त १ रु पया प्रति एकर या दराने देण्यात आली.

**पहिला वादः** हिंडेनबर्ग रिसर्चने मनी लाँड्रिंगचा आरोप केलाः हे जानेवारी २०२३ मधील आहे. गौतम अदानी यांची प्रमुख कंपनी, अदानी एंटरप्रायझेसने २०,००० कोटी रु पयांची फ?लो-ऑन पब्लिक ऑफरिंगची घोषणा केली. ही ऑफर २७ जानेवारी २०२३ रोजी उघडणार होती. तथापि, त्याआधी, २४ जानेवारी २०२३ रोजी, हिंडेनबर्ग रिसर्चने अदानी गरुपविरुद्ध मनी लाँड्रिंग आणि शेअर्समध्ये



फेरफार केल्याचा आरोप करणारा एक अहवाल प्रसिद्ध केला.

२५ जानेवारीपर्यंत, समूहाच्या शेअर्सचे बाजारमूल्य जवळजवळ १२ अब्ज डालर्स (अंदाजे १ लाख कोटी) कमी झाले होते. तथापि, अदानी यांनी कोणताही गैरव्यवहार केल्याचा इन्कार केला. परिणामी, अदानी समूहाने त्यांचे २०,००० कोटी रु पयांचे फॉलो-ऑन पब्लिक ऑफरिंग देखील रद्द केले. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सहा सदस्यांची समिती स्थापन केली आणि सेबीनेही या प्रकरणाची चौकशी केली.

न्यायालयाच्या निर्णयानंतर, अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी म्हणाले होते की, 'न्यायालयाच्या निर्णयावरून सत्याचा विजय झाला आहे हे दिसून येते. सत्यमेव जयते. आमच्यासोबत उभे राहिलेल्यांचा मी आभारी आहे. भारताच्या विकासाच्या गाथेत आमचे योगदान असेच सुरू राहील. जय हिंद.'

**दुसरा वादः** कमी दर्जाचा कोळसा उच्च दर्जाचा म्हणून विकल्याचा आरोप या वर्षाच्या सुरु वातीला, फायनान्शियल टाईम्सने ऑर्गनाइज्ड क्राइम अँड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्टच्या अहवालाचा हवाला देत दावा केला होता की जानेवारी २०१४ मध्ये, अदानी समूहाने इंडोनेशियाना कंपनीकडून 'कमी दर्जाचा' कोळसा २८ (सुमारे २,३६० रुपये) प्रति टन या किमतीने खरेदी केला होता.



अहवालात आरोप करण्यात आला आहे की ही शिपमेंट तामिळनाडू जनरेशन अँड डिस्ट्रिब्युशन कंपनी (TANGEDCO) ला उच्च दर्जाच्या कोळशाच्या रूपात सरासरी ॐ९१.९१ (सुमारे ७,७५० रु पये) प्रति टन किमतीने विकण्यात आली.

**अदानी समूहावर यापूर्वी कोळसा आयात बिलांचा गैरवापर केल्याचा आरोप होता..**फायनान्शियल टाईम्सने एका वृत्तात आरोप केला आहे की अदानी समूहाने इंडोनेशियातून कमी किमतीत कोळसा आयात केला आणि जास्त किमती दाखवण्यासाठी बिलांमध्ये फेरफार केला. परिणामी, समूहाने ग्राहकांना कोळशापासून तयार होणारी वीज जास्त किमतीत विकली.२०१९ ते २०२१ या ३२ महिन्यांच्या कालावधीत अदानी समूहाने इंडोनेशियाहून भारतात आयात केलेल्या ३० कोळशाच्या शिपमेंटची तपासणी फायनान्शियल टाईम्सने केली. या सर्व शिपमेंटच्या आयात नोंदींमध्ये निर्यात घोषणांपेक्षा जास्त किमती दिसून आल्या. वाढवलेला हा आकडा अंदाजे ५८२ कोटी इतका होता.

**अदानी आशियातील दुसया क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती**

गौतम अदानी हे आशियातील दुसया क्रमांकाचे सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. फोर्ब्सच्या मते, त्यांची एकूण संपत्ती ६.२२ लाख कोटी इतकी आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत ते २७ व्या क्रमांकावर आहेत. अदानी समूहाचे साम्राज्य कोळसा व्यापार, खाणकाम, लाजिस्टिक्स, वीज निर्मिती, सिमेंट उद्योग आणि वितरण क्षेत्रात पसरलेले आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# आयात डाळींचे संकट

डाळींच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे. पण जर उत्पादन घटत राहिले आणि आयातीवर अवलंबित्व वाढले, तर भारताची अन्नसुरक्षा धोक्यात येऊ शकते. भारत हा जगातील सर्वात मोठा डाळ उत्पादक देश आहे. जगातील एकूण डाळीच्या लागवडीपैकी तब्बल ३५.८७ टक्के क्षेत्र भारतात आहे. परंतु उत्पादनाच्या प्रमाणात आपला वाटा केवळ २७.४ टक्के इतकाच आहे. म्हणजेच लागवड जास्त, पण उत्पादन कमी. या तङ्गावतीमुळे भारत जगातील सर्वात मोठा डाळ आयातदार बनला आहे. देशात डाळींचा सध्याचा उपभोग सुमारे २९ दशलक्ष टन इतका आहे, तर उत्पादन केवळ २५.२३८ दशलक्ष टन आहे. मागणी आणि पुरवठा यातील हा जवळपास ३.७६२ दशलक्ष टनांचा ङ्गरक दरवर्षी वाढत चालला आहे. या तुटीची भरपाई करण्यासाठी भारताने २०२५ मध्ये तब्बल ७.६५४ दशलक्ष टन डाळी आयात केल्या. म्हणजेच तुटीपेक्षा दुप्पट आयात! याच ठिकाणी धोरणात्मक विसंगती प्रकर्षाने दिसते. गेल्या चार वर्षांत डाळींच्या लागवडीचे क्षेत्र सुमारे ३.१ दशलक्ष हेक्टरने घटले आहे. कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०२१-२२ मध्ये डाळींचे एकूण क्षेत्र ३०.७३१ दशलक्ष हेक्टर होते, जे २०२४-२५ मध्ये घटून २७.६२४ दशलक्ष हेक्टरवर आले आहे. या घटीचे मुख्य कारण म्हणजे शेतकर्‍यांना त्यांच्या पिकाचा योग्य मोबदला मिळत नाही. डाळ पिकांचा उत्पादन खर्च वाढत असतानाच बाजारभाव सतत घसरत आहेत. सरकारने जाहीर केलेल्या एमएसपीपेक्षा (किमान आधारभूत किंमत) बाजारभाव कमी आहेत आणि सरकारी खरेदीही अत्यल्प प्रमाणात होते. परिणामी शेतकर्‍यांचा तोटा वाढतो आणि पुढच्या हंगामात ते डाळींची लागवड कमी करण्याचा निर्णय घेतात. तूर, उडीद, मूग आणि चणे या प्रमुख डाळींच्या भावात गेल्या एका वर्षात मोठी घसरण झाली आहे. कृषी मंत्रालयाच्या संशोधन अहवालानुसार, ऑगस्ट २०२४च्या तुलनेत ऑगस्ट २०२५ मध्ये तूरडाळीचा भाव तब्बल ४२ टक्क्यांनी घसरला आहे. उडीदाचे भाव २० टक्क्यांनी, तर चण्याचे दर १८ टक्क्यांनी कमी झाले आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्येही हे दर एमएसपीपेक्षा तूर १८३८ रुपये, मूग २२५० रुपये आणि उडीद २०६३ रुपये इतक्या तुटीने खालीच राहिले आहेत. ही परिस्थिती बाजारात स्वस्त आयात मालाचा पूर येतो तेव्हाच निर्माण होते. कॅनडा, म्यानमार, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांहून आयात वाढल्याने भारतीय बाजारात स्वस्त डाळ उपलब्ध झाली आहे. ग्राहकांना कदाचित काही महिन्यांसाठी दिलासा मिळाला असेल, पण शेतकरी मात्र उत्पादन खर्चही वसूल करू शकत नाही. नीती आयोगाच्या अहवालानुसार, भारतातील डाळ तुटवडा केवळ ३.७६२ दशलक्ष टनांचा असताना, सरकारने ७.६५४ दशलक्ष टनांची आयात करण्याचे आदेश दिले. म्हणजे आवश्यकतेपेक्षा जवळपास दुप्पट आयात! यामुळे स्थानिक बाजारात भाव कोसळले आणि शेतकर्‍यांना मोठा तोटा झाला. २०२४-२५ मध्ये डाळ आयात ४० टक्क्यांनी वाढली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही अभूतपूर्व वाढ आहे. हे सगळं ड्यूटी-ॲग्री इम्पोर्ट पॉलिसीमुळे घडले आहे. आयात शुल्क शून्य ठेवल्याने व्यापार्‍यांना परदेशातून स्वस्त माल आणणे सोपे झाले आहे; पण यामुळे देशी उत्पादकांना आपला माल तोट्यात विकावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मिशन आत्मनिर्भरता इन पल्सेस ही योजना जाहीर केली आहे. २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी असलेल्या या योजनेचा एकूण खर्च ११,४४० कोटी रुपये आहे. याअंतर्गत डाळींचे क्षेत्रङ्गळ २७.५ दशलक्ष हेक्टरवरून वाढवून ३१ दशलक्ष हेक्टरपर्यंत नेण्याचे, उत्पादन ३५ दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचे आणि उत्पादकता १,१३० किलो प्रति हेक्टर इतकी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. देशातील ४१६ जिल्ह्यांवर याचा ङ्गोकस असेल. तूर, उडीद आणि मसूर या डाळींवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. मात्र तज्ज्ञांचे मत आहे की, एमएसपीची हमी नसेल तर ही योजना केवळ कागदावरच राहील. कारण, जर शेतकर्‍यांना त्यांच्या उत्पादनाचा हमीभाव मिळाला नाही, तर ते वाढीव लागवड करण्यास तयार होणार नाहीत. वास्तविक, डाळ उत्पादनात वाढ करण्यासाठी केवळ योजना पुरेशा नाहीत. स्थिर बाजारभाव, हमीखरेदी आणि आयात धोरणात शिस्त आवश्यक आहे. जोपर्यंत सरकार आयातीवर नियंत्रण ठेवत नाही, तोपर्यंत देशी शेतकर्‍यांना न्याय मिळणार नाही. मेक इन इंडियाचा नारा दिला जातो, पण ग्रो इन इंडियाला प्रोत्साहन नाही, हीच खरी शोकांतिका आहे. भारतातील कृषी अर्थव्यवस्था अजूनही डाळींसारख्या पिकांवर अवलंबून आहे. प्रथिनाचा मुख्य स्त्रोत असलेल्या डाळींची कमतरता पोषणाच्या दृष्टीनेही गंभीर प्रश्न उभा करते. वाढती लोकसंख्या आणि बदलते आहारतंत्र या दोन्ही गोष्टी डाळींच्या मागणीत सातत्याने वाढ घडवत आहेत. पण जर उत्पादन घटत राहिले आणि आयातीवर अवलंबित्व वाढले, तर देशाची अन्नसुरक्षा धोक्यात येऊ शकते. डाळींच्या वाढत्या आयातीमुळे केवळ आर्थिक तोटा नाही, तर आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेवरही आघात झाला आहे. आत्मनिर्भर भारत म्हणणार्‍या देशाने डाळीसारख्या मूलभूत अन्नघटकासाठी परदेशाकडे पाहणे ही लज्जास्पद बाब आहे. शेतकर्‍यांच्या हाती न्याय्य किंमत देऊन, त्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ करून आणि आयात-निर्यात धोरण संतुलित करूनच भारत खर्‍या अर्थाने डाळ उत्पादनात स्वावलंबी बनू शकतो.

# प्रतिष्ठा महिलांच्या हाती

**क्रिकेट खेळल्या जाणाऱ्या देशांमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसी आय) एक वेगळेच वलय आहे. सर्वाधिक श्रीमंत क्रिकेट मंडळ असा बीसीसीआयचा जगभरात नावलौकिक आहे. भारतीय क्रिकेट संघामध्ये सुरुवातीपासूनच अनेक नावलौकिक प्राप्त खेळाडूंचा समावेश राहिला आहे. क्रिकेट खेळातील अनेक विक्रम भारतीय खेळाडूंच्या नावावर आहेत.**



क्रिकेट खेळल्या जाणाऱ्या देशांमध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसी आय) एक वेगळेच वलय आहे. सर्वाधिक श्रीमंत क्रिकेट मंडळ असा बीसीसीआयचा जगभरात नावलौकिक आहे. भारतीय क्रिकेट संघामध्ये सुरुवाती पासूनच अनेक नावलौकिक प्राप्त खेळाडूंचा समावेश राहिला आहे. क्रिकेट खेळातील अनेक विक्रम भारतीय खेळाडूंच्या नावावर आहेत. अन्य देशातील क्रिकेट खेळाडूंच्या तुलनेत भारतीय खेळाडूंना मिळणारे मानधन अधिक आहे. पूर्वी भारतीय क्रिकेटमध्ये पुरुष आणि महिला संघांच्या मानधनामध्ये विषमता होती. पण बीसीसीआयची सूत्रे जय शहा यांच्याकडे गेल्यानंतर बीसीसीआयचा चेहरा-मोहरा बदलण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. महिला क्रिकेटपटूंनाही आता पुरुष खेळाडूंच्या बरोबरीने मानधन मिळण्यास सुरुवात झाल्याने मानधनातील दुजाभाव संपुष्टात आला आहे. भारतीय पुरुष क्रिकेट संघामध्ये मागील अनेक वर्षांपासून एकाहून एक अशा अनेक मातब्बर खेळाडूंचा समावेश राहिलेला आहे व आजही भारतीय क्रिकेट पुरुष संघामध्ये समावेश होण्यासाठी कमालीची चुरस निर्माण झालेली आहे. अनेक दर्जेदार, गुणवंत खेळाडू खेळाचा क्लास असताना व दर्जामध्ये सातत्य असताना प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. एकेकाळी डायना एडल्जी, मिताली राजसारख्या मोजक्याच खेळाडूंमुळे भारतीय महिला क्रिकेटच्या संघाची ओळख असायची, पण अलीकडच्या काळात भारतीय महिला क्रिकेट संघाने कात टाकल्याप्रमाणे प्रगती केली आहे. भारतीय महिला संघाची एक दर्जेदार संघ म्हणून ओळख होत असून एक आक्रमक चेहरा भारतीय महिला क्रिकेट संघाला प्राप्त झाला आहे. अनेक विक्रम भारतीय महिला क्रिकेटर्सच्या खात्यात जमा असून अनेक दिग्गज संघांना सामन्यांमध्ये भारतीय महिला क्रिकेटर्सने आपल्या कामगिरीच्या बळावर पाणी पाजले आहे. सध्या भारतीय क्रिकेटमधील पुरुष आणि महिला संघाची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भारतीय पुरुष संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतीय संघाची फारशी प्रभावी कामगिरी झालेली नाही. एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत सलग दोन सामने भारताला गमवावे लागले असून मालिकाही भारताला गमवावी लागली आहे. विराट कोहली, कर्णधार शुभमन गिल या दिग्गज खेळाडूंच्या फलंदाजीतील अपयशामुळे भारतीयांची चिंता वाढली आहे. गोलंदाजांनाही फारशी प्रभावी कामगिरी करता आलेली नाही. अर्थात ऑस्ट्रेलियामध्ये जाऊन त्यांना पराभूत करणे एक अग्निदिव्यच आहे. त्यात फलंदाजीला अनुकूल असलेल्या खेळपट्टीवर २६५ धावांचे रक्षण करणे कोणत्याही संघातील गोलंदाजांसाठी अवघड काम आहे. त्यातल्या त्यात दुसऱ्या सामन्यामध्ये रोहित शर्माला गवसलेला सूर क्रिकेटप्रेमींना दिलासा देणारी बाब आहे. विराट कोहलीला दोन्ही सामन्यात खाते उघडता आले नाही, तर कर्णधार शुभमन गिलला दोन्ही सामन्यांतील आकडेवारी एकत्रित केली तरी २५च्या पार करता आलेली नाही.

शनिवारी, २५ ऑक्टोबर रोजी भारत व ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय मालिकेतील अखेरचा सामना होत असून मालिकेतील व्हाईट वॉश टाळण्यासाठी व प्रतिष्ठा जपण्यासाठी भारताला अखेरच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्याची कामगिरी करून दाखववावी लागणार आहे. त्या तुलनेत महिला भारतीय क्रिकेट संघाची सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेतील कामगिरी नक्कीच अभिमानास्पद आहे. विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिलांनी गुरुवारी न्यूझीलंडचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. विश्वचषकांचा संभाव्य विजेता म्हणूनही आज भारतीय महिला संघाकडे पाहिले जात आहे. दोनदा उपविजेतेपद आणि तीन वेळा उपांत्य फेरी. आयसीसी महिला विश्वचषकात आजवर विजयाच्या असे जवळ येऊनही भारताला विजेतेपदाचा आनंद साजरा करता आलेला नाही. उपांत्य फेरी व त्यापाठोपाठ फायनलचा सामना जिंकून पण हाच इतिहास बदलण्याची चांगली संधी भारताकडे चालून आलेली आहे. विश्वचषक स्पर्धेदरम्यान भारतीय महिलांचा प्रवास हा अडथळ्याची मालिका पार करतच झालेला आहे. भारतीय संघाचा स्पर्धेतील प्रवास चढ-उतारांचा राहिला. त्यांनी श्रीलंकेविरुद्ध आणि पाकिस्तानविरुद्ध सलग विजय मिळवून विश्वचषक स्पर्धेत चांगली सुरुवात केली होती. मात्र, त्यानंतर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध त्यांना सलग तीन सामन्यांमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. अखेरीला न्यूझीलंडविरुद्धच्या प्रतिष्ठेच्या सामन्यात भारतीय महिलांनी प्रथम फलंदाजी करताना ३४० धावांपर्यंत मजल मारली व न्यूझीलंडला पावणेतीनशेच्या घरातच रोखत उपांत्य फेरीत प्रवेश केला. विश्वचषक स्पर्धेदरम्यान या स्पर्धेत भारतीय संघाने दाखवलेले धैर्य आणि जिद्द कौतुकास्पद आहे. सुरुवातीच्या पराभवानंतरही त्यांनी जोरदार पुनरागमन करत उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे.

कर्णधार हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाने दाखवलेला आत्मविश्वास पुढील सामन्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका या बलाढ्य संघांसमोर भारतीय संघाला उपांत्य फेरीत कडवी झुंज द्यावी लागेल. मात्र, न्यूझीलंडविरुद्धच्या विजयाने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. आता सर्वांचे लक्ष या उपांत्य सामन्यांकडे लागले आहे, जिथे विश्वविजेतेपदासाठी चुरशीची लढत पाहायला मिळेल. भारतीय महिला संघाच्या फलंदाजीने दणकेबाज खेळी करत स्पर्धेमध्ये ३००चा आकडा अनेकदा पार केला आहे. स्मृती मानधनाने खेळीमध्ये दाखविलेल्या सातत्यामुळे मागील तीन सामन्यांमध्ये भारताला चांगली मजल मारणे शक्य झाले. भारतीय क्रिकेट संघाची प्रतिष्ठा आता खऱ्या अर्थाने पणाला लागलेली आहे. पुरुष क्रिकेट संघाला आपली पत राखण्यासाठी आणि एकदिवसीय मालिकेतील व्हाईट वॉशची नामुष्की टाळण्यासाठी आजचा सामना जिंकावा लागणार आहे.

महिला क्रिकेट संघ उपांत्य फेरीत पोहोचल्याने भारतीयांच्या आशा उंचावल्या आहेत. सध्या भारतीय महिला फलंदाजांना गवसलेला सूर पाहता व आक्रमक खेळी पाहता वर्ल्ड कप आता दूर नाही, अशी आशा बाळगायला वाव आहे.

## दिवाळी अंक घटत्या आकर्षणाची मीमांसा....

मराठी संस्कृतीत दिवाळी अंकांची परंपरा १०० वर्षांहून अधिक जुनी आहे. एकेकाळी, दिवाळीचा फराळ आणि दिवाळी अंक हे एक अटळ समीकरण होते. कुटुंबातील सदस्य, मित्रमंडळी आणि ग्रंथालये मोठ्या उत्साहाने या 'साहित्य फराळाची' अक्षरशः वाट पाहत असत. हा केवळ वाचनाचा विषय नसून, तो मराठी कुटुंबातील एका सांस्कृतिक सोहळ्याचा अविभाज्य भाग होता. मात्र, गेल्या दोन दशकांत, विशेषतः मोबाईल आणि इंटरनेटच्या अभूतपूर्व क्रांतीनंतर, मराठी दिवाळी अंकांच्या आकर्षणात लक्षणीय घट झाली आहे. बदलती जीवनशैली, वाचन संस्कृतीतील आमूलाग्र बदल आणि तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव ही या घटत्या आकर्षणाची मुख्य कारणे आहेत, ज्यांची मीमांसा करणे आवश्यक आहे.

मराठी दिवाळी अंकांचे आकर्षण कमी होण्याची प्रमुख कारणे: तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि माध्यमांची गर्दी डिजिटल युगात माहितीची उपलब्धता त्वरित झाली आहे. पूर्वी एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीची मुलाखत, नवीन पाककृती किंवा दर्जेदार कथेसाठी दिवाळी अंकाची वाट पाहावी लागत असे. आज ती सर्व माहिती एका क्लिकवर, अगदी त्वरित आणि विविध स्वरूपात (लेख, व्हिडिओ, पॉडकास्ट) उपलब्ध आहे. मुलाखतीसाठी आता पॉडकास्ट उपलब्ध आहेत, तर पाककला शिकण्यासाठी यूट्युबवरील उच्च दर्जाचे व्हिडिओ उपलब्ध आहेत. ही साधने वाचकाला कमी वेळात थेट आणि आकर्षक माहिती देतात, ज्यामुळे दिवाळी अंकातील 'खास' मजकुराचे अप्रूप आणि आकर्षण मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. त्याचबरोबर ओटीटी प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया आणि ऑनलाईन गेम्स यांसारख्या करमणुकीच्या असंख्य पर्यायांमुळे वाचकांचा वेळ विभागला गेला आहे, परिणामी दिवाळी अंकासाठी एका जागी शांत बसून वेळ देण्याची सवय लोप पावत आहे.

बदललेली वाचन संस्कृती आणि सवयी :

सोशल मीडियामुळे वाचकाला 'झटपट आणि छोटे' वाचण्याची सवय लागली आहे. त्यामुळे दिवाळी अंकांमधील १००-२०० पानांचे दीर्घ आणि गंभीर वाचन आता अनेकांना कंटाळवाणे किंवा वेळखाऊ वाटते. तरुण पिढीला पुस्तकी वाचनापेक्षा दृकश्राव्य माध्यम अधिक प्रिय आहे. त्यांच्या आवडीचे विषय आणि त्यांच्या भाषेतील लेखन अनेक अंकांत न मिळाल्याने त्यांना दिवाळी अंकाचे फारसे आकर्षण राहिलेले नाही. आधुनिक आणि धावपळीच्या जीवनशैलीत एकाच जागी बसून निवांत वाचन करण्यासाठी लागणारा 'शांत वेळ' उपलब्ध होत नाही, जो दिवाळी अंक वाचण्यासाठी अत्यंत आवश्यक असतो.

साहित्य आणि दर्जामधील आव्हान: पूर्वीसारखे दमदार, कसदार आणि वाचकाला खिळवून ठेवणारे मराठी कथा-कादंबरी लिहिणारे लेखक मोठ्या प्रमाणात राहिले नाहीत, किंवा त्यांचे दर्जेदार लेखन विशिष्ट आणि मोजक्याच अंकात प्रकाशित होते. याशिवाय, अनेक दिवाळी अंकांत 'तोचतोपणा' जाणवतो आणि काही अंक दर्जेदार मजकुरापेक्षा केवळ जाहिरातींवर अधिक भर देतात, ज्यामुळे अंकाचा दर्जा आणि वाचनाचा अनुभव खालावतो. या 'तोचतोपणा'मुळे नियमित वाचकांचेही समाधान होत नाही.

दिवाळी अंकांच्या निर्मितीचा खर्च (कागद, छपाई, मानधन) वाढल्यामुळे त्यांची किंमतही वाढली आहे. पूर्वी स्वस्त दरात उपलब्ध असलेले अंक आता २०० ते ३०० किंवा त्याहून अधिक किमतीचे झाले आहेत. ही वाढलेली किंमत अनेक वाचकांना विशेषतः नियमित वाचक नसलेल्यांना खरेदी करताना विचार करायला लावते. याहून महत्त्वाचे म्हणजे, अनेक दर्जेदार अंक आजही डिजिटल (ई-बुक) स्वरूपात किंवा ऑनलाईन सबस्क्रिप्शन मॉडेलमध्ये सहज उपलब्ध नाहीत. बदलत्या पिढीला आकर्षित करण्यासाठी डिजिटल उपलब्धता आणि परवडणारे सबस्क्रिप्शन मॉडेल महत्त्वाचे ठरते.

मराठी दिवाळी अंकांचे आकर्षण कमी होण्यामागे केवळ 'काळ बदलला' इतकेच कारण नसून, तो तंत्रज्ञान, वाढलेली किंमत, वाचन सवयीतील बदल आणि पर्यायी माध्यमांची सहज उपलब्धता यांचा एकत्रित परिणाम आहे. जुन्या आणि प्रतिष्ठित अंकांनी आजही आपला वाचक वर्ग जपला असला तरी, एकंदरीत पाहता, मराठी माणसाच्या घरात दिवाळी अंकाचे पूर्वीचे महत्त्व आणि स्थान धोक्यात आले आहे. काळानुरूप डिजिटली बदलून, ऑनलाईन उपलब्धता वाढवून आणि नवीन पिढीच्या आवडीनुसार विषयांची निवड करूनच या १०० वर्षांहून अधिक जुन्या साहित्य परंपरेला नवसंजीवनी देणे शक्य आहे.

**अविनाश देशपांडे**

## अपारंपरिक ऊर्जा स्तोत्रांना अधिक प्रोत्साहन देण्याची गरज

आज जगभरात ऊर्जेची मागणी सतत वाढत आहे. ऊर्जेच्या पुरवठ्यातील त्रुटी दूर करण्यावर, त्यात डिजिटलायझेशन आणण्यावर जगभरातील ऊर्जा वितरण कंपन्यांचा अधिक भर असल्याचे दिसते. त्यातही आता ऊर्जेच्या निर्मितीतील संसाधनांना मर्यादा आल्याने जगभरात अक्षय ऊर्जा, हरित ऊर्जेचा वापर करण्याकडे अधिक कल वाढला आहे. त्यांना अखंडित विजेची गरज लागते. देशातील महानगरांमध्ये हायपरस्केल डेटा सेंटर असतात. हायपरस्केल डेटा सेंटर म्हणजे एखाद्या मोठ्या टेक कंपनीने बांधलेले आणि मालकीचे

असलेले डेटा सेंटर याला क्लाउड डेटा सेंटर असेही म्हणतात. एका हायपरस्केल सुविधेत पन्नास हजार चौरस फूट किंवा त्याहून अधिक जागेत हजारो सर्व्हर असू शकतात. या सुविधा बहुतेकदा मोठ्या शहरांच्या बाहेरील भागात असतात. पारंपरिक ग्रीडस्ला, विशेषतः महानगरीच्या क्षेत्रांच्या पलीकडे डेटा सेंटर्सना लागणारी अखंड, उच्च-गुणवत्तेची वीज पुरवण्यात अनेकदा अडचणी येतात. लहान शहरे आणि ग्रामीण भागातील अनेक डिजिटल हबना वारंवार वीज खंडित होणे, व्होल्टेज अस्थिरता आणि मर्यादित ग्रीड क्षमता यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे ट्रान्समिशन पायाभूत सुविधांवर अतिरिक्त दबाव येतो. महत्वाच्या डिजिटल सेवांसाठी अप टाइम राखण्यासाठी वीजपुरवठा, वितरण आणि लवचिकता धोरणांचा मूलभूत पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

भविष्यातील विकेंद्रित, बुद्धिमान ऊर्जा परिसंस्था या आव्हानांना तोंड देण्यासाठी या क्षेत्राने स्वयंपूर्ण ऊर्जा परिसंस्थांकडे वळले पाहिजे. यासाठी मायक्रोग्रीड्स, बॅटरी ऊर्जा साठवण प्रणालीद्वारे वाढवलेल्या अक्षय ऊर्जा आणि रिअल-टाइम ऊर्जा ऑप्टिमायझेशन तंत्रासह हायब्रीड स्तोत्राने एकत्रीकरण आवश्यक करणे आहे. विकेंद्रित वीज वितरण संरचना अस्थिर ग्रीड्सवरील अवलंबित्व कमी करतात. त्यामुळे ग्रामीण डेटा नोड्स, टेलिकॉम टॉवर्स आणि स्मार्ट कारखाने यासारख्या प्रमुख संस्थांना उच्च गुणवत्तेसह स्वायत्तपणे ऑपरेट करता येते. पायाभूत सुविधांचे निरीक्षण आणि एआय संचलित ऊर्जा व्यवस्थापन भार वितरण आणि भविष्यसूचक देखभाल सुधारू शकतात. परस्परांशी जोडलेला डिजिटल साइट्सची ऊर्जा कार्यक्षमता वाढवू शकते. २०३० पर्यंत पाचशे महत्वाकांक्षी अक्षय ऊर्जा लक्ष्य आहे. सरकारी प्रोत्साहनामुळे डिजिटल पायभूत सुविधांचे हरित ऊर्जेचे एकत्रीकरण वेगाने होत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ऑपरेटर रुफटॉप सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि प्रगत शीतकरण तंत्रज्ञानाचा वापर वाढवत आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहन अनुदानांमुळे ऊर्जा साठवण उपक्रमांनी बॅटरी स्टोरेजचा अवलंब करण्यास गती दिली आहे. ही पुरवठा मागणी तफावत भरून काढण्यासाठी आणि अक्षय ऊर्जेची अनियमित उपलब्धता कमी करण्यासाठी महत्वपूर्ण आहे.

भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या आणि ऊर्जा पायाभूत सुविधांच्या सहजीवन वाढीमुळे जटिल आव्हाने निर्माण होतात. त्यासाठी नाविन्यपूर्ण आणि एकात्मिक दृष्टीकोनाची आवश्यकता असते. सक्रिय गुंतवणूक आणि सक्षम धोरणांद्वारे डेटा सेंटर्सच्या उदयोन्मुख गरजांनुसार तयार केलेल्या विकेंद्रित, बुद्धिमान आणि हरित ऊर्जा प्रणालींचा विकास अत्यंत महत्वाचा असतो. या आव्हानांना यशस्वीरीत्या तोंड दिल्यास भारताची डिजिटल परिसंस्था मजबूत आणि अनुकूल राहील आणि पुढील दशकात जागतिक तंत्रज्ञान महासत्ता म्हणून त्याचे स्थान सुरक्षित राहू शकेल. अक्षय ऊर्जा ही अनंत शक्ती आहे. पृथ्वीवर पारंपरिक ऊर्जेचे स्तोत्र अतिशय मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. प्रमाणात वापरले गेल्यास हे पारंपरिक स्तोत्र संपुष्टात आल्यावर एक गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. म्हणूनच जगभरात अपारंपरिक ऊर्जा स्तोत्रांना प्रोत्साहन देण्याची गरज भासू लागली आहे. अक्षय ऊर्जा स्तोत्रांपासून ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. अक्षय म्हणजे जो कधीही संपत नाही, म्हणजेच अक्षय ऊर्जा ही प्रत्यक्षात ऊर्जेचा अमर्याद पर्याय आहे आणि आजच्या काळात कोणत्याही राष्ट्राच्या अक्षय विकासाचा मुख्य आधारस्तंभ देखील आहे. पर्यावरणीय चिंता लक्षात घेता, गेल्या काही वर्षांपासून अशी ऊर्जा आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या वाढत्या समस्येपासून जगाला काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल.

आज कोणत्याही राष्ट्राला स्वतःला विकसित करण्यासाठी प्रदूषणमुक्त अक्षय ऊर्जा स्तोत्रांचा योग्य वापर करण्याची आवश्यकता आहे. आज केवळ भारतच नाही, तर संपूर्ण जगाकडे विजेसारख्या महत्वाच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधने आहेत आणि पर्यावरणीय असंतुलन आणि विस्थापनासारखी गंभीर आव्हाने आहेत. गंभीर समस्या आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी अक्षय ऊर्जा हा एकमेव सर्वोत्तम पर्याय आहे. जो पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्याबरोबरच ऊर्जेच्या गरजा पूर्ण अनेक आव्हाने उभी करतात. देशभरात अक्षय ऊर्जा उत्पादनाची अनेक लहान युनिट आहेत, त्यांना एका ग्रीडमध्ये आणणे हे एक अतिशय आव्हानात्मक काम आहे. याचा परिणाम विजेच्या गुणवत्तेवर होतो. भारतात अक्षय ऊर्जेच्या विविध स्तोत्रांचा प्रचंड साठा आहे. परंतु त्यापासून ऊर्जा निर्माण करणारी बहुतेक उपकरणे परदेशातून आयात केली जातात. देशात ऊर्जेची मागणी आणि पुरवठ्यातील फरकदेखील वेगाने वाढत आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार देशातील एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४५० गिगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. त्यापैकी २३० गिगावॅटपेक्षा जास्त ऊर्जा अक्षय ऊर्जेच्या स्तोत्राद्वारे मिळवली जात आहे. आज भारतात विविध स्वरूपातील ऊर्जेच्या गरजांसाठी अक्षय ऊर्जा हा एक प्रमुख पर्याय आहे.

**मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

## विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा सर्वांचा लाडका 'लक्ष्या'

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षांच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म ७१ वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
९९२२५४६२९५

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शिवसेनेचे 'शिवसंकल्प' जिल्हा पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर आज

## शिवसेना मुख्यनेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - शिवसेनेच्यावतीने जिल्ह्याच्या वतीने 'शिवसंकल्प जिल्हा पदाधिकारी प्रशिक्षण शिबिर' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन उद्या रविवार, दिनांक २६ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. स्थानिक जांब मार्गवरील हॉटेल व्हेनिशियन येथे सकाळी ११ वाजता शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे शिबिर होणार आहे.

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या या शिबिरास केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, राज्याचे,पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, शिवसेना नेते आनंदराव अडसूळ, आमदार तथा शिवसेना नेत्या भावना गवळी, शिवसेना यवतमाळ जिल्हा निरीक्षक शिवसेना उपनेते ज्ञानेश धाने पाटील यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच पश्चिम विदर्भातील आजी माजी आमदार व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आणि आजी माजी लोकप्रतिनिधी मान्यवर शिवसैनिकांसाठी हा प्रेरणादायी आणि मार्गदर्शक उपक्रम ठरणार आहे. शिवसेना यवतमाळ जिल्हातर्फे गेल्या दोन महिन्यात शिवसेनेच्या जवळपास दोन हजार पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत झाले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी या सर्व पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी या शिबिराचे मुख्यतः आयोजन जिल्हा शिवसेनेतर्फे करण्यात आले आहे. पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना संघटनात्मक कौशल्य, संवादकौशल्य, समाज माध्यमांचा प्रभावी वापर आणि सामाजिक जबाबदारीचे प्रशिक्षण देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरामध्ये पक्ष संघटन, सामाजिक माध्यमांवरील राजकारणाचा प्रभाव, महिला सहभाग आणि कार्यकर्त्यांचा वैयक्तिक संघटनात्मक बांधणी कौशल्य विकासावर विविध तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. शिबिरात विश्वनाथ केळकर हे शिवसैनिकांचे तयार करण्यात आलेल्या लक्ष्यवेध अॅपबद्दल माहिती देणार आहेत, तर डॉ. राजश्री अहेरराव या धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाबद्दल माहिती देणार आहेत. शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी हे संघटन बांधणीबद्दल मार्गदर्शन करतील तर शिवसेना प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे या राजकारणात महिलांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन करतील. दुपारी ३ वाजता शिबिराचा समारोपिय सत्राला सुरुवात होणार आहे. शिबिरात जिल्ह्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व आजी माजी लोकप्रतिनिधी यांनी त्यांना दिलेल्या निमंत्रण पत्रिकेसह सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.







## अकबर सेठ खेतानी आणि सलीम खेतानी यांचा सत्कार

पांढरकवडा - ज्येष्ठ नागरिक श्री. अकबर सेठ खेतानी, श्रीमती नूरजहा अकबर अली खेतानी आणि सामाजिक कार्यकर्ते तसेच खेतानी फाउंडेशनचे प्रमुख श्री. सलीमजी खेतानी यांनी आपल्या सर्व कुटुंबीयांच्या वतीने श्री गोरक्षण संस्थान, पांढरकवडा येथील नवीन गोरक्षण शेड व इमारत बांधणीसाठी रु. ५ लाखांची उदार देणगी दिली आहे. या समाजहितार्थ योगदानाबद्दल त्यांचा श्री गोरक्षण संस्थान व श्री दत्त मंदिर देवस्थान तर्फे सत्कार करण्यात आला. त्यांच्या या दानशूर कार्यामुळे गोरक्षण सेवेला नवी ऊर्जा मिळाली असून, समाजात एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.

# पुसद शहरालगत असलेले लेआउट व यशवंत स्टेडियम झाले मद्यपींचा अड्डा

## अल्पवयीन तरुण पिढी दारू आणि सिगरेटच्या गर्तेत

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - शहराच्या लगत असलेल्या अनेक लेआउट तयार झालेले आहे, काही ठिकाणी घर बांधकाम झाले आहे तर काही ठिकाणी घर बांधकाम नसल्यामुळे, त्यामध्ये खिस रोड, पीएन कॉलेज परिसर, ईटावा परिसर, तसेच उमरखेड रोड, बोरगडी रोड, कारला रोड,काकडदाती रोड तसेच महत्वाचे शहरालगत व उपविभागीय अधिकारी तथा तहसील कार्यालय शेजारी असलेले यशवंत स्टेडियम येथे अल्पवयीन तरुण मुले तसेच ३५ ते ४५ वयोगटातील इसम सुद्धा या ठिकाणी येऊन दारू व सिगारेट या नशापाणी करतांना जेष्ठ नागरिकांना आणि या ठिकाणी पडलेल्या दारूच्या बॉटल आणि सिगारेटचे पाकिट यावरून दिसून येत आहे. अशा लेआउट व स्टेडियम मध्ये आता चिंताजनक स्थिती निर्माण झाली असुन. या ठिकाणी रात्रीच्या वेळी मद्यपींची गर्दी होत असून, अल्पवयीन तरुण तसेच कधी कधी विद्यार्थीही सिगारेट व दारूच्या व्यसनात अडकलेले दिसत आहेत. सकाळी ज्येष्ठ नागरिक महिला तथा पुरुष पायी फिरण्यासाठी जाणारे नागरिक यांची सतत ओरड असते की, रस्त्यावर दारूच्या बाटल्या, सिगारेटचे पाकिटे, बिसलरी बाटल्या अशा स्वरूपात कचरा दिसतो. या ठिकाणी रात्रीच्या सुमारास तरुण मंडळी दारूचा आस्वाद घेत बसतात आणि नंतर बाटल्या रस्त्यावर फेकून स्वच्छ असलेला परिसर अस्वच्छ करतात. सकाळी सकाळी फिरण्यासाठी व व्यायाम करण्यासाठी जाणारे ज्येष्ठ व सुज्ञ नागरिकांचा ग्रुप आणि स्थानीक असलेले रहिवासी यांनी अनेक वेळा या विषया विरोधात नाराजी व्यक्त केली आहे. या लेआउट परिसरात तसेच स्टेडियम परिसरात रात्री ७:०० ते रात्री १०:०० वाजता च्या दरम्यान पोलिसांनी पेट्रोलिंगची गाडी फिरविणे अत्यंत महत्वाचे झाले आहे. यामुळे असे अवैध प्रकार थांबतील अन्यथा पुसद तालुक्यातील नवतरुण पिढी व विद्यार्थी हे मोठ्या प्रमाणात व्यसनाधीश होऊन आपले आयुष्य खराब करून घेतील,तसेच या तरुण पिढीकडे व विद्यार्थ्यांकडे आपल्या पालकांनी सुद्धा लक्ष देणे गरजेचे झाले आहे. तसेच या गंभीर बाबीकडे पुसद शहर पोलिसांनी या गोष्टीकडे गंभीरतेने लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे. असे शहरातील सुज्ञ व ज्येष्ठ नागरिक तथा मॉर्निंग ग्रुप कडून सांगण्यात येत आहे.

## जळका येथे जय लखमाई क्रीडा मंडळतर्फे भव्य एकदिवसीय खुले कबड्डी स्पर्धेचे आयोजन!

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - राळेगाव शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या जळका गावात जय लखमाई क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित एकदिवसीय खुले कबड्डी स्पर्धेचा थाटात शुभारंभ करण्यात आला. खेळाडू व क्रीडाप्रेमींच्या उपस्थितीत स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते व बांधकाम ठेकेदार श्री. सुरेशभाऊ घसाल, तसेच माजी सैनिक श्री. गुरुदास देविदास नागरळे आणि जळका-धानोरा जिल्हा परिषद गटाचे भावी उमेदवार डॉ. कुणाल भोईर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी गावातील मान्यवर, क्रीडाप्रेमी युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यात प्रमुख पाहुण्यांनी जय लखमाई क्रीडा मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. ग्रामीण भागात अशा क्रीडा उपक्रमांमुळे तरुणांना व्यसनमुक्ती, संघभावना आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश मिळतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी खेळाडूंचा परिचय घेऊन पाहुण्यांनी सर्व संघांना आगामी सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या. दिवसभर चाललेल्या या स्पर्धेत परिसरातील नामांकित कबड्डी संघांनी सहभाग घेतला. मैदानावर "कबड्डी... कबड्डी..." या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते. खेळाडूंनी उत्कृष्ट चढाया, जबरदस्त पकडी आणि चुरशीच्या झुंजींनी प्रेक्षकांचे मन जिंकले. विजयी संघाला आकर्षक बक्षिसे तसेच सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या यशस्वी आयोजनासाठी जय लखमाई क्रीडा मंडळाचे अध्यक्ष, सचिव व सर्व सदस्यांचे गावकऱ्यांनी कौतुक केले. ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती वाढविण्यासाठी असे उपक्रम प्रेरणादायी ठरावेत, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीतर्फे तीनशे एक दिवे लावून दीपोत्सव साजरा



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरे केल्या गेले असून जन्मोत्सवातील दुसऱ्या पर्वातील दिवाळीच्या पाडव्याच्या पूजनाच्या दिवशी यवतमाळ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकाची साफसफाई करून, रांगोळी काढून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे पूजन करून दिवाळी पाडव्याच्या दिवशी बुधवारी दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक, म.फुले चौक, यवतमाळ येथे तीनशे दिवे लावून मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळेस शोभा पुनसे, ललिता शेळके,लता गलाट, मनस्वी काकडे,अर्चना काकडे, सुनयना येवतकर, सुधा खडके,रेणुताई शिंदे, सुवर्णा अराटे, गौतमी शिंदे,शीतल घावडे, माधवी लोळगे,वसंतराव ढोके, डॉ.शैलेश म्हस्के,पवन थोटे, सुरेश भावेकर, अंकुश गलाट, सुनील सोळंकि, धन्नूलाल पाली, राजकुमार लकडे,राजेश मदने, विलास अवघड, शशिकांत लोळगे, चंद्रकांत काळे, विष्णुपंत गाडेकर, मनमोहन काकडे,विजय शिंदे, किशोर शेळके, बलदेव गव्हनर,रमेश उघडे, हिर अवघड, प्रदीप पुनसे, विजय शिंदे, अविनाश शिंदे, देविदास अराटे आदी समाज बांधव भगिनी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

## शहरातील सामाजिक कार्यकर्ते सैय्यद सादीक व सैय्यद राजीक हे प्रभाग क्रमांक 3 आणि ५ भाजपकडून निवडणूक लढविण्यास इच्छूक

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - उमरखेड शहर हे संवेदनशिल शहर आहे. याठिकाणी छोट्या-छोट्या गोष्टीवरून मोठे वाद होतांना आपण पाहतो. त्यामुळे समाजासमाजात तेढ निर्माण होण्याचे प्रकरणे आपण पाहिले आहेत. या सर्व किल्लर बाबी बाजुला ठेऊन आणि सर्व धर्म समभाव जोपासत वाटचाल करणारे ,जातपात न पाहता कुठलाही समाज असो मदतीचा हात देणारे दोघे भाऊ सय्यद सादीक सैय्यद अब्दुल व सैय्यद राजीक सैय्यद अब्दुल हे बांधकाम व्यवसायासह ढाणकी रोडवर सेल्सचे दुकान सांभाळतात.

मागील काळात सय्यद सादिक व सय्यद राजीक यांनी शहरातील रुग्णांसाठी मोफत आटो सेवा ही सुद्धा चालवली होती तसेच त्यांच्या या कार्याची दखल घेत अनेक पुरस्कार मिळाले तसेच सर्व जाती-धर्माच्या सण उत्सवात पुढाकार घेणारे हे दोन्ही भाऊ वेळोवेळी प्रशासनाच्या कार्यक्रमात पुढाकार घेतात. शहरातील अनेकांच्या सुखा दुखात अहोरात्र पुढाकार घेणारे हे दोन्ही भाऊ नेहमी आपल्या कार्याच्या माध्यमातून लोकांच्या मनात घर केले आहे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारसंवर्धन समिती उमरखेड यांच्या विद्यमाने आयोजित फुले आंबेडकरी प्रबोधन पर्व कार्यक्रमात सैय्यद सादीक भैय्या यांना सामाजिक बांधीलकीची भावना ठेवून गेल्या अनेक वर्षापासुन सातत्याने उमरखेड आणि उमरखेड परिसराच्या जडणघडण मध्ये त्यांचे सहकार्य असल्याने त्यांना 'जनसेवक' ही पदवी देवून सन्मानित करण्यात आले होते.जगद्गुरुतुकोबाराय साहित्य परिषद यवतमाळ व सेवाभावी संस्थेतर्फे सत्कार करून सन्मानपत्र मिळाले. २०२५ मध्ये होवू घातलेल्या नगरपरिषद निवडणुकीत भाजप -काँग्रेस पक्ष आमने सामने लढत देणार आहेत. सय्यद सादीक व सैय्यद राजीक यांना भाजपने उमेदवारी देवून निवडणुकीच्या मैदानात उतरवल्यास हे दोघेही भाजपसाठी वजनदार उमेदवार ठरु शकतात.

## ● वेचक

### दिवाळीनिमित्त धनोडा येथे दिवाळी विविध स्पर्धा-२०२५ संपन्न



महागाव - तालुक्यातील धनोडा येथे दरवर्षीप्रमाणे दिनांक 22 ऑक्टोबर 2025 ला धनोडा, महागाव (यवतमाळ) येथे दिवाळी स्पर्धा 2025 निमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. ग्रामदैवत श्री. संत तुकेश्वर महाराज यांच्या कृपेने, साईप्रसाद परिवार , नांदेड आणि नव विचार मंच , छत्रपती संभाजीनगर यांच्या संकल्पनेतून, दिवाळीच्या पावनपर्वात धनोडा गावात विविध स्पर्धा श्री.हनुमान मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आल्या होत्या. या विविध स्पर्धेमध्ये, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडल्या आणि स्पर्धेनंतर परीक्षक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण पार पडले. प्रत्येक स्पर्धा प्रकारात गटानुसार विजेत्यांना बक्षीस आणि प्रमाणपत्र देण्यात आले तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणुन सुप्रसिध्द चित्रकार आणि उपक्रमशील शिक्षक रणजित वर्मा, रांगोळी कलेसाठी प्रसिध्द अशा शुभांगी अभय बोमिलवार आणि प्रसिध्द चित्रकार अराध्ये सर लाभले होते. सर्व मान्यवर परीक्षकांनी स्पर्धकांना विविध विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले आणि सर्व स्पर्धकांचे आणि आयोजकांचे कौतुक केले.

### वाइल्ड फॉर नेचर क्लब दिग्रसकडून ८ फुटी अजगराला जीवनदान



दिग्रस : २४ ऑक्टोबर रोजी खंडापूर येथे एका शेत शिवारात अजगर निघण्याची घटना घडली असता ही बातमी महानायक अॅकॅडमी चे संचालक अविनाश राठोड सर यांनी वाइल्ड फॉर नेचर क्लब च्या सदस्यांना दिली असता ग्रुपचे प्रथमेश जाधव, शिवम ढोले, सौरभ अंबोरे, कपिल काटकोजवार, आशिष भस्मे, जय गरड, जय पिट्टलवार, ओम पवार यांनी क्षणाचा ही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली व तिथे जाऊन पहाणी केली असता (इंडियन रॉक पायथन) मराठी नावे भारतीय अजगर साप आढळून आला व त्या सापाला अगदी सुरक्षित पणे कोणतीही इजा न पोहचता त्या सापाला जेरबंद केले व त्या सापाची माहिती वनविभागाला देऊन त्या सापाला निसर्गमुक्त करण्यात आले व त्यावेळी ग्रुप चे सदस्य योगेश जाधव, ओम राठोड, अर्जुन राठोड, ऋषिकेश भलगे, संकेत ढोरे, रुपाली खिराडे, पीयुष चौधरी इत्यादी उपस्थित होते. अजगर हा साप पूर्णपणे बिनविषारी असून या सापाची लांबी अधिकतम लांबी 16 फूट इतकी असू शकते आणि हा साप अधिनियम परिशिष्ट 1 मध्ये समाविष्ट आहे आणि या सापाची हत्या करणे किंवा खेळ करणे कायद्याने गुन्हा आहे व असे केल्यास तुरुंगवास होऊ शकते व कुठेही साप किंवा वन्यजीव धोक्यात आढळून आल्यास 7038030312 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा आपला एक फोन एक जीव वाचवू शकतो.

# नियमित वाचनाने व्यक्तीची स्वतंत्र ओळख निर्माण होते : ठाणेदार गोपाल उंबरकर

जनमाध्यम प्रतिनिधी



वणी: वाचनानेमानव मस्तिष्कसुदृढ होते. त्यामुळे काय वाईट काय चांगले याचा निर्णय घेता येतो. जे जीवनामध्ये खूप आवश्यक आहे. अशा प्रकारे नियमित वाचनाने व्यक्तीची स्वतंत्र ओळख निर्माण होते. असे प्रतिपादन येथील ठाणेदार गोपाल उंबरकर यांनी केले. ते नगर वाचनालयात आयोजित दिवाळी अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका संघचालक हरिहर भागवत हे होते.

दरवर्षी नगर वाचनालयात महाराष्ट्रातील दर्जेदार साहित्यिक, विनोदी, स्त्री शक्ती विषयक विविध दिवाळी अंकांची खरेदी करून वाचकांना उपलब्ध करून देण्याच्या अशी वणीकरणा या दिवाळी अंकांचे अवलोकन करता यावे यासाठी दिवाळी अंकांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन झाल्यानंतर अतिथीसह उपस्थितांनी या अंकांचे अवलोकन करून आनंद व्यक्त केला.दोन दिवसाच्या प्रदर्शनानंतर दिनांक 26 ऑक्टोबर पासून 300 रुपये ना परतावा नोंदणी शुल्क देऊन 35 दिवाळी अंक वाचता येणार आहे. अध्यक्षीय भाषणात भागवत यांनी नगर वाचनालय वाचन संस्कृती वाढविण्यासाठी करीत असलेल्या उपक्रमाचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाचनालयाचे सचिव गजानन कासावार यांनी केले. आभार प्रदर्शन उपाध्यक्ष विशाल झाडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देवेंद्र भाजीपाले, प्रमोद लोणारे, राम मेंगावार यांनी परिश्रम घेतले.

# साई वृद्धाश्रम व बाळू धुमाळ मित्र परिवारातर्फे दिवाळीप्रीत्यर्थ सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - दिवाळी या सणाच्या निमित्ताने साई वृद्धाश्रम व बाळू धुमाळ मित्र परिवार यांच्या वतीने राळेगाव नगरपंचायत येथील सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. शहराच्या स्वच्छतेसाठी वर्षभर परिश्रम घेणाऱ्या या कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने प्रत्येक सफाई कर्मचारी बहिणींना साडीचोळी मिठाई, कर्मचारी बांधवांना कपडे व मिठाई दिवाळी निमित्त वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष रवींद्र शेराम, महेशभाऊ शेंडे, फिरोजभाऊ लखानी, निलय घिनमीने, सागर वनस्कर, शुभम लोटे, मंगेश राऊत, पराग मानकर, योगेश मलोंडे, अनुष्का धुमाळ, साई धुमाळ, पवन राऊत व हरिभाऊ किन्हेकर यांची उपस्थिती लाभली. तसेच नगरपंचायतचे सर्व सफाई कर्मचारी उत्साहाने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याची प्रशंसा करत, शहर स्वच्छतेसाठी त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे नमूद केले. समाजात सेवा भाव जोपासणाऱ्या कर्मचाऱ्यांचे हे कौतुक म्हणजे त्यांच्या श्रमाला दिलेला सन्मान असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहात पार पडले. शेवटी सर्व उपस्थितांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून दिवाळी सणाचे स्वागत करण्यात आले. साई वृद्धाश्रम व बाळू धुमाळ मित्र परिवार तर्फे सफाई कर्मचाऱ्यांना दिलेल्या साडीचोळी, कपडे आणि मिठाईच्या वाटपामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला आणि "दिवाळीचा खरा आनंद म्हणजे समाजातील मेहनती व्यक्तींना सन्मान देणे" असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# आजाद समाज पार्टी (कां.) आयोजित कार्यकारिणी व भीम आर्मी आढावा बैठक संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - आजादसमाज पार्टी (कां.) आणि भीम आर्मी यवतमाळ आयोजित कार्यकारिणी तसेच आढावा बैठक दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी विश्राम गृह, पुसद येथे संपन्न झाली. आगामी काळात जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या – नगर परिषद, नगर पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत आजाद समाज पार्टी (कां.) युवामोर्चायवतमाळ जिल्ह्याच्या वतीने पुसद मध्ये प्रत्येक ठिकाणी उमेदवार देणार आहे, असे बैठक दरम्यान जाहीर करण्यात आले.

बैठकीसाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवली. या बैठकीत संघटनेच्या आगामी कार्यक्रमांची रूपरेषा, कार्यकारिणीचे आढावे, तसेच समाजातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

अशोक भालेराव, भीम आर्मी यवतमाळ जिल्हा अध्यक्ष यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या माध्यमातून दिलेले अधिकार प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचे काम तरुण पिढीने केले पाहिजे आणि संघटनेच्या बळकटीसाठी कार्यकर्त्यांना सतत सक्रिय राहण्याचे आवाहन केले.



राजकुमार भगत, आजाद समाज पार्टी (कां.) युवा मोर्चा यवतमाळ जिल्हा अध्यक्ष यांनी देखील संघटन बळकटीकरण साठी मार्गदर्शन केले त्यांनी असे सांगितले की आज आपल्यासमोर सर्वात मोठं काम आहे संघटना तळागाळात जाऊन मजबूत करणे गावोगावी विभागाणिक आपली विचारधारा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली समतेची शिकवण पोहोचवणं हेच आपल्या कार्याचे केंद्रबिंदू आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतःला संघटनेचा प्रतिनिधी म्हणून सिद्ध करावं आणि आपल्याला काही मागायचं नाही आपल्याला आपल्या मेहनतीने संघटनेच्या शक्तीने मिळवायचा आहे. चला संघटित व्हा शिक्षित व्हा आणि संघर्ष करा पण संविधानाच्या मार्गानेच असे मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच आझाद समाज पार्टी युवा मोर्चा यवतमाळ जिल्हा अध्यक्ष राजकुमार भगत यांच्याहस्ते शरद खंदारे,यांची आजाद समाज पार्टी ग्रामीण तालुका अध्यक्ष पदीनिवड करण्यात आली तर सुदर्शन कांबळे यांची सुद्धा तालुका उपाध्यक्ष ग्रामीण पदी आणि प्रशिक कांबळे, रोहडा सर्कल अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी विशाल ढाके, राज कांबळे, करण खंदारे, अंकुश देवकते, धोंडू ढोणे, विशाल खंदारे, अनिल कांबळे, भगवान खंदारे, वैभव सूर्यवंशी, राहुल घुले, अजय लोखंडे, अश्विन कांबळे, राज कांबळे, गजानन ढोणे, दिनेश ढोणे, पंढरी आवळे, रामभाऊ ढोणे, शामराव ढोणे, गोपाल जगताप, इत्यादी संघटनेचे पदाधिकारी/ कार्यकर्ते उपस्थित होते.

## रेती घाट लिलाव कधी होणार! स्वस्त रेती कधी मिळणार!

जनमाध्यम प्रतिनिधी

ढाणकी - शासनाच्या विविध घरकुल योजनांसाठी मोफत रेती देण्याची योजना सरकारकडून आणण्यात आली. उमरखेड तालुक्यात मात्र या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली नसून घरकुल धारकांना मोफत रेती भेटायची सोडा, विकत रेती सुद्धा मिळत नसल्याने स्वप्नातील घर बांधणे अवघड झाले आहे.

रेती लिलाव न झाल्याने बांधकामावर परिणाम झाला आहे, ज्यामुळे बांधकामे रखडली आहेत. घरकुल लाभार्थी आणि कंत्राटदार यांना रेती मिळवण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत आणि या समस्येमुळे काम करणाऱ्या मजुरांच्या रोजगारावरही परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी रेती उपलब्ध नसल्यामुळे घरांची तसेच इतर बांधकामे अर्धवट आहेत. रेती घाटांचे लिलाव बंद असल्याने रेतीची किंमत वाढली आहे. त्यामुळे लोकांना चढ्या दराने रेती विकत घ्यावी लागत आहे. रेती घाटांचे लिलाव बंद झाल्याने रेतीचे काम करणाऱ्या ट्रॅक्टर मालकांना आणि मजुरांना काम मिळत नाही, ज्यामुळे त्यांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. रेतीची टंचाई असल्याने आणि अधिक दराने विक्री होत असल्याने चोरट्या मार्गाने रेतीची वाहतूक सुरु झाली आहे, ज्यामुळे शासनाचा महसूलही बुडत आहे.उमरखेड तालुक्यातील रेती घाटांचे लिलाव त्वरित करावेत, अशी मागणी आता जोर धरत आहे.

जिल्ह्यात 65 वाळू घाट आहेत. त्यापैकी 33 वाळू घाटांचे लिलाव जिल्हा प्रशासनद्वारे केले जात असल्याचे माहिती आहे. लिलाव न झाल्याने वाळू तस्करांना मोकळे रान झाल्याचे चित्र सध्या आहे. वाळू घाटांच्या लिलावाच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाला दरवर्षी 17 कोटी रुपयांचा महसूल मिळतो अशी माहिती आहे. परंतु, यंदा लिलाव झाले नसल्याने 17 कोटी रुपयांच्या महसुलावर खनिकर्म विभागाला पाणी सोडण्याची वेळ आली आहे असे कळते.






# मनपा निवडणूकीचे राजकीय वातावरण तपले

## महायुतीत मतभेदाची पेरणी, महाविकास आघाडीत संभ्रम

**अमरावती / का.प्र.**

पुढच्या वर्षी होणाऱ्या अमरावती महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय वातावरण तापले आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आपली पकड कायम ठेवण्यासाठी सज्ज आहे, तर काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सारखे विरोधी पक्ष भाजपला आव्हान देण्यासाठी रणनीती आखत आहेत. या निवडणुकीत महायुतीतच सामना रंगण्याची चिन्हे आहेत. भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटात युतीची शक्यता धूसर आहे. काँग्रेसनेही स्वबळाची भाषा सुरू केल्याने शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट काय भूमिका घेणार, यावर पुढील गणित अवलंबून राहणार आहे.

भाजपमध्ये गटा-तटाचे राजकारण

भाजपची पुरा ही माजी खासदार नवनीत राणा, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांच्या हाती आली आहे. युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवि राणा यांचा भाजपमध्ये प्रत्यक्ष सहभाग नसला, तरी त्यांची भूमिका देखील महत्त्वाची राहणार असल्याने माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांचा गट अस्वस्थ आहे. भाजपमधील गटा-तटाचे राजकारण यावेळी मोठ्या प्रमाणात बघायला मिळू शकेल. दुसरीकडे, राष्ट्रवादी अजित पवार गठाचे आमदार संजय खोडके हे आपली रेष मोठी करण्याच्या प्रयत्नात आहेत.

काँग्रेसमध्ये इच्छुकांची गर्दी

काँग्रेस हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष आहे. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख हे गेल्या निवडणुकीच्या वेळी भाजपमध्ये होते. त्यांच्याकडे काँग्रेसची धुरा आहे. काँग्रेसमध्येही इच्छुकांची गर्दी आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट काय भूमिका घेणार, याची उत्सुकता आहे.

गेल्या निवडणुकीत भाजपने ८७पैकी ४५ जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसला १५. शिवसेनेला ७ तर एमआयएमला १० जागा मिळाल्या होत्या. मार्च २०२२ मध्ये महापालिका बरखास्त झाल्यापासून प्रशासक राजवट सुरू असल्याने, या निवडणुकांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महायुतीत चांगलीच रस्सीखेच दिसून येत आहे. भाजप आणि युवा स्वाभिमान पक्षामध्ये सहजरित्या युती होण्याची शक्यता असली, तरी राष्ट्रवादी अजित पवार गट युवा स्वाभिमान पक्षापासून अंतर राखून आहे.



स्वाभिमान युवा भाजपसोबत जाणार असेल, तर युती अशक्य असल्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके यांनी स्पष्टपणे सांगून टाकले आहे. शिवसेना शिंदे गट भाजपसोचत युती करण्यास अनुकूल असला, तरी भाजपमध्ये इच्छुकांची मोठी गर्दी ही अडचण भाजपसमोर आहे. भाजप हा गेल्या निवडणुकीत सर्वांत मोठा पक्ष म्हणून समोर आला होता. भाजपला वर्चस्व कायम राखायचे आहे, पण गेल्या आठ वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे.

# १४८ बँक ग्राहकांचे ३.५२ कोटींचे खाते पुन्हा 'ॲक्टिव्हेट'



**अमरावती / का.प्र.**

ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत मिळाली नसलेल्या आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणा साठी आज जिल्हास्तरीय शिबिर पार पडले. विशेष म्हणजे या शिबिरामध्ये विविध बँकांच्या १४८ खातेदारांचे ३.५२ कोटी रुपयांचे खाते पुर्नजीवित (ॲक्टिव्हेट) करण्यात आले.

'ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता फंड' या शिबिराचे आयोजन जिल्हाची अग्रणी बँक (सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया) ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी शिबिराचे फलित यांच्या पुढाकाराने अभिनंदन को ऑपरेटिव बँकेच्या सभागृहामध्ये करण्यात आले होते. अभिनंदन बँकेचे अध्यक्ष विजय बोथरा, रिजर्व बँकेचे सहायक महाप्रबंधक विनोद कुमार के., अभिनंदन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे, अभिनंदन बँकेचे व्यवस्थापकीय अध्यक्ष सुदर्शन गांग, सेंन्ट्र सेंन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक सुनील पांडेय, स्टेट बँकेचे नवीन उप्पलवार, अग्रणी बँक जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यावेळी उपस्थित होते. या उपक्रमामुळे खातेदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी परत मिळवण्याची संधी मिळत आहे. १० वर्षांहून अधिक काळ ज्या ठेवींवर खातेधारका 'कडून काही कारणांमुळे दावा करण्यात आला नाही, अशा ठेवी 'ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी' मध्ये हस्तांतरित करण्यात येत आहेत. खातेदारांना त्या ठेवी परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. याबाबत जनजागृती व्हावी, यासाठी या शिबिराच्या आयोजन करण्यात आले. शिबिरात खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवींचे निराकरण करणे तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासंबंधी मार्गदर्शन शिबिरात करण्यात आले. वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर घेण्यात आले. ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत नामनिर्देशित, लाभार्थी या शिबिरास उपस्थित होते. शिबिराचे प्रास्ताविक सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय प्रबंधक सुनील पांडेय, संचालन नरेश हेडाऊ, तर आभार प्रदर्शन रोहण पोंक्षे यांनी केले.

# 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा



**अमरावती/ का.प्र.**

'एक चांगलं पुस्तक शंभर मित्राप्रमाणे असते' - या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी विचाराला केंद्रस्थानी ठेवून तक्षशिला अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापुर येथे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामार्फत करण्यात आले.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे भारताचे महान शास्त्रज्ञ, माजी राष्ट्रपती आणि तरुणांसाठी प्रेरणास्थान होते. त्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या विकासाला नवी दिशा दिली. 'यशस्वी कथा वाचू नका, त्यांनी केवळ संदेश मिळतो. अपयशाच्या कथा वाचा, त्याने यशस्वी होण्यासाठी कल्पना मिळतात.' हा त्यांचा विचार आजही प्रत्येक तरुणाच्या मनात प्रकाशवत आहे. वाचन, चिंतन आणि कृती यांच्या संगमाने त्यांनी 'ज्ञानातून विकास' ही संकल्पना साकार केली.

कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथपूजनाने व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी व सर्व कर्मचाऱ्यांनी 'मी दररोज किमान काही वेळ पुस्तक, मासिक, संशोधनग्रंथ किंवा ज्ञानवर्धक साहित्य वाचेन. वाचन ही माझी सवय आणि जीवनाची गरज बनवेन. पुस्तकांमधून मिळालेलं ज्ञान मी माझ्या आयुष्यात, अभ्यासात व समाजकार्यात उपयोगात आणेन.' अशी वाचनाची शपथ घेतली. वाचन शपथ घेताना विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत वाचनाविषयीचा उत्कट उत्साह आणि अभिमान झळकत होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दिनेश डी. खेडकर, प्राध्यापक व विभागप्रमुख, शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावती उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, 'डॉ. अब्दुल कलाम यांचे आयुष्य हे वाचनातून प्रगल्भ झालेल्या विचारांचे आणि त्या विचारांतून साकार झालेल्या कृतीचे मूर्त उदाहरण आहे. पुस्तकांशी नाते जोडणारा विद्यार्थी कधीच दिशाहीन होत नाही, कारण प्रत्येक पुस्तकात एक अदृश्य गुरु असतो जो शांतपणे

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जेनेटिक लॅबला मान्यता

## ट्रान्सप्लांट ओटीलाही मान्यता मिळाली

**अमरावती/ का.प्र.**

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून ओळखले जाणारे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय विविध महत्त्वाच्या शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करत आहे. रुग्णालयाला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. या संदर्भात, रुग्णालय आता त्यांच्या सेवांचा विस्तार आणि वाढ करत आहे. एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे, त्यानुसार महाराष्ट्रातील पहिली जेनेटिक आण्विक प्रयोगशाळा येथे स्थापन केली जाईल.

सूत्रांनी सांगितले की राज्य सरकारने या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. लवकरच निधी जारी केला जाईल आणि प्रत्यक्ष काम सुरू होईल.

विविध गंभीर आजारांसाठी सूक्ष्म रक्त चाचण्यांमध्ये जेनेटिक लॅब खूप उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे, शस्त्रक्रियेदरम्यान रक्त घटकांची त्वरित आवश्यकता असते. रक्त प्रयोगशाळा हे त्वरित उपलब्ध करून देईल. आरोग्य विभागाने लॅबच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे आणि निधी मंजूर केला आहे.

महिन्यांपूर्वी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला भेट दिली. रुग्णालयाच्या कामगिरीने, विशेषतः यशस्वी प्रत्यारोपण ऑपरेशन्सने ते प्रभावित झाले. रुग्णालयाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला. प्रकाश आबिटकर यांनी आधुनिक अनुवंशशास्त्र प्रयोगशाळेला हिरवा कंदील दाखवला.

रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अमोल नरोटे म्हणाले की रुग्ण सेवांचा विस्तार होत आहे. आरोग्य मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. यामुळे अनुवंशशास्त्र प्रयोगशाळा आणि प्रत्यारोपण ओटी स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

# १२ वीच्या बोर्ड परीक्षेसाठी ३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वीच्या बोर्ड परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांना २० ऑक्टोबरपूर्वी अर्ज सादर करायचे होते. राज्य मंडळाच्या १२ वी आणि १० वी इयत्ता शेवटच्या शालेय परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये होणार आहेत.

या परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज ऑनलाइन सादर करावेत. ते हे अर्ज यू-डीआयएसई आणि पेन आयडी वापरून कनिष्ठ महाविद्यालयामार्फत मंडळाकडे सादर करू शकतात. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नियमित विद्यार्थी, सर्व प्रवाहातील पुनर्परीक्षा घेणारे उमेदवार, नोंदणी प्रमाणपत्रे मिळालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधारणा योजनेअंतर्गत प्रवेश घेतलेले विद्यार्थी आणि तुरळक किंवा आयटीआय विषयात प्रवेश घेतलेले विद्यार्थी यांनी कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत त्यांचे अर्ज सादर करावेत. ते आता नियमित शुल्कासह त्यांचे अर्ज ३ नोव्हेंबरपर्यंत सादर करू शकतात. नियमित आणि विलंब शुल्कासह अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे परीक्षा शुल्क मंडळाकडे ७ नोव्हेंबरपर्यंत जमा करावे लागेल. कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या विद्यार्थी यादी आणि पूर्व-याद्या विभागीय मंडळाकडे १० नोव्हेंबरपर्यंत जमा कराव्या लागतील.

# खेडच्या सीताफळांची चवच न्यारी !

**अमरावती/ का.प्र.**

पूर्णतः नैसर्गिक, स्वादिष्ट व चवदार म्हणून खेडच्या सीताफळाचा नावलौकिक आजदेखील कायम आहे.

खेड येथील १३२ हेक्टर वनजमिनीवरील उत्पादित सीताफळ हे पूर्णपणे रसायन विरहित असल्याने खाणाऱ्यांची पहिली पसंती आहे. त्यामुळे यावर्षीदेखील अमरावतीच्या बाजारात खेडच्या सीताफळाची मागणी मोठ्या प्रमाणात दिसून आली. मात्र, आवक जास्त असल्याने पाहिजे त्या प्रमाणात फळाला दर मिळत नसल्याचे मत महाराष्ट्र सीताफळ महासंघाचे दिनेश शर्मा यांनी व्यक्त केले. एकेकाळी मोठमोठ्या डाल्यांमधून मंडीपर्यंत जाणारे खेडचे सीताफळ आज पॅकिंग होऊन विक्रीला जात आहे. संत्रा उत्पादकांना होत असलेली निराशा दूर करण्यासाठी



**अमरावतीच्या बाजारात वाढती मागणी**

**आवक वाढल्याने दर मात्र गडगडले**

अल्पावधीतच कमी खर्चात, कमी पाण्यात येणारे सीताफळ हे पीक वरदान ठरू शकते. याकरिता शासनाने सीताफळ पिकाला राजाश्रय देणे गरजेचे असून नाशवंत फळ असल्याने ज्या भागात सीताफळाचे उत्पादन जास्त आहे, त्या भागात प्रक्रिया प्रकल्प शासनाने उभे करणे आवश्यक आहे, असे उत्पादकांचे मत आहे. सीताफळ गराला जगभरात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मागणीच्या प्रमाणात फक्त दहा टक्के सीताफळ गराचा पुरवठा होत आहे, हे वास्तव असले तरी सीताफळला पाहिजे ते मूल्य मिळत नसल्याची खंत अनेक उत्पादकांनी व्यक्त केली. सीताफळ गरापासून शेक, रबडी, सीताफळ कँडी असे चवदार पदार्थ तयार होतातच;

याशिवाय सीताफळ बीज व पाल्यापासून कीटकनाशके बनतात. अवघ्या तीन वर्षांत सीताफळ वृक्षांना फळ धारणा होते व जनावरांपासून किंवा वानरांपासून या पिकाला इतर पिकांच्या तुलनेत कमी धोका आहे, असेही तज्ज्ञांचे मत आहे.

# विसावा वृद्धाश्रमात प्रिया पाटील गोंडजवर यांचा वृद्धांसोबत वाढदिवस



**अंजनगाव सुर्जी / वार्ताहर**

जवळच्या जवळा खुर्द येथील सामाजिक कार्यकर्त्या , शिव - शाहू -फुले -आंबेडकर विचारवंत श्रीमाही फाउंडेशन सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा प्रिया पाटील गोंडचवर यांचा सामाजिक जाणीव ठेवत विसावा वृद्धाश्रम चांदूरबाजार नाका, परतवाडा येथे वृद्धांसोबत वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी वृद्धाश्रमातील रहिवाशांना मिष्टांन व भोजनदान देऊन वाढदिवसाचा आनंद वृद्धांसोबत साजरा केला. या कार्यक्रमात गोंडचवर परिवारातील तरुणांसोबत पुढील पिढीनेही सहभाग घेत वृद्धाश्रमातील आजी- आजोबांचा आशीर्वाद घेतला.

सेवाभावाचा संदेश देणारा हा उपक्रम अनेकांच्या मनाला स्पर्शून गेला. वृद्धांसोबत वाढदिवस साजरा करताना वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या डोळ्यात आनंदाश्रू तर सगळ्यांच्या मनात समाधानाची भावना होती. या कार्यक्रमाला कर्मयोगी फाउंडेशन अध्यक्ष ललित ढेपे, ग्रा.पं.सदस्य छोटू पाटील काळपांडे, उन्नती फाउंडेशन अध्यक्ष उमेश इंगळे, योगेश गोंडचवर तथा गोंडचवर परिवार, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण भगत, योगिता भगत, वैशाली मातकर, अंजू मातकर, स्नेहलता काळपांडे, संगीता मैदनकर, माला बोंद्रे, निशांत तायडे, पंजाबराव नागे, मोहन मातकर तथा गावातील समस्त महिला भगिनी व ग्रामस्थ मंडळी आवर्जून उपस्थित होती.

# नारायण गुरू क्रीडा मंडळाचे कबड्डी सामने



**दर्यापूर /वार्ताहर**

आपल्या अचूक व अप्रतिम सामने आयोजनाने संपूर्ण विदर्भभर प्रसिद्ध असलेल्या दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील नारायण गुरु क्रीडा मंडळाच्या सामने आयोजन स्थळी स्थानिक गाडगेबाबा मंडळाने रुग्णवाहिका सेवा घोषीत केली आहे . चालक व इंधनासह पुरविण्यात येत असलेल्या या सेवेची घोषणा स्वतः मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांनी आयोजन स्थळावर रुगावाहिकेच्या उपस्थितीत केली . सार्वत्रिक तथा समाजउपयोगी राष्ट्रीय कार्यात व आयोजनात सातत्याने गाडगेबाबा मंडळाची रुग्णवाहिका सेवा प्रदान केल्या जाते हे संपूर्ण तालुक्यात ज्ञात आहे . अनेक आपत्ती ग्रस्त परिस्थिती तथा सार्वत्रिक निवडणूका यामध्ये सुद्धा हि सेवा देऊन मंडळाने स्वतःला उपकृत करून घेतलेले आहे . अनेक रुग्णांचे जीव वाचविण्यात या सेवेने यश मिळविल्याने शासनाद्वारे मंडळाला उत्कृष्ट सेवा पुरस्काराने तथा प्रमाणपत्राद्वारे वेळोवेळी सम्मानित करण्यात आलेले आहे ही बाब इथे उल्लेखनिय आहे . सुप्रसिद्ध हावरे बिल्डर्स मुंबई संस्थेच्या संचालिका उज्वला सतीश हावरे यांनी नऊ वर्षांपूर्वी ही रुग्णवाहिका स्व सतीश दादासाहेब हावरे( पथ्रोट ) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व सेवार्थ मंडळाला भेट दिलेली आहे .

आपल्या निष्काम सेवेने प्रसिद्ध असलेल्या गाडगेबाबा मंडळाने रुग्णवाहिका सेवेची घोषणा केल्यानंतर कबड्डी सामन्यांचे आयोजक गणेशराव साखरे व सर्व मंडळातील लहान थोर कार्यकर्ते , देणगीदार यांनी गाडगेबाबा मंडळावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे . दर्यापूर परिसर हा कबड्डी खेळासाठी संपूर्ण देशभर भूतकाळापासून प्रसिद्ध असल्याने परिसरातील सर्व क्रीडा प्रेमींनी आयोजनतील सर्व घटनांवर व अथक प्रयत्नांवर शुभेच्छा प्रदान केल्या असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष नारायण गुरु क्रीडा मंडळाच्या सामने आयोजनावर केंद्रीत झालेले आहे . रुग्णवाहिका सेवा घोषणा प्रसंगी आयोजन समितीतील मान्यवर, कार्यकर्ते व मंडळाचे खेळाडू यांची बहुसंख्येने उपस्थिती होती .

# सरकारी निधी अभावी पोषण आहार योजनेचे 'कुपोषण'

## प्राथमिक शिक्षक समितीची निधीची मागणी

**अमरावती/ का.प्र.**

राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहार योजनेचा निधी शाळांना गेल्या चार महिन्यांपासून मिळालेला नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून निधीच मिळालेला नसल्याने पोषण आहार योजनेसाठी शाळांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून पोषण आहार उपलब्ध करावा लागत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. पुढील चार दिवसांत शाळांना चार महिन्यांचा निधी एकत्रित वितरित केला जाणार असल्याचे स्पष्टीकरण शिक्षण विभागाने दिले.

प्राथमिक शिक्षक समितीची निधीची मागणीचार दिवसात निधी वाटपाचे शिक्षण संचालक यांचे आश्वासन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, शासकीय शाळा, अनुदानित शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार योजना राबवण्यात येते. त्यात पहिली ते पाचवी विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक, १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तर पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक, २० ग्रॅम प्रथिनेयुक्त भोजन देण्यात येते. त्यासाठी शासननियुक्त पुरवठादाराकडून शाळांना तांदूळ, कडधान्ये, तेल, तिखट, मीठ, मसाला, मोहरी, जिरे अशा धान्य मालाचा पुरवठा केला जातो. ग्रामीण भागात स्वयंपाक्यांकडून आहार शिजवून घेऊन विद्यार्थ्यांना दिला जातो, शहरात केंद्रीय स्वयंपाकघरातून आहार पुरविण्यात येतो.



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, 'पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीत प्रचंड बेफिकीरी आहे. योजनेचे कोणतेही अनुदान अग्रीम स्वरूपात दिले जात नाही. तसेच, दोन दोन-तीन महिने अनुदान मिळत नाही. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यापासून गेल्या चार महिन्यांपासून इंधन, भाजीपाल्याचे अनुदान मिळालेले नाही.

त्यामुळे ग्रामीण भागात कोणताही बचत गट किंवा स्वयंपाकी या योजनेचे काम स्वीकारत नाही. शालेय पोषण आहार देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक हे शेतमजूर, कष्टकरी, गरीब कुटुंबातील असतात. हेच पालक शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी असतात.

ते शालेय पोषण आहार योजनेमध्ये खर्चाचा हातभार उचलू शकत नाहीत. त्यामुळे शिक्षकांनाच पदरमोड करून ही योजना चालवण्याची वेळ आली आहे.'

> केंद्र आणि राज्य सरकारकडून पोषण आहार योजनेसाठीचा निधी नुकताच प्राप्त झाला आहे. पुढील चार दिवसांत चार महिन्यांचा एकत्रित निधी शाळांना वितरित केला जाणार आहे.
>
> **शरद गोसावी,**
> संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय

# कृषी विकासाची नवी दिशा

**पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या पाठबळामुळे हा प्रायोगिक टप्पा यशस्वी झाला असून, यापुढे दररोज किंवा आठवड्यातून एकदा असे रेल्वे मार्गाचे नियोजन करण्यात येणार आहे. या पॅटर्नचा उद्देश सांगलीचा जीडीपी आणि प्रति व्यक्ती उत्पन्न वर्षाला लाखाने वाढवणे हा आहे.**



पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या पाठबळामुळे हा प्रायोगिक टप्पा यशस्वी झाला असून, यापुढे दररोज किंवा आठवड्यातून एकदा असे रेल्वे मार्गाचे नियोजन करण्यात येणार आहे. या पॅटर्नचा उद्देश सांगलीचा जीडीपी आणि प्रति व्यक्ती उत्पन्न वर्षाला लाखाने वाढवणे हा आहे. सांगली पॅटर्न हे शेतकऱ्यांच्या मालाला थेट बाजारपेठ जोडण्यावर आधारित आहे. जिल्ह्यातील कृषी विभाग, रेल्वे आणि शेतकरी संघटनांच्या एकत्रित प्रयत्नाने हे शक्य झाले. जिल्हाधिकारी काकडे यांनी कृषी विभागाचे अधीक्षक विवेक कुंभार आणि इतर अधिकाऱ्यांच्या मेहनतीने हा उपक्रम साकारला. प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या योजनेतून शेतकऱ्यांना मिरज रेल्वे स्टेशनवरून दिल्लीपर्यंत माल पाठवता आला, ज्यामुळे वाहतुकीचा खर्च ४० टक्क्यांनी कमी झाला. सांगली जिल्ह्यातील राष्ट्रीय कृषी विकास योजना (आरकेव्हीवाय) अंतर्गत ठिबक सिंचन, ड्रोन फवारणी आणि नॅनो युरिया सारख्या तंत्रज्ञानांचा वापर आधीच सुरू आहे, ज्यामुळे उत्पादनात १५-२० टक्के वाढ झाली आहे. या पॅटर्नमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वर्षाला ५० हजारांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे जिल्ह्याचा जीडीपी १० टक्क्यांनी उंचावेल. या यशामागे कृष्णा नदी बेसिनची भूमिका महत्त्वाची आहे. सांगली हा कृष्णा नदीच्या टापूवर वसलेला असल्याने, नदीचे पाणी सिंचनासाठी उपयुक्त ठरते. कोयना धरण आणि वारणा नदी यांचा सहभाग असल्याने, जिल्ह्यातील ७५ टक्के शेती सिंचित आहे. जर कोल्हापूर आणि सातारा येथे हे पॅटर्न अवलंबले, तर दक्षिण महाराष्ट्रातील एकात्मिक विकास शक्य होईल.

कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांत पॅटर्नची संभाव्यता

कोल्हापूर आणि सातारा हे दोन्ही जिल्हे सांगलीसारखेच कृष्णा-कोयना-पंचगंगा बेसिनमध्ये येतात. कोल्हापूर मध्ये पंचगंगा नदीचे पाणी ऊस, भाजीपाला आणि दूध उत्पादनासाठी वापरले जाते, तर सातारामध्ये कोयना धरणामुळे फळबागायती शेती प्रगतिपथावर आहे. या जिल्ह्यांत सांगली पॅटर्न राबवण्याची पूर्ण क्षमता आहे, कारण इथे आधीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना यांसारख्या केंद्र-राज्य योजनांखाली विहिरी, शेततळे आणि यांत्रिकीकरणाला चालना मिळत आहे. कोल्हापूर जिल्हा कोल्हापूरमध्ये १२ लाख हेक्टर शेतीक्षेत्र आहे, ज्यात ६० टक्के सिंचित आहे. पंचगंगा नदी बेसिनमुळे इथे भाजीपाला आणि फळ उत्पादन भरपूर होते, पण बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात. सांगली पॅटर्नप्रमाणे रेल्वे वॅगन जोडले, तर कोल्हापूरच्या मिरज मार्गाने दिल्ली, मुंबई किंवा बेंगलोरला माल पाठवता येईल. जिल्हा परिषद कोल्हापूरमार्फत राबवल्या जाणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण योजनेत ट्रॅक्टर, ड्रोन आणि प्लास्टिक मल्चिंगसाठी ५० टक्के अनुदान मिळते, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होईल. कोल्हापूरमधील हातकणंगले तालुक्यातील शेतकऱ्यांना विशेष वॅगनमुळे टोमॅटो आणि काकडीसाठी दिल्ली बाजारात ३०-४० रुपये प्रति किलो दर मिळू शकतो, ज्यामुळे सध्याच्या १५-२० रुपयांच्या तुलनेत उत्पन्न दुप्पट होईल. जिल्ह्यातील २ लाख शेतकऱ्यांना फायदा होईल आणि जीडीपीमध्ये ८-१० टक्के वाढ होईल. मात्र, पावसाळ्यात पूरप्रवण क्षेत्र असल्याने जलसंधारण योजना (आरकेव्हीवाय अंतर्गत) सोबत जोडावी लागेल.

सातारा जिल्हा : सातारा हा कोयना धरणाचा जिल्हा असून, ११ लाख हेक्टर शेतीमध्ये फळे, ऊस आणि द्राक्षाची लागवड प्राबल्य आहे. जिल्हा परिषद सातारामार्फत बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना आणि परंपरागत कृषी विकास योजना (सेंद्रिय शेतीसाठी ६ लाखांपर्यंत अनुदान) राबवल्या जात आहे. सांगली पॅटर्न इथे लागू केले, तर कराड-महाबळेश्वर मार्गावरील शेतकऱ्यांना रेल्वेने मुंबई किंवा दिल्लीला द्राक्ष आणि स्ट्रॉबेरी पाठवता येतील. सध्या शेतकऱ्यांचे ४० टक्के उत्पन्न मध्यस्थांमुळे कमी होते; या पॅटर्नमुळे ते थेट विक्रीने वाढेल. सातारामध्ये शासन आपल्या दारी योजनेतून ७५,००० शेतकऱ्यांना लाभ मिळतो, ज्यामुळे रेल्वे उपक्रमाची अंमलबजावणी सोपी होईल. प्रति व्यक्ती उत्पन्न सध्या १.५ लाख असून, वर्षाला लाखांची वाढ शक्य आहे.

नदी बेसिनचा एकात्मिक विकास : कृष्णा-कोयना-पंचगंगेची भूमिका

दक्षिण महाराष्ट्रातील कृष्णा नदी बेसिन (क्षेत्रफळ २.६ लाख चौरस किमी) हे तीन नद्यांच्या (कृष्णा, कोयना, पंचगंगा) संगमावर आधारित आहे, ज्यामुळे ७६ टक्के क्षेत्र कृषी प्रधान आहे. कोयना धरण (१०५ टीएमसी क्षमता) आणि पंचगंगा नदीमुळे सिंचनाची सोय आहे, पण जलविवाद आणि पूर यामुळे आव्हाने आहेत. सांगली पॅटर्न तीनही जिल्ह्यांत राबवले, तर बेसिन-आधारित विकास शक्य होईल: एकीकृत सिंचन नेटवर्क (प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अंतर्गत), सामूहिक शेततळे आणि रेल्वे-लॉजिस्टिक्स जोड. यामुळे ५ लाख हेक्टर क्षेत्रात उत्पादन २० टक्क्यांनी वाढेल आणि दूध, भाजीपाला निर्यात वाढेल. अभ्यासानुसार, नदी बेसिनमध्ये खनिजसंपदा आणि औद्योगिक संभाव्यता (जसे साखर कारखाने) असल्याने कृषी-उद्योगांची जोड शक्य आहे. कृष्णा जल विवाद अधिकरणाच्या शिफारशींनुसार (२०१६), महाराष्ट्राला ६५ टक्के पाणी हिस्सा मिळतो, ज्याचा वापर त्या दक्षिण भागात वाढवावा. यातच गरजेनुसार सेंद्रिय शेती आणि ड्रोन तंत्रज्ञान (परंपरागत कृषी विकास योजना) जोडले, तर पर्यावरणस्नेही विकास होईल. आव्हाने आणि उपाय सांगली पॅटर्नची विस्तारात अडथळे आहेत: रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चरची कमतरता, मालाची टिकाऊपणा आणि जलविवाद. कोल्हापूरमध्ये पूर, सातारामध्ये डोंगराळ भाग हे आव्हाने आहेत. उपाय म्हणून : १) एकत्रित जिल्हा कृषी समिती स्थापन करणे, २) आरकेव्हीवाय अंतर्गत १०० कोटी निधी वाटप, ३) शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ) विकसित करणे शक्य आहे. शासनाने 'शासन आपल्या दारी' योजनेप्रमाणे शिबिरे घेऊन जागृती करावी.

दक्षिण महाराष्ट्राची नवी ओळख

सांगली पॅटर्न कोल्हापूर-सातारा जिल्ह्यांत राबवले, तर दक्षिण महाराष्ट्र हा कृषी हब बनेल. कृष्णा-कोयना-पंचगंगेच्या टापूवर १० लाख शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, जीडीपी १५ टक्क्यांनी उंचावेल आणि प्रति व्यक्ती उत्पन्न लक्ष्य साध्य होईल. हे केवळ शेती नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा क्रांतिकारक टप्पा असेल. जिल्हाधिकारी काकडे आणि पालकमंत्री पाटील यांसारख्या नेत्यांच्या धडपडीने हा स्वप्नासारखा विकास प्रत्यक्षात येईल, ज्यामुळे दक्षिण महाराष्ट्र 'उत्पन्न वाढवणाऱ्या विकासाचे' उदाहरण बनेल.

# अजब रिफंड




लहान मुलांच्या हातात मोबाईल दिला की, त्याचे काय काय परिणाम होतात हे आपण कायम अनुभवत असतो. मुलांनी कोणाला तरी फोन लावणे, चित्र-विचित्र शब्दांतले मेसेज ग्रुपमध्ये सेंड होणे असो किंवा एखाद्या ई-मेलला रिप्लाय जाणे असो, हे अनेक पालकांचे कायमचे अनुभव असतात. काही पालकांची थोडी मोठी मुले तर परस्पर वस्तू, खेळणी यांची खरेदी आणि गेम्समध्ये शस्त्रे विकत घेणे, पुढच्या लेव्हलसाठी स्टार खरेदी करणे यासाठी त्यांच्या खात्यातून परस्पर पैसे पाठवत असल्याचे उद्योग करतात हे कटू अनुभवदेखील आपण ऐकत असतो, पण चीनच्या एका मातेला आलेला अनुभव सध्या प्रचंड चर्चेत आहे.

चीनमध्ये राहणाऱ्या ली यून नावाच्या एका ११ वर्षांच्या मुलीने तिच्या आईच्या मोबाईलवर आईच्या नकळत एका जुन्या वस्तूंची विक्री करणाऱ्या ॲपवरून ५०० युआन म्हणजे साधारण ४७०० रुपयांची खेळणी ऑनलाईन विकत घेतली. नशिबाने काही वेळातच ही गोष्ट तिच्या आईच्या लक्षात आली आणि तिने ताबडतोब ती ऑर्डर रद्द करून पैसे परत करण्याची मागणी केली. सर्वसाधारणपणे अशा वेळी विक्रेता ऑर्डर रद्द करण्याचे कारण जाणून घेतो आणि पैसे परत करतो. मात्र या विक्रेत्याने ली यूनच्या आईकडे चक्क माफीनामा आणि एका विचित्र व्हिडीओची मागणी केली.

विक्रेत्याने ली यूनच्या आईला ती ली यूनला रागावत आहे आणि तिला एक थप्पड मारत आहे असा व्हिडीओ चित्रित करून पाठवण्यास सांगितला. या व्हिडीओच्या जोडीला १००० शब्दांचा एक माफीनामादेखील लिहून पाठवण्याचा आग्रह त्याने धरला. चिडलेल्या ली यूनच्या आईने त्या ॲपच्या ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क साधला. मात्र आम्ही यात काही मदत करू शकत नसल्याने त्यांनी सांगितले.

सध्या या विक्रेत्याने केलेली मागणी ही योग्य का अयोग्य आणि अशा प्रकारे एखाद्या मुलाला शिस्त लावायची विक्रेत्याची पद्धत योग्य का अयोग्य यावर मोठी खुमासदार चर्चा रंगलेली आहे.

# अपघातांची घंटा



१५ सप्टेंबर १९९० रोजी कोकण रेल्वे मार्गाच्या कामाची पायाभरणी रोहा येथे करण्यात आली. प्रत्यक्षात २६ जानेवारी १९९८ रोजी कोकण रेल्वेसेवा सुरू झाली. या सेवेला आता २७ वर्षे पूर्ण झाली; परंतु कोकण रेल्वे महामार्गाचा विचार करता अजूनही कोकण रेल्वे महामार्गावरील स्थानकातील काही फलाटांची उंची वाढवण्यात आलेली नाही. ही अपघाताची धोक्याची घंटा आहे. तेव्हा रेल्वे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून प्रत्येक रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची रेल्वे गाडीच्या दरवाजाइतकी समान असावी. म्हणजे गाडीत चढता-उतरताना प्रवाशांना त्रास होणार नाही. तेव्हा रेल्वे प्रशासनाला जागरूक करून प्रवाशांचा प्रवास सुखद होण्यासाठी केलेला एक प्रयत्न.

एका बाजूला अरबी समुद्र, दुसऱ्या बाजूला पश्चिम घाट, नद्या-नाले, डोंगर-दऱ्या आणि घनदाट जंगल त्यामुळे अशक्य वाटणारे शक्य झाल्याने कोकणातील चाकरमानी आपल्या गावी सकाळी जाऊन रात्री मुंबईला परत येऊ शकतो. हे फक्त आणि फक्त कोकण रेल्वे महामार्गावर धावणाऱ्या रेल्वे गाड्यांमुळे शक्य झाले आहे. तेव्हा असे जरी असले तरी रेल्वे गाड्यांचा दरवाजा व रेल्वे फलाटांची उंची समान असणे आवश्यक आहे. भविष्यात दुहेरी वाहतूक होणार हे मात्र नक्की असले तरी कोकण रेल्वे महामार्गावरील रेल्वे स्थानकांचा विचार केल्यास ठरावीक स्थानके सोडली तर अजूनही काही ठिकाणी फलाटांची उंची वाढविण्यात आलेली नाही. ती अजूनही रेल्वे रूळाइतकीच आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. तेव्हा दुहेरी वाहतूक होण्याला काही काळ असला तरी प्रत्येक रेल्वे स्थानकामध्ये रेल्वे थांबते. याला जलद गाड्या अपवाद आहेत. त्या ठरावीक रेल्वे स्थानकात थांबतात. तेव्हा प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची रेल्वे दरवाजाइतकी वाढविणे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कोकणात रेल्वेसेवा सुरू होऊन आता जवळजवळ २७ वर्षे झाली; परंतु अजूनही काही रेल्वे स्थानकावर फलाट तयार करण्यात आलेले नाही. वास्तविक रेल्वे स्थानक म्हटले की रेल्वे स्थानकावर गाडीच्या लांबीचे फलाट बांधणे आवश्यक आहे. ते सुद्धा रेल्वे दरवाजाच्या उंची बरोबर असले पाहिजेत. कारण ही रेल्वे स्थानकाची मूलभूत गरज आहे. रेल्वे ही प्रवाशांच्या सेवेसाठी असते तेव्हा प्रवाशांना उत्तम प्रकारे सेवा मिळालीच पाहिजे. त्यासाठी रेल्वे फलाटांची उंची रेल्वे दरवाजाच्या उंचीइतकी असायला हवी. म्हणजे गाडीमध्ये प्रवाशांना चढता किंवा उतरतांना त्रास होत नाही; परंतु फलाटाची उंची गाडीच्या दरवाजाइतकी नसल्याने वृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती, लहान मुले आणि गरोदर महिला यांना गाडीत चढणे किंवा उतरणे शक्य होत नाही. तसेच आजारी व्यक्ती व जड सामान नेणे अवघड असते. अशा अनेक कारणासाठी रेल्वे दरवाजा इतकी उंची रेल्वे फलाटाची असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे गर्दीच्या वेळी खाली उतरताना धक्काबुक्की झाल्यास प्रवाशांना इजा होण्याची शक्यता असते. म्हणजे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून प्रवास करणे व फलाट नसणाऱ्या रेल्वे स्थानकात उतरणे धोकादायक आहे. तरी कोकणी माणसात आपापसात हेवेदावे जरी असले तरी प्रवासात एकमेकांना समजून घेतात. रेल्वेत शिरले काय समोरच्या व्यक्तीला आपुलकीने विचारणार काय हो, खय उतरणार? त्याचा स्टेशन समजला काय त्यांचे गजाली सुरू होतले. अगदी रेल्वे गाडीतून उतरापर्यंत. असो..! मनमिळावू कोकणी माणूस आसा.

तेव्हा कोकणात रेल्वे सुरू झाल्याने लालपरीपेक्षा कमी तिकीट व आरामदायी प्रवास असल्याने कोकणी माणूस सर्रास रेल्वेने प्रवास करणे जास्त पसंत करतात. त्यामुळे लालपरीकडे कोकणी माणूस पाट फिरवू लागला आहे. मात्र लालपरी चालली पाहिजे म्हणून काही चाकरमानी लालपरीने आपल्या गावी येणे-जाणे करणे पसंत करतात. उन्हाळी सुट्टी, गणेश चतुर्थी व नाताळ या मोसमात तर रेल्वे गाडीने जाऊच नये असे वाटते. कारण तिकीट जरी आरक्षित केलेले असले तरी गाडीत चढणे कठीण असते. मागील उन्हाळ्यात जाताना माझा एक मित्र सांगत होता की, मी स्लीपरचे तिकीट काढले होते. दादरला कोकण रेल्वेत कसाबसा चढलो. मात्र माझ्या जागेपर्यंत जाण्यासाठी रत्नागिरी उजाडली. म्हणजे प्रवाशांचे गर्दीच्या वेळी किती हाल होतात याची कल्पना येते. तो सुद्धा रात्रीचा प्रवास हे विसरून चालणार नाही. मग गर्दीच्या वेळी फलाट नसलेल्या स्थानकात कशाप्रकारे प्रवाशांचे हाल होत असतील याचे वर्णन न केलेले बरे. तेव्हा अशा विविध घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अर्थात रेल्वे मंत्रालयाने रेल्वे प्रवाशांचे हित लक्षात घेऊन ज्या रेल्वे स्थानकात फलाट नाहीत ते प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व रेल्वे प्रशासनाच्या हितासाठी तातडीने बांधून घेणे गरजेचे आहे. तेव्हा कोकण रेल्वे महामार्गावर ज्या रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची वाढवावी अशी स्थानिक नागरिकांची किंवा रेल्वे प्रवाशांची मागणी असेल त्या रेल्वे स्थानकातील फलाटांची उंची त्वरित वाढविण्यात यावी. त्यासाठी संबंधित रेल्वे स्थानकातील फलाटांचे प्रस्ताव तयार करून रेल्वे मंत्रालयाकडे सादर करणे गरजेचे आहे.

**रवींद्र तांबे**

# फाशी की इंजेक्शन?



अलीकडे सर्वोच्च न्यायालयात मृत्युदंडाची अंमलबजावणी कशा प्रकारे केली जाते, या विषयावर मोठी चर्चा रंगली. याचे कारण यासंदर्भात दाखल करण्यात आलेली एक जनहित याचिका.

एका याचिकेत असा मुद्दा मांडण्यात आला आहे की, मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्या गुन्हेगारांना फाशी देण्याऐवजी लिथल इंजेक्शन दिले जावे, जेणेकरून मृत्यूच्या वेळी त्यांच्या वेदना कमी होतील. वकील ऋषी मल्होत्रा यांनी २०१७ मध्ये यासंदर्भात याचिका दाखल केली होती. त्यांचे म्हणणे आहे की, फाशीच्या प्रक्रियेत मृत्यू होण्यासाठी ३० ते ४० मिनिटे लागत असून ते अत्यंत वेदनादायी असतात. त्याऐवजी इंजेक्शन दिल्यास मृत्यू तात्काळ होतो आणि यातनाही कमी होतात. अमेरिकेतील ४९ राज्यांनी ही पद्धत स्वीकारल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. सरकारच्या वतीने वकील सोनिया माथुर यांनी याबाबतचा युक्तिवाद करताना असे म्हटले आहे की, मृत्युदंडाची पद्धत बदलणे हे न्यायालयाचे नव्हे, तर सरकारचे धोरणात्मक अधिकार क्षेत्र आहे. सरकारच्या मते, इंजेक्शनचा पर्याय व्यवहार्य नाही. तथापि, या भूमिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करत सरकार या संवेदनशील विषयावर बदलासाठी तयार नसल्याबाबत ताशेरेही ओढले आहेत. न्यायालयीन चर्चेच्या पलीकडे, हा प्रश्न आता केवळ कायदेशीर न राहता नैतिक आणि मानवी संवेदनशीलतेचा झाला आहे. एका लोकशाही राष्ट्राने आपल्या नागरिकाला जीवनदान देण्याऐवजी मृत्युदंडाचा निर्णय घेण्याचा अधिकार किती योग्य आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

भारतीय दंडसंहितेनुसार हत्या, बलात्कारासह हत्या, दहशतवादी कारवाया यांसारख्या अत्यंत गंभीर आणि दुर्मिळातील दुर्मिळ गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. १९८० मध्ये बच्छनसिंग विरुद्ध पंजाब राज्य या ऐतिहासिक खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की मृत्युदंड हा दुर्मिळातील दुर्मिळ आणि भयंकर गुन्ह्यांमध्येच दिला जावा. पण दुर्मिळातील दुर्मिळ म्हणजे नेमके काय, याचे एकसंध मोजमाप किंवा ठोस निकष आजपर्यंत ठरवण्यात आला नाही. त्यामुळे अनेकदा एका न्यायालयात गंभीर गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाते, तर दुसर्या न्यायालयात त्याच गुन्ह्यासाठी आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली जाते.

ॲमनेस्टी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार २०२४ मध्ये भारतातील कनिष्ठ न्यायालयांनी एकूण १३९ जणांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली असून ती मागील वर्षाच्या तुलनेत १४ टक्क्यांनी अधिक आहे. पण यातील बहुसंख्य आरोपी गरीब, सामाजिकदृष्ट्या मागास किंवा अल्पसंख्याक समुदायातील आहेत. नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, दिल्लीच्या प्रोजेक्ट ३९अ या अहवालानुसार मृत्युदंड ठोठावलेल्यांपैकी सुमारे ७४ टक्के कैदी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत, तर ७६ टक्के आरोपींकडे उच्च शिक्षण नाही.

सर्वांत धक्कादायक म्हणजे मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्यांपैकी ९० टक्क्यांहून अधिक कैदी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा अल्पसंख्याक घटकांतील आहेत. या असमानतेमुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो, असे काहींचे म्हणणे आहे. यामागचे कारण, कायदा सर्वांसाठी समान असावा अशी संविधानाची अपेक्षा आहे, पण वास्तवात सामाजिक आणि आर्थिक दर्जानुसार न्यायाचा तराजू हलताना दिसतो अशी टीका केली जाते.

भारतामध्ये मृत्युदंड ठोठावलेल्या अनेक कैद्यांना फाशीच्या शिक्षेची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. काही कैदी दहा-दहा वर्षे एकांत कोठडीत राहतात. ही केवळ शिक्षा नाही, तर मानसिक छळ आहे असे मानवाधिकारवाद्यांचे म्हणणे आहे. आजघडीला देशातील ५६ टक्क्यांहून अधिक कैदी पाच वर्षांहून अधिक काळ फाशीच्या प्रतीक्षेत आहेत. या काळात त्यांचे मनोबल खचते, कुटुंब उद्ध्वस्त होते आणि कायदा त्यांच्यावर मरण्यापूर्वीच मरण्याची वेळ आणतो. सर्वोच्च न्यायालयाने अशा विलंबाबद्दल अनेक वेळा सरकारकडे नाराजी व्यक्त केली आहे. सद्यस्थितीत जगातील १४४ देशांनी मृत्युदंडाची शिक्षा पूर्णपणे रद्द केली आहे.

केवळ ५५ देशांमध्ये तो अद्याप अस्तित्वात असून यापैकी बहुतांश देश आशिया आणि मध्यपूर्वेतील आहेत. चीन, इराण, सौदी अरेबिया, इजिप्त आणि अमेरिका हे देश अजूनही मृत्युदंड देतात. भारतात मृत्युदंडाची शिक्षा अस्तित्वात असली तरी त्याचा वापर अत्यंत मर्यादित आहे. शेवटची चर्चितफाशी २०२० मध्ये निर्भया बलात्कार प्रकरणातील दोषींना देण्यात आली होती. पण भारतात मृत्युदंड हा प्रत्यक्ष न्यायापेक्षा प्रतिकात्मक अधिक झाला असून कायदे किती कठोर आहेत हे दाखवण्यासाठी ही शिक्षा दिली जाते, अशी टीका होते. वास्तविक, कोणत्याही कायद्यामागचा हेतूच मुळात तो असतो. कठोर शिक्षा दिल्यास समाजात भय निर्माण होते आणि गुन्हे कमी होतात. पण भारतात याबाबत उलट चित्र दिसते. मृत्युदंडाच्या शिक्षा ठोठावण्यात येऊनही हत्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यांत घट झाली नाही. हाच धागा पकडून फाशी किंवा मृत्युदंड हा गुन्ह्यांना आळा घालण्यास प्रभावी नाही अशी मांडणी केली जाते. पण या शिक्षेचा प्रभाव समाजावर न पडण्याचे कारण म्हणजे आपल्याकडे शिक्षा ठोठावल्यानंतर तात्काळ त्याची अंमलबजावणी केली जात नाही. त्यामुळे बलात्कार, दहशतवादी हल्ला यांसारखे विषय जेव्हा ज्वलंत ठरलेले असतात तेव्हा लोकांचा कायद्यांकडून भ्रमनिरास होतो.

काही प्रकरणात तर फाशीची शिक्षा सुनावण्यात येऊनही अनेक वर्षांनंतर दयेचा अर्ज मंजूर करून आरोपींना सोडण्यात येते किंवा त्यांची शिक्षा जन्मठेपेत बदलण्यात येते. अशा घटनांमुळे फाशीच्या शिक्षेचे गांभीर्य कमी होत गेले आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही अनेक वेळा जगभर मृत्युदंडाला स्थगिती देण्याची शिफारस केली आहे. न्याय हा केवळ प्रतिशोधासाठी नसावा. न्यायाचे उद्दिष्ट समाजात सुधारणा आणि पुनर्निर्मिती असावे. मृत्युदंड दिल्यास गुन्हेगाराला सुधारणेची कोणतीही संधी दिली जात नाही, असे मत यासंदर्भात मांडले जाते.

केंद्र सरकारने अलीकडे न्यायव्यवस्थेत काही सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार दया याचिकेवर निर्णय घेण्यासाठी १८ महिन्यांची मर्यादा ठेवली आहे, जेणेकरून कैदी अनिश्चित काळ प्रतीक्षेत राहू नयेत. हा एक सकारात्मक बदल आहे. पण आता सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार येत्या काळात फाशीच्या शिक्षेबाबत सरकार बदलांची भूमिका घेणार का हे पहावे लागेल. जगातील बहुसंख्य लोकशाही राष्ट्रांनी मृत्युदंड रद्द केला असून तेथे गुन्हेगारीत वाढ झालेली नाही. उलट, शिक्षण, पुनर्वसन आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांमुळे गुन्हे कमी झाले आहेत. त्यामुळे मृत्युदंड रद्द करणे म्हणजे गुन्ह्यांना प्रोत्साहन देणे नाही; तर मानवी मूल्यांची प्रतिष्ठा जपणे आहे, असे फाशीची शिक्षा नको असे म्हणणार्या वर्गाचे म्हणणे आहे.

यासंदर्भातील दोन मतप्रवाहांचा विचार पाहता, फाशीची शिक्षा असावी की नसावी याबाबत एकदाच व्यापक मंथन होण्याची गरज आहे हे निश्चित. पण लिथल इंजेक्शनचा जो पर्याय सध्या पुढे आला आहे तोही वेदनादायी नाहीये असे मानण्याचे कारण नाही. वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर या प्रक्रियेमध्ये सदर व्यक्ती पूर्णपणे बेशुद्ध झाली नाही तर तिला प्रचंड वेदना होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये असे दिसूनही आले आहे. तसेच लिथल इंजेक्शन हे वेदनारहित नसतेच.

ज्या अमेरिकेत याचा वापर केला जातो तेथील संविधानानुसारही कैद्याला वेदनारहित मृत्यूची हमी दिलेली नाही. त्यामुळे भारत सरकारचे म्हणणे आहे की फाशीच्या पर्यायाचा विचार करता येईल, पण सध्या लिथल इंजेक्शनसारख्या तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या आणि महागड्या प्रक्रियेचा अवलंब करणे व्यवहार्य नाही. म्हणूनच, भारतात सध्या फाशी हीच मृत्युदंडाची एकमेव कायदेशीर पद्धत कायम ठेवण्यात आली आहे.

**ॲड. प्रदीप उमाप**

# कृषी उत्पन्न बाजार समितीत ग्रेन मर्चंट असो.ची दीपावली मुहूर्त खरेदी प्रारंभ

■ प्रतिनिधी | अकोला ■

**दि ग्रेन मर्चंट असो.च्या वतीने स्थानीय कृषी उत्पन्न बाजार समितीत दीपावली मुहूर्त खरेदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रारंभ करण्यात आली. यावेळी गोरेगाव येथील रामचंद्र शेगोकार या कास्तकाराचा मुंग प्रसाद ट्रेडर्स या अडतच्या माध्यमातून ७१११ रुपये भाव देऊन वल्लभ ट्रेडर्सने खरेदी केला तर सोयाबीनची लिलावादारे विक्री करण्यात येऊन अकोला येथील कास्तकार संतोष गवई यांचे सोयाबीन रोशन ट्रेडिंग कंपनी च्या अडत मार्फत दयाल एनर्जी प्रा.ली यांनी ५१११ रुपये देऊन खरेदी केले.**



बाजारच्या मुहूर्ताचा हा कार्यक्रम ७३ वर्षापासून सेवारत असणाऱ्या ग्रेन मर्चंट असो.करीत असून सुमारे पन्नास वर्षापासून दीपावली स्नेह मिलन खरेदीची परंपरा बाजार समितीमध्ये सातत्याने सुरू आहे. याच परंपरेनुसार कार्यक्रमाच्या प्रारंभी मुग व सोयाबीन मालधनी कास्तकारांचा दुपट्टा,टोपी व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी ७५ वर्षीय हृदयात पेसमेकर बसविलेले व कडक उन्हात कास्तकारांना योग्य भाव देऊन त्यांचा शेतमाल खरेदी करणारे व्यापारी गोवर्धन डोडिया यांचा शाल श्रीफळ देऊन असो.चे ओमप्रकाश गोयनका, अशोक गुप्ता, संदीप चौखंडे ,राजीव शर्मा यांनी भावपूर्ण सत्कार केला. या स्वागत सोहळ्यात बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, उपसभापती ज्ञानेश्वर महल्ले, बाजार समितीचे माजी संचालक अशोक गुप्ता, प्रकाश लहाने,असो.चे अध्यक्ष पंकज बियाणी, विद्यमान संचालक राजीव शर्मा, माजी अध्यक्ष ओमप्रकाश गोयनका, वसंत बाछुका, शंकरलाल बियाणी आदी उपस्थित होते. यावेळी आतिषबाजी व पेढे वाटप करून ही मूहुर्त खरेदी संपन्न झाली.दरम्यान बाजार समिती सभागृहात सर्व प्रमुख व्यापाऱ्यां ची बाजार समिती चे दैनंदिन कामकाज यावर चर्चा करण्यात आली. यामध्ये मागील पन्नास वर्षापासून कार्यरत असलेले गंगासहाय कंपनीचे श्रीकिसन अग्रवाल यांनी बाजार समितीच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून निर्माणाधिन शेड व कोल्ड स्टोरेजचे निर्माण कार्य त्वरित करण्याचे आवाहन केले. तसेच अशोक गुप्ता यांनी बाजार समितीमध्ये विक्री करण्याच्या पद्धतीवर संबोधन करून सर्वांना दीपावली शुभेच्छा दिल्यात.वसंत बाछुका यांनी विद्यमान सरकारच्या शेतकऱ्याबद्दल विविध मदतीबद्दल संबोधन केले.

# इन्स्टाग्रामवर आक्षेपार्ह कमेंट करणाऱ्या इसमास अटक

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरात सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारी आक्षेपार्ह कमेंट केल्याप्रकरणी एका इसमाला पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अकोट शहर पोलिस ठाण्याच्या गोपनीय विभागात कार्यरत पोलीस कॉन्स्टेबल विजय राजनकर यांना माहिती मिळाली की फिरोज खान याकुब खान (वय ३७, रा. गुलशन नगर, शाईन कॉलनी, अकोट) या व्यक्तीने इंस्टाग्रामवरून श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्हिडिओवर आक्षेपार्ह आणि धार्मिक भावना दुखावणारी कमेंट केली आहे.

**वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा**

अकोट शहर पोलिसांनी नागरिकांना इशारा दिला आहे की, सोशल मीडियावर धार्मिक, जातीय किंवा सामाजिक भावना दुखावतील अशा पोस्ट किंवा कमेंट करू नयेत. अशा प्रकारच्या वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

याबाबत पो. कॉ. विजय राजनकर यांनी पोलिस ठाण्यात लेखी फिर्याद दिल्यानंतर, अ.क्र. ३७१/२५, कलम १९६(१), २९९, २९६ भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी फिरोज खान यास पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेऊन अटक केली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, व पोलीस उपअधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल माळवे, पो. उपनिरीक्षक वैभव तायडे, पो. उपनिरीक्षक धनंजय गावंडे, पो. हे. कॉ. गणेश सोळंके, ना. पो. कॉ. विपुल सोळंके, पो. कॉ. गोपाल तायडे व पो. कॉ. अश्विन चव्हाण यांच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास उपनिरीक्षक धनंजय गावंडे हे करीत आहेत.

# गोमांस वाहतूक करणाऱ्यावर अकोट ग्रामीण पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट ग्रामीण पोलिसांनी गोमांस वाहतूक करणाऱ्या इसमावर कारवाई केली आहे. शुक्रवारी पोलिसांचा पथक नियमित गस्त घालत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक इसम मोटारसायकलवर गोमांस बांधून विक्रीसाठी घेऊन जात आहे.

या माहितीच्या आधारे पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोहाळा-आंबोडा रोडवरील कृष्णाई गौरक्षण संस्थेजवळ नाकाबंदी करण्यात आली. या दरम्यान शेख अदनान शेख अन्सार (वय १९, रा. अकोलखेड) हा संशयित ७० किलो गोमांस (किंमत सुमारे १४ हजार रुपये) व मोटारसायकल (किंमत सुमारे ३० हजार रुपये) असा एकूण ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन जाताना आढळून आला.

प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे प्रभारी ठाणेदार अमोल माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हे.कॉ. विठ्ठल चव्हाण, पोकॉ. गोपाल जाधव आणि नितीन तेलगोटे यांनी केली.

# दोन तरुणांनी जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी मिळवली पात्रता

■ प्रतिनिधी | अकोला ■



मुरुमकार परिवारातील दोन होतकरू तरुणांनी आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याच्या जोरावर संपूर्ण परिवाराचा अभिमान उंचावला आहे. बुद्धिबळ आणि जिमनॅस्टिक या दोन भिन्न क्षेत्रांमध्ये त्यांनी आपले प्राविण्य सिद्ध करून जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी पात्रता मिळवली आहे. याबद्दल त्यांचा मुरुमकार परीवाराच्या दिवाळी स्नेहमिलन सोहळ्यात हभप श्रीकृष्ण महाराज मुरुमकार, व डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत्त उपकुलसचिव शांताराम मुरुमकार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह तसेच पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना त्यांनी दोघांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

शिवर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य व उत्कृष्ट क्रिकेटपटू श्री देवानंद प्रल्हादराव मुरुमकार यांचे चिरंजीव अर्जुन देवानंद मुरुमकार यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असून, आता ते जिल्हास्तरावर अकोल्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

तर उत्कृष्ट क्रिकेटपटू रमेश श्रीरामजी मुरुमकार यांचे चिरंजीव करण रमेश मुरुमकार यांनी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे आयोजित तालुकास्तरीय जिमनॅस्टिक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला आहे.

# आगर सर्कल मधील पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगर गाव व आगर सर्कल मधील ६४ खेडी पाणीपुरवठा योजनेमधून आगर व सर्कल मधील गावांना पाणीपुरवठा होत असते. मात्र अनेक दिवसांपासून या परिसरात अनियमित पाणी पुरवठा होत आहे.यामुळे पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे. प्रस्तुत पाणीपुरवठा २५ दिवसात होत असून पाणी आल्यावरही दोन दोन तास पाणी नळांना येत नाही. पाण्याची समस्या भेडसावीत असून ६४ खेडी पाणीपुरवठा योजना सुरळीत करून पाणी देण्याची मागणी आगर मधील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.

# आडसुळ येथे अनोळखी इसमाची हत्या! पोलीस घटनास्थळी दाखल!

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

अकोला जिल्ह्यातील तेल्हारा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम आरसुळ नजीक एका अनोळखी इसमाचा जळालेल्या अवस्थेत आढळला आहे.

ग्राम आरसुळ येथील विश्रामगृहा जवळ एका अनोळखी इसमाचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह असल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली.सदर मृतदेहाचा चेहरा पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत असल्याने मृतदेहाची ओळख पटली नसून तेल्हारा पोलीस स्टेशन चे ठाणेदार प्रकाश



तुनकुलवार हे आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले असून नेमकी ही हत्या की अजून काही याचा तपास करीत आहेत.

# भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारा ग्राम गोरेगाव येथील गोवर्धन पूजा उत्सव

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

निष्काम कर्मयोगी महान संत गाडगेबाबा यांनी सुमारे ९० वर्षांपूर्वी संत श्री पुंडलिक महाराज यांच्या जन्मभूमी असलेल्या मुर्तिजापूर तालुक्यातील ग्राम गोरेगाव येथे सुरू केलेल्या गोवर्धन पूजा उत्सवाची परंपरा आजही तेवढ्याच उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरी केली जाते.

तालुक्यातील काटेपूर्णा नदी तीरावर वसलेले ग्राम गोरेगाव हे संत पुंडलिक महाराजांचे जन्मस्थान असल्यामुळे या गावाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. गावातील एकोपा, सामूहिकता आणि परंपरा जपण्याची ही परंपरा आजही गावकऱ्यांच्या एकजुटीचे प्रतीक आहे.

सन १९३५ मध्ये महान संत गाडगेबाबा यांनी गावातील अंगदराव सानप, खंडूजी पातोंड, माधवराव मुंडे, अभिमानदास सरदार, उरकड महाराज, देवराव कराड, तुकाराम सोनोने, आत्माराम गावंडे, रामराव डोईफोडे



आदी ग्रामस्थांसह गोवर्धन पूजेचा शुभारंभ केला. तेव्हापासून दरवर्षी दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी हा उत्सव सातत्याने साजरा केला जातो.

या दिवशी सकाळी गावकरी शेतातून हिरवा चारा आणून नदीकाठी ठेवतात. गावातील सर्व गोधन (गाय-वासरे) त्या ठिकाणी आणून त्यांची पूजा केली जाते. संत पुंडलिक बाबा मंदिरापासून गावभर पालखी मिरवणूक काढली जाते. त्यानंतर नदीकाठी गोधनाची आणि नदीची पूजा करून आरती केली जाते. या धार्मिक सोहळ्यात गावातील सर्व जाती-धर्मातील नागरिक एकत्र सहभागी होतात.या उत्सवाच्या आयोजनात महादेव सानप यांचा नेहमीच पुढाकार असतो. पूजा संपल्यानंतर पुंडलिक बाबा मंदिरात महाप्रसादाचे आयोजन केले जाते. या महाप्रसादात येसुराची भाजी हे विशेष आकर्षण असते. विशेष म्हणजे, या दिवशी कोणत्याही घरात स्वयंपाक केला जात नाही — सर्वजण महाप्रसादाचाच आस्वाद घेतात.

या प्रसंगी बाहेरगावी कामानिमित्त गेलेले सर्व गावकरी तसेच गावातील लेकी-बाळीही आपल्या मातृभूमीत परत येऊन या दिव्य परंपरेत सहभागी होतात.

**स्थानिक समस्या :** गावापासून नदीपर्यंत जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट असून, अद्याप कोणत्याही लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे लक्ष दिले नाही, अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

**हिंदू संस्कृतीचे प्रतीक :** संत पुंडलिक महाराजांच्या जन्मभूमीवर साजरा होणारा गोवर्धन पूजा उत्सव हा हिंदू संस्कृतीचे प्रतीक आहे. सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन व सर्व धर्मीयांचा सहभाग ही प्रेरणादायी बाब आहे.

**विनोद गणेशपुरे,** मुर्तिजापूर

......................

**संतांचा आशीर्वाद आणि परंपरेचे जतन :** महान संत गाडगेबाबांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा उत्सव आजही संत पुंडलिक महाराजांच्या आशीर्वादाने गावकऱ्यांच्या वतीने मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जात आहे.

**श्रीकांत डोईफोडे,** ग्रामस्थ गोरेगाव

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत

## दिवाळीपूर्वीचे आश्वासन फोल : रब्बी पिकाची पेरणी संकटात

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चान्नी मंडळातील विविध गावांतील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पिकांच्या नुकसानीचा फटका बसला आहे. शासनाकडून या शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई देण्याची घोषणा करण्यात आली होती. प्रशासनाने संबंधित अहवाल तयार करून शासनाकडे पाठवला असला तरी दिवाळी संपूनही नुकसानभरपाईची रक्कम अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही.

अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम हातातून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. आता रब्बी हंगामाची पेरणी सुरू होत असताना बियाणे, खते आणि शेतीसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. मात्र शासनाने जाहीर केलेली नुकसानभरपाई मिळाली नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.



'दिवाळीपूर्वी सरसकट नुकसानभरपाई देण्याचे जाहीर झाले होते, मात्र दिवाळी होऊनही आम्हाला काहीच मिळाले नाही. त्यामुळे तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी, जेणेकरून रब्बी पेरणीस मदत मिळेल,' अशी मागणी सावरगाव येथील शेतकरी मधुकर इंगळे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की सत्ताधारी असो वा अधिकारी, कुणीही त्यांच्या भावना ओळखायला तयार नाही. त्यामुळे शासनाने तात्काळ अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाई जमा करावी, अशी मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

'दिवाळीपूर्वी सरसकट नुकसानभरपाई देण्याचे जाहीर करण्यात आले होते, परंतु दिवाळी होऊन सुद्धा अद्यापही नुकसानभरपाई देण्यात आली नाही. त्यामुळे त्वरित नुकसानभरपाई देण्यात यावी, जेणेकरून रब्बी पिकाच्या पेरणीस मदत होईल.'

**मधुकर इंगळे,**
शेतकरी सावरगाव

**शेतकरी सरसकट नुकसानीच्या प्रतीक्षेत! :** अतिवृष्टीच्या पावसामुळे खरीप पिके पूर्णपणे हातातून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीचा फटका बसला आहे. रब्बी पिकाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. शासनाने जाहीर केलेली नुकसानभरपाई लवकरात लवकर वितरित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# दिव्यांग विश्वाचे आंतरराष्ट्रीय दूत बनले डॉ. लोहिया

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक राम नगरचे रहिवासी आणि नागपूरच्या इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रेस्पिरेटरी मेडिसिन या विषयात एम.डी.चे शिक्षण घेत असलेले सेरेब्रल पाल्सीग्रस्त दिव्यांग डॉ. आदित्य संजय लोहिया यांची गोवा सरकारने समाजात सेरेब्रल पाल्सीबाबत जनजागृतीसाठी आंतरराष्ट्रीय पर्पल अँबॅसिडर म्हणून नियुक्ती केली आहे.गोवा सरकार, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या सहकार्याने तसेच संयुक्त राष्ट्र संघाच्या सहभागाने पणजी येथे आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्ट २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश सर्व श्रेणीतील दिव्यांग व्यक्तींच्या सशक्तीकरणाला चालना देणे हा आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकारच्या दिव्यांगतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्पल अँबॅसिडरची नियुक्ती करण्यात आली. त्यात सेरेब्रल पाल्सी विषयी जनजागृती साठी महानगरातील डॉ. आदित्य लोहिया यांची निवड होऊन त्यांना हे पद बहाल करण्यात आले.

**Change In Name**

My Old passport name was
**IDRIS RAZIQUE KHAN**
now my new name is
**IDRIS KHAN RAZIQUE KHAN**
My Old passport no L18 05029 Address near masjid gol bazar road ghasiti pura Akot Dist Akola 444101 ( M S )

# महानगरात संत जलाराम जयंतीचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■



बिर्ला गेट परिसरातील श्री जलाराम मंदिरामध्ये पूज्य संत श्री जलाराम बाप्पांच्या २२६ व्या जयंतीनिमित्त भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जलाराम सेवा भजन मंडळाच्या वतीने आयोजित संत श्री जलाराम बाप्पांचा हा दोन दिवसीय जयंती महोत्सव बुधवार २९ ऑक्टोबर रोजी बिरला कॉलनी येथील श्री जलाराम मंदिरात साजरा केला जाणार आहे.या दोन दिवसीय उत्सवाची सुरुवात मंगळवार २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता रमेशभाई गणात्रा परिवाराच्या हस्ते श्री जलाराम बापा यांच्या प्रतिमेची पूजा करून करण्यात येईल. त्यानंतर दुपारी ४ वाजता राऊत वाडीतील मुखर्जी बंगल्या जवळील सृष्टी रेसिडेन्सी परिसरातील रमेशभाई गणात्रा यांच्या निवासस्थानातून संत जलाराम बाप्पांची भव्य शोभायात्रा निघेल.ही शोभायात्रा जठारपेठ, सातव चौक मार्गे बिरला कॉलनी, जलाराम नगर येथील श्री जलाराम मंदिरात पोहोचेल. मंदिरात पोहोचल्यानंतर नववधू ग्रुपच्या वतीने बाप्पांची पूजा आणि आरती होईल.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# भारतीय जनता पक्षात विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने प्रवेश

## जनतेचा आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा विश्वास भाजपावर : आ. रणधीर सावरकर



■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीचा झेंडा फडकणार असून जनतेचा तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांचा विश्वास भारतीय जनता पक्षावर आहे. भाजपात प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान राखत त्यांच्या कर्तृत्वाचा लाभ पक्ष निश्चितच घेईल, असे प्रतिपादन भाजप प्रदेश सरचिटणीस तथा आमदार रणधीर सावरकर यांनी केले.रामगाव पंचकोशी परिसरातील विविध पक्षांतील कार्यकर्त्यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. खासदार अनुप धोत्रे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जयंत मसने हे होते.

या प्रसंगी आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, विजय अग्रवाल, प्रवीण हगवणे, संजय गावंडे, देवेंद्र देवर, गणेश लोड, संजय कोरडे, चंदाताई लवाळे, रूपालीताई काकड, माधव मानकर, डॉ. अमित कावरे, दिगंबर गावंडे, अनमोल गावंडे, जयकुमार ठोकळ, शिवशंकर पाटील आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

रामगाव पंचकोशीतील अंकुश नारायणराव दौड यांच्या नेतृत्वाखाली देवेंद्र देवर व संजय गावंडे यांच्या प्रयत्नातून नितीन पावसाळे, भूषण लोणंद, मंगेश पाटेकर, राहुल विखे, अनिकेत धोत्रे, चेतन्य लोणंद, जितेंद्र दौड, विजय दौड, निखिल पावसाळे, ऋतिक धोत्रे, अभिषेक पाटेकर आदी असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

खासदार अनुप धोत्रे यांनी सर्व नवागत कार्यकर्त्यांना पक्षाचा दुपट्टा परिधान करून सदस्यत्व प्रदान केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण हगवणे यांनी केले, संचालन गिरीश जोशी यांनी तर आभार प्रदर्शन माधव मानकर यांनी केले.

# शेतकऱ्याचा जीवंत आक्रोश : दहा एकरातील सोयाबीनला चितेचा अग्नी

## अतिवृष्टी, नापिकी, कर्जबाजारीपण आणि सरकारचा कानाडोळा : दिवाळीतील प्रकाश गेला धुरात

**साहूर जनमाध्यमः** जगाचा पोशिंदा आज हतबल झाला आहे. अतिवृष्टी, नापिकी आणि शासनाच्या बेफिकिरीने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याने स्वतःच्या हातांनी शेतीला चिता लावली. गावातील शेतकरी समीर हरिभाऊ वाघ यांनी दहा एकर तर कपिल रमेश भोरे यांनी दोन एकरातील सोयाबीन गंजी पेटवून दिली. एका क्षणात वर्षभराच्या घामाची राख झाली.दहा एकरातील पिकाला आग लागल्याने जवळपास पाच लाखांचे नुकसान झाले. मळणीचा खर्चही निघणार नाही हे लक्षात आल्यानंतर या शेतकऱ्यांना हा टोकाचा निर्णय घ्यावा लागला. एका वेळच्या अन्नदात्याच्या डोळ्यादेखत त्याचेच श्रमधन धुरात विरून गेले, हा दृश्य कोणत्याही दगडाच्या अंत:करणालाही हादरवणारा होता.आत्महत्येच्या वाटेवर ढकलणाऱ्या या नापिकीच्या लाटेला सरकारचे दुर्लक्ष कारणीभूत ठरत आहे. कर्जमाफी, अनुदान आणि मदतीच्या घोषणा फक्त जाहिरातीपुरत्या आहेत. शेतकऱ्याच्या खात्यात दिवाळीत रुपयाही



जमा न झाल्याने त्यांचे सणाचे दिवसही राखेत मिळाले. महागाईचा भस्मासुर बेलगाम आहे, तर शेतकरी जिवंत असूनही मृतासारखे जगतोय. शासन मात्र कुंभकर्णी झोपेत बुडाले आहे. अन्नदात्याच्या अश्रूंनी दिवे पेटवावे लागणाऱ्या या दिवाळीने सत्ताधाऱ्यांच्या संवेदनेला कधी जाग येणार?

# दिवाळीत हुल्लडबाजीचा स्फोट

## चालत्या दुचाकींवरून फटाके फोडत युवकांचा उन्माद

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीच्या उत्साहात काही युवकांचा उन्माद वाढला असून, वर्धा शहरातील बॅचलर रोडवर चालत्या दुचाकींवरून फटाके फोडण्याचा अजब प्रकार समोर आला आहे. दिवाळीच्या रात्री गजबजलेल्या रस्त्यावर काही तरुणांनी अनार, रॉकेट व इतर फटाके पेटवून फेकल्याने नागरिक त्रस्त झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक ते राष्ट्रमाता जिजाऊ स्मारक या दरम्यान युवकांनी गाड्यांवरून फटाके उडविण्याचे धिंगाणा घातला. कुठे फटाका पडेल याचा नेम नसल्याने वाहनचालक हादरले. काही फटाके थेट वाहनांवर पडल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला. महिला व विद्यार्थिनी चालकांच्याही जवळ फटाके फुटल्याने लोकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.दरम्यान, शहरातील व्यापारीवर्गाने मुख्य मार्गावर ढोल-ताशांच्या गजरात दिवाळी साजरी केली, मात्र बेताल फटाके वाजवल्याने इतर वाहनचालकांची चांगलीच अडचण झाली. अचानक फुटणाऱ्या फटाक्यांमुळे काहींचा तोल सुटल्याचेही दिसले.या गोंधळात एका युवकाने फोडलेला फटाका स्वतःच्या अंगावर पडून त्याची फजिती झाली. नागपूर बायपास परिसरातही अशीच हुल्लडबाजी वाढल्याचे दिसत असल्याने नागरिकांनी रात्रीची गस्त वाढवून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे.



# नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**तळेगाव (श्या पं.) जनमाध्यम**

इटलापूर येथील शेतकरी दीपक पडोळे (५२) यांनी नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना अमरावती-नागपूर महामार्गा लगतच्या शेतात आज शुक्रवार २४ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास उघडकीस आली.



मिळालेल्या माहितीनुसार, दीपक पडोळे यांची शेतीवर उपजीविका सुरू होती. गेल्या काही वर्षांपासून पावसाची अनियमितपणा आणि नापिकी यामुळे त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. यातच यावर्षी जिल्ह्यात अतिवृष्टीने थैमान घातले. पिकासह शेतीही खरडून गेली. त्यामुळे यावर्षीसुद्धा हाती काहीच येणार नाही, या विवंचनेत ते नेहमी राहायचे. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून तणावात होते. अखेर त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. गुरुवारी ते आपल्या मोठ्या मुलीकडे जाण्यासाठी घरून निघाले. मात्र, ते मुलीकडे न जाता त्यांनी अमरावती-नागपूर महामार्गावरील एका शेतात झाडाला गळफास घेतला. दरम्यान, ही बाब गावातील एका व्यतीच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ तळेगाव पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश भोयर, पोलिस उपनिरीक्षक किशोर खंडार, राहुल अमुने आणि कर्मचारी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयात हलविला.

## संक्षिप्त

### महादेवा योजनेंतर्गत फुटबॉल खेळाडूंसाठी निवड चाचणी

**वर्धा जनमाध्यम :** राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्यासाठी महादेवा ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉलमध्ये करीअर करण्यासाठी जिल्ह्यातील १३ वर्षाखालील मुले व मुलींसाठी जिल्हास्तरावर ३० व ३१ ऑक्टोंबर रोजी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीस खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेचा एक भाग म्हणून राज्यातील १३ वर्षांखालील मुले व मुलींसाठी जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीतून निवड होणा-या खेळाडूंना दि.१४ डिसेंबर रोजी मुबंई येथे जागतिक किर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १३ वर्षाखालील खेळाडूंनी ३० व ३१ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता न्यू इंग्लीश हायस्कूलच्या मैदानावर होणा-या निवड चाचणीस उपस्थिती राहावे. निवड चाचणीमध्ये १ जानेवारी २०१२ ते डिसेंबर २०१३ मध्ये जन्मलेल्या मुलांना व मुलींना सहभागी होता येईल, असे जिल्हा क्रिडा कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.



### संत सयाजी महाराज यांची पंचमुखी हनुमान मंदिराला भेट

**हिंगणघाट जनमाध्यम :** सुप्रसिद्ध संत श्री सयाजी महाराज यांनी शुक्रवार, दिनांक २४ ऑक्टोबर रोजी येथील सयाजीनगर परिसरातील पंचमुखी हनुमान मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. दिवाळी सणानिमित्त त्यांनी उपस्थित भाविक भक्तांना शुभेच्छा देत आशीर्वाद दिले. त्यांच्या आगमनाने परिसर भक्तिमय झाला होता. यावेळी ह.भ.प. मयूर महाराज, चंद्रशेखर दंडारे, प्रकाश खंडार, वासुदेव खडतकर, रमेश जामूनकर, पुरुषोत्तम मोहाड, विनायक भगत, सौ. कापसे मॅडम, सौ. घवघवे, प्रदीप नंदुरकर, वैशाली नंदुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### दुचाकीमधून दारू वाहतूक करणारा पकडला

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने दुचाकीवरून अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्या युवकाला रंगेहाथ पकडून ९६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.मुखबिराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार निखील संजय पाटील (वय ३०, रा. बुरकोणी) हा निळ्या-काळ्या रंगाच्या स्प्लेंडर प्लस मोटारसायकलने नागरी मार्गे लाडकीकडून बुरकोणीकडे देशी दारूची वाहतूक करीत असल्याची माहिती पथकास मिळाली. त्यानुसार लाडकी बसस्थानकाजवळ नाकाबंदी करण्यात आली.तपासामध्ये मोटारसायकलच्या टाकीवर बांधलेल्या चुंगडीमध्ये 'रॉकेट' कंपनीच्या ९० मिलीच्या देशी दारूच्या ३०० सीलबंद बाटल्या आढळल्या. प्रत्येकीची किंमत १२० रुपये असून एकूण किंमत ३६ हजार रुपये इतकी आहे. स्प्लेंडर प्लस गाडी (क्र. एमएच ३२ एएफ २३८७) किंमत अंदाजे ६० हजार रुपये, असा एकूण ९६ हजारांचा माल जप्त करण्यात आला.ही कारवाई गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली आहे.

### विनाकारण वाद, युवकास कुऱ्हाडीने केली मारहाण

**वर्धा :** विनाकारण वाद करत दोघांनी युवकास लाथाबुक्क्यांनी तसेच कुऱ्हाडीने डोक्यावर मारुन जखमी केले. ही घटना लादेन नगर झोपडपट्टी परिसरात घडली. याप्रकरणी शहर पोलिसात तक्रार ईफाजत दाखल करण्यात आली. रहलीम शहा हा त्याच्या झोपडीसमोर जेवण करुन बसला असताना तेथे जंजीर रज्जाक सैय्यद आणि मगरीब रज्जाक शहा हे दोघे आले आणि विनाकारण ईफाजत सोबत वाद करु लागले. ईफाजतने शिवीगाळ करण्यास हटकले असता दोघांनी लाथाबुक्क्यांनी तसेच कुऱ्हाडीने मारुन जखमी केले. याप्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सध्या किरकोळ कारणातून वादाच्या घटना वाढत चालल्या आहेत. असे वाद पुढे जाऊन मोठे रुप धारण करत असल्याने हे वाद वेळीच थांबविण्याची नितांत गरज आहे. समन्वयातून वाद मिटविणे काळाची गरज आहे.

# मेहनत आणि जिद्दीच्या बळावर प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे विद्यार्थी अखिल भारतीय क्रीडा स्पर्धेत

**हिंगणघाट जनमाध्यम :** मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर हिंगणघाट येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी अंतर्गत चालणाऱ्या हिंगणघाट व वेळा येथील भारत विद्यालय आणि हिंगणघाट येथील एस. एस. एम. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्याभारती आयोजित अखिल भारतीय क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.ही स्पर्धा भोपाळ (मध्यप्रदेश) आणि हासन (कर्नाटक) येथे घेण्यात येणार आहे. ज्युदो व कुस्ती स्पर्धा भोपाळ येथे २३ ते २५ ऑक्टोबर, तर ॲथलेटिक्सची अखिल भारतीय स्पर्धा हासन येथे ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर दरम्यान पार पडणार आहे. तीनही शाळांमधील एकूण २४ विद्यार्थी खेळाडू या स्पर्धांमध्ये भाग घेणार आहेत.ज्युडो व कुस्ती प्रकारात वेदांत दुरबुडे, ऋषिकेश शेंडे, आराध्या भोयर, राशी सातपुते, भती दुरबुडे, ज्ञानेश्वरी मेश्राम, रुचिता शेंडे, वैष्णवी बनसोड, पुर्वा कोल्हे, यश मुकतेवार, रणवीर इतवारे, अनन्या सोनकुसरे, क्रिष्णा ढगे, शौर्य भगत, परी इटणकर, तन्मय दुरबुडे आणि चंचल कातरे सहभागी होत आहेत. तर ॲथलेटिक्ससाठी जुगल तपासे, जय ठाकरे, मनीष सालेकर, यश चव्हाण, प्रज्वल आखाडे, इस्माईल शेख आणि सौरभ मुडे हे मैदानात कौशल्य दाखवणार आहेत.या स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गोकुलदास राठी, उपाध्यक्ष श्याम भिमनवार, सचिव रमेश धारकर, तसेच विद्याभारती विदर्भ व देवगिरी प्रांत संघटन मंत्री शैलेश जोशी, उपाध्यक्ष बळीराम चव्हाण, खेलकुद प्रमुख जितेंद्र घोरदडेकर आदींनी अभिनंदन करून उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच मुख्याध्यापक हरीश भट्टड, राजू कारवटकर, चंद्रशेखर खडतकर, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, किरण मद्दलवार, पर्यवेक्षक निलाक्षी बुरीले, ईश्वर चंदनखेडे, मनिषा कोंडावार, क्रीडा विभाग प्रमुख विनोद कोसुरकर, क्रीडा शिक्षक दिलीप मारोटकर, संदीप चांभारे आणि संजना चौधरी यांनीही खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर यश मिळवण्याची प्रेरणा दिली.



# उद्यापासून श्रीमद् भागवत ज्ञान यज्ञ सप्ताह महोत्सव

**हिंगणघाट :** येथील मोहता भवन येथे सोमवार दि. २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरपर्यत आदित्य शास्त्री बुरहानपूर यांचे भागवत सप्ताह ज्ञान यज्ञ महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या ज्ञानयज्ञात सोमवार, दि. २७ रोजी यात्रा कथा प्रारंभ गोकर्ण महात्म, मंगळवार २८ रोजी भीष्म स्तुती परीक्षित जन्म, बुधवारी २९ श्री नृसिंह भगवान प्रागत्य, ३० ऑक्टोबरला वामन श्रीराम, श्रीकृष्ण जन्म, ३१ ऑक्टोबर शुक्रवारी बाललीला श्री गोवर्धन पूजा मनोहरथ, १ नोव्हेंबरला रुक्मिणी विवाह, गोपी गीत, संवाद व रविवार २ नोव्हेंबरला सुदामा चरित्र एकादसकंदने कथेचा समारोप होईल. सोमवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी हवन केल्यानंतर भाविक भक्तांसाठी महाप्रसाद होईल. तसेच विविध धार्मिक कायक्रम होणार आहेत. या कार्यक्रमाचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# शिक्षकांच्या जुनी पेन्शन मागणीला पुन्हा विलंब

## न्यायालयीन आदेश असूनही प्रशासनाकडून कारवाईला विलंब

**हिंगणघाट जनमाध्यम :** राज्यातील शाळांतील १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त आणि शंभर टक्के अनुदानप्राप्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याबाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अमलबजावणी अद्याप अनिश्चिततेत आहे. शिवाय, शासन आणि शिक्षण विभाग यांच्यातील निर्णयप्रक्रियेमधील मंद गतीमुळे पेन्शनपीडित कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. मुंबई खंडपीठाने २७ फेब्रुवारी २०२५ रोजी दिलेल्या आदेशात विभागीय शिक्षण उपसंचालकांना ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांची पडताळणी करून पात्रता निश्चित करण्याचे निर्देश दिले होते.

पण आदेश दिल्यानंतरही शासनाकडून अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश न गेल्याने अंमलबजावणीच्या प्रक्रियेला विलंब झाला आहे. दरम्यान, राज्य शासनाने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याने विषय अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत निकाल देण्याचे आदेश असतानाही एक महिन्यानंतरच अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना मूळ कागदपत्रांसह हजर राहण्यास सांगितले आहे. त्यामुळे पेन्शन प्रश्नी निर्माण झालेला संभ्रम कायम आहे.

याचिकाकर्ते मुख्याध्यापक प्रदीप महल्ले यांनी सांगितले की, २०१९ मध्ये लॉर्जर बेंचकडून कर्मचाऱ्यांच्या विरोधातील निर्णय जरी आला असला तरी २०२१ पासूनच्या १४ प्रकरणांमध्ये शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल लागले आहेत. मात्र, शासनाने अजूनही जुनी पेन्शन लागू करण्याचा निर्णय घेतलेला नाही.

# वंचितांसोबत केली दिवाळी साजरी; साहित्य केले वाटप

**हिंगणघाट :** शहरातील नारायण सेवा मित्र परिवार व मायेची फुंकर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील वंचितांसोबत दिवाळी साजरी करत त्यांना विविध साहित्य वितरण केले.

समाजातील जे वंचित घटक आहेत, ते दिवाळीचा आनंदापासून वंचित राहू नयेत, याकरिता मित्र परिवाराच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.

याअंतर्गत गरजू, निराधारांना दिवाळीनिमित्त कपड्याचे निःशुल्क वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित स्वास्थ निरीक्षक विजय खोब्रागडे, विजय गुप्ता, लालचंद भुतडा, ज्योत्स्ना बावणे, दीपाली कांबळे, लक्ष्मी गुप्ता यांच्या हस्ते फराळ व मिठाईच्या किटचे वाटप करण्यात आले. यामुळे वंचितांच्या चेहऱ्यावर हसू उमलले.

# लग्नसराईच्या उंबरठ्यावर सोन्याच्या दरात घसरण

## सुवर्ण व्यवहारात शांतता, तीन दिवसांत तब्बल ७,५०० ची पडझड

**वर्धा जनमाध्यम :** सणासुदीचा उत्साह ओसरताच लग्नसराईच्या उंबरठ्यावर सोन्याच्या दरात घसरण पाहायला मिळत आहे. सलग तिसऱ्या दिवशी सोन्याचे भाव कमी झाले असून ते १ लाख २५ हजार ५०० रुपयांपर्यंत खाली आले. या दरकपातीमुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.लक्ष्मीपूजनाच्या दिवशी देशभरात सोन्याला उच्चांक गवसला होता. त्या वेळी दर १ लाख ३३ हजारांच्या घरात पोहोचले होते. मात्र त्यानंतर दुसऱ्याच दिवशी घट सुरू झाली. पाडव्यानंतर आणि भाऊबिजेच्या दिवशीही ही घसरण कायम राहिली. तीन दिवसांत जवळपास साडेसात हजार रुपयांची कपात



नोंदवली गेली आहे.स्थानिक सुवर्ण व्यावसायिकांच्या म्हणण्यानुसार, सट्टा बाजारातील नफेखोरी ही घसरण तात्पुरती असण्याची शक्यता आहे. निकट भविष्यात सोन्याचे दर पुन्हा वाढू शकतात. दरम्यान, चांदीच्या बाजारातही मोठी पडझड दिसली असून प्रति किलो भाव १ लाख ९० हजारांवरून थेट १ लाख ५६ हजारांवर आला आहे. गेल्या काही वर्षांतील हा सर्वात मोठा दर कपाती नंतरचा झटका मानला जात आहे.

# झाडगाव-बेलगाव-दिग्रज मार्गाची दुरवस्था

## शेतकरी व नागरिकांना हालअपेष्टा, रस्त्यांच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** देवळी-पुलगाव विधानसभा मतदारसंघातील झाडगाव परिसरातील शेती पांदन रस्त्यांसह झाडगाव-बेलगाव-दिग्रजज्मांडवा-उमरी (मेघे) हा महत्त्वाचा संपर्कमार्ग गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत जीर्णावस्थेत आहे.

रस्त्यांवरील खोल खड्डे, उखडलेले डांबर, पाणी साचलेले भाग आणि चिखलामुळे नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थी वर्गाला रोजचा प्रवास अवघड झाला आहे.

अनेक ठिकाणी पावसाळ्यानंतर रस्त्यांचे स्वरूपच बदलले असून, शेतकऱ्यांना शेतीकडे जाणारे पांदन रस्ते वापरणे कठीण ठरत



मनसेकडून आमदार बकाने यांना निवेदन

आहे. त्यातून पिकांची देखभाल, बैलबंडी वाहतूक आणि शेतीकामात अडथळे निर्माण झाले आहेत.या परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे यांच्या मार्गदर्शनात आणि वर्धा तालुका संघटक नितीन परतेकी यांच्या नेतृत्वात मनसेतर्फे आमदार राजेश बकाने यांना निवेदन सादर करण्यात आले निवेदनात झाडगाव परिसरातील सर्व पांदन रस्त्यांची तसेच मुख्य संपर्कमार्गाची तातडीने दुरुस्ती, रुंदीकरण आणि पुनर्बांधणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. नितीन परतेकी यांनी सांगितले की, हा जनतेच्या रोजच्या जगण्याशी संबंधित मुद्दा आहे. प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत, तर मनसेला आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. या प्रसंगी सर्कल अध्यक्ष नितीन दाभेकर, शाखा संघटक नितेश टापरे, अमर व्यापारी, सतीश व्यापारी, गुणवंत कुचेवार, स्वप्निल डंभारे, रोहित कल्याणी, गणेश अवचट, सुदर्शन तितरे, राजेश कोटमकार, राजेश गजबे आदींसह नागरिक, शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.या निवेदनामुळे रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत स्थानिक स्तरावर काहीतरी सकारात्मक हालचाल होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# वर्धा पुरवठा निरीक्षण अधिकारी मनीषा मांजरखेडे यांची बदली

## सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तहसीलमध्ये नियुक्ती

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा तहसीलमधील पुरवठा निरीक्षण अधिकारी मनीषा मांजरखेडे यांची बदली करण्यात आली असून त्यांची सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तहसीलमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने शुक्रवार, २४ ऑक्टोबर रोजी यासंदर्भात आदेश जारी केले. मनीषा मांजरखेडे या अधिकारीविषयी आमदार, स्थानिक जनप्रतिनिधी, स्वस्त धान्य दुकानदार तसेच लाभार्थींकडून शासन दरबारी वारंवार तक्रारी करण्यात आल्या होत्या. नुकत्याच उघड झालेल्या सायलेंट आरसी प्रकरणानंतर या तक्रारींची दखल मंत्रालयाने घेतली होती. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी पार पडली व त्याचा अहवाल सरकारकडे पाठविण्यात आला.या चौकशी अहवालाच्या आधारे शासनाने मांजरखेडे यांची बदली करत कार्यमुक्तीचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यांना नव्या ठिकाणी तातडीने रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले असून, बदली प्रक्रियेवर अनावश्यक दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्यास ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# महाएल्गार आंदोलनाला शेतकऱ्यांचा राज्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद

## -माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली अन्यायाविरुद्ध हक्काचा लढा

**चांदुरबाजार/प्रतिनिधीः-** नागपूरच्या येथे होणाऱ्या महाएल्गार आंदोलनाला राज्यभरातून शेतकरी, बेरोजगार युवक, दिव्यांग, मेंढपाळ, मच्छीमार आणि विविध शोषित घटक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. ही सभा राज्यातील सर्व शेतकरी नेते व प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली होत असून, या सभेमुळे शेतकऱ्यांचा आवाज पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचणार आहे.या महाएल्गार आंदोलनाची तयारी मागील काही दिवसांपासून जोरात सुरू आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शेतकरी नागपूरकडे रवाना होत आहेत.

मौदा परिसरातून भाजीपाला, गोंदिया,भंडारा, लाखनी भागातून तांदूळ, नाशिकवरून कांदा व भाजीपाला, सोलापूर येथून २०००० भाकरी व खर्डा तर विदर्भातील अनेक भागातून चिवडा तयार करून सहभागींसाठी तयारी सुरू आहे.तसेच गावागावातील ट्रॅक्टर सहभागी होणार आहे त्या ट्रॅक्टरची सर्विसिंग गावागावात सुरू आहे. ग्रामीण भागातील महिलांनीही या सभेसाठी उत्साहाने तयारी केली असून, अनेक ठिकाणी स्वयंसेवक मंडळे भोजन व निवासाची व्यवस्था करत आहेत.शेतकरी, मजूर आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर सरकारकडून होणाऱ्या दुर्लक्षाविरोधात बच्चू कडू यांनी 'आरपारचा लढा' उभारण्याचा निर्धार केला आहे.शेतकरी कर्जमुक्ती, शेतीमालाला हमीभाव, बेरोजगारांना रोजगार, दिव्यांगांसाठी न्याय्य हक्क, तसेच मेंढपाळ, मच्छीमार आणि लघु शेतकऱ्यांच्या समस्या या विषयांवर या सभेत ठोस निर्णय घेतले जाणार आहे.

वाहतूक नियंत्रणासाठी विशेष योजना आखण्यात आली असून, ग्रामीण भागातून येणाऱ्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची सोय केली आहे. दरम्यान, नागपूरच्या सर्व प्रवेशद्वारांवर 'शेतकऱ्यांचा जयघोष' घुमत असून, बच्चू कडू यांच्या नेतृत्वावर शेतकऱ्यांचा ठाम विश्वास दिसून येत आहे.राज्यातील विविध संघटनांनी या सभेला पाठिंबा जाहीर केला आहे. अनेक शेतकरी संघटनांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थी वर्ग देखील सभेत सहभागी होणार आहेत. 'आमचा आवाज दुर्लक्षित केला तर आम्ही गप्प बसणार नाही,' असे वक्तव्य अनेक शेतकऱ्यांनी माध्यमांशी बोलताना केले.या महाएल्गार सभेच्या माध्यमातून शोषित घटकांचा हक्क आणि न्याय मिळविण्यासाठी बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी सरकारसमोर ठोस मागण्या मांडतील. नागपूरच्या भूमीतून उठणारा हा आवाज राज्याच्या राजकारणात नवा बदल घडवेल,असा विश्वास व्यक्त होत आहे.







राज्यातील मेंढपाळ बांधवांनी दोन दिवसापासून नागपूरच्या दिशेने कुच केलेली आहे. आपल्या संपूर्ण शेळ्या, मेंढ्या, बैल बंड्या सह पूर्ण कुटुंबाचा वाडा घेऊन ते नागपूरच्या आंदोलनात सहभागी होण्याकरता नागपूरच्या दिशेने येत आहे. मेंढपाळ बांधव आपल्या न्याय हक्कासाठी आता रस्त्यावर उतरलेले आहेत. २८ तारखेला नागपूर येथे माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वात महाएल्गार आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात शेतकऱ्यांची कर्जमाफी मेंढपाळ बांधवांच्या समस्या यासह बेरोजगारांच्या समस्या तसेच विविध समस्या घेऊन हे आंदोलन उभारण्यात आलेले आहे. सरकारने शेतकऱ्यांना निवडणुकीपूर्वी कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते मात्र ते आश्वासन पूर्ण झाले नाहीत व दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना जी आर्थिक मदत देण्याची घोषणा केली होती ती मदत सुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यात अद्यापही जमा झालेली नाही .त्यामुळे या खोटारड्या सरकारच्या विरोधात आता नागपूर येथे ऐतिहासिक आंदोलन उभारण्यात येणार आहे. या आंदोलनाकरिता मराठवाड्या सह विविध भागातून मेंढपाल बांधव आपल्या लाखो मेंढ्या घेऊन नागपूरच्या दिशेने रवाना झालेले आहे. या मेंढपाल बांधवांना काही ठिकाणी आता पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न सुद्धा केला जात आहे मात्र ज्या ठिकाणी पोलिसांनी आम्हाला अडवले आम्ही त्याच ठिकाणी आंदोलन सुरू करू असा थेट इशारा या मेंढपाळ बांधवांनी दिला आहे त्यामुळे नागपूरला होणारे आंदोलन हे सरकारला घाम फोडणार हे आता यावरून दिसून येत आहे.



# ३८ वे अखिल भारतीय महानुभाव परिषद अधिवेशन नाशिक येथे उत्साहात

## -मुख्यमंत्री फडणवीस यांनी आ.प्रवीण तायडे यांचा केला सत्कार




**अचलपूर/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ३८ वे अखिल भारतीय महानुभाव परिषद अधिवेशन नाशिक येथे मोठ्या श्रद्धा, भक्तीभाव आणि उत्साहात पार पडले. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांचा शाल ,श्रीफळ देऊन सत्कार केला.यावेळीं मंचावर राज्याचे मंत्री गिरीश महाजन,राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे,आमदार प्रवीण तायडे,आ. देवयांनी फरांदे अधिवेशनास उपस्थित होते .छत्रपती संभाजीनगर रोडवरील जय शंकर फेस्टिव्हल लॉन्स येथे दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात देशभरातून संत-महंत, पुजारी, भक्तगण आणि महानुभाव संप्रदायाचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष कविश्वर कुलाचार्य विद्वांसबाबा शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.आज सकाळी पवित्र पालखी सोहळा, ग्रंथदिंडी, ध्वजारोहण आणि अधिवेशनीय सभागृह तसेच ग्रंथनगरीचे उद्घाटन या कार्यक्रमांनी अधिवेशनाची मंगल सुरुवात झाली. भक्तिमय भजन, नामस्मरण आणि ग्रंथपूजनाच्या वातावरणात संपूर्ण परिसर भारावून गेला होता.यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संतगण आणि मान्यवर नेते यांच्या उपस्थितीत महंत मोहनराज कारंजेकर बाबा यांनी अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात महानुभाव संप्रदायाने समाजात रुजवलेल्या समरसतेच्या, भक्तीच्या आणि मानवतेच्या विचारांचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, संत परंपरेने महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाला दिलेली दिशा आणि आदर्श आजही प्रेरणादायी आहे. समाजात एकतेचा आणि बंधुभावाचा संदेश देणारी महानुभाव संप्रदायाची शिकवण ही काळानुरूप अधिक महत्त्वाची ठरते.यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.यावेळीमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत आ.प्रवीण तायडे यांनी मतदार संघाचा सर्वागीण विकासाबाबत ही चर्चा केली .आ.प्रवीण तायडे यांचा नाशिक मध्ये विविध सामाजिक संघटनेच्या वतीने सुद्धा सत्कार करण्यात आला.

# नगराध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धारणीच्या राजकारणात चैतन्य

## -इंजि. अर्पण मालवीय यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश

**धारणी/प्रतिनिधीः-** धारणी नगराध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धारणीच्या राजकारणात चैतन्य निर्माण झाले आहे.

शहरातील लोकप्रिय, सक्रिय, सामाजिक कार्यात अग्रेसर आणि उच्चशिक्षित युवा चेहरा इंजि. अर्पण मालवीय यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. हा पक्षप्रवेश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि भाजप संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर यांच्या उपस्थितीत झाला.





इंजी. अर्पण मालवीय यांच्या प्रवेशाने धारणी नगराध्यक्ष पदाकरिता पक्षाला एक उत्साही व सक्षम युवा चेहरा मिळाल्याचे राजकीय वर्तुळात म्हटले जात आहे.

इंजी. अर्पण मालवीय यांचे जनसंपर्क, सामाजिक आणि धार्मिक कार्यातील सहभाग तसेच युवांमधील प्रचंड लोकप्रियता यामुळे धारणीच्या राजकारणात नवीन समीकरणे निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. तर पक्षातील दोन्ही दिग्गज नेत्यांनी इंजि अर्पण मालवीय यांना आशीर्वाद देऊन पक्ष बळकटीकरण व समोरील कार्यासाठी तयारी करण्याचे आदेश दिले आहे अशी माहिती सूत्रांकडून झाली आहे. आगामी नगरपंचायत निवडणुकीत नगर अध्यक्ष पदाकरिता नगर अध्यक्षपदाचे उमेदवारी मिळण्याचे संकेत आहे.

# अपघाताला आमंत्रण देतोय, मुख्य रस्त्यावरील खड्डा

## -खड्डा बुजविण्यासाठी सा.बां.विभागाला जिवित हानीची प्रतीक्षा

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** पावसाळ्यापासून शहरातील प्रमुख मार्गावर मोठे खड्डे पडले आहेत.यात अत्यंत वर्दळ व वाहतूक मार्गावरील,मुख्य रस्त्याच्या मध्ये असलेले खड्डे अपघाताला आमंत्रण देत आहेत.या खड्डया बद्दल तक्रारी ही करण्यात आल्या.वृत्तपत्रांच्या माध्यमातून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा ही प्रयत्न झाला.मात्र कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला अद्यापही जाग आली नाही.त्यामुळे खड्डे बुजविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला, खड्डे बुजविण्यासाठी जिवितहानीची प्रतीक्षा आहे की काय? असा प्रश्न स्थानिक नागरीकांच्या मनात निर्माण झाला आहे.

शहरातील एस.टी.डेपो, पोलिस स्टेशन, नोंदणी कार्यालया दरम्यान रस्त्याचे मधोमध एक मोठ्ठा खड्डा पडलेला आहे .या मार्गावरून जयस्तंभ चौका कडे जाणारी मोठी वाहतूक दिवसभर सुरू असते. मात्र सात महिन्यांपासून पडलेल्या हा रस्ता बुजविण्यासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागाला अद्यापही वेळ मिळाला नाही.या ठिकाणी जयस्तंभ कडून आलेला सिमेंट रस्ता व जुना डांबर रस्ता असा जोड निर्माण झाला आहे. सिमेंट रस्ता बांधणी नंतर दोन रस्त्यांना जोडण्यासाठी , येथे उतार काढून देणे ही कंत्राटदाराची जबाबदारी होती. मात्र कंत्राटदाराने याकडे दुर्लक्ष केले .तर बांधकाम विभागानेही डोळेझाक केल्याचे दिसून येते.

या रस्त्यावरून पादचाऱ्यांचीच नव्हे तर , लहान मोठ्या सर्वच वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. बोराळा मार्गावरील, तहसील कार्यालयाकडील, एस.टी.डेपो मधील, पोलिस स्टेशन मधील व जयस्तंभ चौका कडील वाहतूक याच ठिकाणी येऊन मिळते.सर्व बाजूंनी येणाऱ्या वाहतूकीला हाच खड्डा पार करून पुढे जावे लागते.त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या - जाणाऱ्या वाहनांची एकच गर्दी असते.परिणामी या खड्ड्यातून वाहन लवकर न निघाल्यास, अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर अपघातात जिवितहानी झाल्यास सा.बां.विभाग याची जबाबदारी घेईल काय? असा प्रश्नही नागरीकांकडून विचारण्यात येत आहे. एवढेच नव्हेतर याच चौकातील बोराळा मार्गावर,दोन मोठे खड्डे पडले आहेत.तर नेताजी चौकातील शिवकृपा ड्रेसेस समोरही एक मोठा खड्डा पडला आहे.या सर्व मार्गावरून तालुक्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी,यांच्यासह आजी माजी लोक प्रतीनिधी ही जाणे - येणे करतात.तरी ही प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या, ही बाब यांच्या लक्षात का आली नाही.या रस्त्यांवरून जातांना, हे सर्व डोळे बंद करून जातात की काय? हे कोडं मागील सहा महिन्यां पासून अद्यापही, शहरातील नागरीकांना सोडवता आले नाही.या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना तोल जाऊन अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. काही किरकोळ अपघात आधीच झालेत.तरी ही प्रशासनाला जाग येत नाही.



> या परिस्थितीवर प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. रस्त्यांवरील खड्डे फक्त गैरसोय निर्माण करत नाहीत, तर ते थेट जीवित हानीस कारणीभूत ठरू शकतात. वेळेवर दुरुस्ती आणि योग्य देखभाल करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.तातडीने रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती न झाल्यास, प्रशासनाला नागरिकांच्या संतापाचा सामना करावा लागेल.
>
> **-रावसाहेब घुलक्ष,** नागरीक

सध्या स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभागाचा पदभार, अचलपूर येथील उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे आहे .त्यांचे लक्ष इथल्या समस्यांकडे कमी आहे. अधिकारी फक्त अधून मधून याच मार्गाने दौरा करतात.परंतू प्रत्यक्ष कामकाजात सुधारणा होताना दिसत नाही. त्यामुळे खड्ड्यांचा प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहत आहे .खड्ड्यांची दुरुस्ती आणि रस्त्यांचे देखभाल कार्य कोणाची जबाबदारीत आहे. त्यासाठी उत्तरदायित्व कोण घेणार? हा प्रश्न सहा महिन्यांपासून अनुत्तरितच आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहिती नुसार काही ठिकाणी, तात्पुरती खडी टाकून खड्डे बुजवण्याचा दिखावा केला गेला. मात्र दोन दिवसांतच ते खड्डे पुन्हा पूर्ववत झाले. त्यामुळे एखादी दुर्दैव घटना घडल्या शिवाय, प्रशासनाला जाग येणार नाही का?.' हा प्रश्न आता सर्वत्र चर्चेचा विषय झाला आहे.

# आ.राजेश वानखडे यांनी साजरी केली ज्येष्ठ नागरिकांसह दिवाळी

## गुरूकुंज मोझरी येथील वृद्धाश्रमात उत्साह



**तिवसा/प्रतिनिधीः-** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरुदेव यांच्या पावन विचारांवर आधारित गुरूकुंज मोझरी येथील वृद्धाश्रमात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिवाळीचा सण अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांनी स्वतः उपस्थित राहून ज्येष्ठ नागरिकांसोबत दिवाळी साजरी केली. त्यांना नवीन कपडे व मिठाईचे वाटप केले. या उपक्रमाद्वारे वृद्धांप्रती कृतज्ञता, स्नेह, आपुलकी आणि आदर व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आमदार राजेश वानखडे यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत बसून त्यांच्याशी मनमोकळ्या संवाद साधला. त्यांनी ज्येष्ठांच्या आरोग्याची, दैनंदिन जीवनातील अनुभवांची आणि दिवाळीच्या आठवणींची चौकशी केली. यावेळी वृद्धांनीही आमदारांच्या या भेटीने आणि प्रेमळ वागणुकीने आनंद व्यक्त केला. नवीन कपडे आणि मिठाईचे वाटप करताना आमदारांनी प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला वैयक्तिकरित्या शुभेच्छा दिल्या, ज्यामुळे आश्रमातील वातावरण अधिकच उत्साही आणि प्रेमळ झाले.या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ भौतिक मदत नव्हे, तर ज्येष्ठ नागरिकांना मानसिक आधार आणि समाजाशी जोडण्याचा प्रयत्न आहे. आमदार वानखडे यांनी सांगितले की, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांप्रमाणे वृद्धांचा सन्मान करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. दिवाळी हा प्रकाशाचा सण असून, वृद्धांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश पसरवणे हे आपले कर्तव्य आहे.' त्यांनी आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी नेहमी तत्पर राहण्याचे आणि अशा उपक्रमांना सातत्याने पाठबळ देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास आरती वानखडे, रायजीप्रभू शेलोटकार महाराज, उद्धवजी वानखडे, विधानसभा संयोजक प्रदीप गौरखेडे, माजी तिवसा मंडळ अध्यक्ष नीलेश श्रीखंडे, तालुका सरचिटणीस श्रीकांत कांडलकर, शहराध्यक्ष अजय गुल्हाने, जिल्हा सचिव आशिष निस्ताने, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष शुभम राऊत, विनोद पटेल, युवा मोर्चा सरचिटणीस निशांत भुरे, उपाध्यक्ष अजय पाटील, रोशन राणे, शक्तीकेंद्र प्रमुख सुनिल बारबुध्दे, प्रमोदराव कुरळकर, अभय शास्त्रकार, सुनिल गौरखेडे, राहुल थोटे, रमेश साकोरे, बबनराव निस्ताने, नरेशसिंग ठाकुर, दिलीप आगाशे, पवन उमप, श्रीकांत आमडारे, शामभाऊ बिंड, शुभम बोथे, अनिकेत वानखडे, सुधीर वानखडे, सुनिल इंगळे, नंदकिशोर काळे, अमोल बालपांडे, योगिता बालपांडे, साधना पाटील यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित सर्वांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि वृद्धांसोबत दिवाळी साजरी करण्याचा अनोखा आनंद व्यक्त केला. अनेकांनी आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी भविष्यातही सहकार्य करण्याचे आणि नियमित भेटी देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्रितपणे दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला आणि शुभेच्छांचे आदान-प्रदान केले.हा उपक्रम गुरूकुंज मोझरी वृद्धाश्रमाच्या परंपरेला साजेसा ठरला असून, समाजातील वृद्धांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# बालविवाहानंतर मुलगी गर्भवती, जुळ्या मुलांचा जन्मानंतर मृत्यू

## परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीसोबत १९ वर्षीय तरुणाने आठ महिन्यांपूर्वी बालविवाह केला. त्यानंतर पीडित अल्पवयीन मुलीला गर्भधारणा झाली. दरम्यान पोटदुखीचा त्रास झाल्यामुळे तीन ते चार दिवसांपूर्वी पीडित मुलीला रुग्णालयात दाखल केले असता, तिने दोन मुलांना जन्म दिला. मात्र काही वेळातच ते दोन्ही मुलं दगावली.या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी बालविवाह करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या १९ वर्षीय तरुणाविरुद्ध गुरुवारी (दि. २३) गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी मूळची मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील रहिवासी आहे. काही दिवसांपूर्वी तिच्यासोबत परतवाडा येथील एका १९ वर्षीय तरुणाने मंदिरात जाऊन लग्न केले. त्यानंतर ते पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहत होते. मागील सात ते आठ महिन्यात तरुणाने अल्पवयीन मुलीवर वारंवार शारीरिक अत्याचार केला. त्यामधून मुलीला गर्भधारणा झाली. काही दिवसांपूर्वी पीडितेचे पोट दुखत असल्याने तिला अचलपूर येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केली असता, ती सहा महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आले. यातच गर्भवती अल्पवयीन मुलीने दोन मुलांना जन्म दिला. परंतु काही वेळातच दोन्ही मुलांचा मृत्यू झाला. पीडितेवर उपचार सुरू आहेत. ही मुलगी अल्पवयीन असल्याने हा प्रकार वैद्यकीय यंत्रणेने तत्काळ परतवाडा पोलिसांना सांगितला. पोलिसांनी याप्रकरणी १९ वर्षीय तरुणाविरुद्ध बलात्कार, ॲट्रॉसिटी, पोस्को तसेच बालविवाह प्रतिबंध अधिनियमाद्वारे गुन्हा दाखल केला

# कुराशच्या खेळाडूंची राज्यस्तरीय बॉक्सिंगमध्ये दमदार कामगिरी!

## -विजयी चमूंचे चांदूर रेल्वे शहरात जल्लोषात स्वागत व सत्कार



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रात सातत्याने आघाडीवर असलेल्या घोडे सर अकॅडमी आणि कुराश स्पोर्ट्स असोसिएशन, अमरावती यांच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय बॉक्सिंग व ॲडव्हान्स बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत एकूण ११ पदके पटकावली. यामध्ये ४ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्य पदकांचा समावेश आहे. या चमकदार यशामुळे घोडे सर अकॅडमी व कुराश असोसिएशनचे हे 'विजयी चमू' संपूर्ण चांदूर रेल्वे तालुक्याचा अभिमान बनले आहे.कोच संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत कामगिरी करणाऱ्या विजेत्या विद्यार्थ्यांमध्ये अफशा शाह (सुवर्ण), क्षितिज मुधोडकर (सुवर्ण), तृप्ती जगताप (सुवर्ण), रियाक्षी डोंगरे (सुवर्ण), पार्थ जोगदंडे (रौप्य), नैतिक कानेटकर (रौप्य), सांजवी वानखडे (रौप्य), सर्वज्ञ सांभारे (रौप्य), भूषण टोटे (रौप्य), वंश लोखंडे (कांस्य) आणि आयुष माहुलकर (कांस्य) यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा फुलांच्या गुच्छांनी व हारांनी सत्कार करण्यात आला. घोडे सर अकॅडमी तर्फे या विजेत्यांचे जल्लोषात स्वागत व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अंकुश घोडे (संचालक) होते. या प्रसंगी कोच संदीप देशमुख, समाजसेवक नंदा वाधवानी, निलेश भालेराव, बच्चु वानरे, ॲड. लकी डोंगरे, चेतन भोले, आकाश मोटघरे, मनोज सांधेकर, शुभम पुरोहित, प्रदीप मेश्राम, तसेच कुराश संस्थेचे पदाधिकारी अशोक मोटघरे, उमेंद्र ढगे, सुरेश तिखे, ॲड. मनोज अंबाडकर, एस. टी. तायडे आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्रा. अंकुश घोडे म्हणाले 'विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळातही आपली छाप उमटवली आहे. हा केवळ स्पर्धेतील विजय नसून आत्मविश्वासाचा विजय आहे. खेळ हे व्यक्तिमत्त्व घडवणारे माध्यम आहे. आमच्या विद्यार्थ्यांची ही सुवर्ण कामगिरी भविष्यातील आणखी मोठ्या यशाची नांदी ठरेल.' कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# लक्ष्मीपूजन, भाऊबीजेला वीजपुरवठा खंडित...

## -परतवाडा शहरासह कांडली भागातील नागरिकांची गैरसोय - कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी...

**अचलपूर/वार्ताहर**

लक्ष्मीपूजन नंतर भाऊबीजेच्या दिवशीही विद्युत पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना प्रकाशपर्वात गैरसोयीचा सामना करावा लागला. त्यामुळे विद्युत ग्राहकांकडून महावितरण विभागाविषयी नाराजी व्यक्त होत होती.

दिवाळीत सर्वत्र आनंद व उत्साहाचे वातावरण असतांना दिवाळीत २१ ऑक्टोबला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बऱ्याच भागात वीजपुरवठा खंडित झाल्याने काही भागात नागरिकांना



काळोखात लक्ष्मीपूजन करावे लागले. त्यानंतर २३ ऑक्टोबरला भाऊबीजेलाही वारंवार वीजपुरवठा खंडित होत होता. त्यामुळे भाऊबीजेलाही नागरिकांना कमालीची गैरसोय सोसावी लागली. कांडली, परतवाडा व बऱ्याच भागातील नागरिकांना हा त्रास सहन करावा लागला. दिवाळी सारख्या प्रकाशपर्वातही काळोख्याचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांमध्ये महावितरण विषयी संताप व्यक्त केला. कायमस्वरूपी उपाय योजना महावितरण प्रशासन का करत नाही ? देखभाल दुरुस्तीचे कामे झाली नाहीत का? असे एक ना अनेक प्रश्न विद्युत ग्राहकांकडून विचारल्या जात आहे.

> लक्ष्मीपूजनच्या दिवशी धामणगाव गढी वाहिनीचा ३३ केव्ही वाहिनीचा तार तुटून ११ केव्ही वाहिनीवर पडल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. तो बाजूला करून लाईन पुर्ववत करण्यात आली तर भाऊबीजेला तांत्रिक कारणाने वीजपुरवठा खंडित झाला. तो पण पूर्ववत करण्यात आला. फिडरची लांबी जास्त असल्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होऊ नये याकरिता सदर फिडरची दोन भागात विभागणी करण्यात येणार आहे.
>
> **-यु. के. राठोड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता.**

# मतदार नोंदणीसाठी 'फॉर्म १९' करीत मुदतवाढ

**अमरावती-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी पात्र असलेल्या पात्र मतदारांनी (फॉर्म १९) मधील अर्ज वेळेत सादर करावा. मतदार नोंदणी नियम, १९६० नुसार, मतदार नोंदणी अधिकारी यांनी आवाहन केले आहे की, ज्या व्यक्तींची नावे यापूर्वी मतदार यादीत समाविष्ट नाहीत, त्यांनी हा अर्ज ६ नोव्हेंबर, २०२५ (गुरुवार) पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. हा नमुना १९ अर्ज मतदार नोंदणी नियम, १९६० मधील दुसऱ्या अनुसूचीमध्ये उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी व तपशीलासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे www.ceo.maharashtra.gov.in तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे संकेतस्थळ www.amravatidivision.gov.in यावर संपर्क साधावा. सर्व पात्र शिक्षकांनी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन आपली मतदार नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# राज्यस्तरीय विज्ञान नाट्योत्सवात रंगणार विज्ञान आणि कलेचा संगम

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषदेच्या प्रमुख कार्यक्रमांपैकी एक असलेला हा नाट्योत्सव दरवर्षी भारतातील सर्व २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये आयोजित केला जातो. या अंतर्गत ब्लॉक, जिल्हा आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश पातळीवरील स्पर्धांमधून निवड झालेल्या चमूंना राज्यस्तरीय व अखेर राष्ट्रीय स्तरावर सादरीकरणाची संधी दिली जाते. दरवर्षी ४०,००० हून अधिक विद्यार्थी या उपक्रमात सक्रियपणे सहभागी होऊन आपल्या नाट्यप्रस्तुतींमधून वैज्ञानिक विषयांचे सर्जनशील दर्शन घडवतात.

विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला कलात्मक अभिव्यक्तीची जोड देणारा राज्यस्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव २०२५–२६ च्या यजमानपदाचा बहुमान यावर्षी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती ला प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या पुढाकारातून हि स्पर्धा दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या 'सर सी. व्ही. रमण सभागृहात' होणार आहे. तालुका, जिल्हा आणि विभागीय पातळीवर उत्कृष्ट ठरलेल्या नाटकांचे सादरीकरण यावेळी होणार आहेत. २०२५–२६ च्या विज्ञान नाट्य स्पर्धेचा मुख्य विषय 'मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान असा आहे' असा आहे. या अंतर्गत विद्यार्थी विविध उपविषयांवर आधारित नाट्यप्रयोग सादर करतील.

या स्पर्धेचा उद्देश म्हणजे नाटक आणि संवादाच्या माध्यमातून विज्ञान आणि तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता निर्माण करणे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी, कल्पनाशक्ती आणि नवोन्मेषी दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहन देणे असा आहे. ही स्पर्धा इयत्ता ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी असून, सहभागी विद्यार्थी आपल्या शाळेतील चमूंमार्फत या उपविषयांवर आधारित सर्जनशील प्रकल्प आणि नाट्यरूप सादरीकरणे करून स्पर्धेत नाट्याविष्कार साकारणार आहेत.

राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद, कोलकाता आणि नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्यासह राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे; राज्य विज्ञान शिक्षण संस्था, (प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर; विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती; जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती आणि डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती विज्ञान केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने, राज्य विज्ञान शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. हर्षलता बुराडे यांच्या मार्गदर्शनात पर पडणाऱ्या या नाट्योत्सवाचे उद्घाटन मा. सौम्या शर्मा चांडक, आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या हस्ते २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात येणार आहे. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान मा. हर्षवर्धन देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती भूषवतील. या कार्यक्रमास मा. साबळे, विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, अमरावती, तसेच नीलिमा टाके, शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

अमरावतीकरांनी या नाट्योत्सवाचा लाभ घेऊन विज्ञानप्रसार आणि सामाजिक परिवर्तनाच्या या चळवळीचा एक भाग व्हावे, असे आवाहन या नाट्योत्सवाचे आयोजन सचिव डॉ. पंकज नागपुरे यांनी केले आहे.

> श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती ने विज्ञान आणि कलेचा उत्तम संगम साधला आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सर्जनशीलतेचा सेतू निर्माण करून महाविद्यालयाचे विद्यार्थी सांस्कृतिक क्षेत्रातून आपला विचार जनमानसात पोहोचवित आहेत. एका विज्ञान महाविद्यालयाने उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या विद्यापीठाची जनरल चॅम्पियनशीप ट्रॉफी सातत्याने पाचव्यांदा प्राप्त करून यावर शिक्कामोर्तब केले आहे. नाट्यकलेच्या माध्यमातून विज्ञानाचे सार अर्थपूर्ण, आकर्षक आणि संवादात्मक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचवले जातील. परंपरेप्रमाणे यावर्षीदेखील या महोत्सवात उत्साही सहभाग, रंगतदार सादरीकरणे आणि बालकलावंत विद्यार्थ्यांच्या प्रभावी नाट्यकृतींचे दर्शन घडेल, असा आम्हाला विश्वास आहे.
>
> **-प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे:**

> विज्ञान, कला आणि साहित्याचा संगम विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला दिशा देतो, तर विविध माध्यमांतून विज्ञानसंवाद घडवून आणल्याने समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकशीलता आणि माहितीची पडताळणी करणारी वृत्ती विकसित होते. याकरिताच नाट्यकलेला विज्ञानसंवादाचे प्रभावी साधन म्हणून स्वीकारण्यात आलेल्या या स्पर्धेतून भारतीय संविधानाला अपेक्षित वैज्ञानिक दृष्टीकोन नवीन पिढीच्या विचारसरणीत रुजविल्या जातील. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थी कलावंत आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांच्या सहभागासाठी आभार आणि शुभेच्छा
>
> **-मा. हर्षवर्धन देशमुख,**
> अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था

# लिओनेल मेस्सीसोबत खेळण्याची संधी

**अमरावती/का.प्र**

महाराष्ट्र शासन, क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्स्फॉर्मेशन, सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टीने महादेवा ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉलमध्ये करिअर करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेचा भाग म्हणून राज्यातील १३ वर्षांखालील मुले, मुलींसाठी (जन्मतारीख दि. ०१.०१.२०१२ ते ३१.१२.२०१३) जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निवडचाचणीतून निवड होणाऱ्या खेळाडूंना १४ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची संधी मिळणार आहे. तरी सदर निवड चाचणीस्थळी येण्यापूर्वी यासोबत जोडलेल्या गुगल लिंकद्वारे (https://forms.gle/ctCMRZ4FZDxwYEvA7) नोंदणी करावी. आपल्या शाळा, संस्थेतील जास्तीत जास्त फुटबॉल खेळाडूंना सहभागी होण्यास प्रोत्साहित करून फुटबॉल या खेळात करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. अंतिम निवड झालेल्या खेळाडूंना राज्यशासनातर्फे प्रोत्साहन म्हणून ५ वर्ष स्कॉलरशिप, निवासी प्रशिक्षण, शिक्षण, भोजन, निवास इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जिल्हास्तर निवड चाचणी स्थळ हे पोलिस ग्राउंड, पोलिस पेट्रोल पंप मागे, अमरावती आहे. चाचणी दिनांक दि. २९ ऑक्टोबर २०२५, सकाळी ९.३० वाजता राहील. आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड व जन्माचा दाखला सोबत आणावा. अधिक माहितीसाठी अमरावती जिल्हा फुटबॉल संघटना सचिव सुशिल सुर्वे (मो. ७८७५६५२५२७) यावर संपर्क साधावा,. जास्तीत -जास्त खेळाडूंनी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी आवाहन केले आहे.

# राज्य परिवहन महामंडळाच्या धावत्या बसमधून निघाला धूर

**अचलपूर/वार्ताहर**



अमरावतीहून परतवाडाकडे येणाऱ्या अमरावती आगाराच्या बसमधून बुधवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास अचानक धूर निघायला सुरुवात झाली. चालकाने बस थांबवली. प्रवासी सुखरूप खाली उतरले. सुदैवाने कुठलीच अनुचित घटना घडली नाही. मात्र, नेहमीच्या या प्रकाराने प्रवासी कमालीचे संतप्त झाले.

परतवाडा-अमरावती मार्गावरून सर्वाधिक प्रवासी वाहतूक आहे. आधीच रस्ते जिवावर उठले असताना नेहमीप्रमाणे परिवहन महामंडळाच्या बसमधून जीवघेणा प्रवास नागरिकांना करावा लागत आहे. बुधवारी रात्री ८ वाजता अमरावती आगाराची साधारण बस आष्टी नजीक येताच धूर निघायला सुरुवात झाली. प्रवाशांच्या लक्षात येताच बसचालकाने थांबवून प्रवासी बाहेर काढले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

**ढकलून सुरू करूनही बसमधून निघाला धूर**

महामंडळाच्या बसगाड्या भंगार असताना बुधवारी अचानक बंद पडलेली बस प्रवाशांनी ढकलून सुरू केली. पुढे जाताच त्यातून पुन्हा धूर निघाला असल्याचे बसमधील प्रवासी शेख मोहसीन शेख मोबीन यांनी लोकमतशी बोलताना सांगितले. प्रवाशांना मागून लागलीच आलेल्या ईव्ही बसमध्ये पुढील प्रवास करावा लागला, अन्यथा अर्धा ते एक तास मार्गावर पुढील बसची वाट बघत ताटकळत बसावे लागले असते.

**नादुरुस्त बस रस्त्यावर धावतात तरी कशा?**

परतवाडा आणि अमरावती हे दोन्ही आगार जिल्ह्यात मोठे आहे. स्वतंत्र वर्कशॉप (दुरुस्तीसाठी यंत्रणा) याठिकाणी आहे. त्यामुळे वेळेपूर्वीच कालबाह्य झालेल्या बसगाड्या या मार्गावरून पाठविल्या जातात. कधी चाक निघून पडू लागतात, तर धावत्या बसमधून धूर निघतो. नादुरुस्त बस मार्गावरून धावून प्रवाशांच्या जिवाशी आगर खेळत असल्याचा संतापजनक प्रकार सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांनी दिली.

# लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी 'ई-केवायसी'ला तूर्तास लागला




**अमरावती/का.प्र**

विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींमुळे महायुतीची राज्यात सत्ता आली. त्या लाडक्या बहिणींची नाराजी आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीला परवडणार नाही. त्यामुळे लाडक्या बहिणींची 'ई-केवायसी'ची प्रक्रिया तूर्तास थांबविली आहे. ऑक्टोबरचा लाभही पुढील आठवड्यात दिला जाणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला २८ जून २०२४ रोजी मान्यता दिली. जुलै २०२४ पासून योजनेची अंमलबजावणी सुरू झाली.

**आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा**

> 'महिलांचा लाभ बंद होणार नाही. शासनाने आता प्रत्येक लाभार्थीस ई-केवायसी बंधनकारक केली आहे. योजनेच्या वेबसाईटवरील ई-केवायसी करण्यातील तांत्रिक अडचणी आता दूर झाल्या आहेत. पण, लाभार्थींनी ई-केवायसी करून घ्यावी.'
>
> **- अतुल भंडागे,**
> महिला व बालकल्याण अधिकारी,

योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. राज्यभरातून दोन कोटी ५६ लाख महिलांनी योजनेसाठी अर्ज केले. पण, सहा महिन्यांनी निकषांवर बोट ठेवत योजनेच्या लाभार्थीची पडताळणी सुरू झाली. पहिल्यांदा चारचाकी वाहने असलेल्या महिला, केंद्र व राज्य सरकारच्या वैयक्तिक योजनांचे लाभार्थी, सरकारी नोकरदार महिला, एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त लाभार्थी महिलांचा शोध घेण्यात आला. याशिवाय चुकीचे वय दाखवून किंवा वय कमी-अधिक असताना देखील योजनेचा लाभघेणाऱ्या महिलांचाही त्यात समावेश होता. पडताळणीनंतर राज्यातील सुमारे ४५ लाख महिलांना लाभ मिळालेला नाही. आता 'ई-केवायसी'तून ज्या लाभार्थी महिलांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न दोन लाखांपेक्षा जास्त आहेत, त्यांचा शोध घेतला जाणार आहे. या निकषांनुसार जिल्ह्यातील हजारो महिला अपात्र ठरतील, अशी शक्यता वर्तविली आहे.

# नारायण गुरू क्रीडा मंडळाचे कबड्डी सामने

**दर्यापूर/वार्ताहर**



आपल्या अचूक व अप्रतिम सामने आयोजनाने संपूर्ण विदर्भभर प्रसिद्ध असलेल्या दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे ) येथील नारायण गुरु क्रीडा मंडळाच्या सामने आयोजन स्थळी स्थानिक गाडगेबाबा मंडळाने रुग्णवाहिका सेवा घोषीत केली आहे . चालक व इंधनासह पुरविण्यात येत असलेल्या या सेवेची घोषणा स्वतः मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांनी आयोजन स्थळावर रुग्णवाहिकेच्या उपस्थितीत केली . सार्वत्रिक तथा समाजउपयोगी राष्ट्रीय कार्यात व आयोजनात सातत्याने गाडगेबाबा मंडळाची रुग्णवाहिका सेवा प्रदान केल्या जाते हे संपूर्ण तालुक्यात ज्ञात आहे . अनेक आपत्ती ग्रस्त परिस्थिती तथा सार्वत्रिक निवडणूका यामध्ये सुद्धा हि सेवा देऊन मंडळाने स्वतःला उपकृत करून घेतलेले आहे . अनेक रुग्णांचे जीव वाचविण्यात या सेवेने यश मिळविल्याने शासनाद्वारे मंडळाला उत्कृष्ट सेवा पुरस्काराने तथा प्रमाणपत्राद्वारे वेळोवेळी सम्मानित करण्यात आलेले आहे ही बाब इथे उल्लेखनिय आहे . सुप्रसिद्ध हावरे बिल्डर्स मुंबई संस्थेच्या संचालिका श्रीमती उज्वलाताई सतीश हावरे यांनी नऊ वर्षांपूर्वी ही रुग्णवाहिका स्व सतीश दादासाहेब हावरे ( पथ्रोट ) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व सेवार्थ मंडळाला भेट दिलेली आहे .

आपल्या निष्काम सेवेने प्रसिद्ध असलेल्या गाडगेबाबा मंडळाने रुग्णवाहिका सेवेची घोषणा केल्यानंतर कबड्डी सामन्यांचे आयोजक गणेशराव साखरे व सर्व मंडळातील लहान थोर कार्यकर्ते , देणगीदार यांनी गाडगेबाबा मंडळावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे . दर्यापूर परिसर हा कबड्डी खेळासाठी संपूर्ण देशभर भूतकाळापासून प्रसिद्ध असल्याने परिसरातील सर्व क्रीडा प्रेमींनी आयोजनतील सर्व घटनांवर व अथक प्रयत्नांवर शुभेच्छा प्रदान केल्या असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष नारायण गुरु क्रीडा मंडळाच्या सामने आयोजनावर केंद्रीत झालेले आहे . रुग्णवाहिका सेवा घोषणा प्रसंगी आयोजन समितीतील मान्यवर, कार्यकर्ते व मंडळाचे खेळाडू यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## संतोषी माता मंदिरात भव्य अन्नकुट

**अमरावती -** जवाहर गेट जवळील सफालला लागून असलेल्या श्री संतोषी माता मंदिरात भक्तांनी जयेशभाई राजा, सदानंद आप्पा, दिलीप मावडे, आणि इतरांना अन्नकुट प्रसाद परंपरा राखण्यासाठी दीक्षा दिली. माजी नगराध्यक्ष विलास इंगोले, माजी सभापती प्रा.डॉ.संजय शिरभाते, राजू भेळे यांच्या हस्ते संतोषी मातेची आरती करण्यात आली. तसेच मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. संपूर्ण परिसर संतोषी मातेच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

# श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान मध्ये कार्तिक मास सोहळा

**कुऱ्हा/वार्ताहर**

विदर्भाची पंढरी आई रुक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्तिक मास सोहळा दि. ३० ऑक्टोबर ते दि. १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे भव्य दिव्य असे आयोजन करण्यात आले आहे.

कार्तिक मास सोहळा निमित्त दररोज दैनंदिन कार्यक्रम यामध्ये स.६ वा. महाअभिषेक,काकडा आरती, सामूहिक प्रार्थना व संध्या. ६ वा. हरिपाठ करण्यात येईल. तसेच सन्माननीय आमंत्रित पाहुण्यांचे हस्ते 'श्री' ची महापूजा यामध्ये ३० ऑक्टोबरला कार्तिक शुद्ध ८ स. ६ वा. कलश स्थापना व मुख्य देवतेला अभिषेक बाळासाहेब पावडे (अध्यक्ष श्री संत लहानुजी महाराज संस्थान टाकरखेडा ता. आर्वी) यांचे शुभहस्ते व नामदेवराव अमाळकर (अध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर) यांचे उपस्थितीत ३१ ऑक्टोबरला स. ६ वा. 'श्री' ची विजयराव डहाके (कुऱ्हा) यांचे शुभ हस्ते महापूजा १ नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री' ची महापूजा व दिनेशभाऊ भुसारी (आर्वी) यांचे हस्ते २ नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री' ची महापूजा प्रबोधनी एकादशी (पंढरपूर यात्रा)



या दिवशी जयनारायण चांडक व परिवार (आर्वी) यांचे शुभहस्ते ३ नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री'जी महापूजा संजयराव वानखडे (मार्डीकर) मार्डी यांच्या हस्ते ४ नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री'जी महापूजा गितेश मारोतराव सुने (कुऱ्हा) यांचे शुभहस्ते ५ नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री'जी महापूजा सुनीलभाऊ रिठे, (पालवाडी) यांचे हस्ते ६ नोव्हेंबरला स. ६ वा. कार्तिक कृष्ण१ 'श्री' ची महापूजा राजेशभाऊ वानखडे (आमदार तिवसा विधानसभा) व नामदेवराव अमाळकर (अध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर) यांचे शुभहस्ते तथा संस्थानच्या समस्त विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीत ७ नोव्हेंबरला सकाळी ६ वा. 'श्री' ची महापूजा विजयराव बाभुळकर (मंगरूळ कांबे ता. मूर्तीजापूर) यांचे शुभहस्ते ८ नोव्हेंबरला स .६ वा. 'श्री'ची महापूजा सचिनभाऊ पंडितराव चौधरी (अंजनवती) ह.मु. अमरावती ९ नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री' ची महापूजा वसंतराव डाहे (उपाध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर) यांचे हस्ते १० नोव्हेंबरला स. ६ वा. 'श्री'जी महापूजा विठ्ठलराव सपाटे (माजी सरपंच अंजनवती) यांचे शुभहस्ते तसेच स. ९ वा. 'श्री' संत सद्गुरु सदाराम महाराज समाधीची महापूजा सदानंद साधू (सचिव श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर) तसेच समस्त साधू परिवार (कारंजा लाड जि. वाशिम) या कार्तिक मास सोहळा निमित्य महाप्रसाद विठ्ठलराव सपाटे (माजी सरपंच अंजनवती) यांचे कडून होईल. भव्य नगर प्रदक्षिणा व दहीहंडी सोहळा कार्तिक मास सोहळ्या करिता येणाऱ्या सर्व दिंडींची नगर प्रदक्षिणा ६ नोव्हेंबरला स. ७.३० वा. ह.भ.प. पंकज महाराज महल्ले (कौंडण्यपूरकर) यांचे नेतृत्वाखाली निघेल व वसंतराव डाहे (उपाध्यक्ष) अशोक पवार (विश्वस्त) सुरेशराव चव्हाण (विश्वस्त) अतुल ठाकरे (विश्वस्त) यांचे व गावकरी पंचक्रोशीतील सर्व वारकरी भक्तांच्या सहकार्याने नगर प्रदक्षिणा चा कार्यक्रम होईल. तसेच पहाटे ५ ते स. ७ वाजेपर्यंत महापूजा स. ७.३० वा. पालख्या व दिंड्यांची नगर प्रदक्षिणा स. १० ते ११ खंजेरी भजनाचा कार्यक्रम श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी यांचा होईल दुपारी १२ ते २ काल्याचे किर्तन ह.भ.प. कीर्तनकार आचार्य लक्ष्मण महाराज चाधेगावकर (अध्यापक गाथा मंदिर देहू )यांच्या सुमधुर वाणीतून कीर्तन त्यांना सातसंगत कौंडण्यपूर व पंचक्रोशीतील वारकरी भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत होईल. दुपारी २ वा. ते ३.४५ वाजेपर्यंत आमंत्रित संत महंताचे आशीर्वाद पर मार्गदर्शन व प्रवचन दुपारी ३.४५ वा. काल्याचा अभंग त्यानंतर दहीहंडी करिता गोपाळपूर टेकडीवर प्रस्थान सायं. ४ वा. दहीहंडी सोहळा वंदनीय श्री संत जितेंद्रनाथ महाराज (पिठाधीश्वर देवनाथ मठ अंजनगाव सुर्जी) जगतगुरु श्री राजराजेश्वराचार्य महाराज (माऊली सरकार पीठाधीश्वर रुक्मिणी मठ अंबिकापुर) श्री संत सचिन देव महाराज (अमरावती) श्री संत सयाजी महाराज येळाकेळी जि. वर्धा या संत महंतांच्या उपस्थिती होईल. या सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री सदानंद साधू (सचिव श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर) हे करणार तेव्हा या कार्तिक मास सोहळा कार्यक्रमांचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान अध्यक्ष तथा विश्वस्त मंडळ व समस्त गावकरी मंडळी श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर यांनी केले आहे.

# भीषण अपघातात दोन ठार, आठ जखमी

## परतवाडा-अंजनगाव मार्गावर एसटी बस व क्रुझरची समोरासमोर धडक




अचलपूर/प्रतिनिधीः- परतवाडा ते अंजनगाव सुर्जी मार्गावरील शहापूर फाट्याजवळ आज शनिवारी (दि.२५) सकाळी झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. अकोट आगारातील एस.टी. बस (क्रमांक एम.एच.४० बीवाय ५१३४) आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या क्रुझर वाहनाचा (क्रमांक एम.एच.१० सी.ए. ९३७१) समोरासमोर अपघात झाला. अपघातानंतर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. मृतांमध्ये आप्पासो राजाराम अतकरी (कुझरचा ड्रायव्हर) रा. खशव सातारा आणि बाबु दस्तगिर बाबू मुतानी या दोघांचा समावेश आहे.

प्राप्त माहितीनुसार, परतवाडा बस आगारातून निघालेली एस.टी. बस अकोटकडे जात होती. दरम्यान शहापूर फाट्याजवळील टर्निंग पॉईंटवर बससमोरून एक ट्रक येत होता. ट्रकला वाचविण्याच्या प्रयत्नात बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बसने समोरून येणाऱ्या क्रुझरला जबर धडक दिली. धडकेमुळे क्रुझर रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी काठावर जाऊन आदळली. त्यामुळे क्रुझर चालकासह एक प्रवासी जागीच ठार झाला. मृतांमध्ये आप्पासो राजाराम अतकरी, दस्तगीर बाबुराव मुलानी (वय ५५, रा. सांगली) यांचा समावेश आहे, तर दुसऱ्या मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. दोन्ही मृतदेह अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत.

जखमींमध्ये महेश माहुलकर (वय ४२, अमरावती), सुखदेव सरगर (वय ५०, सांगली), मुकेश देशपांडे (वय ६०, ओमवाडी), (पान २ वर)

# श्वानाच्या हल्ल्यात बालिका गंभीर

## भोकरबर्डी येथील घटना, १ डोळा झाला निकामी

**धारणी/प्रतिनिधीः-** तालुक्यातील भोकरबर्डी गावात श्वानाच्या हल्ल्यामध्ये चार वर्षीय बालिका गंभीर जखमी होऊन तिचा १ डोळा निकामी झाल्याची घटना शुक्रवारी रात्री समोर आली आहे. यामुळे गांवात खळबळ उडाली आहे. गंभीर अवस्थेत या बालिकेला नागपूर येथे रेफर करण्यात आले आहे. जिथे तिच्यावर उपचार सुरू आहे. तनिषा राजकुमार धांडे (वय ४ वर्ष) असे जखमी बालिकेचे नाव आहे.

माहितीनुसार शुक्रवारी रात्री तनिषा धांडे आपल्या घरासमोर खेळत होती. त्यावेळी अचानक आलेल्या मोकाट श्वानाने तिच्यावर हल्ला केला. श्वानाने तिच्या चेहऱ्यावर आणि डोळयावर चावे घेतले. त्यामुळे तनिषा रक्तरंजित झाली. तिने आरडाओरड केल्यामुळे कुटुंबीय आणि शेजारचे लोक बाहेर आले. त्यांनी कसेबसे श्वानाला तिथून पळवून लावले. कुटुंबीयांनी तात्काळ तिला धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. जिथे प्राथमिक(पान २ वर)



# पूर्व वैमनस्यातून अक्षय नागलकरची अपहरण करून हत्या

**-पुरावे नष्ट करण्यासाठी जाळला मृतदेह, -चार आरोपी गजाआड**

### बहुचर्चित प्रकरणाचा पोलिसांनी केला उलगडा




**अकोला/प्रतिनिधीः-** शहरातील बहुचर्चित अक्षय नागलकर या तरुणाच्या बेपत्ता प्रकरणात धक्कादायक प्रकार पोलीस तपासात पुढे आला आहे. दिवाळीच्या दिवशी आठ जणांनी अक्षयला जेवणासाठी हॉटेलमध्ये बोलावून त्याची निर्घृण हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह शेतात जाळून टाकल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून इतरांचा शोध घेतला जात आहे. शहरातील डाबकी रोड पोलीस (पान २ वर)

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची सन २०२१ मध्ये झालेली पंचवार्षिक निवडणूक अवैध

## मुंबई सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या आदेशानं खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची सन २०२१ ते सन २०२५ ची निवडणूक मुंबईच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी बेकायदेशीर ठरवलीय. निवडणुकीसाठी धर्मादाय कार्यालयाची परवानगी घेतलेली नाही. निवडणुक अधिकाऱ्याची नियुक्ती नियमबाह्य केली. चेंज रिपोर्ट मंजूर झालेला नाही. असोसिएशननं सादर केलेली कागदपत्रं आणि निवडणूक प्रक्रिया विश्वसनीय वाटत नाही, असे स्पष्ट निष्कर्ष सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्या न्यायालयानं नोंदवले आहेत. या निकालामुळे सध्या कार्यरत असलेली महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची कार्यकारिणी बेकायदेशीर ठरते. त्यामुळं सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र ऑलिम्पिकच्या निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालंय.

**-सध्या सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया स्थगित होण्याची शक्यता**

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या २४ सप्टेंबर २०२१ च्या निवडणूक प्रक्रियेवर सुर्यकांत पवार यांनी आक्षेप घेतला होता. २०२१ च्या निवडणूक प्रक्रियेनंतर नामदेव शिरगावकर यांनी मुंबईतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात चेंज रिपोर्ट म्हणजे बदल अहवाल सादर केला होता. मात्र ही निवडणूक प्रक्रिया बेकायदेशीर असल्याची तक्रार झाल्यानं, चेंज रिपोर्ट प्रलंबित होता. मुंबईच्या(पान २ वर)

# महिलेची २० हजारांनी फसवणूक!

## कर्ज देण्याचे आमिष, गाडगेनगर पोलिसांत गुन्हा दाखल



अमरावती/प्रतिनिधीः- कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका चहाविक्रेत्या महिलेची २० हजार रुपयांनी फसवणूक करण्यात आली. ही घटना २४ ऑक्टोबर रोजी गाडगेनगर हद्दीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला अमरावती शहरात चहाची कॅन्टीन चालविते. तिच्या कॅन्टीनवर एक युवक(पान २ वर)

### केवायसीच्या नावाखाली आणखी फसवणूक

गाडगेनगर हद्दीतील संबोधी कॉलनी निवासी संजय सावळे (वय ३६) यांच्याशीही अशाच प्रकारे फसवणूक करण्यात आली. संजय यांना 'बँकेतून बोलतो आहे, केवायसी अपडेट करा' असा फोन आला. त्यांनी सांगितल्याप्रमाणे बँकेत जाऊन प्रक्रिया सुरू केली असता, त्यांच्या खात्यातून २० हजार रुपये काढल्याचा मेसेज त्यांच्या मोबाईलवर आला.

याच दरम्यान आणखी एक ५ हजार रुपयांचा विड्रॉल मेसेज आला. त्वरित बँकेत जाऊन चौकशी केली असता, बँक अधिकाऱ्यांनी हे सायबर फसवणुकीचे प्रकरण असल्याचे सांगून सायबर पोलिसांकडे तक्रार करण्याचा सल्ला दिला. या प्रकरणी संजय सावळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे.

# उभ्या ट्रॅक्टरला दुचाकीची धडक, चालकाचा मृत्यू

## अंजनगाव-सुर्जी ते अकोट मार्गावरील अपघात




**अमरावती/प्रतिनिधीः-** उभ्या ट्रॅक्टरला दुचाकीची जोरदार धडक बसून झालेल्या अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला, तर त्याचा भाऊ जखमी झाला. ही घटना अंजनगाव सुर्जी–अकोट मार्गावर घडली. मृताचे नाव लक्ष्मण हिरे (वय ४५, रा. लखाड, अंजनगाव सुर्जी) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण हिरे आणि त्यांचा भाऊ मोटरसायकलने अंजनगावहून लखाडकडे जात होते. दरम्यान, अकोट मार्गावर अमोल बालकृष्ण वानखेडे (वय ४०) यांनी आपला ट्रॅक्टर रस्त्यावर निष्काळजीपणे उभा ठेवला(पान २ वर)

# अवैध दारु विक्रीविरोधात कारवाईचा सपाटा

## विशेष मोहीम राबवून अनेक आरोपी जेरबंद

**मोठ्या प्रमाणात गावठी व देशी दारू जप्त**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अवैध दारु विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गुन्हे शाखेने २५ ऑक्टोबर रोजी विशेष मोहीम राबवली. या कारवाईत वेगवेगळ्या ठिकाणांवरून गावठी आणि देशी दारूच्या मोठ्या प्रमाणावर जप्तीसह अनेक आरोपी जेरबंद झाले. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी फ्रेजरपुरा हद्दीत लक्ष्मी छोटू रायलीवाले याच्याकडून ३ हजार रुपयांची गावठी दारू जप्त करण्यात आली. त्याचप्रमाणे बानो गंगु रायलीवाले, महबुब सकरु मांजरे यांच्याकडून सुध्दा अवैध दारू जप्त झाली आहे. गाडगेनगर हद्दीत साहिल अरुण सांळुंखे, गणेश दत्तुजी दुर्योधन, नंदा शांताराम(पान २ वर)

# परतवाड्यात गांजा तस्कर ताब्यात

**-१ किलो ६५२ ग्रॅम गांजा जप्त**



**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा शहरातील मोघलाई भागात अवैध गांजा विक्री करणाऱ्या तस्करावर परतवाडा पोलिसांनी धडक कारवाई केली. मोहम्मद शाहीद मोहम्मद शाकीर (रा. मरीमाता मंदिरासमोर, मोघलाई) याला रंगेहात पकडण्यात आले असून त्याच्याकडून १ किलो ६५२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, सहायक पोलीस अधीक्षक शुभमकुमार, तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली परतवाडा पोलिस पथकाने छापा टाकला. (पान २ वर)

# सुपर हायवेवर गोवंश तस्करीचा भंडाफोड

## ३५ जनावरांची सुटका, ट्रक चालक पसार



**अंजनगाव बारी/ प्रतिनिधीः-** बडनेरा आणि नांदगाव पेठ पोलिसांच्या संयुक्त पथकाने गौवर्धन पूजेच्या मध्यरात्री सुपर हायवेवर गोवंश तस्करी करणारा ट्रक पकडला. ही कारवाई चक्रधर पेट्रोल पंपाजवळ झाली.

पोलिसांना माहिती मिळाली की एम.एच.-४०/सीडी-४२६६ क्रमांकाचा ट्रक नांदगाव पेठेहून गोवंश घेऊन बडनेराकडे येत आहे. पोलिसांनी सुपर हायवेवर नाका उभारला. ट्रक चालकाने पोलिसांचा नाका पाहून गाडी वळवून पळ काढण्याचा प्रयत्न केला, पण ट्रक नाल्यात अडकला आणि चालक पसार झाला. (पान २ वर)




# संत सचिन देव महाराजांना मातृशोक



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत अच्युत महाराजांचा धार्मिक कार्याचा वारसा पुढे नेणारे संत सचिन देव महाराजांच्या मातोश्री वैशाली दीपकराव देव यांचे शनिवार २५ ऑक्टोबर रोजी दुपारी दिर्घ आजाराने डॉ. हेडगेवार रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्या ७० वर्षाच्या होत्या. त्यांच्या निधनाने श्री संत अच्युत महाराज भक्त परिवारात शोककळा पसरली आहे. विद्युत नगर येथील त्यांच्या राहत्या घरून रविवार २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता अंत्ययात्रा निघेल. हिंदूस्मभानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होईल. त्यांच्या पश्चात पती दीपकराव, तीन मुले पराग, राहूल, संत सचिन देव महाराज आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# रेल्वे प्रवासात कोट्यवधीचे सोन्याचे दागिने चोरून नेणारा मोकाटच

### रेल्वे पोलिसांचा तपास संथगतीने



**अमरावती/प्रतिनिधीः-** जळगाव येथील सराफा व्यापाऱ्याचे कोट्यवधी रुपयांचे सोन्याचे दागिने बडनेरा रेल्वे स्टेशनवर हावडा-मुंबई मेल एक्सप्रेसमध्ये चोरी झाले होते. याप्रकरणाच्या तपासादरम्यान आरोपी हे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद असल्याचे दिसूनही बडनेरा जीआरपी पोलिस अद्याप त्यांचा मागोवा घेण्यात अपयशी ठरले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, किशोर वर्मा (वय ४५, जळगाव, ज्वेलर्स प्रतिष्ठान संचालक) हे रेल्वेने अमरावतीमध्ये आले होते. त्यांच्याकडे २,३४१ ग्रॅम सोन्याचे दागिने असलेली कॉलेजची बॅग होती, ज्याची बाजारात किंमत ३ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी रेल्वे बडनेरा स्टेशनवर पोहोचताच, त्यांच्या बॅगमधील सोन्याचे दागिने चोराने लंपास(पान २ वर)

# महामार्गावर महिलेचा धिगाणा

### पोलीसांनी घेतले महिलेला ताब्यात

**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील गुरुकुंज येथील महामार्गावर आज सकाळी १० वाजताच्या सुमारास एका ३०,वर्षीय महिलेने चांगलाच गोंधळ घातला. यावेळी महिलेने चक्क एका दुकानातील ऑइल अंगावर ओतून तासभर धिगाणा घातला.ज्यामुळे नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

माहिती मिळताच तिवसा पोलीसांनी सदर महिलेला ताब्यात घेतले.गुरुकुंज मोझरीतील राष्ट्रीय महामार्गावर सकाळी हा प्रकार घडल्याने चर्चेला चांगलेच उधाण आले होते.

## चारोळी......

कळीचं फुलनं हा तर तिचाच गुण
वेड्या कवींसाठी मात्र ती प्रेमाची खुण

पाखराचे बोल कुणासाठी गाणे
कुणा येई धुंदी कुणी छेडी तराणे

कधी गुलाबी थंडी कधी वारा कुंद
कुणी शोधे राधा कुणा हवा मुकुंद

प्रेम माझ तुझ्यावरचं कोणत्याही
शब्दात मावणार नाही,

तुला मिठीत घेताच कळतं,
आता त्याची काहीच गरज
भासणार नाही

सारांश
जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
❐ रविवार,२६ ऑक्टोबर२०२५ ❐ E-paper - www.janmadhyam.com


# शैलगृहांच्या विश्वात – बाराबर आणि नागार्जुनी लेणी

**बिहारमधील जहानाबाद जिल्ह्यातील बोधगयेपासून जवळ असणारी ही शैलगृहे मौर्य सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांनी आजीविक नावाच्या धर्मपंथीयांसाठी खोदली. या शैलगृहांमधील शिलालेखात त्याकाळात बोलल्या जाणार्या प्राकृत या भाषेचे प्रादेशीक बोलीनुसार असलेले नमुने आढळतात.**

भारतामधील एकूण मानवनिर्मित शैलगृहांची संख्या पाहता त्यापैकी जवळ जवळ ८० टक्के ही आपल्या महाराष्ट्रामध्ये आहेत. यामध्ये सर्वात जास्त गुहा या बौद्ध धर्मीयांसाठी केलेल्या असल्या तरी भारतामध्ये अशा प्रकारच्या कोरीव गुंफा सर्वात प्रथम बिहारमध्ये बाराबर आणि नागार्जुनी टेकडय़ांमध्ये इ.स. पूर्व तिसरे शतक या काळात म्हणजे मौर्य सम्राट अशोकाच्या काळात 'आजीविक' नावाच्या धर्मपंथीयांसाठी कोरल्या गेल्या होत्या.

बिहारमधील जहानाबाद जिह्यातील हे ठिकाण बोधगयेपासून २४ किमी अंतरावर आहे. मौर्य सम्राट अशोक आणि त्याचा नातू दशरथ यांनी आजीविक नावाच्या धर्मपंथीयांसाठी इ.स.पूर्व २५२ ते इ.स. पूर्व २१४ या काळात ग्रॅनाईट या खडकात ही शैलगृहे खोदली. इथे एकूण सात शैलगृहे आहेत. त्यामुळे स्थानिक लोक याला सातघर असेही म्हणत असत. त्यापैकी चार बाराबर टेकडीत व तीन पुढे दीड किलोमीटरवर नागार्जुनी टेकडय़ांमध्ये आहेत. या परिसरात पूर्वी अनेक नक्षलवाद्यांचा निवास होता. त्यामुळे बराच काळ या परिसरात जायचे असल्यास पोलिसांची मदत घेऊन जावे लागे. बाराबर टेकडीमध्ये असलेल्या शैलगृहांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- लोमश ऋषी गुंफा, सुदामा गुंफा, कर्ण चौपड आणि विश्व झोपडी. ही नावे स्थानिक लोकांनी दिलेली आहेत, पण नागार्जुनी टेकडीवर गोपिका कुभा, वदथिक कुभा किंवा मठिका कुभा आणि वपियककुभाया नावांच्या शैलगृहांची ही नावे मात्र तेथील शिलालेखात आलेली आहेत.

ही भारतातील सर्वात प्राचीन मानवनिर्मित शैलगृहे आहेत की, ज्यांचा नेमका काळ सांगता येतो. येथील शैलगृहांमध्ये 'लोमश ऋषी गुंफा' ही सर्वात जास्त प्रसिद्ध आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तिचे मुखदर्शन. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना दोन अर्धस्तंभ कोरले आहेत. हे दोन्ही अर्धस्तंभ वरच्या बाजूने आत झुकलेले आहेत. त्यावर कमानदार छतासारखे नक्षीकाम आहे. कमानीच्या आणि दरवाजाच्या मध्ये काही अर्धवर्तुळाकार रचना आहेत. त्यापैकी एकामध्ये जाळीचे नक्षीकाम आहे. दुस?यामध्ये मध्यभागी असणा?या स्तूपासारख्या दिसणा?या गोष्टीकडे दोन्ही बाजूने जाणा?या हत्तींच्या रांगा आहेत. या लेण्याचे मुखदर्शन हे लाकडी बांधकामाचे तंतोतंत अनुकरण आहे. या शैलगृहाच्या आत एक वर्तुळाकार दालन आणि त्याला लागून आयताकार मंडप अशी रचना आहे. या गुहेच्या भिंती घासून गुळगुळीत आणि चमकदार केल्या आहेत. या लेण्याच्या भिंतीचा छताजवळचा भाग तसेच गजपृष्ठाकार छतही खराब खडक असल्याने अपूर्ण राहिला आहे. दगडावर दिसणारी अशा प्रकारची झिलई हे मौर्यकालीन कलावशेषांचे वैशिष्टय़च आहे. लोमश ऋषीबरोबरच या दोन्ही टेकडय़ांमध्ये असलेल्या सर्व गुंफांमध्ये अशाच घासून गुळगुळीत, चमकदार तसेच आरशासारखे प्रतिबिंब दाखविणा?या भिंती आहेत. इथे सम्राट अशोकाचा नाहीतर मौखरी राजवंशातील राजा अनंत वर्मन याचा इ.स.च्या ६व्या शतकातील लेख आहे. त्यामध्ये 'प्रवरगिरी' पर्वतावरील या गुहेत विष्णूच्या मत्स्यावताराची मूर्ती स्थापन करण्याचा उल्लेख आहे. मात्र या लेखाच्या खाली साधारणपणे इ.स.च्या ४थ्या – ५व्या शतकातील ब्राह्मी लिपीमध्ये 'क्लेशकांतार' असे लिहिले आहे. त्याच्या शेजारी इ.स.च्या ७व्या शतकातील ब्राह्मी लिपीमध्ये




डॉ. मंजिरी भालेराव


'बोधिमूल' असे लिहिले आहे. दरवाजाच्या शेजारील भिंतीवर 'गोरथगिरी' असेही मौर्यकालीन म्हणजे इ.स.पूर्व तिस?या शतकातील ब्राह्मी लिपीत लिहिलेले आहे.

येथील सुदामा नावाने प्रसिद्ध असलेल्या लेण्याचीसुद्धा अशीच रचना आहे. हे लेणे मात्र सगळीकडे अतिशय उत्तम झिलई असलेले आणि सगळे कोरीवकाम पूर्ण झालेले आहे. सम्राट अशोकाने त्याच्या राज्याभिषेक झाल्यावर १२ वर्षांनी या लेण्याचे दान दिले होते असे येथील लेखात म्हटले आहे. 'लाजिनापियदसिना दुवाडस वसाभिसितेन इयं निगोह कुभादिना आजीविकेही' (राजा प्रियदर्शी याच्या राज्याभिषेकानंतर १२ वर्षांनी हीन्यग्रोध नावाची गुहा आजीविकांना दान दिली आहे.) अशा प्रकारचे दान लेखलोमश ऋषी गुहा सोडली तर बाकी प्रत्येक गुहेत पाहायला मिळतात. इ.स. पूर्व तिस?या शतकातील हे लेख ब्राह्मी लिपी आणि प्राकृत भाषेचा वापर करून लिहिले आहेत. प्राकृत ही एक भाषा नसून अनेक प्रादेशिक बोली भाषांच्या समूहाचे नाव आहे. सम्राट अशोकाचे लेख हे प्रादेशिक प्राकृत भाषांचा वापर करून लिहिले असल्याने त्या काळातील भारताच्या विविध भागांमध्ये कोणत्या प्रकारची प्राकृत भाषा बोलली जात होती हे त्यातून समजते. या काळातील प्रादेशिक बोलीभाषांचे ते अतिशय दुर्मिळ आणि अत्यंत महत्त्वाचे नमुने आहेत. असाच एक मागधी भाषेचा पुरावा आपल्याला या बाराबर आणि नागार्जुनी गुंफांमध्ये पाहायला मिळतो. या भाषेचे एक महत्त्वाचे वैशिष्टय़ म्हणजे 'र' चा 'ल' होणे. त्यामुळे 'राजा' या शब्दाऐवजी या लेखात 'लाजा' असा शब्दप्रयोग केलेला आहे. विश्वकर्मा हे लेणे अपूर्णावस्थेत आहे, पण तिथेही अशीच दोन दालने करायचा मानस होता हे लक्षात येते. मात्र इथे सम्राट अशोकाचा दानलेख पाहायला मिळतो.

नागार्जुनी टेकडीमधील शैलगृहांची रचना अशी दोन दालनांची नाही. तिथे गोपिका नावाच्या गुहेमध्ये गजपृष्ठाकार छत असलेले दंडगोलाकार लेणे आहे. या दोन्ही टेकडय़ांमधील सर्व शैलगृहांपैकी हे आकाराने सगळ्यात मोठे आहे. बाकीच्या दोन्ही शैलगृहांचा आकार आयताकृती आहे. अशोकाचा नातू दशरथ याने या तीनही गुंफा दान दिल्या आहेत. तसेच मौखरी वंशातील राजांचेही लेख येथील गुंफांमध्ये आहेत. येथील लेखांमध्ये दशरथ म्हणतो की, आचंद्र सूर्य या गुंफा 'निषिधी'साठी आजीविक भिक्षूंना दान दिल्या आहेत. ही शैलगृहे वर्षावासासाठी जशी लेणी केली गेली, तशीच आहेत असेच आतापर्यंत सर्वमान्य मत होते, पण काही वर्षांपूर्वी कोलकाता विद्यापीठातील प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती विभागातील प्राध्यापिका डॉ.सुष्मिता बासुमजुमदार आणि त्यांच्या सहका?यांनी या दोन्ही ठिकाणी असलेल्या शैलगृहांचा पुन्हा नव्याने अभ्यास केला तसेच या ठिकाणी असलेल्या सर्व शिलालेखांचा नव्याने विचार करून नवीन अर्थ लावायचा प्रयत्न केला.


(लेखिका टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे श्रीबालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्राच्या विभागप्रमुख आहेत)


# एक लढा वार्धक्याशी

समाजातील ज्येष्ठ वृद्ध व्यक्तींना सन्मानपूर्वक आणि आनंदी ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे. मात्र सध्या समाजात सर्वात दुर्लक्षित घटक वृद्धच आहेत.

ऑक्टोबर हा दरवर्षी आंतरराष्ट्रीय वृद्धांचा दिवस म्हणून साजरा केला जातो. कशासाठी? कारण समाजात सर्वात दुर्लक्षित घटक वृद्ध आहे. वृद्धांकडे लक्ष वेधण्यासाठी याच दिवशी नाही, तर वर्षभर सर्वांनी आठवण ठेवावी. समाजातील ज्येष्ठ वृद्ध व्यक्तींना सन्मानपूर्वक आणि आनंदी ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे. म्हणूनच हा लढा वार्धक्याशी आहे.

हे प्रत्येकासाठी आव्हान आहे. वृद्धांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे, त्यानुसार होणारा भेदभाव नष्ट करणे, त्यांच्यामुळे वृद्धांवर होणारा मानसिक दुष्परिणाम थांबवणे हे सर्व समाजाचे कर्तव्य आहे. असे झाल्यास ज्येष्ठ नागरिकांना आतापर्यंत आयुष्यभर त्यांनी केलेल्या मेहनतीचे फळ मिळेल. डब्ल्यूएचओच्या माहितीनुसार, जगामध्ये साठ वर्षांवरील १२ कोटी लोक आहेत आणि ती संख्या पुढील काही वर्षांत दुप्पट होणार आहे. सर्वात अधिक संख्या विकसनशील देशांत वाढणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती, सकस आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आर्थिक सुबत्ता यामुळे सरासरी आयुर्मान वाढलेले आहे. या वेगवान जगात व राहणीमानात ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग अतिशय महत्त्वपूर्ण राहणार आहे. उदाहरणार्थ स्वयंसेवी कार्य करणे, आपल्या अनुभवाचा फायदा समाजाला करून देणे आणि कुटुंबामध्ये महत्त्वाच्या जबाबदा?या पेलणे. त्यासाठी प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाने आपले आरोग्य सांभाळणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

जसा वृद्धापकाळ सुरू होतो तसतसे काही दुर्धर आजार बळावयास लागतात आणि त्याचा परिणाम विकलांगत्व होण्यात होतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्वातंत्र्यपूर्ण जगणं



थांबतं. परावलंबित्व वाढण्याने प्रतिकार क्षमता कमी होते, जी पुन्हा नवीन रोगांना आमंत्रण ठरते. परावलंबत्वामुळे सामाजिक जीवन संपुष्टात येते. घरातील लोक लक्ष देईनासे होतात. त्यामुळे परिस्थिती आणखीच बिघडते. हृदयविकार, मधुमेह, हाडे फ्रॅक्चर होणे, संधिवात आणि कॅन्सर असे मुख्य रोग आहेत, ज्यामुळे वृद्धापकाळात सर्वाधिक त्रास होतो.

मानसिक आजार वृद्धावस्थेत अधिक वाढताना दिसतात. आज जे वृद्ध आहेत, त्यांच्या उमेदीच्या काळात मानसिक आजारांबद्दल एवढी जागरूकता नव्हती.

ती आजच्या काळात वाढणे गरजेचे आहे. ६५ वर्षांनंतर डिमेन्शिया, विसराळूपणा हा सर्वात जास्त आढळणारा आजार आहे. त्याचबरोबर एंक्झायटी, नैराश्य असे अनेक आजार दिसून येतात. ताप आला, साखर वाढली, रक्तदाब वाढला की, आपण लगेच डॉक्टरकडे जातो, त्याप्रमाणे मानसिक आजारासाठी आपण खरंच काही तपासणी करतो का? तर उत्तर 'नाही' असे आहे. वृद्धांनी केलेल्या आत्महत्यांमध्ये ७५ टक्के लोक नैराश्याने आजारी असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नैराश्याची लक्षणे आढळल्यास लवकर डॉक्टरांशी संपर्क करा. सतत दुःखी वाटणे, चिंतातुर असणे, रिकामपणा वाटणे, आपण कोणाच्याच उपयोगी नाही, होपलेस आहोत असे वाटणे, कुठल्या आशाआकांक्षा न


डॉ. आशुतोष कुलकर्णी


वाटणे, सतत अपराधी असण्याची भावना, थकवा येणे, एकाग्रता कमी होणे, विसराळूपणा वाढणे, झोप न लागणे, लवकर जाग येणे, अति झोप येणे, निर्णय क्षमता कमी होणे, आत्महत्या करण्याचे विचार येणे, चिडचिड, अस्थिर वाटणे अशी काही कारणे लक्षणे आढळल्यास त्यासाठी त्वरित योग्य डॉक्टरांशी संपर्क साधा.

**ज्येष्ठ नागरिकांनी स्वत काळजी कशी घ्यायची ?**

आपल्या आरोग्यपूर्ण राहण्याच्या गरजा ओळखा. त्याप्रमाणे आरोग्य तपासण्या करून घ्या. त्यासाठी विश्वासू, ज्ञानी फॅमिली डॉक्टर असणे आवश्यक आहे. फळे, वेल वर्गातील भाज्या, सालासकट कडधान्ये, ज्यात भरपूर फायबर आहे अशा गोष्टी आहारात हव्यात. वजन अतिरिक्त वाढले असेल तर ते नियंत्रणात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. रोज हलका व्यायाम, चालणे, योगासने, ध्यानधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे. धूम्रपान आणि मद्य सेवन टाळा.भरपूर विश्रांती घ्या, झोपण्याची लाज बाळगू नका. एखाद वेळेस रात्री उशिरापर्यंत झोप नाही.येणार. दिवसा थोडा थोडा वेळ झोप पूर्ण करा.स्वतला अजिबात मानसिक ताण देऊ नका.

स्वतला सामाजिक कार्यांमध्ये आणि सांस्कृतिक कार्पामात गुंतवून घ्या. 'रिकाम्या डोक्यात सैतान' या म्हणीप्रमाणे मन रिकामे राहिल्यास मानसिक ताण वाढल्याची उदाहरणे आहेत .जी औषधे तज्ञ डॉक्टरांनी दिली आहेत, ती शेजारपाजारच्या, मित्रमंडळींच्या सांगण्याने बंद करू नका.

# १,३०० वर्षे प्राचीन बुद्ध मूर्तिखाली सापडला सोन्याचा खजिना


थायलंड आणि भारतीय संस्कृतीचा ऋणानुबंध हजारो वर्षांचा आहे. भारत हा देश बौद्ध तत्त्वज्ञानाची जन्मभूमी असला तरी, हे तत्त्वज्ञान ज्या ज्या देशांच्या अंगणात वाढले, बहरास आले, त्या देशांच्या यादीत थायलंडचे नाव अग्रणी आहे. केवळ बौद्ध धर्मच नाही तर, भारतीय संस्कृतीच्या अनेक पैलूंना या देशाने आपल्या भूमीत आणि संस्कृतीत सामावून घेतले. अलीकडेच पुरातत्त्व अभ्यासकांना ज्या खजिन्याचा शोध लागला आहे, तो एका बौद्ध मंदिराच्या खाली सापडला आहे.

(वाट थम्मचक सेमा राम) या मंदिर परिसरात खोदकाम सुरू असताना मंदिराखाली सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच धातूच्या पट्टया सापडल्या आहेत. या शोधामुळे थायलंडमधील द्वारावती काळातील कला आणि अध्यात्मिक इतिहासाविषयी अधिकची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. या दुर्मीळ वस्तूंवर संशोधन करण्याचे काम थायलंडच्या फाईन आर्ट्स विभागाकडे सोपवण्यात आले आहे. या शोधामुळे थायलंडच्या इतिहासातील एक अज्ञात पर्व समोर येण्याची शक्यता अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

वाट थम्मचक सेमा राम

हे मंदिर थायलंडच्या नखोन रात्चासीमा या प्रांतात आहे. हे एक प्राचीन आणि ऐतिहासिक बौद्ध मंदिर आहे. या मंदिराचा इतिहास (इसवी सन ७ वे ते ११ वे शतक) हा द्वारावती कालखंडाशी संबंधित आहे. हा काळ थायलंडमधील प्रारंभिक बौद्ध संस्कृतीचे सुवर्णयुग म्हणून ओळखला जातो.

या मंदिरातील बुद्ध मूर्ती ही



थायलंडमधील सर्वात जुन्या मूर्तींपैकी एक मानली जाते. या मूर्तीच्या जडणघडणीत भारतीय गुप्तकाळातील बौद्ध शिल्पव कलेचा प्रभाव जाणवतो, त्यामुळे भारत आणि थायलंड यांमधील प्राचीन धार्मिक तसेच सांस्कृतिक संबंध दृढ असल्याचं दिसून येतं.

या परिसरातील पुरातत्त्व उत्खननात प्राचीन विटांचे स्तूप, विहारांचे अवशेष व काही शिल्पकृती आणि पुरावस्तू सापडल्या आहेत. त्यामुळे हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून, आग्नेय आशियातील बौद्ध कला आणि वास्तुकलेचा मौल्यवान पुरातत्त्व वारसा म्हणून ओळखले जाते. थायलंडच्या इतिहासात वाट थम्मचक सेमा राम मंदिराला एक विशेष स्थान आहे.

मंदिर परिसरात जलनि:स्सारण प्रकल्पाचे काम सुरु होते. त्यासाठी सुरु असलेल्या खोदकामादरम्यान सोनं, चांदी आणि कांस्याच्या प्राचीन वस्तूंचा खजिना सापडला आहे. या वस्तू मंदिरातील निर्वाण निद्रेत असलेल्या बुद्धाच्या मूर्तीखाली सापडल्या आहेत. सुमारे १,३०० वर्षांपूर्वीच्या या खजिन्याचा शोध अपघाताने लागला असून या शोधामुळे पुरातत्त्व अभ्यासक आणि पुरातत्त्व इतिहासप्रेमींमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. हा शोध अकस्मात लागलला असला तरी पुढे या भागात पुरातत्त्व अभ्यासकांनी उत्खनन सुरू ठेवले. त्यात अनेक नव्या गोष्टी उघड झाल्या आहेत.

सोन्याच्या अंगठ्या, चांदीच्या कुड्या आणि कांस्याचे कानातलेष्ठ

या मंदिरात असलेली बुद्धाची मूर्ती तब्बल ४३ फूट लांब असून थायलंडमधील सर्वात जुन्या आणि भव्य मूर्तींपैकी एक मानली जाते. या मूर्तीच्या खाली चार फूट खोलवर हा शोध लागला आहे. सापडलेल्या वस्तूंमध्ये सोन्याच्या अंगठ्या, चांदीच्या कुड्या आणि कांस्याच्या वर्तुळाकार कानातल्यांची एक जोडी यांचा समावेश आहे. त्या द्वारावती काळातील असल्याचे मत संशोधकांनी व्यक्त केलं आहे. या मौल्यवान वस्तू अतिशय काळजीपूर्वक पुरण्यात आल्याचे दिसते. त्यामुळेच त्या धार्मिक विधींसाठी वापरल्या जात असाव्यात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या शोधामुळे त्या काळातील सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाबद्दल माहिती मिळते.

**द्वारावती काळातील उत्कृष्ट कारागिरीची झलक**

सापडलेल्या वस्तूंमध्ये रिपुस्से धातुपत्रे देखील आहेत. हा कला प्रकार सर्वात उल्लेखनीय मानला जातो. हे एक प्रगत तंत्र आहे. यात धातूचा पत्रा ठोकून नाजुक नक्षी आणि प्रतिमा तयार केल्या जातात. सापडलेल्या कलाकृतींपैकी काही सोन्याचा तर काही शिसे-टिन मिश्रधातूपासून तयार केलेल्या आहेत. या पत्र्यांवर बुद्धांच्या वेगवेगळ्या मुद्रांमधील ध्यानस्थ प्रतिमा कोरलेल्या आहेत. या प्रतिमा केवळ धार्मिक भक्तीचे दर्शन घडवत नाहीत, तर द्वारावती काळातील कलाकारांच्या अप्रतिम कौशल्याची साक्ष देतात. रिपुस्से या तंत्रात धातूच्या पत्र्याच्या मागील बाजूने ठोकून पुढच्या बाजूला उठाव असलेली आकृती तयार केली जाते. यासाठी अत्यंत संयम, कौशल्य महत्त्वाचं आहे.

सापडलेल्या वस्तूंमध्ये सुमारे तीन बाय पाच इंच आकाराची आयताकृती सोन्याची पट्टी आहे. या पट्टीवर बुद्धांची प्रवचन देणाऱ्या मुद्रेतली प्रतिमा कोरलेली आहे. या प्रतिमेत बुद्धांच्या डोक्यावर गुंडाळलेले केस, कानाच्या लांब पाळी आणि तेजोवलय (प्रभामंडळ) स्पष्टपणे दिसते. या पट्टीच्या एका कोपऱ्यात लहान छिद्र आहे. त्यामुळे या पट्टीचा वापर गळ्यात घालण्यासाठी किंवा काही विशिष्ट पूजनासाठी केला जात असावा, असा अंदाज अभ्यासक व्यक्त करतात.सध्या सापडलेल्या मौल्यवान वस्तू थायलंडच्या फाईन आर्ट्स विभागाकडे सुपूर्त केल्या आहेत. सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करणाऱ्या थायलंडच्या फाईन आर्ट्स विभागाने या प्राचीन वस्तूंच्या संशोधनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# जान्हवी कपूर लवकरच अडकणार लग्नबंधनात

जान्हवी कपूर प्रोफेशनल आयुष्या सोबतच वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अभिनेत्री सोशल मीडियावरही कायम सक्रीय असते आणि तिच्याविषयीचे अपडेट्स शेअर करते. जान्हवी अनेकदा बॉयफ्रेंड शिखर पहाडियासोबतही दिसते. जान्हवी आणि शिखर लवकरच लग्न करणार अशा चर्चा होत्या. मात्र, आता जान्हवीने शेअर केलेल्या पोस्टमुळे लग्नाच्या चर्चांना हवा मिळाली असून पुन्हा एकदा जान्हवी लवकरच लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.



**जान्हवी कपूरची व्हायरल पोस्ट**

जान्हवी कपूरने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली होती, पण नंतर ती पोस्ट तिनं डिलीट केली. अभिनेत्रीनं पोस्ट जरी डिलीट केली असली तरी तिची ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होतेय. जान्हवी कपूरने इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत लिहिलं होतं की, '२९ ऑक्टोबर तारीख सेव्ह करा...' असं म्हणत अभिनेत्रीनं हार्ट इमोजी, डान्सिंग गर्ल आणि फ्लाईटचा फोटो शेअर केला आहे.

जान्हवीने स्टोरी डिलीट केल्यामुळे या पोस्टचा नेमका अर्थ काय? हे समजून येत नाहीये. तरीही चाहते जान्हवी लग्नबंधनात अडकणार का? असा प्रश्न उपस्थित करतायत. तर काही जण जान्हवीच्या 'चालबाज इन लंडन' या सिनेमाची घोषणा २९ ऑक्टोबरला होऊ शकते, असा अंदाज लावत आहेत. पण, या पोस्ट मागचा खरा अर्थ काय, हे समजण्यासाठी वाट पहावी लागेल. सध्या जान्हवी किंवा शिखर यांच्यापैकी दोघांनीही २९ ऑक्टोबरला काय होणार? याबद्दल अधिकृत माहिती दिलेली नाही.

# 'तिच्याबद्दल खूप चुकीचं बोलायचे', लेकीला दिसण्यावरून ट्रोल करणाऱ्यांबद्दल काजोलची प्रतिक्रिया

बॉलीवूडमधील स्टारकिड बद्दल अनेकदा बोललं जातं. काही वेळा त्यांचं कौतुक होतं तर काही वेळा सेलिब्रिटींच्या मुलांना ट्रोलिंगलाही सामोरं जावं लागतं. अशातच आता काजोलनेही याबद्दल सांगितलं आहे. काजोलने तिची लेक निसाला दिसण्यावरून बोललं गेलं होतं याबद्दल सांगितलं आहे.

काजोल नेहमीच विविध गोष्टींबद्दलची तिची मतं, प्रतिक्रिया स्पष्टपणे मांडत असते. ती अनेकदा तिच्या खासगी आयुष्यातील अनुभवदेखील शेअर करत असते. काजोल




अनेकदा मुलाखतींमधून तिच्या नवऱ्याबद्दल आणि मुलांबद्दल बोलताना दिसते. अशातच अभिनेत्रीने नुकतंच तिच्या लेकीबद्दल सांगितलं असून, तिच्या लेकीला निसा देवगणला तिच्या दिसण्यावरून खूप बोललं जायचं याबद्दल सांगितलं आहे.

काजोल व ट्विंकल सध्या त्यांच्या 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' या कार्यक्रमामुळे चर्चेत आहेत. या कार्यक्रमात आतापर्यंत बॉलीवूडमधील अनेक लोकप्रिय सेलिब्रिटींनी हजेरी लावली आहे. अशातच या कार्यक्रमाच्या नवीन भागात करण जोहर व जान्हवी कपूर यांनी हजेरी लावली. यावेळी काजोलने तिच्या लेकीबद्दल निसाबद्दल सांगितलं. त्यानंतर जान्हवी कपूरनेही तिला आलेल्या काही अनुभवांबद्दल सांगितलं.

कार्यक्रमात काजोल म्हणाली, 'मला आठवतंय जेव्हा निसा लहान होती तेव्हा खूप काही चुकीचं आणि नको नको ते तिच्याबद्दल बोललं गेलं. हे पापाराझी आणि सोशल मीडियावरील लोक तिच्याबद्दल खूप काही बोलायचे.

# 'चित्रपटासाठी त्याने खूप त्याग केला', रवी दुबेची रणबीर कपूरबद्दल प्रतिक्रिया; कौतुक करत म्हणाला

रवी दुबे हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक मालिका, रि?लिटी शोमध्ये काम केलं आहे. यासह तो एक निर्माताही आहे. लवकरच रवी दुबे नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटातून झळकणार आहे.

रवी दुबे कुठल्या न कुठल्या कारणांनी सतत चर्चेत असतो. तो व त्याची पत्नी सरगुन मेहता यांची स्वत:ची निर्मिती संस्थादेखील आहे. अशातच दोघांनी नुकतीच रणवीर अल्हाबादियाला मुलाखत दिली आहे. यामध्ये रवीने 'रामायण' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान रणबीर कपूरबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला आहे.

**रवी दुबेची रणबीर कपूरबद्दल प्रतिक्रिया**

'रामायण' चित्रपटात रणबीर कपूर श्रीरामांच्या तर रवी लक्ष्मणाच्या भूमिकेतून झळकणार आहे. रवी या मुलाखतीत आधी चित्रपटासाठी काम करण्याचा अनुभव सांगत म्हणाला, 'या भूमिकेमुळे माझ्यामध्ये खूप बदल झाला. भूमिकेला न्याय देण्यासाठी मला माझ्यामध्ये खूप बदल करावा लागला. माझं दिवसाचं वेळापत्रक पूर्णपणे बदललं होतं. माझ्यासह इतर सगळ्या कलाकारांनीही एवढीच मेहनत घेतली आहे. रणबीर कपूरनेसुद्धा. त्याने या चित्रपटासाठी खूप त्याग केला आहे. आम्ही सगळ्यांनी चित्रपटात साकारत असलेल्या पात्रांसाठी आमच्याकडून शक्य तितकी मेहनत घेतली आहे.'

रणबीर व रवी यांच्याबरोबर चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेता यश रावणाची भूमिका साकारणार आहे. या दोघांबद्दल रवी पुढे म्हणाला, 'रणबीरचा ऑरा खूप वेगळा आहे. तो शांत, संयमी, कामाशी एकनिष्ठ असा असतो, तो



खूप चांगला आहे; त्यामुळेच अनेक जण त्याला भेटल्यानंतर त्याचं कौतुक करतात. तर दुसरीकडे यश खूप वेगळा आणि सगळ्यांबरोबर मैत्रीपूर्वक संबंध ठेवणारा आहे. खूप चांगला आणि खरा माणूस आहे तो. हे दोघेही खूप वेगळे आहेत, पण दोघेही खूप चांगले आहेत.'


सप्टेंबर महिन्यात या वर्षी रणबीरने 'रामायण' चित्रपटासाठी स्वत:च्या काही गोष्टींमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतल्याचं म्हटलं जात होतं. माध्यमांच्या वृत्तानुसार तो सात्विक आहाराचं सेवन करत होता. व्यायाम, मेडिटेशन या गोष्टींमुळे शरीराला शिस्त लावून जेणेकरून पात्र साकारताना याचा उपयोग होईल यासाठी तो या गोष्टी करत असल्याचेही म्हटलं गेलं. त्याने केवळ मद्यपानच सोडलेले नाही, तर तो आता मांस, मच्छी, मटण असं काहीही खात नसून शाकाहारी झाला आहे.

# माझ्याबरोबर लग्न करशील का? गश्मीर महाजनीला चाहतीने थेट घातली लग्नाची मागणी

गश्मीर महाजनी मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता आहे. गश्मीर मराठीसह हिंदीतही काम करत असतो. त्याने अनेक चित्रपट व वेब सीरिजमधून आजवर काम केलं आहे. गश्मीर सोशल मीडियावरही सक्रिय असतो. अनेकदा यामार्फत तो त्याच्या खासगी आयुष्याबद्दलही सांगत असतो.

गश्मीर सोशल मीडियामार्फत त्याच्या कामासंबंधित अपडेट तसेच खासगी आयुष्यातील घडामोडी प्रेक्षकांबरोबर शेअर करत असतो. अशातच त्याने नुकतच इन्स्टाग्रामवर 'आस्क मी' हे सेशन घेतलं आहे, जिथे त्याने त्याच्या चाहत्यांनी त्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली आहेत. यावेळी गश्मीरला व्यावसायिक आयुष्यासह खासगी आयुष्याबद्दलही अनेक प्रश्न विचारण्यात आले.

गश्मीरला यावेळी त्याच्या एका चाहतीने माझ्याबरोबर लग्न करशील का? असा प्रश्न विचारला. यावर उत्तर देत गश्मीर म्हणाला, 'माझं लग्न झालं ग आणि मी माझ्या बायको आणि परिवारासोबत खूप खूश आहे.' पुढे एकाने गश्मीरला बॉलीवूडमध्ये काम करायला आवडेल का आणि कोणत्या कलाकाराबरोबर काम करायला आवडेल असं विचारलं. यावर गश्मीरने 'माझी तशी काही इच्छा नाही' म्हणत उत्तर दिलं.





गश्मीर महाजनी इन्स्टाग्राम स्टोरी

गश्मीर अनेकदा सोशल मीडियावर हे सेशन घेत असतो आणि त्याच्या चाहत्यांच्या प्रश्नांची उत्तरं देत असतो. यावेळीसुद्धा त्याला अनेक वेगवेगळे प्रेश्न विचारले. यादरम्यान त्याचे चाहते त्याच्या चित्रपटांतील कामाचं कौतुकही करत असतात.

गश्मीर अनेक हिंदी वेब सीरिजमध्येही काम करताना दिसतो, त्यामुळे त्याचा चाहतावर्गही वाढत असल्याचं पाहायला मिळतं. त्याने आजवर 'फुलवंती', 'सरसेनापती हंबीरराव', 'धर्मवीर', 'बोनस', 'मला काहीच प्रॉब्लम नाही', 'डोंगरी का राजा', 'कान्हा', 'देऊळ बंद', 'कॅरी ऑन मराठा' यांसारख्या अनेक चित्रपटांत काम केलं आहे. त्याने हिंदी मालिकेतही काम केलंय; तर गश्मीरने 'प्रेमा तुझा रंग कसा', 'श्रीकांत बशीर', 'तू जख्म हैं', 'गुन्हा' यासारख्या हिंदी वेब सीरिजमध्ये काम केलं आहे.

# मैत्रिणीमुळे ओळख, दादा म्हणून मारायची हाक

मराठी अभिनेत्री प्राजक्ता कुलकर्णी सध्या 'ठरलं तर मग' या मालिकेमध्ये दिसत असून या मालिकेमध्ये त्यांनी कल्पनाची भूमिका साकारली आहे. प्राजक्ता यांनी यापूर्वी अनेक मालिका, सिनेमा आणि नाटकांमध्ये काम केलं आहे. अशातच आता प्राजक्ता यांची एक मुलाखत चर्चेत आली आहे. या मुलाखतीदरम्यान प्राजक्ता यांनी त्यांची लव्ह-स्टोरी सांगितली आहे. प्राजक्ता यांनी नुकतीच दिवाळी पाडवानिमित्त पती राजन यांच्यासोबत 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान त्यांनी अनेक मजेदार किस्से शेअर केले. प्राजक्ता यांनी सांगितलं की, त्या राजन यांना बघताच क्षणी त्यांच्या प्रेमात पडल्या होत्या. त्याचबरोबर त्या सुरुवातीला राजन यांना दादा म्हणायच्या. प्राजक्ता कुलकर्णी म्हणाल्या की,



'यांची चुलत बहिण ही माझी लहानपणापासूनच मैत्रीण आहे. तर हा सुट्टीमध्ये तिच्याकडे राहायला यायचा. तेव्हा आम्ही दादरला राहायचो तर हा अंधेरीला राहायला. त्यावेळी शाळेच्या दिवसांमध्ये मी तिच्याकडे अभ्यासाला राहायला जायचे.'

पुढे प्राजक्ता म्हणाल्या की, 'ती कायम याचं कौतुक करायची. तिच्या तोंडी नेहमी राजनचं नाव असायचं.

थोडक्यात हा तिचा गुरु होता. तो जे काम करायचा ती ते आम्हाला सांगायची. त्यावेळी मीही त्याला दादा म्हणायचे. तेव्हा मीही तिला मोठ्या उत्सुकतेने याबद्दल विचारायचे. त्याचदरम्यान, तिने घराचं नवीन काम केल्याचे फोटो दाखवले. ती गोष्ट मी माझ्या बाबांनी सांगितली. त्यात माझे बाबा खूप हौशी होते. आम्ही त्यावेळेस चाळीत राहायचो.


अर्चनाचं सजवलेलं घर पाहून बाबा म्हणाले, बोलाव त्याला आपण काहीतरी करायला सांगू. त्यानंतर मग याने संपूर्ण घराचं काम घेतलं. पण, जेव्हा तो पहिल्यांदा माझ्या घरी आला तेव्हा लव्ह अ‍ॅट फर्स्ट साईट असं झालं.'

# लग्नाआधीच वडील होण्याची जबाबदारी कळली, भूषण प्रधान

भूषण प्रधान मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांत विविध भूमिका साकारत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. सध्या तो त्याच्या 'तू माझा किनारा' या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. यानिमित्त भूषण यात एका मुलीच्या वडिलांची भूमिका साकारण्याबद्दल बोलला आहे.

भूषण प्रधान लवकरच 'तू माझा किनारा' या चित्रपटातून झळकणार आहे. यामध्ये त्याच्यासह अभिनेत्री केतकी नारायण व बालकलाकार केया इंगळे झळकणार आहे. येत्या ३१ ऑक्टोबरला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. अशातच यानिमित्त भूषणने 'लोकमत फिल्मी'ला दिलेल्या मुलाखतीत चित्रपटात वडिलांची भूमिका साकारण्याचा अनुभव सांगितला आहे.

तू माझा किनारामधील



भूमिकेबद्दल भूषणची प्रतिक्रिया


मुलाखतीत भूषणला चित्रपटाबद्दल विचारल्यानंतर तो म्हणाला, 'मला या कुटुंबाची गोष्ट खूप भावली. याआधी मी कधीच वडिलांची भूमिका साकारली नव्हती आणि हे जे नातं चित्रपटात ज्या पद्धतीने उलगडत जात आहे, हे असं मी कधीच चित्रपटात अनुभवलं नव्हतं. काही गोष्टी ज्या आपल्या आयुष्यात घडलेल्या नसतात, आपल्याला त्या या मार्फत अनुभवता येतात.'

भूषण पुढे म्हणाला, 'मी खऱ्या आयुष्यात अजून वडील झालेलो नाहीये, पण असं असतानाही ही भूमिका साकारताना तो अनुभव मला घेता आला. मला भाचा, भाची, पुतणे, पुतणी आहेत; त्यामुळे मी खूप कडक शिस्तीचा काका, मामा आहे. त्यातून पालकत्वाचा थोडासा अनुभव येतो, पण तरीही वडिलांची भूमिका खऱ्या आयुष्यात अनुभवली नव्हती आणि तीच यातून अनुभवता येतेय.'

भूषण पुढे त्याने काम केलेल्या चित्रपटांबद्दल म्हणाला, 'मी आजवर अनेक नवीन दिग्दर्शकांबरोबर काम केलं आहे. चित्रपट का करायचा याबद्दलची स्पष्टता असल्यामुळे मला कधीच मी केलेल्या चित्रपटाची लाज वाटली नाही.

# आयुष्मान खुरानाच्या 'थामा'ने चौथ्या दिवशी किती केली कमाई?

सरपोतदार दिग्दर्शित 'थामा' हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होऊन चार दिवस झाले आहेत. समीक्षक आणि प्रेक्षकांकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. या चित्रपटात आयुष्मान खुराना, रश्मिका मंदाना, नवाजुद्दीन सिद्दीकी, परेश रावल, सत्यराज, गीता अग्रवाल आणि रचित सिंग यांच्यासह इतर कलाकार आहेत.चित्रपटाने तीन दिवसांत ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली होती, परंतु आता त्याची कमाई कमी झाली आहे. चित्रपटाने चौथ्या दिवशी, शुक्रवारी किती व्यवसाय केला ते जाणून घेऊया.'स्त्री', 'स्त्री २', 'रूही', 'भेडिया' आणि 'मुंज्या'नंतर 'थामा' हा मॅडॉक फिल्म्सचा सहावा हॉरर कॉमेडी चित्रपट आहे. त्याची कथा प्रेक्षकांना भावते आणि चित्रपटाने अवघ्या तीन दिवसांत ५० कोटी क्लबमध्ये प्रवेश केला. सॅकनिल्कच्या अहवालानुसार, दिवाळीला, २१ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झालेल्या 'थामा'ने पहिल्या दिवशी २४ कोटी रुपये कमावले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी १८.६ कोटी रुपये आणि तिसऱ्या दिवशी १३ कोटी रुपये कमावले.आता शुक्रवारी, चौथ्या दिवशी, चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये घट झाली आहे. सॅकनिल्कच्या अहवालानुसार, चित्रपटाने ३.७९ कोटी कमावले, ज्यामुळे त्याचे एकूण कलेक्शन ५९.३९ कोटी झाले.



# अजय देवगणचा 'भूत' ते अनुष्का शर्माचा 'परी' बॉलीवूडमधील कलाकारांचे 'हे' हॉरर चित्रपट

हॉरर चित्रप टांचा एक वेगळा चाहतावर्ग असतो. गूढ, रहस्य मय आणि हॉरर कथानक असलेले चित्रपट प्रेक्षक मोठ्या प्रमाणात पहात असतात. आता ओटीटीच्या काळात तर कुठल्याही भाषेतील, देशातील हॉरर चित्रपट प्रेक्षकांना घरबसल्या फोनमार्फतही पाहता येतात. बॉलीवूडमध्येही असेच काही हॉरर चित्रपट आहेत.

राज – बॉलीवूडमधील हॉरर चित्रपटांबद्दल बोलायचं झालं तर यातील एक म्हणजे 'राज' हा चित्रपट. विक्रम भट्ट यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. अभिनेत्री बिपाशा बासू आणि दिनो मोरिया यामध्ये झळकले होते. या चित्रपटात एक नवरा बायकोची जोडी उटी येथे सुखात रहात असतात, पण त्यांना अचानक काही आवाज येऊ लागतात आणि भास होतात, ज्यानंतर कथानकात ट्विस्ट येतो. 'राज' चित्रपटात रहस्य, गूढ आणि थ्रिलर पाहायला मिळतो.भूत – राम गोपाल वर्मा दिग्दर्शित 'भूत' हा चित्रपट २००३ मध्ये प्रदर्शित झालेला. यामध्ये अजय देवगण, उर्मिला मातोंडकर, फरदीन खान, संजय ठक्कर, रेखा आणि नाना पाटेकर असे बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकार पाहायला मिळतात. या चित्रपटात एका दांपत्याला त्यांच्या नवीन घरात एक भूतनी त्रास देत असते असं पाहायला मिळतं. तर या चित्रपटाची एकूनच कथा खूप रंजक आहे.




कृष्णा कॉटेज – 'कृष्णा कॉटेज' हा चित्रपट मित्रांच्या गोष्टीवर आधारित आहे. हे मित्र एक पुस्तक वाचतात आणि त्यानंतर त्यांच्या आयुष्यात विचित्र आणि भीषण घटना घडू लागतात. त्यांच्यात दिशा नावाची एक मुलगी येते आणि मग एकामागोमाग एक मृत्यू होऊ लागतात. सोहेल खान, ईशा कोप्पीकर आणि अनिता हसनंदानी यांच्या भूमिका असलेला हा चित्रपट २००० च्या दशकातील गाजलेल्या हॉरर चित्रपटांपैकी एक आहे.परी – बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री अनुष्का शर्मा यामध्ये मुख्य भूमिकेत आहे. यात तिने रुकसाना ही भूमिका साकारली आहे.

# थिएटरमध्ये पुन्हा प्रदर्शित होणार शाहरुख खानचे 'हे' गाजलेले चित्रपट

शाहरुख खान बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्याने त्याच्या अभिनयशैलीने आणि हटके स्टाईलने प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. त्याने आजवर विविध चित्रपटांत काम केलं आहे. अशातच आता एसआरकेच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. अभिनेत्याचे काही गाजलेले चित्रपट पुन्हा प्रदर्शित होणार आहेत.शाहरुख खानचे गाजलेले चित्रपट प्रेक्षकांना पुन्हा एकदा चित्रपटगृहात जाऊन पाहता येणार आहेत. अभिनेत्याच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त हा फिल्म फेस्टिव्हल सुरू होणार आहे. येत्या २ नोव्हेंबरला एसआरकेचा वाढदिवस आहे. यानिमित्त या फेस्टिव्हलचं आयोजन करण्यात आलं आहे. ३१ ओक्टोबरला हा फिल्म फेस्टिव्हल सुरू होणार असून शाहरुख खानने पोस्ट शेअर करत याबद्दलची माहिती दिली आहे.शाहरुख खानने पोस्ट शेअर करत दिली माहितीशाहरुख खानने इन्स्टग्रामवर याबद्दल पोस्ट करत, 'माझे काही चित्रपट पुन्हा एकदा चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहेत, त्यामध्ये मी होतो तसाच आजही आहे; फक्त केस जरा वेगळे आहेत आणि आता मी अधिक छान दिसत आहे' असं म्हटलं आहे. यावेळी त्याने खाली द शाहरुख खान फिल्म फेस्टिव्हल ३१ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून भारतातील काही ठराविक चित्रपट गृहांत हे चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचं म्हटलं आहे.या फिल्म फेस्टिव्हलमध्ये शाहरुख खानचे 'मै हू ना', 'चेन्नई एक्स्प्रेस', 'देवदास', 'दिल से', 'कभी हा कभी ना', 'जवान' आणि 'ओम शांती ओम' या चित्रपटांचा समावेश आहे;



# आरोग्यम् धनसंपदा




आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक लोकांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनियमित दिनचर्या, ताणतणाव, अपूर्ण झोप आणि असंतुलित आहार यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. आरोग्य राखण्यासाठी दैनंदिन जीवनात काही साध्या पण प्रभावी उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या ब्लॉग पोस्टमध्ये, तुमच्या दैनंदिन जीवनात आरोग्य कसे राखावे याबाबत काही महत्त्वाच्या दिल्या आहेत, या टिप्स चा वापर करून निरोगी आयुष्य जगण्यास सुरुवात करू शकता.

सकाळी लवकर उठण्याचे अनेक फायदे आहेत. हे तुम्हाला फ्रेश आणि ॲक्टिव्ह ठेवते. पहाटेच्या थंड आणि ताज्या हवेत चालणे किंवा व्यायाम करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. सकाळी ५ च्या दरम्यान उठल्यास दिवसभर आळस कमी येतो.

रोजच्या व्यायामामुळे शरीरातील सर्व अवयव निरोगी राहतात. व्यायामामुळे ब्लड सरकुलेशन सुधारते, पचनक्रिया सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. योग, धावणे, चालणे, सायकल चालवणे किंवा जिममध्ये व्यायाम करणे हे चांगले पर्याय आहेत. रोजच्या व्यायामाची एक ठराविक वेळ असावी आणि दररोज किमान ३० मिनिटे तरी व्यायाम करावा.

आरोग्यासाठी संतुलित आहार घेणे महत्त्वाचे आहे. आपल्या आहारात सर्व प्रकारचे पोषक घटक असावेत. यामध्ये प्रोटीन, व्हिटॅमिन, खनिजे आणि फायबर असणे आवश्यक आहे. फळे, भाज्या, धान्य, कडधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थांचा आहारात समावेश करा.

पुरेशी झोप घेतल्याने शरीर आणि मन ताजेतवाने राहते. दररोज किमान ७-८ तासांची झोप घेणे आवश्यक आहे. झोप जर पूरक झाली नाही तर मानसिक आणि शारीरिक ताण वाढू शकतो.

स्ट्रेस आणि चिंता आरोग्यावर निगेटिव्ह परिणाम करू शकतात. स्ट्रेस कमी करण्यासाठी मेडिटेशन, योग किंवा श्वसनाचे व्यायाम करणे फायदेशीर आहे. तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टींमध्ये वेळ घालवणे, पुस्तक वाचन, संगीत ऐकणे हे देखील ताण कमी करू शकतात.

दिवसभरात पुरेसे पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि त्वचा चमकदार राहते. दररोज किमान ८-१० ग्लास पाणी प्या. पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशन होऊ शकते, ज्यामुळे थकवा, डोकेदुखी आणि एकाग्रता कमी होण्याची शक्यता असते. पाणी पिल्याने शरीराच्या सर्व कार्यप्रणाली व्यवस्थित कार्य करतात. तुम्ही लिंबू, पुदीना किंवा फळांच्या तुकड्यांसह पाणी अधिक स्वादिष्ट करू शकता.

स्वच्छता पाळणे आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. नियमितपणे हात धुणे, आंघोळ करणे, दात घासणे या गोष्टींची काळजी घ्या. स्वच्छता राखल्यामुळे संसर्गजन्य रोगांपासून बचाव होतो.

तंबाखू किंवा घुटका, या सारख्या विषारी वस्तूंचे सेवन करू नये, हे सर्व आरोग्यासाठी हानिकारक आहेत. हे अनेक गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकतात. तंबाखू आणि सिगरेट टाळल्यास कॅन्सर होण्यापासून बचाव होतो.

आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करणे महत्त्वाचे आहे, जसे की - संपूर्ण रक्ततपासणी, मधुमेह तपासणी, कोलेस्टेरॉल तपासणी, लिव्हर फंक्शन टेस्ट (एलएफटी), किडनी फंक्शन टेस्ट (केएफटी) इत्यादी. यामुळे कोणतेही आजार लवकर ओळखता येतात आणि त्यावर योग्य वेळी उपचार घेता येतात. आपल्या डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित आरोग्य तपासणी करून घ्या.

शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्यही महत्त्वाचे आहे. आपले विचार पॉजिटीव्ह ठेवा, मेंटल स्ट्रेस टाळा आणि जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद घ्या. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी करा आणि नेहमी हसत राहा.

फळे आणि भाज्यांमध्ये आवश्यक व्हिटॅमिन्स आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे दररोजच्या आहारात फळे आणि भाज्यांचा समावेश करावा. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि शरीर तंदुरुस्त राहते. फळे आणि भाज्यांमधील फायबरमुळे पचनशक्ती सुधारते आणि वजन नियंत्रित राहते. विविध रंगांची फळे आणि भाज्या खाण्याचा प्रयत्न करा, कारण प्रत्येक रंगाचे वेगवेगळे पोषक घटक असतात. यामुळे त्वचा, केस आणि एकूणच शारीरिक आरोग्य सुधारते.

अल्कोहोलचे सेवन मर्यादित ठेवल्याने आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम कमी होतात. अधिक प्रमाणात अल्कोहोलचे सेवन केल्याने लिव्हर, लंग्स, हार्ट आणि इतर अवयवांवर परिणाम होऊ शकतो.

गोड पदार्थांचे अधिक सेवन केल्याने वजन वाढू शकते आणि डायबेटिस सारखे आजार होऊ शकतात. त्यामुळे गोड पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवावे आणि शक्यतो नैसर्गिक गोड पदार्थांचा समावेश करावा. जसे की फळे.

तंदुरुस्त राहण्यासाठी वजनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वजन वाढल्याने अनेक आजार होऊ शकतात. संतुलित आहार, रोज व्यायाम आणि ६ -८ तास झोप यामुळे वजन नियंत्रणात राहते.

धूम्रपान आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. यामुळे फुफ्फुसाचे विकार, हृदयविकार आणि कर्करोग होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे धूम्रपान टाळावे आणि निरोगी जीवन जगावे.

दर ३-४ तासांनी थोडेसे खाणे आरोग्यासाठी चांगले असते. यामुळे पचनशक्ती सुधारते आणि ऊर्जा टिकून राहते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात एकावेळी खाण्यापेक्षा नियमित अंतराने थोडेसे खाण्याची सवय लावा.

ताजे आणि घरगुती अन्न खाणे आरोग्यासाठी सर्वोत्तम आहे. बाहेरचे अन्न टाळा आणि शक्यतो ताजे आणि पौष्टिक अन्न खा. यामुळे पचनशक्ती सुधारते आणि शरीर निरोगी राहते.

नियमित वेळी जेवण करणे, झोपणे आणि उठणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. यामुळे शरीराची जैविक घडी स्थिर राहते आणि पचनशक्ती सुधारते. त्यामुळे नियमित वेळा पाळण्याची सवय लावा.

कामाच्या दरम्यान पुरेशी विश्रांती घेणे आवश्यक आहे. यामुळे ताण कमी होतो आणि कार्यक्षमता वाढते. दर दोन तासांनी थोडावेळ विश्रांती घ्या आणि ताजेतवाने व्हा. विश्रांतीमुळे मन शांत होते आणि नवीन ऊर्जा मिळते. विश्रांतीदरम्यान काही श्वासाचे व्यायाम, मेडिटेशन किंवा स्ट्रेस कमी करण्यासाठी हलक्या खेळांचा समावेश करा. दिवसभरात काही मिनिटांचा ब्रेक घेणे आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. विश्रांतीमुळे एकाग्रता सुधारते आणि कामात उत्साह वाढतो.

सकारात्मक विचार आणि दृष्टिकोन आरोग्यासाठी महत्त्वाचे आहेत. नेहमी सकारात्मक विचार करा, ताण कमी करा आणि जीवनातील प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या. सकारात्मक विचारांमुळे मानसिक आरोग्य सुधारते आणि जीवनात आनंद येतो.

या आरोग्य टिप्स तुम्हाला निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतील. आपल्या दैनंदिन जीवनात या टिप्सचा अवलंब करा आणि निरोगी जीवन जगा.

# रोजच्या आहारात मटकीचा समावेश कसा करावा?

भारतीय स्वयंपाकघरात अनेक प्रकारच्या कडधान्यांना मानाचे स्थान आहे, त्यात 'मटकी' मराठी घरात हमखास आढळणारे आणि लोकप्रिय असलेले कडधान्य आहे. थालीपीठ, उसळ, मिसळ, पावभाजी, भेळ अशा पदार्थांमध्ये मटकीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. बऱ्याच ठिकाणी तर आपल्याला मटकी मिसळही मिळते. किंबहुना, ग्रामीण भागात तर ही मटकी पिकवण्यापासून ते रोजच्या जेवणात वापरण्यात अग्रेसर आहे.

मटकी हे एक प्रकारचं कडधान्य आहे, ज्याची उष्ण आणि कोरड्या हवामानात चांगली वाढ होते. मटकीच्या पिकाला पाण्याची गरज कमी असल्याने ती महाराष्ट्र, राजस्थान, आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक या भागात मोठ्या प्रमाणावर पिकवली जाते.मटकीचे आरोग्यदायी फायदे प्रथिनांचा उत्कृष्ट स्रोत : मटकीमध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने असतात. शाकाहारी लोकांसाठी ही एक महत्त्वाचा प्रथिनयुक्त घटक आहे. तंतुमय आहार : यात भरपूर तंतू आहेत, जे पचनसंस्था सुधारतात, बद्धकोष्ठता दूर करतात आणि पोट साफ ठेवण्यास मदत करतात. लोह, कॅल्शियम आणि जीवनसत्त्वांचा भरणा: मटकीमध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, फॉस्फरस, मॅग्नेशियमसारखी खनिजे आणि बी व्हिटॅमिन्स प्रमाणात मिळतात. त्यामुळे रक्ताची कमतरता, हाडांची मजबुती, आणि शरीराचा नैसर्गिक उर्जा स्तर राखण्यात मदत होते.



हृदयाचे आरोग्य राखते : यात असलेल्या तंतूमुळे आणि कोलेस्टेरॉल कमी करणाऱ्या घटकांमुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. मटकी नियमित सेवन केल्याने रक्तातील वाईट कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते. डायबेटीससाठी फायदेशीर : मटकीमध्ये असणारे तंतू आणि कमी ग्लायसेमिक इंडेक्स यामुळे रक्तातील साखर हळूहळू आणि नियंत्रित प्रमाणात वाढते. त्यामुळे मधुमेही रुग्णांना मटकी खाणे फायदेशीर ठरते. वजन नियंत्रणात मदत : जास्त प्रथिने, तंतू असलेली मटकी पोट भरण्यास मदत करते; खात्रीशीरपणे पोट भरलेले राहते आणि पोट लवकर रिकामे लागत नाही. हे वजन नियंत्रित ठेवण्यास मदत करते. रोगप्रतिकारक शक्ती वाढवते : यात असलेल्या विविध खनिजे आणि जीवनसत्त्वांमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते. लहान मुलांसाठी उपयुक्त : लहान मुलांच्या वाढीसाठी मटकी फायद्याची आहे. निवडून दिलेल्या आणि योग्यरित्या शिजवलेल्या मटकीचे पदार्थ पालकांनी त्यांच्या आहारात द्यावेत. काही लोकांना मटकी किंवा इतर कडधान्ये खाल्याने पोट फुगणे, वायू होणे अथवा जुलाब होऊ शकतात. हे टाळण्यासाठी मटकी भिजवून, उकडून किंवा अंकुरित करून खावी. ॲलर्जिक प्रतिक्रिया : कडधान्ये कधी-कधी काही लोकांना ॲलर्जी देऊ शकतात. त्वचेवर लालसरपणा, खाज, सूज – अशी लक्षणे आढळल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कच्च्या स्वरूपात न खाणे योग्य : कच्ची मटकी, न शिजवता किंवा योग्य प्रकारे अंकुरित न करता, खाल्ली गेल्यास पचनावर वाईट परिणाम होऊ शकतो. किमान उकडून/ शिजवून मटकी खावी. पुरेशी विविधता राखा : कोणतेही एकाच कडधान्यास अती प्रमाणात खाऊ नये. आहारात विविधता आणि संतुलन राखणे गरजेचे.

मटकी हे आपल्या आहारासाठी उत्तम प्रथिन व पोषणसंपन्न पर्याय आहे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनी ही डाळ अंकुरित, उकडून किंवा विविध पदार्थांसोबत संतुलित प्रमाणात खावी. पचनाच्या समस्या किंवा ॲलर्जी असल्यास वैद्यकीय सल्ला घ्या.

# डायबिटीजसाठी 'हे' एक फळ वरदान



फळं खरं तर आपण विचार करतो त्यापेक्षा अनेक पटीने शरीरासाठी फायदेशीर असतात. एका नवीन अभ्यासातून असे दिसून आले आहे की, सर्वात आवडते उन्हाळी फळ शरीरासाठी किती प्रभावी ठरू शकते. संशोधकांना असे आढळले आहे की, दररोज स्ट्रॉबेरीचे सेवन केल्याने प्रीडायबिटीज असलेल्या प्रौढांमध्ये रक्तातील साखर कमी होण्यास, जळजळ कमी होण्यास आणि अँटी-ऑक्सिडंट्सची पातळी वाढण्यास मदत होऊ शकते. यामुळे मधुमेह प्रतिबंधासाठी एका साध्या फळाचा खूप मोठा फायदा होऊ शकतो.

साधारण चयापचय आणि टाइप-२ डायबिटीज यांच्यातील प्रीडायबिटीज हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये रक्तातील साखरेमध्ये सौम्य वाढ आणि इन्सुलिन प्रतिरोधकता दिसून येते. न्यूज मेडिकल डॉट नेटच्या अहवालानुसार, या असंतुलनामुळे अनेकदा ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ होते. हे दोन प्रमुख घटक स्वादुपिंडाच्या पेशींना नुकसान करतात आणि इन्सुलिन प्रतिसाद बिघडवतात.

नवीन संशोधनातून असे दिसून आले की, स्ट्रॉबेरी प्रीडायबिटीजशी लढण्यास मदत करू शकतात. १२ आठवड्यांच्या एका अभ्यासात असे आढळून आले की, दररोज फ्रीजमध्ये साठवलेल्या स्ट्रॉबेरीमुळे अँटी-ऑक्सिडंटची पातळी वाढते. जळजळ कमी होते आणि उपवासावेळी रक्तातील साखर नियंत्रित राहते. हे चयापचय आरोग्यासाठी फायदेशीर मार्ग आहे. स्ट्रॉबेरी टाइप २ मधुमेहाची प्रगती रोखण्यास मदत करू शकतात.

जेव्हा रक्तातील साखरेची पातळी वाढते, तेव्हा शरीर अधिक रिॲक्टिव्ह ऑक्सिजन स्पीसीज तयार करते, जे इन्सुलिनच्या कार्यात व्यत्यय आणू शकते. कालांतराने यामुळे दीर्घकालीन दाह होतो.

# हार्ट अटॅकच्या ९९ टक्के रुग्णांमध्ये समान धोकादायक घटक

फकीर या नावाने ओळखले जाणारे गायक आणि अभिनेता ऋषभ टंडन यांचं बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी वयाच्या ३५ व्या वर्षी दिल्लीमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. ते मुंबईत आपल्या पत्नी आणि अभिनेत्री- मॉडेल ओलेसिया नेडोबेगोवा यांच्याबरोबर राहत होते. मात्र दिवाळी साजरी करण्यासाठी ते आपल्या कुटुंबाबरोबर काही दिवसांसाठी दिल्लीला गेले होते. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबाला जबर धक्का बसला आहे. गेल्या काही वर्षात कमी वयात येणाऱ्या हृदयविकाराच्या झटक्यांचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे एकूणच हृदयविकार ही जागतिक समस्या ठरते आहे. यासंदर्भात गेले दशकबर सुरु असलेल्या संशोधनात काही



महत्त्वाची निरीक्षण आढळून आली आहेत.

९९ टक्के हृदयविकारांच्या रुग्णांमध्ये काही समान गोष्टी आढळल्या आहेत. त्या मुख्यत्त्वे हृदयविकारासाठी कारणीभूत ठरतात आणि त्यांची काळजी घेतली तर हृदयविकार टाळता येऊ शकतो, असा दावा या संशोधकांनी केला आहे.

हृदयाच्या आजाराची लक्षणं ओळखून योग्य वेळी उपचार आणि काळजी घेतली, तर सुमारे ८० टक्के हृदयविकाराची प्रकरणं पूर्णपणे टाळता येऊ शकतात. म्हणजेच, योग्य जीवनशैली, तपासण्या आणि वैद्यकीय सल्ल्याचं पालन केल्यास अनेकांचा जीव वाचू शकतो, असं मत तज्ज्ञ व्यक्त करतात.

सिएटल येथे झालेल्या एका क्रांतिकारी संशोधनात एक अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष समोर आला आहे.

या संशोधनात असं दिसून आलं की, हृदयविकाराचा झटका किंवा मेंदूला रक्तपुरवठा बंद होऊन येणारा झटकाआलेल्या ९९ टक्क्यांहून अधिक लोकांमध्ये आरोग्यासाठी घातक असलेल्या गोष्टींना नियंत्रित ठेवण्याची काळजी घेण्यात आली नव्हती. या गोष्टींचे वर्णन जोखीम असलेले घटक म्हणून करण्यात येते.

रक्तदाब वाढलेला असणं, रक्तातील साखर (डायबिटीज) जास्त असणं, कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढणं, वजन जास्त असणं, धूम्रपान किंवा व्यायामाचा अभाव इत्यादी.

# 'हे' पदार्थ खाल्ल्यानंतर चुकूनही पिऊ नका पाणी

पाणी हे आपल्या शरीराचे अन्न आहे, जे आपले शरीर आतून स्वच्छ करण्यास मदत करते, शरीर हायड्रेटेड ठेवते आणि शरीराचे अवयव योग्यरित्या कार्य करतात. शरीर निरोगी ठेवण्यासाठी दररोज दीड ते दोन लिटर पाणी पिणे महत्त्वाचे आहे. ते पचन, पोषक तत्वांचे शोषण आणि एकूण शरीराच्या कार्यात मदत करते. ते चयापचय नियंत्रित करते, बद्धकोष्ठता प्रतिबंधित करते आणि दिवसभर ऊर्जेची पातळी राखते. पाणी आरोग्यासाठी आवश्यक आहे. साधारणपणे पाणी पिणं फायदेशीर मानलं जात असलं तरी, काही पदार्थ खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचन बिघडू शकते. काही पदार्थ जे नैसर्गिकरित्या पाण्यासारखे असतात, त्यात जास्त पोषक घटक असतात. ते पाण्यात मिसळल्यास पचनावर परिणाम होऊ शकतो.

लाइफ सायन्सेस जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्याने पाचक एन्झाइम कमकुवत होऊ शकतात आणि पचन मंदावते. आयुर्वेदाने जेवणानंतर किमान ३० मिनिटे वाट पाहण्याची शिफारस केली आहे. जेणेकरून पाचक शक्ती मजबूत राहील आणि पचन योग्य राहील. आता प्रश्न उद्भवतो की कोणते पदार्थ खाल्ल्यावर पाणी प्यावे आणि किंवा कोणते पाणी प्यावे तसंच कोणते नाही हे कसे ओळखावे. कोणते पदार्थ खाल्ल्यानंतर सेवन केल्यास आम्लता वाढते आणि आतड्यांचे आरोग्य बिघडते ते जाणून घेऊ.

**टरबूज खाल्ल्यावर पाणी पिऊ नका**

टरबूजमध्ये अंदाजे ९६ टक्के पाणी असते. जेवणानंतर लगेच जास्त पाणी प्यायल्याने पचनावर परिणाम होऊ शकतो. टरबूजमध्ये आधीच भरपूर पाणी असते, त्यामुळे खाल्ल्यानंतर जास्त पाणी प्यायल्याने पाचक रस पातळ होऊ शकतो, पचन मंदावते आणि पोटफुगी वाढते. टरबूज खाल्ल्यानंतर किमान ४० ते ५० मिनिटे थांबून पाणी पिणे उत्तम.

**केळं खाल्ल्यानंतर पाणी पिऊ नये**

केळामध्ये पोटॅशियम, फायबर आणि नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असते. केळी खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने मळमळ आणि पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. केळी पचण्यासाठी पुरेसे पाचक एन्झाइम आणि आम्ल आवश्यक असते. केळी खाल्ल्यानंतर जर तुम्हाला पाणी प्यायचे असेल तर अर्धा तास थांबा.



**लिंबूवर्गीय फळे**

संत्री, लिंबू आणि द्राक्ष यासारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये फायबर, व्हिटॅमिन सी आणि अँटी-ऑक्सिडंट्स असतात. असं असताना खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनावर परिणाम होऊ शकतो. लिंबूवर्गीय फळे पोटात आम्ल उत्पादन वाढवतात आणि पाणी प्यायल्याने हे संतुलन बिघडू शकते. त्यामुळे गॅस, पोटफुगी किंवा पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. लिंबूवर्गीय फळे खाल्ल्यानंतर किमान अर्धा तास पाणी पिणं टाळा.

**शेंगदाण्यांसोबत पाणी पिऊ नका**

शेंगदाण्यांत प्रथिने असतात आणि शरीराचे तापमान वाढवून चयापचय वाढवतात. शेंगदाणे खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचन मंदावते. प्रामुख्याने मुलांमध्ये. पाण्यामुळे पचन प्रक्रिया मंदावते. त्यामुळे पोटात जडपणा किंवा अस्वस्थता येऊ शकते. शेंगदाणे खाल्ल्यानंतर २० ते ३० मिनिटे पाणी पिऊ नका.

**दुधासोबत पाणी पिऊ नका**

दुधात कॅल्शियम, प्रथिने आणि आवश्यक जीवनसत्वे असतात. गरम दूध प्यायल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. पाणी दुधाच्या पचनासाठी आवश्यक असलेले आम्ल आणि एन्झाइम पातळ करते, त्यामुळे चयापचय मंदावतो आणि पोटातील आम्लता वाढते. दूध प्यायल्यानंतर किमान ३० मिनिटे ते १ तास थांबा आणि मग पाणी प्या.

# पतीने विवाहबाह्य संबंध ठेवले तर ...



एखाद्या व्यक्तिला माहीत आहे की, समोरच्या माणसाचं लग्न झालं आहे. तो माणूस त्याचं कौटुंबिक आयुष्य जगतो आहे. असं असूनही ती व्यक्ती त्या माणसाशी जवळीक वाढवते. पुढे याचेच विवाहबाह्य संबंधात रूपांतर होते. त्यावेळी नेमकी चूक कोणाची? या प्रकरणात पतीच्या प्रेयसीवर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते का? न्यायालयं काय म्हणतं, जाणून घेऊ

हे प्रकरण दिल्ली उच्च न्यायालयातीलआहे. यात प्रेयसीवर एक सुखी संसार उध्वस्त करण्याचा आरोप आहे. एका वैवाहिक जोडप्याचे नाते संपवण्यास कारणीभूत ठरल्याचा आरोप तिच्यावर करण्यात आला. त्या प्रेयसीने २०२१ साली त्या पुरुषाच्या आयुष्यात प्रवेश केला. तिने तंत्र व्यावसायिक उपक्रमांपैकी एका ठिकाणी विश्लेषक म्हणून प्रवेश केला, तेव्हा या साऱ्या घटनाक्रमाची सुरुवात झाली.

पत्नीने आरोप केला की, तिच्या पतीच्या आयुष्यात प्रेयसी म्हणून आलेल्या त्या महिलेला तिच्या कृतीचे परिणाम माहीत होते. असे असतानाही तिने त्याच्याशी जाणीवपूर्वक जवळीक निर्माण केली. ती वारंवार त्यांच्या घरी येऊ लागली आणि कामानिमित्त प्रवास करताना पतीची ती एकमेव सहप्रवासी झाली. २०२३ साली पत्नीला या दोघांमधल्या नात्याबद्दल संशय आला. तिने त्या दोघांमधील एक संवाद ऐकला आणि नंतर पतीच्या लॅपटॉपवर त्यांचे ई-मेल्स पाहिले, त्यातूनच त्यांच्या विवाहबाह्य नात्याची खात्री झाली. सासरच्या मंडळींनी आणि इतर नातेवाईकांनी हस्तक्षेप करूनही ती दुसरी महिला (प्रेयसी) नातं तोडण्यास तयार नव्हती. अखेरीस, तो पुरुष तिच्यासोबत अनेक सामाजिक कार्यक्रमांना जाऊ लागला आणि २०२५ च्या एप्रिल महिन्यात त्याने पत्नीपासून घटस्फोट मिळावा, यासाठी अर्ज दाखल केला.पत्नीने दिवाणी न्यायालयात खटला दाखल केला आणि आपल्या पतीच्या कथित प्रेयसीकडून नुकसानभरपाई मागितली. पत्नीने आरोप केला की, या महिलेने तिच्या वैवाहिक नात्यातील प्रेम आणि सहवास हिरावून घेतला. तिचा आरोप होता की, त्या दुसऱ्या महिलेच्या दुष्ट आणि हेतुपुरस्सर वर्तनामुळे तिने आपल्या पतीचं प्रेम गमावलं. त्या महिलेनं जाणूनबुजून आणि हेतुपूर्वक त्यांच्या विवाहात हस्तक्षेप केला, त्यामुळे हे नातं अखेर संपुष्टात आलं. या दांपत्याचं लग्न २०१२ साली मार्च महिन्यात झालं होतं. २०१८ साली त्यांना जुळी मुलं झाली आणि २०१९ पासून पत्नी कुटुंबाच्या डायग्नोस्टिक व्यवसायात संचालक म्हणून कार्यरत होती.

या प्रकरणात लागू झालेली कायदेशीर संकल्पना म्हणजे 'Alienation of Affection'. ही संकल्पना अँग्लो-अमेरिकन कॉमन लॉ मधून घेण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ती यापूर्वीच्या काही निर्णयांमध्ये मान्य केली. ही संकल्पना अशा दिवाणी स्वरूपाच्या चुकीशा संबंधित आहे, जिथे तिसरी व्यक्ती जाणूनबुजून एखाद्याच्या वैवाहिक नात्यात हस्तक्षेप करते आणि त्यामुळे एका जोडीदाराचं दुसऱ्याबद्दलचं प्रेम आणि आपुलकी कमी होते किंवा संपते.न्यायाधीशांनी स्पष्ट केलं की, अशा दाव्याला मान्यता मिळवण्यासाठी पत्नीला खालील गोष्टी सिद्ध कराव्या लागतील;

पतीचे विवाहबाह्य संबंध हा त्याचा पूर्णपणे स्वेच्छेने घेतलेला निर्णय नसून, तो प्रेरित किंवा प्रेयसीच्या दबावाखाली घेण्यात आलेला होता.सुरुवातीला असे दावे फक्त पतींना करता येत होते. पण, काळानुसार ही संकल्पना दोन्ही जोडीदारांना 'लिंगभेद न ठेवता' लागू करण्यात आली.

पतीचा युक्तिवाद- स्वातंत्र्य आणि वैयक्तिक हक्क

पतीने न्यायालयात असा युक्तिवाद केला की, त्यालाही वैयक्तिक स्वातंत्र्याचाअधिकार आहे. तो ज्या महिलेशी नात्यात होता ती त्याची पत्नी नाही, म्हणजेच ती वैवाहिक नात्याबाहेरील तिसरी व्यक्ती आहे. त्यामुळे त्या महिलेवर त्याच्या पत्नीसंबंधित कोणतीही कायदेशीर जबाबदारी नाही. त्याने पुढे असा दावा केला की, सर्वोच्च न्यायालयाने २०१८ साली दिलेल्या एका महत्त्वाच्या निर्णयात व्यभिचारालागुन्हा मानणारा कायदा रद्द केला होता. त्या निर्णयानुसार, एखादा विवाहित पुरुष किंवा स्त्री जर परस्पर संमतीने कोणाशी तरी नातं ठेवत असेल, तर ते गुन्हा ठरत नाही.म्हणूनच त्याने सांगितलं की, राज्य किंवा न्यायालयाने प्रौढ आणि परस्पर संमतीने नातं ठेवणाऱ्या व्यक्तींच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप करू नये. हे त्यांचं वैयक्तिक स्वातंत्र्य आहे आणि संविधान त्यांचं संरक्षण करतं.

थोडक्यात सांगायचं तर, पतीचा मुद्दा असा होता की, त्याचं वैयक्तिक जीवन आणि त्याचे संबंध हे त्याच्या आणि त्या महिलेच्या परस्पर संमतीवर आधारित आहेत; त्यामुळे राज्य किंवा त्याची पत्नी त्यात कायदेशीर हस्तक्षेप करू शकत नाहीत.

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी आपल्या निरीक्षणात नमूद केलं की, अशा प्रकारचा दिवाणी दावा ग्राह्य धरला जाऊ शकतो आणि तो केवळ फॅमिली कोर्टातच नव्हे, तर दिवाणी न्यायालया देखील चालवला जाऊ शकतो.

न्यायालयानं स्पष्ट केलं की, भारतीय कायद्यात एखाद्या तिसऱ्या व्यक्तीकडून वैवाहिक नातं बिघडवल्याबद्दल थेट दिलासा देणारी कोणतीही तरतूद नसली तरी, अशा दाव्यांवर कायदेशीर बंदी देखील नाही. म्हणूनच अशा प्रकरणाचा हा कायदेशीर पाया मानला जाऊ शकतो. न्यायालयाने फौजदारी कारवाई आणि नागरी परिणाम यांमध्ये स्पष्ट भेद केला आणि म्हटलं

'वैयक्तिक स्वातंत्र्याला फौजदारी शिक्षा लागू होत नाही, पण त्यातून नागरी परिणाम निर्माण होऊ शकतात.' म्हणजेच, जर एखाद्या जोडीदाराला तिसऱ्या व्यक्तीच्या हस्तक्षेपामुळे वैवाहिक नात्यात हानी किंवा कायदेशीर दुखापत झाली असेल, तर त्याला नागरी कायद्यानुसार आर्थिक नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे पायंडे

या प्रकरणात न्यायमूर्तींनी सर्वोच्च न्यायालयाच्या दोन महत्त्वाच्या निर्णयांचा आधार घेतला होता. या दोन्ही निर्णयांनी विवाहबाह्य संबंध, वैवाहिक नात्यातील हस्तक्षेप आणि कायदेशीर जबाबदारी याबाबत महत्त्वपूर्ण स्पष्टता दिली.

पहिला निर्णय २०१३ मधील होता. या प्रकरणात एका पतीवर क्रूरतेचा आणि पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच आरोप ठेवून शिक्षा झाली होती. या प्रकरणाचा संबंध त्या पतीच्या विवाहबाह्य संबंधाशी होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही शिक्षा रद्द केल्या आणि पतीला निर्दोष ठरवलं. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्ट केलं होत की, नैतिकता ही फौजदारी कायद्याद्वारे लागू केली जाऊ शकत नाही, परंतु अशा वर्तनातून नागरी जबाबदारी उद्भवू शकते. म्हणजेच, एखाद्याचं वर्तन समाजाच्या नैतिक निकषांनुसार चुकीचं वाटलं तरी ते गुन्हा ठरत नाही, मात्र त्यातून नुकसानभरपाई सारखी नागरी जबाबदारी लागू होऊ शकते.

या निर्णयातAlienation of Affection या संकल्पनेवरही चर्चा झाली. याचा अर्थ असा की, एखाद्या वैवाहिक नात्यात तिसऱ्या व्यक्तीने अनुचित हस्तक्षेप केल्यामुळे त्या पती-पत्नीच्या नात्यात आलेला दुरावा. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं की, 'Alienation of affection संबंधी कारवाई कोणत्याही व्यक्तीच्या वैवाहिक नात्यातील अनुचित हस्तक्षेप किंवा आघाताविरुद्ध करता येते. मग ते विवाहबाह्य संबंधाशी जोडलेले असोत किंवा नसोत.' याचा अर्थ असा की, जर तिसऱ्या व्यक्तीच्या वर्तनामुळे पती-पत्नीच्या नात्यात तणाव निर्माण झाला, तर त्या व्यक्तीविरुद्ध नागरी कारवाई करता येऊ शकते.

दुसऱ्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने आणखी स्पष्ट केलं की, जर एखादी महिला किंवा एखादा पुरुष आधीपासून विवाहित आहे हे माहीत असूनही त्याच्याबरोबर नातं ठेवते, तर ती त्या नात्याला live-in relationship म्हणू शकत नाही आणि तिला Domestic Violence Act अंतर्गत कोणतंही कायदेशीर संरक्षण मिळत नाही. म्हणजेच, विवाहित पुरुषाबरोबरच नातं हे कायदेशीरदृष्ट्या मान्यता प्राप्त सहजीवन मानलं जात नाही, त्यामुळे त्या महिलेला पत्नीप्रमाणे हक्क किंवा संरक्षण मिळत नाही.

नैतिकता आणि कायदेशीर जबाबदारी हे दोन वेगळे मुद्दे आहेत. फौजदारी कायदा नैतिकतेच्या आधारावर शिक्षा देऊ शकत नाही, पण अशा वर्तनातून वैवाहिक नात्यावर परिणाम झाल्यास नागरी जबाबदारी निर्माण होऊ शकते, त्याचा विचार न्यायालय नक्कीच करेल. न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी आपल्या निर्णयात अत्यंत स्पष्टपणे सांगितलं की, फॅमिली कोर्टाचा अधिकार केवळ वैवाहिक नात्याशी संबंधित त्या प्रकरणांपुरताच मर्यादित असतो.

# तुझे आहे तुजपाशी

आपल्या संस्कृतीमध्ये संस्कारांना अत्यंत महत्त्व आहे. मात्र हेच संस्कार व्यक्तीसापेक्ष योग्य आहेत का? याचा विचार ते अंगीकारणा?या व्यक्तीलाही ब?याचदा समजत नसतं. अशा संस्कारांच्या दडपणात अडकलेल्या कित्येक व्यक्ती, विशेषत महिलांचे मानसिक स्वास्थ्य आज गंभीर होत चालले आहे.

नलिनी काकूंनी (नाव बदलले आहे) गेल्या महिन्यात वयाची साठी गाठली होती. त्यांच्या घरी त्या आणि त्यांचे यजमान सुरेश काका (नाव बदलले आहे) असे दोघेच राहत होते. दोघंही नोकरी करत होते. सुरेश काकांनी आपल्या नोकरीचा कार्यकाळ पूर्ण केला. नलिनी काकूंनी मात्र आपल्या पन्नाशीनंतर प्रकृतीच्या कुरबुरीमुळे नोकरीमध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. त्या दोघांना एकुलता एक मुलगा होता, जो शिक्षणासाठी परदेशात गेला आणि तिथेच सेटल झाला. मुलाचं लग्न होऊन आता जवळपास दोन वर्षे झाली होती, पण हे दोघं काही त्याच्याकडे जाऊन आले नव्हते. 'काय सांगू? माझा डायबिटीस, मायग्रेन आणि बीपी यामुळे मी अक्षरश कुठेही लांबच्या प्रवासाचा आनंद घेऊ शकत नाही. नाहीतर पूर्वी नोकरीला होते तेव्हा मी खूपच ॲक्टिव्ह होते.'' समुपदेशनाला आल्यानंतर नलिनी काकू स्वतबद्दल सांगत होत्या. त्यांच्या बरोबर त्यांची समवयस्क मैत्रीण शालिनी काकू (नाव बदलले आहे) त्यांना सोबत म्हणून आलेल्या होत्या.

'काकांना यायला नाही जमलं का?'' असं त्यांना विचारताच काकूंच्या डोळ्यांत पटकन पाणी आलं. नलिनी काकू या त्यांच्या फॅमिली डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार समुपदेशनाकरिता आल्या होत्या. त्यांच्या प्राथमिक माहितीच्या आधारावर त्यांना काय त्रास असेल, याची कल्पना आली होतीच. त्यांना समुपदेशन करणं आवश्यक होतं.

काकूंचा प्रेमविवाह होता आणि त्या वैवाहिक जीवनात सुखीही होत्या. घरची सांपत्तिक स्थितीही 'अत्युत्तम' या प्रकारात मोडत होती, पण काकूंच्या म्हणण्याप्रमाणे त्या दोघांत आलबेल नव्हतं, सुखसंवादच घडत नव्हता. 'आमच्या नवराबायकांमधले ताणतणाव माझ्या पद्धतीने सोडविण्याचा प्रयत्न केला. सुरेश भरपूर रागीट आणि हेकट स्वभावाचा आहे. आमच्या तिघांमध्ये मुलासमोर आणि नातेवाईकांमध्येही खिल्ली उडवणं त्याचं चालू असायचं. देवाच्या कृपेने तो धडधाकट आहे, हेल्दी आहे आणि त्याचाच त्याला अभिमान आहे. म्हणून माझ्या छोटया मोठया प्रकृतीच्या कुरबुरींना त्याने कायम 'नाटकं' हे नाव दिलं. माझ्या मेनोपॉजमध्ये मला भरपूर मानसिक त्रास झालेला. त्याचीही त्यांनी खिल्ली उडवली. तुझ्यामुळे आपला मुलगाही मुळमुळ झालेला आहे. जरा शिस्त लाव त्याला.'' असं बोलून मला खूप दुखवायचा. वाटायचं की, घटस्फोट द्यावा आणि मुलाला घेऊन दूर जावं. तेव्हा नुकतंच इंटरनेट आणि फेसबुक आलेलं. तेव्हा शालन फेसबुकवर भेटली. माझ्याच एरियात राहणारी आणि स्वतंत्र विचारांची. आमची मैत्री जमली आणि घट्ट झाली.'' नलिनी काकू हळव्या होऊन सगळं आडपडदा न ठेवता सांगत होत्या. तेव्हा शालिनी काकूंनीही त्यांच्या संवेदनशील स्वभावाबद्दल आणि एकंदरीत नवराबायकोच्या विसंवादाबद्दल काही गोष्टी, घटना उघड केल्या, ज्यामध्ये नलिनी काकूंना मनस्ताप झाला होता. ब?याच छोटया मोठया इच्छांना मुरड घालावी लागल्याने त्या नाराज राहायला लागल्या. त्यातच सुरेश काकांचे कधीही खट्टू होणे, खिल्ली उडवणे, पत्नीच्या मनाला समजू न शकणे या सर्वांचा व्हायचा तोच परिणाम काकूंवर झाला आणि त्या नैराश्यात जायला लागल्या, पण सुदैवाने



शालिनी काकूंनी त्यांची ढासळती मनःस्थिती वेळीच ओळखली आणि त्यांच्या पाठीशी खंबीर उभ्या राहिल्या.

'मी नलिनीला डिप्रेशनमध्ये जाऊच दिलं नसतं. कारण मीही त्या भयानक अनुभवातून गेलेले आहे.'' पहिल्यांदाच शालिनी काकू व्यक्त झाल्या होत्या. त्यांनी स्वतविषयी सांगताना त्यांच्याही भूतकाळाचा थोडक्यात परामर्श करून त्यांना मानसोपचारांनी कसं बरं वाटलं तेही सांगितलं. या दोघींचा अनुभव तसा बघायला गेला तर जवळपास सारखाच होता. दोघांचेही पती दोघींना मानसिक सुख द्यायला कमी पडत होते, पण शालिनी काकूंच्या मिस्टरांना वेळीच त्यांची होणारी चूक कळली आणि ते काकूंच्या मानसोपचारांवेळी त्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहिले.

नलिनी काकू त्याबाबतीत एकटया होत्या.

'मला एकतर कळतंय, माणूस जन्माला एकटा येतो आणि जाईपर्यंतही एकटा असतो. जर हा महत्त्वाचा प्रवास एकटयानेच करायचा असेल तर आहे ते आयुष्य का दुस?यावर अवलंबून ठेवायचं?'' असं बोलून नलिनी काकू थांबल्या. 'माहीत आहे. आयुष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर जिथे सगळ्या जबाबदा?या संपल्यावर तर स्वतचा विचार करायला काय हरकत आहे? कारण आपण आपली काळजी घेतली तर इतरांवर आपलं ओझंही होणार नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे जी व्यक्ती वयाच्या सत्तरीनंतरही जर हेकेखोर असेल, आत्मप्रौढी असेल तर ती बदलू शकते किंवा नाही हा त्या व्यक्तीचा प्रश्न आहे, पण म्हणून आपण आशा लावून बसणं आणि त्या व्यक्तीवर आपलं स्वास्थ्य अवलंबून ठेवणं, आपल्या छोटया इच्छा आणि कर्तव्य अवलंबून ठेवणं हे योग्य आहे का?'' असं त्यांना विचारताच काकूंनी मानेनेच नकार दर्शवला. आपल्या संस्कृतीमध्ये संस्कारांना अत्यंत महत्त्व आहे. 'चांगले', 'आदर्श' या विशेषणांमधून ते आपल्या सगळ्यांवर बिंबवलेही गेलेले आहेत. मात्र हेच संस्कार 'व्यक्तीसापेक्ष योग्य आहेत का याचा विचार ते अंगीकारणा?या व्यक्तीलाही ब?याचदा समजत नसतं. अशा इतरांना खुश करण्याच्या नादात कित्येक व्यक्ती, विशेषत महिलांचे मानसिक स्वास्थ्य आज गंभीर होत चालले आहे.

नलिनी काकूंना हे उशिरा का होईना, समजून चुकलं. नियमित सत्रांना येतानाच त्यामध्ये सांगितलेल्या काही गोष्टींवर कामही करायला लागल्या. सुरेश काकांच्या रागाला, खिल्ली उडवण्याच्या बोलण्याला दुर्लक्ष करायला शिकल्या आणि स्वतचं मन स्वतच्या छंदांमध्ये रमवायला लागल्या. शालिनी काकूंची भरभक्कम साथ त्यांना होतीच. हळूहळू त्या स्वतंत्र निर्णय घेत होत्या आणि एक दिवस सत्रामध्ये त्यांनी त्यांचा मुलाकडे परदेशी जाण्याचा निर्णय ऐकवला. सुरेश काका दुसरीकडे बहुतेक आपल्या बायकोमधला बदल टिपत होतेच. त्यांनी त्यांच्या पुरुषी अहंकाराला अनुसरून पुन्हा मुलाकडे जाण्याबाबत नापसंती दर्शवली, पण नलिनी काकू मुलाकडे जाण्याच्या निर्णयावर ठाम राहिल्या त्या वेळी मात्र सुरेशकाका तयार झाले आणि दोघंही मुलाकडे काही महिन्यांसाठी राहायला परदेशी निघून गेले.

# हरिततेचा आगळा संदेश

भारताचा प्रत्येक कोपरा हिरवळीनं भरून जावा हा उद्देश मनात बाळगून जगाला शांतता व हरिततेचा संदेश देणारे 'इनोव्हेशन मॅन' श्याम चौरसिया यांनी पर्यावरणपूरक बॉम्ब तयार केला आहे. बियाण्यांनी युक्त असा हा बॉम्ब जिथे रुजवला जाईल तेथील भूभाग हिरवागार करेल. हरिततेचा आगळा संदेश देणा?या उपक्रमाविषयी.

'इनोव्हेशन मॅन' म्हणून ओळखले जाणारे वाराणसीच्या श्याम चौरसियांनी 'ग्रीन न्यूक्लिअर बॉम्ब' बनविला आहे. हा पर्यावरणपूरक बॉम्ब बनवून त्यांनी जगाला शांतता व हरिततेचा संदेश दिला आहे. हा बॉम्ब जिथे पडेल तेथील भूभाग हिरवेगार करेल. पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने त्यांनी उचललेले हे ाढांतिकारक पाऊल नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

श्याम चौरसियांना दोन वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर ग्रीन न्यूक्लियर बॉम्ब तयार करण्यात यश मिळाले आहे. पाच फूट लांब आणि २५ किलो वजनाचा हा ग्रीन न्यूक्लिअर बॉम्ब एकाच वेळी अनेक कोटी झाडे उगवेल. यात बी-बियाणं, माती आणि सेंद्रिय खते यांचे मिश्रण आहे, जे जमिनीवर पडल्यावर मोठ्या भूभागाला हिरवेगार करेल. जे विमानातून ड्रॉप केल्यावर जमिनीवर पडण्यापूर्वी त्यात भरलेल्या शंभराहून अधिक वृक्ष-वनस्पतींच्या प्रजातींच्या एक कोटीहून अधिक बायोन्यूट्रिशन बिया असलेल्या कॅप्सूल्स खूप दूरपर्यंत पसरतील. हवेच्या संपर्कात येताच या बियांच्या कॅप्सूल्सना अंकुरणास मदत होईल. बियांचे विखुरणे नियंत्रित करण्यासाठी हा बॉम्ब इंटरनेटद्वारेही संचालित केला जाऊ शकतो. हा बॉम्ब बनविण्यासाठी श्याम यांना आयटीएम गिडा, गोरखपूरच्या इनोव्हेशन सेलची मदत मिळाली आहे. फायबर व धातूच्या बॉडीचा एक बॉम्ब बनवायला १.२५ लाख रुपये खर्च आला आहे.

३२ वर्षीय श्याम चौरसिया यांनी आपलं इंजिनीअरिंगचं शिक्षण अर्धवट सोडून पर्यावरण रक्षणाचा मार्ग निवडला.

बनारसच्या गंगेविषयी आणि निसर्गाविषयी असलेल्या प्रेमातून त्यांना प्रेरणा मिळाली आहे. या कामगिरीमुळे त्यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

याविषयी श्याम चौरसिया म्हणतात की, सध्याच्या काळात एकमेकांशी लढण्याऐवजी ग्रीन न्यूक्लिअर बॉम्बने पृथ्वीला हिरवेगार करण्यास मदत करणार आहे. माझी इच्छा आहे की, भारताचा प्रत्येक कोपरा हिरवळीनं भरून जावा आणि हा बॉम्ब त्या स्वप्नाचा एक भाग आहे.






# GPay, PhonePe बायबाय, लवकरच Zoho Pay वरून पेमेंट करता येणार

Zoho कंपनीने बिझनेस सॉफ्टवेअरच्या जगात राज्य करण्यास सुरुवात केली आहे, आता ती डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रात प्रवेश करत आहे. गुगल पे आणि फोनपे सारख्या मोठ्या खेळाडूंशी स्पर्धा करण्यासाठी ँदप्द लवकरच Zoho Pay नावाचे नवीन ॲप आणत आहे.

हे केवळ एक स्वतंत्र ॲप नसेल, तर Zoho च्या मेसेजिंग ॲप अरट्टाईमध्ये देखील असेल. म्हणजे चॅटिंग करताना पैसे पाठवा किंवा घ्या, ॲप न बदलता.

**Zoho Pay फीचर्स**

Zoho पेमेंट्स टेकचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवराम कृष्णन ईश्वरन म्हणाले की, सोपे, सुरक्षित आणि निर्वेध व्यवहार प्रदान करणे हे आमचे उद्दीष्ट आहे. अरट्टाईमध्ये इंटिग्रेटेड केल्याने चॅट विंडो न सोडता काम पूर्ण होईल.

Zoho आधीपासूनच व्यवसाय देयके आणि पॉईंट-ऑफ-सेल सोल्यूशन्स ऑफर करते. आता तिला या क्षेत्रात खोलवर जायचे आहे. ईश्वरन म्हणाले की, त्यांचा फिन्टेक दृष्टीकोन हळूहळू वाढणार आहे. पेमेंटपासून ते लेंडिंग, ब्रोकिंग, इन्शुरन्स आणि वेल्थटेकपर्यंत जातील. Zoho Pay व्यतिरिक्त, Zoho बिलिंग नावाचे एक नवीन इनव्हॉइसिंग आणि सबस्क्रिप्शन मॅनेजमेंट टूल देखील येत आहे.

Zoho पेरोलला बँकांशी खोलवर जोडत आहे जेणेकरून पेमेंट कलेक्शनपासून ते कॅश फ्लो मॅनेजमेंट आणि स्वयंचलित पेरोलपर्यंत सर्व काही एकाच ठिकाणी असेल. लहान व्यवसाय आणि ग्राहक दोघांसाठी कार्य करणारी एक कनेक्टेड आर्थिक प्रणाली तयार करणे हे ध्येय आहे.

**काही महिन्यांत लॉंच होणार**

२०२१ मध्ये अरट्टाई ॲप लॉंच करण्यात आले. हे एक स्वदेशी चॅट आणि सहयोग व्यासपीठ आहे, जे डेटा गोपनीयतेवर लक्ष केंद्रित करून तयार केले गेले आहे. आता झोहो पेचे एकत्रीकरण ही एक नैसर्गिक




पायरी आहे. ईश्वरन म्हणाले की, अराट्टाई हा ग्राहक आणि लहान व्यवसायांना जोडणारा फ्रंट एंड आहे. चॅटमध्येच व्यवहार केल्याने युजर्सचा अनुभव चांगला होईल.

Zoho Pay सध्या अंतर्गत चाचणीत आहे. येत्या काही महिन्यांत ते टप्प्याटप्प्याने प्रक्षेपित केले जाईल. प्रथम अरट्टाईद्वारे आणि नंतर स्वतंत्र ॲप म्हणून. ईश्वरन म्हणाले की, Zoho नेहमीच अशी उत्पादने बनवते जी वैयक्तिक आणि एंटरप्राइझ युजर्ससाठी योग्य असतात. झोहो पेकडून आर्थिक सेवांमध्ये हेच तत्त्व स्वीकारले जात आहे.

भारतातील डिजिटल पेमेंटची बाजारपेठ वेगाने वाढत आहे. गुगल पे, फोनपे, पेटीएम सारख्या ॲप्सचे वर्चस्व आहे. पण Zoho च्या आगमनाने एक नवीन वळण येईल. विशेषतः अराट्टाईमधील चॅट पेमेंटच्या सुविधेमुळे, लहान व्यापारी सहजपणे बिले निकाली काढू शकतील. प्रायव्हसीवर भर दिल्यास युजर्सचा विश्वास वाढेल. ँदप्द आधीपासूनच व्यवसाय टूल्स ऑफर करते, आता ते देयके जोडेल आणि संपूर्ण पॅकेज देईल. एकूणच, Zoho पेद्वारे पेमेंट करणे सोपे आणि सुरक्षित असेल.